# १

# शिक्षणाचे समाजशास्त्र

**प्रकरणाची रचना :-**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ शिक्षणाचे समाजशास्त्र - अर्थ
१.३ शिक्षणाचे समाजशास्त्र - व्याप्ती
१.४ शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक
१.५ शिक्षणाचे समाजशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता
१.६ समाजांत शिक्षणाची कार्ये
१.७ स्वाध्याय

## १.० उद्दिष्टे :-

हा घटक वाचल्यानंतर तुम्ही

- शिक्षणाचे समाजशास्त्राचा अर्थ सांगू शकाल.
- शिक्षणाचे समाजशास्त्राची व्याप्ती करु शकाल.
- शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक सांगू शकाल.
- शिक्षणाचे समाजशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता याचे विश्लेषण करु शकाल.
- समाजात शिक्षणाच्या कार्याची उदाहरणे देऊन स्पष्टीकरण करु शकाल.

## १.१ प्रस्तावना :-

प्रत्येक व्यक्ती स्वतःचे स्वतः फारच कमी प्रमाणात अध्ययन करु शकते. अध्ययन प्रक्रियेत इतरांच्या भूमिकेचा महत्त्वाचा कार्यभाग असतो. इतर व्यक्तींकडून ज्ञान मिळवून व्यक्ती अधिक अध्ययन करते. यामुळेच इतर व्यक्तींचे अस्तित्त्व महत्त्वाचे ठरते. म्हणून शिक्षण मिळवण्याची प्रक्रिया ही नेहमी सामाजिक प्रक्रिया आहे.

'Sociology' ही संज्ञा लॅटीन शब्द 'socious' याचा अर्थ सहचर, सोबती किंवा सांगांती व ग्रीक शब्द 'Logus' म्हणजे पद्धतशीर अभ्यास किंवा शास्त्र म्हणून 'sociology'

म्हणजे माणसांच्या सहजीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र. एक सामाजिक प्राणी या नात्याने मनुष्याचा समाजाशी म्हणजेच अन्य व्यक्तींशी, समूहाशी व संस्थांशी सतत संबंध येत असतो याचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो समाजशास्त्र हे सामाजिक वर्तन, संबंध, संस्था इ. चा मूलभूत नियमांचे अभ्यास करणारे शास्त्र आहे.

Education ही संज्ञा लॅटीन शब्द ducere to lead out – व्यक्तीच्या जन्मजात सुप्त गुणांना जागृत करुन चालना देऊन त्यांचा अविष्कार करणे, विकास करणे. वेबस्टर - शिक्षण ही एक अध्यापनाची प्रक्रिया आहे. शिक्षण देणे म्हणजे ज्ञान, कौशल्य चारित्र्य .. इ. चा विकास करणे. वरील सर्व व्याख्यांवरुन असे दिसून येते की शिक्षणाचा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांचे ज्ञान, कौशल्या किंवा त्यांच्या चारित्र्याचा विकास करणे.

बिल बेटी-शिक्षणाचा हेतू, 'काय' विचार करावा या पेक्षा 'कसा' विचार करावा - आपले विचारांमध्ये सुधारणा कशी होईल, इतरांसारखे स्मरणावर भर देण्यापेक्षा आपला - आपल्यालाच विचार करता आला पाहिजे हा असला पाहिजे.

**शिक्षण व समाजशास्त्र यातील संबंध :-**

एमिल डुरखिम यांना प्रथमच शिक्षणाचा विचार सामाजिक दृष्टीकोनातून पाहण्याची गरज वाटली. त्यांच्या मते शिक्षण व त्याची समाजातील कार्ये, एक आवश्यक सामाजिक वैशिष्ट्य आहे. याचा परिणाम म्हणून इतर कोणत्याही शास्त्रापेक्षा शिक्षणाची उपपत्ती समाजशास्त्राशी अधिक सुस्पष्टरित्या संबंधित आहेत.

एमिल डुरखिम यांनी शिक्षण ही स्थिर घटना (Phenomenon) गतीमान आणि सतत परिवर्तनशील प्रक्रिया आहे यावर भर दिला.

शैक्षणिक समाजशास्त्र ही शाखा शिक्षणाचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास करते. शै. समाजशास्त्रात शिक्षणातून सामाजिक तत्त्वे, प्रक्रिया व संस्था त्यांची सामाजिक कार्ये ठरवली जातात. व त्यालाच सामाजिक स्वरुप प्राप्त होत असते. शिक्षणाचा सामाजिक स्वरुपात विचार केल्यावरच शैक्षणिक समाजशास्त्र स्पष्ट होऊ शकते.

## १.२ शिक्षणाचे समाजशास्त्र - अर्थ :-

शिक्षण प्रणालीत / व्यवस्थेत सामाजिक प्रक्रियां व सामाजिक आकृतीबंधांचे शास्त्रीय दृष्टीकोनातून केलेले विश्लेषण अशी शिक्षणाचे समाजशास्त्राची व्याख्या करु शकतो.

बुकोव्हर व गॉत्लेब - शिक्षण हे सामाजिक कृतींचे एकत्रीकरण व समाजशास्त्र म्हणजे आंतरक्रियांचे विश्लेषण होय. शैक्षणिक प्रक्रिया औपचारिक व अनौपचारिक परिस्थितीत सातत्याने चालू रहाते. सामाजिक दृष्टीकोनातून, शिक्षणात मानवी आंतरक्रियांचे विश्लेषण करताना दोहोंतील परिस्थितींचा व शिक्षण प्रणालीत मानवी संबंधांचे शास्त्रोक्त पद्धतीने सामान्यीकरण करण्याचा मार्ग दर्शविला जाऊ शकतो.

शिक्षणाच्या समाजशास्त्रात सार्वजनिक / सामाजिक संस्था व व्यक्तीचे अनुभव याचा शिक्षणावर कसा परिणाम होतो व त्यातून होणारी फलनिष्पत्ती यांचा अभ्यास केला जातो. यात आधुनिक औद्योगिक समाजाच्या सार्वजनिक नि:शालेय प्रणालींवर अधिक भर आहे. यामध्ये उच्च शिक्षणाचा विस्तार, प्रौढ व निरंतर शिक्षणाचा समावेश आहे. ही तात्विक व सामाजिक संकल्पना असून त्यांची विचारधारा, अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्रीय तंत्रांची रुजवणूक व ज्ञानाचे व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्त्वांचा व संस्कृतीचे सामाजिक पुर्ननिर्माण याबाबतही निर्देश करते.

शिक्षक व विद्यार्थी यांच्यात वर्गांतर्गत होणारे संबंध, कृती व प्रतिक्रियांशी शिक्षणाचे समाजशास्त्र संबंधित आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षणाचे समाजशास्त्राचा अर्थ सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १.३ शिक्षणाचे समाजशास्त्र - व्याप्ती :-

शिक्षणाच्या समाजशास्त्राची व्याप्ती व्यापक आहे.

- शिक्षणाचे समाजशास्त्र सामान्य संकल्पनांशी संबंधित आहे. जसे समाज, संस्कृती, समुदाय वर्ग, पर्यावरण, समाजीकरण आंतरराष्ट्रीयकरण, वसाहत, स्विकृतीकरण, सांस्कृतिक पश्चायन, उपसंस्कृती, दर्जा, भूमिका इ.
- यामध्ये शिक्षणाशी संबंधित सामाजिक वर्ग, राज्य, सामाजिक दबाव / बल, सामाजिक परिवर्तन, संरचनेतील भूमिकांच्या विविध समस्या, संपूर्ण समाज प्रणालीतील संबंधित भूमिकांचे विश्लेषण व शाळेचा सूक्ष्म समाज जसा अधिकार, निवड व अध्ययनाचे संघटन, प्रवाह, अभ्यासक्रम इ. अनेक गोष्टींचा समावेश होतो.
- निरनिराळ्या भौगोलिक व मानववंशशास्त्राच्या संदर्भात, शैक्षणिक परिस्थितीच्या विश्लेषणाचा अभ्यास करते. उदा. ग्रामीण शहरी, व आदिवासी क्षेत्रातील शैक्षणिक परिस्थिती, देशातील / जगातील निरनिराळ्या भागातील वंश, संस्कृती इ. पार्श्वभूमीचा अभ्यास शिक्षणाचे समाजशास्त्रात होतो.

- विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेच्या प्रकारानुसार, अध्यापन परिणामकारक होण्यासाठी विविध अध्यापनाच्या / शिक्षणाच्या पद्धतींचे आकलन होण्यास शिक्षणांचे समाजशास्त्र आपणांस मदत करते.
- विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या प्रकारानुसार, अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यासही यामध्ये केला जातो. उदा. IB, ICSE, SSC, म्युन्सिपल शाळा.
- विविध सामाजिक संस्था जसे कुटुंब, शाळा इ. चा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम यांचे आकलन होण्यास मदत मिळते.
- शिक्षणाचे समाजशास्त्र सामाजिक वर्ग, संस्कृती, भाषा, पालकांचे शिक्षण, व्यवसाय व विद्यार्थ्यांची संपादणूक यांच्या संबंधाचा अभ्यास करते.
- त्याबरोबर शाळेची संरचना, भूमिका व समवयस्क गटाचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करते.
- वंशवाद, संप्रदायवाद, लिंगभेद इ. समस्यांचे आकलन होण्यासाठी शिक्षणाचे समाजशास्त्र मदत करते.
- विद्यार्थ्यांच्या समाजीकरणात शाळेच्या भूमिकेचा अभ्यास करते.
- विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा खरा हेतू, जागतिकीकरण इ. चा विकास करण्याचे मार्ग सुचवते.
- संशोधनात्मक अभ्यासाशी संबंधित नियोजन, संघटन व शिक्षणातील निरनिराळ्या सिद्धांतांची उपयोगिता यावर शिक्षणाचे समाजशास्त्र भर देते.
- वरील सर्व बाबी, शिक्षण व समाजशास्त्र या दोहोंशी संबंधित आहे. ही एक अविभाज्य शाखा असून समाजातील समस्यांवर लक्ष केंद्रित करते.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षणाचे समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.४ शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक :-

समाजशास्त्राची शैक्षणिक समाजशास्त्र ही एक शाखा असून त्यात समाज व शिक्षण यातील संबंधाच्या समस्यांचा अभ्यास केला जातो.

अध्ययनार्थींना कठीण प्रसंगी सामोरे जाता येईल या दृष्टीने ही शाखा विकसित झाली. शैक्षणिक कार्यक्रमांचे नियोजन व त्याची पूर्तता करण्यासाठी परिणामकारक पद्धतीचा उपयोग करण्यासाठी समाजातील संशोधनाच्या निष्कर्षांचा उपयोग शैक्षणिक, समाजशास्त्र करते.

सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास करणे हा शैक्षणिक समाजशास्त्राचा प्रमुख हेतू आहे. फ्रन्सिस ब्राऊनच्या मतानुसार, 'व्यक्तीच्या अनुवंशिक सामाजिक जाणिवेमधील सहभागित्वातूनच सर्व प्रकारचे शिक्षण घडत असते.' त्याच्या मते, शैक्षणिक समाजशास्त्र ही एक अशी शाखा आहे की, ज्यामध्ये शिक्षण प्रक्रियेत सामान्य तत्त्वे आणि समाजशास्त्रातील शोधांचे /निष्कषांचे उपयोग केला जातो.

शैक्षणिक समाजशास्त्र ही शाखा शिक्षणाचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास करते. शैक्षणिक समाजशास्त्रात शिक्षणातून सामाजिक तत्त्वे, प्रक्रिया व संस्था त्यांची सामाजिक कार्ये ठरवली जातात. व त्यालाच सामाजिक स्वरुप प्राप्त होते.

शिक्षण प्रणालीतील, सामाजिक तत्त्वे व समस्यांचे निराकरण करण्याच्या पद्धतींचे उपयोजन शैक्षणिक समाजशास्त्र करते.

व्यक्ती व समाजातील निरनिराळ्या घटकांच्या आंतरक्रियांचे महत्त्व यावर शैक्षणिक समाजशास्थ प्रकाश टाकते. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगती स्पष्ट करते. शालेय व शैक्षणिक समस्या ह्या समाजाच्या समस्या आहेत. या दृष्टीने पाहिले जाते. शिक्षण कोणत्या प्रकारचे दिले पाहिजे? अभ्यासक्रम कोणता असला पाहिजे? मुले अपराधी / कर्तव्यचुकार का बनत चालली आहेत? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शैक्षणिक समाजशास्त्र करते.

शैक्षणिक समाजशास्त्र शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाच्या असलेल्या संस्था, संघटना आणि सामाजिक आंतरक्रियांवर प्रकाश टाकते. ही शाखा व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्यासाठी शैक्षणिक आंतरक्रियांचा अशा प्रकारे उपयोग करते की जेणेकरुन व्यक्तीचा सामाजिक विकास होईल.

शैक्षणिक समाजशास्त्राने शिक्षणाचे सामाजिक स्वरुप जरी प्रत्येकाला स्पष्ट केले असले तरी ध्येयांनुसार शिक्षणाच्या नियोजनाचे मार्गदर्शन, शैक्षणिक समाजशास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ यांनी केलेले संशोधन व त्यानुसार मिळवलेले तात्विक ज्ञान यामुळे शैक्षणिक समाजशास्त्राचा योग्य विस्तार किती आहे याबाबत गोंधळ उडोला दिसतो. शैक्षणिक समाजशास्त्राच्या शाखेत कोणकोणत्या प्रकारच्या संशोधनांचे वर्गीकरण करता येईल याबाबत निरनिराळ्या तज्ञांची मतांतरे आढळून येतात.

यामुळेच शिक्षणाचे समाजशास्त्र या वेगळ्या ज्ञान शाखेचा विचार सुरु झाला लवकरच शिक्षणाचे समाजशास्त्र ही ऐतिहासिक घटना बनली. 1963 साली शैक्षणिक समाजशास्त्राचे नियतकालिक (Journal) हे शिक्षणाचे समाजशास्त्राचे नियतकालिक बनले.

शिक्षण प्रणालीत सामाजिक प्रक्रिया आणि सामाजिक आकृतीबंध यांचे शास्त्रीय दृष्टीकोनातून केलेले विश्लेषण अशी शिक्षणाचे समाजशास्त्राची व्याख्या करु शकतो.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक स्पष्ट करा.

## १.५ शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता :-

प्रत्येक समाजाच्या स्वतःच्या बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक गरजा असतात आणि त्या गरजा भागविण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. संसाधनांचे संवर्धन, पर्यावरणाचे संरक्षण, जागतिकीकरण इ. आजच्या समस्या आहेत. म्हणून निरनिराळ्या गरजा पुरविण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. ज्याप्रमाणे समाजाच्या गरजा बदलतात. त्याप्रमाणे शिक्षण सुद्धा बदलत रहाते. म्हणून शिक्षणाचे समाजशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. शिक्षणाचे समाजशास्त्र आकलनास मदत करते.

१) शाळा व शिक्षकांची कार्ये व त्यांचे सामाजिक संबंध, सामाजिक प्रगती व विकास.
२) समाज व शाळांवर सामाजिक घटकांचा होणारा परिणाम.
३) व्यक्तींच्या जीवनावर सामाजिक घटकांचा होणारा परिणाम.
४) समाजाची सांस्कृतिक व आर्थिक आवश्यकतेनुसार अभ्यासक्रमाची बांधणी.
५) निरनिराळ्या राष्ट्रांत अस्तित्त्वात असलेली लोकशाही विचारसरणी.
६) आंतरराष्ट्रीय संस्कृतीची ओळख व त्याच्या उत्तेजनाची आवश्यकता.
७) संस्कृती व परंपरा ओळखून / जाणीवेतून विविध नियम व कायद्यांच्या निर्मितीद्वारे समाजाचा विकास.
८) सामाजिक व समायोजनास उत्तेजन देण्यासाठी आवश्यकता.
९) सामाजिक समूह, त्यांचे आंतर-संबंध व गतीमानतेचा व्यक्तींवर होणारा परिणाम.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षणाचे समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या आवश्यकतेचे विश्लेषण करा.

## १.६ समाजात शिक्षणाची कार्ये :-

ज्ञान मिळवणे व व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करणे हिच शिक्षणाची प्रमुख कार्ये आहेत हे अधिक काळ गृहीत धरुन चालणार नाही.

समाजशास्त्राच्या दृष्टीकोनातून शिक्षणाची खालील कार्ये आहेत.

**१) संस्कृती / परंपरांचा स्विकार आणि संक्रमण :-** हे करताना जाणीवपूर्वक, काळजीपूर्वक व निवडकपणे करणे गरजेचे आहे. कारण आजच्या लोकशाही व्यवस्थेत पूर्वीच्या काही निवडक परंपरांचाच स्वीकार त्यांचे मूल्य व आवश्यकतेनुसारचं केला पाहिजे. काही मूल्यांचा त्याग केला पाहिजे. उदा. आज सर्वधर्मसमभावाचा प्रसार करण्याची गरज आहे. सर्वधर्मसमभाव म्हणजे सर्व धर्माला (सत्य) समान प्राधान्य देणे किंवा धर्मांमध्ये सुसंवाद साधणे. आजच्या काळात 'सर्व धर्म समान आहेत' असा त्याचा अर्थ घेतला जातो. सर्व धर्मांचा देवाकडे जाण्याचे मार्ग निरनिराळे आहेत किंवा एकसमान अध्यात्मिक हेतू. सर्व धर्म हे मानवांचे / लोकांचे एकमेकांप्रती असलेली समाजातील नैतिक जबाबदारीवर भर देतात. त्याचबरोबर समाजातील बालविवाह, अस्पृश्यता इ. पासून दूर राहण्यासाठी शिक्षणाने प्रयत्न केले पाहिजेत.

शिक्षणाने खालीलप्रकारे मदत केली पाहिजे.

- व्यक्तीगत मूल्यांबाबत स्पष्टता / प्राप्ती मिळवली पाहिजे.
- आत्मसाक्षात्कार / आत्मपरिक्षण - मनन - एखाद्याचे हेतू व क्षमतांबाबत जागरुकता.
- आत्मसन्मान.
- सर्जनशीलतेने विचार.
- संस्कृतीतील गुणग्रहण - कला, संगीत, मानवता.
- कल्याणकरता जाणीव / कर्तव्याचा विकास - बौद्धिक व शारीरीक स्वास्थ.
- भौतिक पर्यावरणाशी संबंधित मूल्याबाबत स्पष्टता / प्राप्ती.
- आदर - मानव म्हणून एकमेकांबद्दल आदर ठेवणे.
- परिपूर्ण जीवन जगण्यासाठीची क्षमता.

**२) नवसामाजिक पद्धतींचा विकास :-** जीवन हे गतीमान आहे. यात सतत बदल घडून येत असतात. विज्ञान, तंत्रज्ञान, व संप्रेषणामुळे जीवनावर फार मोठा परिणाम झाला आहे. पारंपारिक मूल्यांच्या संवर्धनाबरोबरच नव्या मूल्यांची निर्मिती करणे हे सामाजिक व्यवस्थेला विकसित करण्यासाठी गरजेचे आहे. जिथे -

- नागरिक त्यांच्या संस्कृतीला चिटकून असतात आणि इतर संस्कृतीची निर्मिती करण्यास व्यापक दृष्टीकोन बाळगतील.
- जागतिक दृष्टीकोन वृद्धिंगत होईल.
- ज्ञान इतके आधुनिक झाले आहे की आर्थिक विकास आणि भौतिक व मानवी पर्यावरणाच्या जबाबदारीचे व्यवस्थापन बरोबरीनेच जात असतात.

**३) विधायक कार्ये व सर्जनशीलता चालना :-** शिक्षणाने योग्य व सर्जनशील व्यक्तींची निर्मिती करण्यास मदत केली पाहिजे. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार होऊ शकतो. व बौद्धिक क्रांती घडून येऊन आपली आर्थिक प्रगती होऊ शकते. त्यामुळे शिक्षणाने -

- उदरनिर्वाहासाठी कमवण्याची क्षमता - व्यावसायिक शिक्षण.
- बौद्धिक व शारीरीक कौशल्याचा विकास - क्रियात्मक विचार, संप्रेषण, सामाजिक, सौंदर्यात्मक कौशल्ये.
- सामाजिक पर्यावरणानुसार अनुकूल व समायोजन करु शकतील अशा नागरिकांची निर्मिती केली पाहिजे.
- समाजाच्या प्रगतीला हातभार लावतील असे नागरिक तयार केले पाहिजेत.
- लोकशाहीवृत्तीने रहाणारे नागरिक निर्माण केले पाहिजेत.
- फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग करणारे व्यक्तींची निर्मिती केली पाहिजे.
- व्यक्तींना समायोजन, परिवर्तन, किंवा समाजात परिवर्तनास आरंभ केला पाहिजे.
- दुसऱ्याचे मत स्विकारणारा व परस्पर सामंजस्य व शांततेचे मूल्य जाणणाऱ्या व्यक्तींचा विकास केला पाहिजे.
- समाजाने स्विकृत केलेले नैतिक दर्जे आणि नितीतत्त्वांचा व्यवहारात सराव करण्यास चालना दिली पाहिजे.
- विविध पैलूंनी ओळखण्याची व मूल्यमापनाच्या क्षमतेचा विकास केला पाहिजे.
- मानवी-संबंध व प्रेरणा यांच्या आकलनशक्तीचा विकास.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षणाची कार्ये स्पष्ट करा.

## १.७ स्वाध्याय :-

१) शिक्षणाचे समाजशास्त्राचा अर्थ व व्याप्ती स्पष्ट करा.

२) 'प्रत्येक शिक्षकाला शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या ज्ञानाबाबत जाणकार असणे आवश्यक आहे.' चर्चा करा.

३) आजच्या संदर्भात शिक्षणाची कार्ये स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २

# शैक्षणिक समाजशास्त्राचा तात्विक उपागम

**प्रकरणाची रचना :-**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ व्यावहारिकतावाद
२.३ संरचनात्मक व्यावहारिकतावादी
२.४ व्यावहारिकतावादाची मिमांसा
२.५ संघर्ष उपपत्ती
२.६ प्रतिकात्मक अन्योन्यक्रियात्मकता
२.७ मुक्त प्रणाली (सिद्धांत) उपागम
२.८ शिक्षण प्रणाली
२.९ शिक्षणाचा मुक्त प्रणाली उपागम

## २.० उद्दिष्टे :-

ह्या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्हाला खालील गोष्टींचा बोध होईल :

- डरक्हॅमची व्यावहारिकतावादाची उपपत्ती
- संरचनात्मक व्यावहारिकतावादाची प्रमुख लक्षणे
- संघर्ष उपपत्तीचे शैक्षणिक समाजशास्त्राला योगदान
- अन्योन्य क्रियात्मकतेचे चिकित्सक मूल्यमापन
- मुक्त प्रणाली उपगमाचा शिक्षणाशी संबंध

## २.१ प्रस्तावना :-

उपपत्तीचा अर्थ वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारे लावतात. उपपत्तीची व्याख्या खालील प्रमाणे करता येईल – दोन किंवा अधिक चलातील परस्पर संबंध किंवा संबंधातील नियमितता दर्शविण्यासाठी बनविलेला संकल्पनात्मक आराखडा म्हणजे उपपत्ती होय. सैद्धांतिक दृष्टिकोनातून, घडणाऱ्या गोष्टी तशाच का घडतात ह्याचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण देता येते. आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या विविध घटनांसाठी ज्याप्रमाणे वेगवेगळी स्पष्टीकरणे

असतात. त्याचप्रमाणे समाजात घडणाऱ्या घटनांसाठी समाजशास्त्रीय स्पष्टीकरणे असतात. ह्या उपपत्ती एकाच माहितीच्या विविध अंगांचा विचार करतात आणि त्यामुळे त्यासाठी वेगवेगळी स्पष्टीकरणे देतात.

वर्तनवादी शास्त्रात, कोणतीही उपपत्ती ही पूर्णपणे अचूक नसते. कोणतीही उपपत्ती ही निर्णयात्मक मांडणी करु शकत नाही. ज्ञानात पडणाऱ्या नवनवीन भरीमुळे, अस्तित्त्वात असणाऱ्या उपपत्तीत बदल घडून येतो, इतकेच नव्हे, तर काही उपपत्ती पूर्णपणे अस्वीकार केल्या जातात. उपपत्तीची उपयुक्तता ही, ती किती प्रश्नांची उत्तरे देते यावर अवलंबून नसते, तर त्यातून किती नवीन प्रश्न उपस्थित केले जातात ह्यावरही असते.

ज्या उपपत्तींनी शैक्षणिक समाजशास्त्राला महत्त्वाचे योगदान दिले आहे, अशा खालील उपपत्तींचे महत्त्वाचे मुद्दे आपण अभ्यासणार आहोत :

अ) व्यावहारिकतावाद
ब) संघर्ष उपपत्ती
क) अन्योन्य क्रियात्मकता
ड) मुक्त प्रणाली उपागम

## २.२ व्यावहारिकतावाद (Functionalism) :-

समाजशास्त्राचा गाभात्मक दृष्टिकोन म्हणजे व्यावहारिकतावाद (functionalism), सर्वानुमती (Consensus) किंवा समतोल (equalibrium) उपपत्ती ह्या उपपत्तीचे पुरस्कर्ते समाजशास्त्रज्ञ असे मानतात की समाजात घडणारी प्रत्येक घटना, (गुन्हा सुद्धा), कितीही विचित्र, विसंगत किंवा धोकादायक वाटली, तरी त्यातून काहीतरी हेतू साध्य होतो.

व्यावहारिकतावादानुसार समाज म्हणजे, ज्यात संरचित सामाजिक संबंध आणि दृश्य नियमितपणा असतो, अशा परस्पर संबंधित घटकांची स्वयंनियंत्रित अशी प्रणाली आहे.

एमिल डर्कहॅम (१८५८-१९१७) ह्याने पहिल्यांदा शिक्षणाचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करावा अशी शिफारस केली. त्याने असे सुचविले की जर समाजातील विविध घटक काही प्रमाणात तरी एकजिनसी असतील, तरच तो समाज अस्तित्त्वात राहू शकतो. शिक्षण, बालकात सुरुवातीपासूनच सहजीवनासाठी आवश्यक असा सारखेपणा रुजवून हा एकजिनसीपणा चिरस्थायी आणि दृढ करते.

- डर्कहॅम ह्याने शिक्षणाच्या स्वरुपाचे परिक्षण करण्याऐवजी, ते तसे का आहे, हे समजण्याचा प्रयत्न केला.
- त्याने असे दर्शविले की, "समाजातील जाणत्या (प्रौढ) व्यक्ती सहजीवनासाठी तयार होणाऱ्या व्यक्तींवर (बालकांवर) शिक्षणाच्या माध्यमातून परिणामकारक दबाव आणित असतात. ह्याचा मुख्य उद्देश हाच असतो, की राजकीय दृष्ट्या सुसंघटित अशा समाजासाठी आणि जे विशिष्ट कार्य एखाद्या व्यक्तीला समाजात राहून करायचे असते, त्यासाठी आवश्यक अशा शारीरिक, बौद्धिक, नैतिक अवस्थांची गरज उत्पन्न करणे आणि त्यांना विकसित करणे."

- डर्कहॅम ह्याने असे प्रतिपादिते की शिक्षण हे काल आणि स्थल सापेक्ष असते. म्हणूनच आपण शिक्षण आणि समाज एकमेकांवर वेगळे करु शकत नाही. शिक्षण आणि समाज ही एकमेकांची प्रतिबिंबे असतात.
- त्याने असे प्रतिपादन केले की कोणत्याही काळी व स्थळी शिक्षण हे विविध प्रथांशी, मूल्यांशी आणि समजूतींशी निगडित असते.
- डर्कहॅम ह्यांनी शाळेची कार्ये व त्यांचे समाजाशी असलेले नाते ह्याबद्दलच्या स्वतःच्या मतांचे संक्षिप्त सार काढले आहे.
- डर्कहॅम ह्यांनी असे प्रतिपादित केले की शिक्षणाची विविध कार्ये आहेत :

**१) सामाजिक ऐक्य प्रबलित करणे :-**

- इतिहास : ज्या व्यक्तींनी समाजासाठी कार्य केले आहे, अशा व्यक्तींच्या कार्याच्या अभ्यासामुळे, आपण किती नगण्य आहोत, ते जाणवते.
- राष्ट्रनिष्ठेची प्रतिज्ञा : ह्यामुळे व्यक्तीला आपली जमावाशी (समाजाशी) असलेली बांधिलकी जाणवते आणि त्यामुळे नियम / बंधने तोडण्याची शक्यत कमी होते.

**२) सामाजिक भूमिकेचे पालन :-**

- शाळा ही समाजाची लहान प्रतिकृती आहे. त्यामुळे शाळेतही बाह्य जगासारख्याच श्रेणी, नियम, शक्यता / अपेक्षा असतात आणि शाळा बालकांना ह्या भूमिकांची पूर्तता करण्यासाठी सुसज्ज करते.

**३) कामाच्या विभागणीचा पाठपुरावा करणे :-**

- शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे विविध कौशल्यानुसार गट पाडले जातात, जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतानुरुप व्यवसाय क्षेत्र निवडण्यास प्रोत्साहित केले जाते.

- त्यांच्या (डर्कहॅम) मतानुसार, नैतिक मूल्ये ही सामाजिक सुव्यवस्था राखण्याचा पाया आहे आणि समाज हा पाया त्याच्या शैक्षणिक संस्थांमधून चिरस्थायी बनवित असतो.
- कोणताही सामाजिक बदल हा त्या समाजाच्या शिक्षण क्षेत्रात जाणवितो आणि शिक्षण क्षेत्रातील बदल सामाजिक बदल घडवून आणतो. खरेतर शिक्षण हे बदलाची प्रक्रिया घडवून आणण्यात सक्रिय असते.
- डर्कहॅम, फ्रेंच नागरिकांना धर्मनिरपेक्षपणा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करुन देण्यासाठी आणि आधुनिक समाजातील नैतिक / सामाजिक अधःपतन थांबविण्यासाठी शिक्षणाचा कसा उपयोग होईल, ते पहात होते. ते शाळेला समाजाची लहान प्रतिकृती आणि राष्ट्रीयीकरणाचे साधन समजत.
- शाळा ही कुटुंबातील भावनात्मक नैतिकता आणि समाजजीवनातील काटेकोर नैतिकता ह्यातील दुवा म्हणून कार्य करते.
- डर्कहॅम ह्यांनी सांगितलेल्या बाबी ह्या आजही लाग आहेत. त्या म्हणजे – समाजातील विविध घटकांची / स्तरांची शैक्षणिक गरज, शालेय शिस्त, समाजासाठी भावी नागरिक घडविण्यात शाळेची भूमिका, शिक्षण व सामाजिक बदल ह्यातील परस्पर संबंध, आंतर-सांस्कृतिक संशोधन आणि शाळा व वर्ग ह्यातील सामाजिक रचना.

**डर्कहॅम यांच्या व्यावहारिकतावादातील त्रुटी :-**

डरकहॅम ह्यांनी शिक्षणाच्या काही बाबींचा व्यावहारिकतावादामध्ये विचार केला नाही. उदा. प्रौढ (भविष्यातील) भूमिकेची निवड आणि नेमणूक, समाजाची शाळेकडून अपेक्षा आणि शाळेची प्रत्यक्ष कृती.

**आपली प्रगती तपासा:-**

१) व्यावहारिकतावाद म्हणजे काय ?
२) डर्कहॅम ह्यांच्या मते, शिक्षणाची कार्ये कोणती ?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## २.३ संरचनात्मक व्यावहारिकतावादी (Structural functionalists) :

संचरनात्मक व्यावहारिकतावादींनुसार, समाज हा समतोल आणि सुव्यवस्थेकडे झुकतो. ते समाजाची तुलना मानवी शरीराशी करतात. जीवंत राहण्यासाठी मानवी शरीराच्या प्रत्येक भागाचे काहीतरी कार्य असते व ते सर्व एकमेकांवर अवलंबून असते. शिक्षण एक संस्था म्हणून अशीच समाजाला निरोगी / चांगले ठेवण्याचे कार्य करते. सामाजिक आरोग्य म्हणजे सामाजिक सुव्यवस्था. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक त्या समाजाचा नैतिक मूल्ये स्विकारतो व त्यांचे पालन करतो, तेव्हाच सामाजिक आरोग्य योग्य रहाते.

- संरचनात्मक व्यावहारिकतावादीनुसार शिक्षणासारख्या सामाजिक संस्थांचे उद्दिष्टे त्या समाजातील बालकांना व युवकांना समाजशील बनविणे हे असते.
- समाजशीलता ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामुळे नवीन पिढी भविष्यात उत्पादनक्षम नागरिक देण्यासाठी आवश्यक असे ज्ञान, मनोवृत्ती आणि मूल्ये शिकतात.
- औपचारिक अभ्यासक्रात जरी हे ध्येय नमूद केलेले असले, तरीही हे मुख्यत्त्वे करुन चटकन लक्षात न येणाऱ्या पण सूचित केलेल्या अभ्यासक्रमातून, समाजाकडून अपेक्षित मूल्ये मनावर बिंबवण्यामुळे होते.
- विद्यार्थी शाळेतील नियंत्रित वर्तणूकीमूळे ही मुल्ये शिकतात आणि मग ती स्विकारतात आणि आत्मसात करतात.

- शिक्षणाचे आणखी एक कार्य आहे. विविध व्यवसायांमध्ये आवश्यकतेप्रमाणे योग्य व्यक्तींची गरज असते. त्यामुळे शिक्षणाचे आणखीन एक उद्दिष्ट हे असते की विद्यार्थ्यांचे गट पाडून, त्यांचे स्थान / दर्जा निश्चित करुन त्यांना व्यावसायिक जगात स्थान मिळवून देणे.
- ज्यांचे संपादन उच्च असेल अशांना महत्त्वाच्या नोकऱ्यांसाठी प्रशिक्षण देऊन त्यांना जास्त मोबदला द्यावा. ज्यांचे संपादन कमी असेल अशांना (शारीरिक नसले तरी बौद्धिक दृष्ट्या) कमी आव्हानात्मक काम आणि अर्थातच कमी मोबदला द्यावा.

**संरचनात्मक व्यावहारिकतावादाच्या त्रुटी :-**

- सन्नेत आणि कॉब ह्यांच्या नुसार, फक्त क्षमतेनुसार मोबदला देणे, ही फसवणूक आहे.
- मेघन हे मान्य करतात की किती तरी मुले ही क्षमता असूनसुद्धा, परिस्थितीमुळे (घरच्या कष्टकरी पार्श्वभूमीमुळे) शाळेत समाधानकारक पातळी गाठू शकत नाहीत आणि त्यामुळे अर्थातच ज्याला ते पात्र / लायक आहेत असा दर्जा प्राप्त करु शकत नाहीत.
- जेकब असे मानतात की मध्यमवर्गीय शाळेत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अनुभवांपेक्षा कष्टकरी वर्गातील मुलांना घरी मिळणारे अनुभव भिन्न असतात आणि त्यामुळे अशी मुले संपादनात कमी पडतात.
- म्हणजेच, दुसऱ्या शब्दात सांगायचे तर कष्टकरी वर्गातील मुले ही शाळेतील इतर मुलांची बरोबरी करण्यात मागे पडतात. त्यामुळे ह्या मुलांना कमीत कमी आवश्यक अशा प्राविण्य पातळीवर आणून, शाळेतून पुढे ढकलले जाते, जेणेकरुन त्यांना हव्या तशा नोकऱ्या मिळत नाहीत व ते ही कष्टकरीच बनतात.
- सार्जंट ह्यांनीही ह्या चक्राची पुष्टीच केलेली आहे. त्यांच्या मते, शाळा, हे सातत्य आणि पर्यायाने सामाजिक व्यवस्था सांभाळते.

**आपली प्रगती तपासा**

१) संरचनात्मक व्यावहारिकतावादाची मुख्य वैशिष्ट्चे स्पष्ट करा.
२) संरचनात्मक व्यावहारिकतावादाच्या त्रुटी सांगा.

## २.४ व्यावहारिकतावादावर टीका :-

- व्यावहारिकतावाद समाजात असलेले विविध विचार प्रवाह, विविध गटांचे हितसंबंध आणि परस्पर विरोधी स्वार्थ ह्यामुळे होणाऱ्या परिणामांचा विचार करीत नाही. भिन्न – जिनसी समाजात प्रत्येक गटाचे स्वतःचे स्वार्थ सांभाळण्यासाठी वेगवेगळे आराखडे असतात.
- ह्या दृष्टीकोनातून, वर्गात होणाऱ्या ज्या अन्योन्यक्रिया असतात, उदा. शिक्षक – विद्यार्थी किंवा विद्यार्थी – विद्यार्थी, त्यांचे विश्लेषण करणे कठीण जाते.
- शिक्षण प्रक्रियेत समाविष्ट आशय काय आहे व तो कसा शिकविला जातो, ह्याचा विचार केला जात नाही.
- व्यक्ती त्यांना दिलेल्या भूमिका नुसत्याच निभावत नसतात, तर भूमिकांमध्ये बदल करतात व स्वतःसाठी नवीन भूमिका तयार ही करतात, ह्याचा ह्या उपपत्तीमध्ये विचार केला गेलेला नाही.

## २.५ संघर्ष उपपत्ती (Conflict Theory) :-

संरचनात्मक व्यावहारिकतावादाच्या विरुद्ध, संघर्ष उपपत्ती असे मानते की, विविध महत्त्वाकांक्षा असलेल्या, जीवनाकडे पहाण्याचे वेगवेगळे दृष्टीकोन असलेल्या आणि वेगवेगळ्या सामाजिक अपेक्षा असलेल्या गटांचा मिळून समाज बनलेला असतो. त्यामुळे समाजातील विविध गटात शोषण, जुलूम, दडपशाही आणि जबरदस्ती, अशाप्रकारचे परस्पर संबंध असतात.

सामाजिक संघर्षावर भर देणाऱ्या विविध सामाजिक उपपत्ती ह्या थोर जर्मन विचारवंत व राजनीतीतज्ञ कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) ह्यांच्या विचारांवर आधारित आहेत. मार्क्स ह्यांचा संघर्षवादी विचार इतिहासाच्या अधिभौतिकवादी स्पष्टीकरणावर भर देतो. अस्तित्त्वात असलेली सामाजिक व्यवस्था आणि क्रांतीची राजकीय रुपरेशा किंवा कमीत कमी नवीन सामकाजिक रचना घडवून आणण्यासाठी सत्याचा शोध घेणारा हा एक नैतिक दृष्टीकोन होय.

संघर्ष उपपत्ती सत्ता – हक्क भेदावर लक्ष केंद्रित करतात. उदा. वर्ग - संघर्ष आणि पारंपारिक / ऐतिहासिक वर्चस्व असलेल्या विचारधारांना विरोध करतात. संघर्ष उपपत्ती ही जरी मुख्यत्त्वेकरुन मार्क्स विचार धारेशी जोडली गेली असली, तरीही तिचा संबंध निर्णायक उपपत्ती (Critical Theory), स्त्री-प्रधान मत प्रणाली (Feminist Theory), अपूर्व उपपत्ती (Queer Theory), अत्याधुनिक उपपत्ती (Post-modern Theory), संरचनोत्तर उपपत्ती (Post-Structural Theory), वसाहतवादोत्तर उपपत्ती (Post-colonial Theory) आणि बऱ्याच इतर विचार धारांशी जोडता येतो.

मॅक्स वेबर (१८६४-१९२०) सारखे काही संघर्ष उपपत्तीचे पुरस्कर्ते असे मानतात की शिक्षण हे राज्यसंस्थेच्या अखत्याशत, म्हणजेच काही वरिष्ठांच्या हातात असते आणि त्याचा मुख्य उद्देश हा असमतोल बनविणे आणि तो विशेषाधिकार असणाऱ्या वजनदार गटाचे स्थान निश्चित व कायदेशीर करणे हा असतो. कॉनेल आणि व्हाईट म्हणतात की शिक्षण प्रणाली हे जसे ज्ञान प्रेषित करण्याचे माध्यम आहे, तसेच ते विशेषाधिकार प्रेषित करण्याचेही माध्यम आहे.

- शिक्षण हे कनिष्ठ वर्गातल्या मुलांना कनिष्ठ वर्गातील प्रौढ, मध्यम वर्गीय मुलांना मध्यम वर्गीय प्रौढ व उच्च वर्गीय मुलांना उच्च वर्गीय प्रौढ बनवून समतोल राखते.

- मॅक् लिऑडच्या म्हणण्याप्रमाणे कनिष्ठ वर्गातील मुलांना शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी भाषा शिकण्याची, तर्कशुद्ध विचार करण्याची सामाजिक कौशल्ये विकसित करण्याची संधी न मिळाल्यामुळे शिक्षक त्यांना कमी लायक समजतात आणि त्यांना कमी संधी देतात.

- कमी संधी मिळाल्यामुळे कनिष्ठ वर्गातील मुले ही मेहनतीचे काम करण्यासाठीच तयार होतात. आज्ञाधारकपणा, नियमांचे पालन इ. गोष्टींवर भर दिल्यामुळे स्वायत्तता, उच्चस्तरीय विचार, स्वतःची अभिव्यती इ. पासून वंचित रहातात आणि मेहनतीचे काम करण्यासाठीच तयार होतात.

- त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, खाजगी शाळा ह्या महागड्या असल्यामुळे उच्च वर्गांसाठी राखीव असतात आणि सरकारने चालविलेल्या शाळा, उदा. महानगरपालिकेच्या शाळा, ज्या मुख्यत्त्वेकरुन कनिष्ठ वर्गासाठी उपलब्ध असतात, त्यांच्याकडे आर्थिक बळ, मनुष्यबळ कमी असते आणि दिवसेंदिवस त्यांची परिस्थिती जास्त बिकट होत आहे.

- शाळा हे सामाजिककरणाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे आणि त्यातून एक वर्ग दुसऱ्या वर्गावर वर्चस्व गाजवित असतो. उदा. सर्व विद्यार्थ्यांनी इंग्रजीमधून शिकावे अशी मागणी केल्यामुळे इंग्रजीतून बोलणाऱ्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी न बोलणाऱ्या विद्यार्थ्यांवर शाळेमध्ये वर्चस्व रहाते.

- हे चक्र चालू रहाते कारण, वर्चस्व असणाऱ्या गटाने, इतक्या कालावधित शिक्षण मध्यमवर्गीय मूल्यांशी संलग्न केलेले आहे आणि त्यामुळे इतर वर्गांच्या लोकांची त्यापासून फारकत झालेली आहे.

- शिक्षक असे गृहित धरतात की, विद्यार्थ्यांना काही विशिष्ट मध्यमवर्गीय अनुभव घरी मिळालेले आहेत. पण हे सर्वच विद्यार्थ्यांच्या बाबतीत खरे नसते. काही विद्यार्थ्यांना शाळेनंतर आपल्या पालकांना मदत करावी लागते व एकच पालक असलेल्या घरात तर बऱ्याचश्या घरच्या जबाबदाऱ्याही उचलाव्या लागतात.

- घरच्या जबाबदाऱ्यांतून मोकळा वेळ काढून, गृहपाठ करणे त्यांना कठीण जाते आणि त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर विपरित परिणाम होतो.

- ज्या ठिकाणी शिक्षक नियमित अभ्यासाची औपचारिकता शिथिल करतात आणि विद्यार्थ्यांच्या आवडीच्या अभ्यासाच्या पद्धतींची अभ्यासक्रमाशी सांगड घालतात, तेव्हा काही विद्यार्थ्यांच्या आधी न जाणवलेल्या क्षमता दिसून येतात.

- पण असे साचेबंध अभ्यासक्रमाबाहेर जाणारे शिक्षक हे विरळाच असतात आणि पारंपारिक अभ्यासक्रम हा प्रस्थापित राज्यपद्धतीने म्हणजेच पर्यायाने अधिकारात असलेल्यांनी ठरविलेल्या आशयाचे संक्रमण करतात. पण असे ज्ञान हे बहुतांशी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने निरर्थक असते.

- विल्सन आणि वाइन् असे प्रतिपादित करतात की विद्यार्थ्यंना हे जाणवते की जे ते शिकतात त्याचा भविष्यात उदरनिर्वाह करण्यासाठी आवश्यक क्षमतांशी काहीही संबंध नसतो.

- अशा विद्यार्थ्यांची शाळेबद्दलची अनास्था ही त्यांच्या स्वतःच्या आवडीबद्दलच्या जाणीवेमुळे असते.

- सार्जंट यांच्या म्हणण्याप्रमाणे श्रमजीवी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शाळेची मध्यमवर्गीय मूल्ये आत्मसात करणे आणि यश मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, म्हणजे त्यांचा स्वतःचा कनिष्ठ दर्जा मान्य करुन अपयश पत्करणे ठरविल्यासारखे असते.

- फिझजेराल्ड पण म्हणतात, गरीब घरातील मुलांना, त्यांच्यात शैक्षणिक क्षमता किंवा शिकण्याची इच्छा असून सुद्धा यशस्वी होण्याची शक्यता कमी असते.

- ह्याच्या विरुद्ध, मध्यमवर्गीय व उच्च वर्गीय मुलांना, त्यांचा समाजातील दर्जा राखण्यासाठी कमी प्रयत्न करावे लागतात. (अमेरिकेचे) संघराज्याचे सरकार स्वतंत्र, खाजगी शाळांना आर्थिक मदत देऊन, श्रीमंताना चांगले कमी पैशात उपलब्ध करुन देते.

- ह्या 'चांगल्या शिक्षणामुळे' श्रीमंत मुले जास्त चांगले कार्य करुन, जास्त यश प्राप्त करतात. अशा प्रकारे उच्चस्तरीयांचे विशेषाधिकार आणि सांपत्तिक वरिष्ठता कायम रहाणे शक्य होते.

- संघर्ष उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांच्या म्हणण्यानुसार सामाजिक पुनरावृत्ती ही निरंतर चालू रहाण्याचे कारण हेच आहे की पूर्ण शिक्षण व्यवस्था ही प्रबळ / सत्ताधारी गटाच्या विचारधारेप्रमाणे असते.

- खरे तर, असे भासविले जाते की शिक्षण आणि त्याच्या अनुषंगाने संपत्ती व दर्जा सर्वांसाठी खुला आहे आणि जर कोणी आपले उच्च दर्जा प्राप्त करण्याचे उद्दिष्ट गाठू शकला नाही, तर त्याला तो स्वतःच जबाबदार असतो.

- राईट असे प्रतिपादतात की, ह्या गैरसमजामुळे लोकांना हेही कळत नाही की त्यांचे वैयक्तिक कष्ट हे सुद्धा सामाजिक प्रवाहांचाच परिणाम आहे. ह्या दुटप्पीपणामुळे कित्येक पालक कष्टप्रद कामे ह्या विचाराने करत रहातात की, त्यांच्या ह्या त्यागामुळे त्यांच्या मुलांचे भविष्य तरी उज्ज्वल होईल व ज्या संधी त्यांना मिळाल्या नाहीत, त्या मुलांनातरी उपलब्ध होतील.

- असे गरीब आणि कष्टप्रद जीवन जगणाऱ्या व्यक्ती ह्या अशा अनिष्ट सामाजिक युक्तीवादाच्या शिकार होतात. त्यांचा असा समज करुन दिला जातो की शाळेचा मुख्य उद्देश समता बळकट करणे हा असतो. पण प्रत्यक्षात असे दिसून येते की शाळा ह्या प्रचलित दर्जा आणि सत्तेचा असमतोल राखण्याचाच समाजाचा उद्देश दर्शवितात.

**संघर्ष उपपत्तीच्या त्रुटी :-**

ह्या उपपत्तीवर अशी टिका केली जाते की ही उपपत्ती निर्णयात्मक व निराशावादी आहे आणि परिस्थिती सुधारण्यासाठी, व्यक्तीत असलेल्या सामर्थ्यांचा विचार करीत नाही.

तरीसुद्धा हे लक्षात घेतले पाहिजे, की ही उपपत्ती समाजातील सत्य परिस्थितीची हुबेहुब प्रतिमा आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. संघर्ष उपपत्तीच्या मुख्य वैशिष्ट्यांची चर्चा करा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

## २.६ प्रतिकात्मक अन्योन्यक्रियात्मकता(Symbolic Interactionism)

प्रतिकात्मक अन्योन्य क्रियात्मकता किंवा थोडक्यात अन्योन्यक्रियात्मकता हा समाजशास्त्रातील एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. ह्या दृष्टिकोनाचे मूळ जर्मन समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ मॅक्स् वेबर (१८६४-१९२०) आणि अमेरिकन तत्त्ववेत्ता जॉर्ज एच्. मिड (१८६३-१९३१) ह्यांच्या बौद्धिक विचार प्रणालीवर आधारित आहे. ह्या दोघांनाही मानवी वर्तन, सामाजिक प्रक्रिया आणि उपयुक्ततावाद ह्यांच्या व्यक्तिनिष्ठ अर्थावर भर दिला आहे. मिड यांचे शिकागो विद्यापीठातील सहाध्यायी हरबर्ट ब्लुमर ह्यांनी प्रथम “प्रतिकात्मक अन्योन्यक्रियात्मकता” (Symbolic Interactionism) हा शब्दप्रयोग केला आणि ह्या उपपत्तीचे प्रतिपादन केले.

- अन्योन्य क्रियात्मकतावादी, समाज व्यवस्थेच्या ढोबळ वस्तुनिष्ठ दृष्टिकोनापेक्षा समाजजीवनाच्या व्यक्तिनिष्ठतेवर भर देतात.
- ह्याचे एक कारण असे की, ते त्यांचे तर्क हे त्यांच्या समाजाबद्दल असलेल्या प्रतिमेपेक्षा (व्यावहारिकतावाद्यांसारखे), व्यक्तीबद्दल असलेल्या प्रतिमेवर आधारित आहेत.
- अन्योन्य क्रियात्मकतावाद्यांनुसार समाज हा व्यक्तींच्या सुसंघटित आणि आकृतीबंध अन्योन्यक्रियांनी बनलेला असतो.
- अन्योन्य क्रियात्मकतावादींचे संशोधन हे सामाजिक संस्थातील ढोबळ संरचनेतील परस्पर संबंधापेक्षा दृश्य अशा समोरासमोरील अन्योन्यक्रियांवर केंद्रित असते.
- ह्यामुळे अन्योन्य क्रियात्मकतावादींचे लक्ष हे विविध घटनातील भाग घेणाऱ्या व्यक्तींमध्ये घडणाऱ्या अन्योन्यक्रिया आणि त्या घटनांचे व्यक्तीसाठी असणारे महत्त्व ह्यावर केंद्रित असते आणि त्यामुळेच ते समाजात स्थिर अशा रुढी व मूल्यांपासून ढळून कायम बदलत जाणाऱ्या आणि जुळणी करणाऱ्या सामाजिक प्रक्रियेवर केंद्रित होते.
- व्यावहारिकतावादींच्या मतानुसार सामाजिकीकरण हे सामाजिक प्रणालीत संतुलन आणण्याचा प्रयत्न करते, तर अन्योन्यक्रियात्मकतावादींच्या मतानुसार समाजातील

सदस्यांच्या परस्पर तोडजोडीमुळे समाजात तात्पुरते नातेसंबंध तयार होतात आणि ते मूलभूत रचनेत स्थिरता असून सुद्धा, ह्या संबंधात कायम अस्थिरता निर्माण करतात.

- ही उपपत्ती विविध अन्योन्य क्रियांवर, जशा विद्यार्थी – विद्यार्थी, शिक्षक – विद्यार्थी, शिक्षक – मुख्याध्यापक ह्यांतील आंतरक्रिया, विद्यार्थी मनोवृत्ती व संपादन, विद्यार्थ्यांची मूल्ये, त्यांची स्वतःबद्दलची संकल्पना आणि त्यांच्या आकांक्षा, सामाजिक दर्जामधील अंतर आणि संपादन ह्यांवर लक्ष केंद्रित करते.

परस्पर संबंधांच्या दोन उपपत्ती शैक्षणिक समाजशास्त्रात फार महत्त्वपूर्ण आहेत. त्याम्हणजे 'शिक्कामोर्तब उपपत्ती' (Labelling Theory) आणि 'आदान-प्रदान उपपत्ती' (Exchange Theory). शिक्का मोर्तब उपपत्ती ही स्वतःची ओळख आणि त्यांची वर्तणूक ही त्यांची ओळख किंवा वर्गीकरण कसे केले जाते आणि स्वयंपूर्ततेचे भाकित आणि ठरावीक ठश्याची संकल्पना - ह्याच्याशी संबंधित असते. जर एखाद्या मुलाला तू वेडा आहेत किंवा आळशी आहेस, असे परत परत सांगितले तर त्याचा परिणाम त्याच्या ‘स्व’ च्या संकल्पनेवर होऊन तो त्या प्रमाणेच वागायला लागेल. विद्यार्थी, शिक्षकांच्या त्यांच्याकडून ज्या अपेक्षा असतात त्याप्रमाणेच वागतात.

सामाजिक कृती ही व्यक्तीच्या तुलनात्मक फायदा तोट्याच्या निवडीवर अवलंबून असते, असे आदान-प्रदान उपपत्ती दर्शविते. तर सामाजिक अदलाबदल उपपत्ती असे दर्शविते की व्यक्ती स्वतःचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल, ह्यावर स्वतःची कृती ठरवितात. ह्या उपपत्तीचा मुख्य घटक म्हणजे विविध "वैकल्पातील तुलनात्मक पातळी" (“Comparison level of alternatives”) चे आधारतत्त्व. व्यक्तींचा सर्वोत्तम वैकल्प (म्हणजेच नुकसान व जास्तीत जास्त फायदा ह्याची निवड) हा, ‘नुकसान आणि फायदा हा आपल्या अन्योन्यक्रियेवर अवलंबून असतात’, ह्या गृहितकावर आधारित असतो.

व्यक्ती सामाजिक आदान – प्रदानात भाग घेतात, कारण

१. अपेक्षित परस्पर सहकार्य

२. नावलौकिक व दुसऱ्यावरील आपला प्रभाव ह्यात वाढ

३. परहितदक्षता (निःस्वार्थीपणा) आणि सामर्थ्याबद्दलची कल्पना

४. प्रत्यक्ष फायदा

परस्पर आदान-प्रदान हे व्यक्तींना आणि गटांना एकमेकांच्या बंधनात बांधून ठेवते. सन १९७५ पासून जास्त-जास्त शिक्षणतज्ञ्यांना असे वाटू लागले की शिक्षण प्रणालीना समजण्यासाठी अत्यंत पायाभूत (पूरोगामी) विचारांची आवश्यकता आहे. वैश्विक (micro-cosmic) ढोबळ विचारसरणीला (ज्यात अन्योन्य क्रियेला काही महत्त्व नाही), उत्तर म्हणून अन्योन्य क्रियात्मकतावाद्यांनी आपल्या कल्पना ह्या प्रतिकात्मक अन्योन्यक्रियेवर आधारल्या.

मानववंशशास्त्र पद्धती (Ethnomethodology) ही अभूतपूर्व समाजशास्त्राची (phenomenological Sociology) शाखा आहे आणि त्याचा पाया शास्त्रीय सामाजिक

उपपत्ती व सामाजिक भाषाशास्त्रावर आधारित आहे. समाजातील विविध पायाभूत घटक स्वतःच्या व इतरांच्या वागण्याला जो अर्थ लावतात तो अहवालित करण्याचा व त्याचे स्पष्टीकरण देण्याचा वर्णनात्मक अभ्यास ह्यात केला जातो. मानववंशशास्त्र पद्धतीने जाणकार अन्योन्य – विशिष्ट कारणपरत्त्वे घडणाऱ्या घटकांचा स्थल-कालाधिष्ठित समाज-संरचना, संभाषणातून आणि समन्वयित कृतीतून कशा घडतात त्याचा अभ्यास करतात.

ह्याचा उपयोग शैक्षणिक संदर्भात केला, तर त्यातून वर्गातील अन्योन्य क्रियेचे आकृतीबंध, ज्ञानाचा उपयोग आणि व्यवस्थापन – काय सुसंस्कृत करायचे, अभ्यासक्रमातील आशय इ. चा अभ्यास करण्यासाठी होतो.

अन्योन्यक्रियात्मकतावादी सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास सर्वेषण किंवा मुलाखतीच्या ऐवजी सहभागी निरीक्षणाने (Participant Observation) करतात. त्यांच्या मतानुसार, सहभागी घटकांच्या दैनंदिन जीवनाशी जवळचा संबंध असणे व त्यात समरस होणे, हे, विशिष्ट परिस्थितीत त्यांच्या कृतींचा अर्थ समजण्यासाठी आणि ह्यात सहभागी व्यक्तींच्या वर्तणूकीमुळे घटना कशा घडतात, हे समजण्यासाठी आवश्यक आहे. त्या प्रत्यक्ष सहभागामुळे अन्योन्य क्रियावाद्यांची त्यातील मूल्यांशी बांधिलकी तयार होते. खरे तर, अन्योन्य क्रियात्मकतावादी ह्या मूल्यांवरुन काय अभ्यासायचे ते जास्तीत जास्त वस्तुनिष्ठता बाळगून ठरवितात.

**प्रतिकात्मक अन्योन्य क्रियात्मकतेच्या त्रुटी :-**

समाजशास्त्रात प्रतिकात्मक अन्योन्य क्रियात्मकावादींवर बहुधा अशी टिका करतात की त्यांच्या संशोधन कार्यपद्धती जास्त प्रमाणांत कल्पनेवर आधारित असतात व त्यामुळे त्यांच्या उपपत्ती पद्धतशीर नसतात.

**आपली प्रगती तपासा**

१. प्रतिकात्मक अन्योन्य क्रियात्मकतेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२. शिक्का मोर्तब उपपत्तीच्या भूमिकेची चर्चा करा.

## २.७ मुक्तप्रणाली उपागम (Open Systems Approach) :-

मुक्त प्रणाली सिद्धांत हा सर्वप्रथम लड्‌विग हॉन बर्टनलांफी (१९५६) ह्या जीवशास्त्रज्ञाने मांडला. लगेचच तो ज्ञानाच्या इतर शाखांनाही लागू केला गेला. ह्यात प्रणाली (System) ह्या संकल्पनेची व्याख्या, खालील प्रमाणे केलेली आहे. सर्व प्रणाली ह्या छोट्या भागांच्या किंवा त्यांच्या संयोगाच्या एकत्रीकरणामुळे बनलेल्या असतात आणि त्यामुळे त्यातील परस्पर संबंध हे एकमेकांवर अवलंबून असतात.

**प्रणाली ही त्याच्या गुणवैशिष्ट्यांवरुन ठरविली जाते.**

- प्रणाली ही एक भौतिक किंवा संकल्पनात्मक, स्वतंत्र अस्तित्त्व असणारी, परस्परांशी संबंध साधणारी, त्यातील विविध भागात अन्योन्य क्रिया घडणारी आणि त्याच्या वातावरणाशीही अन्योन्य क्रिया साधणारी अशी असते.
- प्रणालीला श्रेयस्कर (preferred) अशी अवस्था असते.
- प्रणालीचे विविध भाग त्यांच्या परीने छोट्या-छोट्या प्रणाली असू शकतात.

**परस्पर संबंधित व एकमेकांवर क्रिया करणारे भाग :-**



**आकृती १**

प्रणाली उपागम ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामुळे एखाद्या संपूर्णाचे (Whole) विविध भाग एकमेकांवर कसे परिणाम करतात, ते समजते. निसर्गातील प्रणाली उपागमाची उदाहरणे म्हणजे पर्यावरण आणि त्याचे घटक – हवा, पाणी, विविध गती आणि त्यात एकत्र कल करणारे, वाढणारे आणि लय पावणारे प्राणी व वनस्पती. संघटनेतील प्रणालीचे घटक म्हणजे त्यात काम करणारी माणसे, संघटनेची रचना आणि संघटनेला प्रबल किंवा दुर्बल करणाऱ्या विविध प्रक्रिया.

प्रणाली विचार (Systems thinking) ही समस्या – निराकरणाची एक पद्धती आहे. ह्यात विविध समस्या ह्या संपूर्ण प्रणालीचे छोटे छोटे भाग मानले जातात आणि त्या भागांचा स्वतंत्र्यपणे विचार करुन, त्यातून, आधी लक्षात न आलेल्या नवीन समस्या निर्माण करण्याऐवजी, त्यांचा पूर्णत्वाने विचार केला जातो. प्रणाली उपागम ही स्वतंत्र एक बाब नसून,

एक सवयींचा / प्रघातांचा किंवा प्रत्यक्ष कृतींचा संच आहे. भाग हे स्वतंत्र्यपणे समजून घेण्यापेक्षा, एकमेकांच्या संदर्भात आणि इतर प्रणालींच्या संदर्भात जास्त चांगले समजू शकतात. प्रणाली उपागमात कारण व परिणाम ह्यांचा रेषीय विचार न करता, चक्रीय विचार केला जातो.

संघटनेच्या आतील व बाहेरील प्रमुख चलांची खरीखरी प्रतिमा मिळण्यासाठी मुक्त प्रणाली उपागम हे एक तपास करणारे असे साधन आहे आणि त्यामुळे संघटनेची किंवा त्यांच्या भागांची चिकित्सक परीक्षा शक्य होते. ह्याच्या वापरामुळे मुख्य चलांची आणि त्यांच्या परस्पर संबंधाची लगेच माहिती मिळते. हे तंत्र वरच्या किंवा खालच्या बाजूला झुकू शकते, म्हणजेच, हे तंत्र प्रणालीचा समग्र किंवा त्यांच्या छोट्या छोट्या भागांच्या परिस्थितीचे वर्णन करु शकते. उदा. हे तंत्र संघटनेतील एखाद्या विभागाचे (department) प्रणाली म्हणून, अभ्यासायला वापरले जाऊ शकते.

**पर्यावरणातील अस्तित्त्व (ज्याच्याशी प्रणालीची अन्योन्य क्रिया होऊ शकते) :-**



**आकृती २**

पर्यावरण हे सर्व प्रणालींना वेढते. पर्यावणात विविध प्रणाली असतात :-

- बद्ध प्रणाली पर्यावरणाशी अन्योन्य क्रिया साधत नाहीत. पूर्णपणे बद्ध प्रणाली हा सैद्धांतिक विचार असला, तरी प्रत्यक्षात सर्व प्रणालींवर काही प्रमाणात तरी पर्यावरणाचा परिणाम होतो.
- मुक्त प्रणाली ह्या पर्यावरणाशी अन्योन्य क्रिया साधतात. पर्यावरणामुळे प्रणालींवर काही बंधने किंवा आनुषंगिक परिणाम होऊ शकतो.
- परिस्थिती – पर्यावरणातील विविध परिस्थितींशी प्रणालीचा संबंध येतो. गतीमान पर्यावरणातील परिस्थिती सतत बदलत असते.
- आनुषंगिक घटना – भोवतालच्या परिस्थितीत घडणारे आकस्मिक, धारदार बदल प्रणालीला असंतुलित करतात किंवा हादरा देतात.

## २.८ शिक्षण प्रणाली :-

शिक्षण प्रणालीच्या विश्लेषणाचे मुख्यत्त्वे करुन दोन भाग पडतात – प्रक्रिया आणि रचना. प्रक्रिया हा प्रणालीचा क्रियात्मक भाग आहे आणि त्यामुळेच रचनेला अर्थ प्राप्त होतो. प्रक्रियेची उदाहरणे म्हणजे अध्ययन, अध्यापन, संप्रेषण, निर्णय घेणे, तसेच शाळेत आयोजित केले जाणारे विविध औपचारिक व अनौपचारिक कार्यक्रम. ह्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थी शाळेत आणि पुढे त्यांच्या भावी जीवनात योग्य सामाजिक भूमिका वठवू शकतात. शिक्षण प्रणालीचे हे गतीमान भाग आहेत.

प्रणालीची रचना म्हणजे पदक्रम किंवा विविध लोकांच्या रचनेतील भूमिका – प्रशासक, शिक्षक, कार्यकर्ते, पालक आणि अर्थातच विद्यार्थी, तसेच अध्ययन अनुभूतींचे संघटन, वर्ग आणि शाळेची रचना, शाळेचा प्रकार आणि अभ्यासक्रमाची रचना.

शाळेच्या पर्यावरणात गट, संघटना, शाळेबाहेरील इतर संस्था आणि पूर्ण वैश्विक समाज ह्यांचा, शाळेच्या कार्यावर परिणाम होतो. उदा. पालक कधीकधी शाळेच्या व्यवस्थापनांवर रोलर स्केटिंगसारखे सहशालेय कार्यक्रम सुरु करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाची सोय करण्यासाठी दबाव आणतात. समाज विविध गटाच्या विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करतो आणि सरकार, आर्थिक – राजकीय संरचना, शाळेसाठी धोरणे आणि साधने उपलब्ध करु देते.

## २.९ शिक्षणाचा मुक्त प्रणाली उपागम :-

मुक्त प्रणाली उपागम शिक्षण प्रणालीला एक समग्र, संपूर्ण, एकसंघ दृष्टिने पहातो. त्यामुळे,

- त्यातील विविध घटकांचा विचार केला जातो.
- माहिती आणि निरीक्षण यांचा योग्य क्रम लावणे सुकर होते.
- मिश्र आणि एकमेकांशी संलग्न घटकांचे आणि त्यांच्या परस्पर संबंधांच्या संचाचे सामान्य चित्र उभे रहाते.
- खालील आकृती कोणत्याही सामाजिक प्रणालीचे मूलभूत घटक दर्शविते. हे घटक म्हणजे संघटना, पर्यावरण (भोवतालची परिस्थिती), अंतरभरण (Input) (म्हणजेच विविध माहिती, व्यक्ती, सामग्री) निष्पत्ती (output) आणि प्रत्याभरण (feedback).

**अंतरभरण** → **शैक्षणिक संस्था** → **निष्पत्ती**

**अंतरभरण**

१. विद्यार्थी
- लोकसंख्यात्मक चले
- उपसंस्कृती
- समवयस्क गट
- वर्ग
- कुटुंब

२. कर्मचारी वर्ग
- शिक्षक
- प्रशासकीय कर्मचारी
- चतुर्थ श्रेणी कर्मचारी
- प्रशिक्षण
- वर्गाची पार्श्वभूमी
- संलग्नता

**शैक्षणिक संस्था**

१. संरचना
- औपचारिक विरुद्ध अनौपचारिक
- भूमिका संबंध
- पर्यायी रचना

२. ध्येये किंवा कार्ये

३. उपक्रम
- आशय, अभ्यासक्रम
- कार्यक्रम
- चाचणी

४. प्रणाली निहाय प्रक्रिया
- सामाजीकरण
- अध्ययन – अध्यापन
- निर्णय प्रक्रिया
- संप्रेषण प्रक्रिया
- शिस्त
- बदल, अनुकूलन

५. अनौपचारिक रचना

**निष्पत्ती**

१. पदवीधर

२. नवीन ज्ञान

३. कालबाह्य माहिती

४. नवीन संस्कृती

**लगतचे**
- शाळेचा बोर्ड / (प्रकार)
- पालक-शिक्षक संघटना
- शिक्षकांची संघटना
- समाजातील दबाव आणणारे गट
- राजकीय नियम

**पर्यावरण**

**दुय्यम**
- तंत्रज्ञान
- राजकीय-आर्थिक
- धार्मिक गट
- सांस्कृतिक मूल्ये व विचारधारा
- सामाजिक बदल व लहरी (अल्पकाळ टिकणारी आवड)
- लोकसांखिक बदल

**प्रत्याभरणाचा वळसा**

**पायरी १ : संघटना :-**

तुमचे लक्ष संघटना ह्या मधल्या चौकटीवर केंद्रित करा हा सर्व कृतींचा मध्य आहे. येथे समाज (उदा. भारत), संस्था (उदा. शिक्षण क्षेत्र). संघटना (उदा. एखादी शाळा), त्याचा छोटा हिस्सा (उदा. एखादा वर्ग) किंवा एखादी अन्योन्यक्रिया (उदा. शिक्षक-विद्यार्थी आणि विद्यार्थी-विद्यार्थी) स्पष्टीकरणासाठी हे सर्व येथे संघटना म्हणून उल्लेखिलेले आहेत. संघटनेमध्ये विविध क्रिया घडत असतात आणि त्या सर्व संघटनेची रचना, स्तर, भूमिका आणि विविध कृतीपेक्षा मोठ्या असतात. दिलेल्या मर्यादांमध्ये विविध विभाग, उपविभाग, स्तर आणि भूमिका यांनी संघटनेची रचना बनत असते आणि रचना म्हणजे प्रत्यक्षात तेथे काम करणाऱ्या, निर्णय घेणाऱ्या विविध व्यक्ती होत. घडणाऱ्या विविध प्रक्रियांमुळेच संघटना कार्यरत रहाते.

ह्या प्रक्रिया पोकळीत घडत नाहीत, तर विविध पदांवर / स्तरांवर काम करणाऱ्या आणि निर्णय घेणाऱ्या व्यक्ती कायम संघटनेच्या आतील आणि बाहेरील मागण्यांप्रमाणे प्रतिसाद देतात. संघटनेच्या मर्यादा भोवतालच्या पर्यावरणाला प्रतिसाद देण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे लवचिक व परिवर्तनशील असतात. अशा प्रणालीला मुक्त प्रणाली किंवा मुक्त मर्यादा असे म्हणतात. विद्यार्थ्यांचे अनुभव हे त्यांच्या सामाजिक स्तराच्या बंधनावर अवलंबून असतात. शाळेतील कर्मचाऱ्यांचा, विद्यार्थ्यांच्या वर्तनाला प्रतिसाद आणि त्यावर विद्यार्थ्यांची कृती ह्या सर्वांचे मिळून संघटनेची संस्कृती बनते.

**पायरी २ : पर्यावरण :-**

पर्यावरण म्हणजे संघटनेच्या सभोवतालची परिस्थिती आणि परिणाम करणारे घटक पर्यावरणामध्ये आजूबाजूच्या इतर प्रणालीही असतात. शाळांसाठी पर्यावरणाचा महत्त्वाचा भाग म्हणजे आर्थिक उत्पन्न – ते कोठून मिळतेः शाळेला सामाजिक, आर्थिक, राजकीय बंधने पाळावी लागतात आणि शाळेकडून काही अपेक्षा असतात. त्यामुळे दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे शाळेला पाळावी लागणारी बंधने. उदा. सरकारने हल्लीच असे जाहीर केले आहे की कोणीही विद्यार्थ्याला ८वी इयत्तेपर्यंत नापास करायचे नाही किंवा त्याच वर्गात मागे ठेवायचे नाही. पर्यावरणाचा आणखीन एक महत्त्वाचा भाग म्हणजे व्यवसायाच्या संधी व त्यासाठी आवश्यक व्यावसायिक कौशल्ये.

संघटना, माहिती आणि आवश्यक साधनांसाठी भोवतालच्या परिस्थितीवर (पर्यावरणावर) अवलंबून रहाते. प्रत्येक संघटनेसाठी पर्यावरणातील घटक हे वेगवेगळे असतात आणि ते बदलत रहातात, आव्हाने बदलत रहातात. होणारी अन्योन्य क्रिया ही चांगली किंवा वाईट असू शकते. हे सर्व अंतरभरण (Input) आणि निष्पत्ती (Output) च्या स्वरुपात घडते.

**पायरी ३ : अंतरभरण (Input) :-**

संघटनेला अंतरभरण ही माहिती, कच्चा माल, कामासाठी माणसे, पैसा आणि नवीन कल्पना इ. स्वरुपात पर्यावरणातून मिळत असतात. संघटनेत काम करणाऱ्या व्यक्ती ह्या सुद्धा सभोवताल्या समाजातून आलेल्या असतात आणि त्यामुळे सभोवतालचा परिणाम संघटनेवर

होतो. बहुतेक सर्वच संघटनांसाठी काही अंतरभरण हे अनिष्ट पण न टाळता येण्यासारखे असते. उदा. नवीन लागू केलेली कायदेशीर बंधने, स्पर्धा, इ. काही प्रकारच्या अंतरभरणावर संघटना आपला अधिकार (वर्चस्व) राबवू शकते. उदा. शिक्षकांची निवड, पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रम इ. प्रवेशावर, त्यामानाने संघटनेचा ताबा कमी असतो.

**पायरी ४ : निष्पत्ती :-**

निष्पत्ती म्हणजे संघटनेमध्ये तयार होणारे भौतिक व कल्पनेसारखे अभौतिक साहित्य, उदा. उत्पादन, टाकाऊ पदार्थ, माहिती, त्यातून बनणारी संस्कृती, आणि नवीन तंत्रज्ञान. संघटनेत विविध प्रकारची कामे करणारा कर्मचारी वर्ग असतो – मग तो विक्रेता असो की मदतनीस असो. बहुधा, विद्यापीठे व महाविद्यालयांच्या संदर्भात बोलायचे झाले, तर नवीन ज्ञान हे संशोधन आणि लेखांच्या स्वरुपात असते.

**पायरी ५ : प्रत्याभरण :-**

प्रणाली प्रतिमानाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे प्रत्याभरणाची प्रक्रिया. कारण, त्यामुळे असे जाणवते की, संघटनेच्या प्रमुख व्यक्ती प्रत्याभरणातून मिळालेल्या माहितीनुसार कायम काहीतरी नवीन शिकत असतात आणि बाह्य परिस्थितीनुसार आणि आव्हानांनुसार, आवश्यक तो बदल करत असतात. संघटनेतील कर्मचारी सद्य परिस्थितीची तुलना इच्छित ध्येयाशी आणि पर्यावरणातून मिळालेल्या प्रत्याभरणाशी करतात आणि पुढील कार्याची योजना आखतात.

**मुक्त प्रणाली पद्धतीचे उपयोग :-**

- मुक्त प्रणाली पद्धतीमुळे, प्रणालीतील आणि पर्यावरणातील किचकट समस्यांतील विशिष्ट, महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रित करुन, समस्येचे योग्य विश्लेषण करता येते. त्यामुळे समस्या सोपी करुन, सोडविण्यास मदत होते.
- प्रणालीतील व पर्यावरणातील घटक किंवा चलांची परस्परावर होणारी अन्योन्य क्रिया व त्यांचा परिणाम हा ओळखून, त्याचे विश्लेषण करता येते.
- भविष्यात घडू शकतील अशा घडामोडी व त्यांचा परिणाम ह्यांचा अभ्यास अशा प्रकारे होऊ शकतो.
- चल, प्रथा आणि त्यांच्या परिणामांचे तक्ते हे तर्कशुद्ध व कल्पक विचारांना चालना देऊन, तार्किक कटीबंधामध्ये, दिलेल्या समस्येसाठी बदलाची शक्यता व त्याचे परिणाम, ह्यासाठी व्यक्तींना विचार करण्यास प्रवृत्त करते.
- समस्येची योग्य समज झाल्यामुळे निर्णय घेण्यास आवश्यक अशा विविध उकलींचा विचार केला जातो.
- व्यावसायिक समस्येचे आणि भविष्यात होणाऱ्या घडामोडींचे (-केस स्टडी किंवा प्रत्यक्ष जीवनातील घटना) पद्धतशीर विश्लेषण करण्यास चालना मिळते.
    - जास्त योग्य निर्णय घेणे.
    - चांगले नियोजन

- o जास्त तयारी
- o प्रणालीचा पर्यावरणाशी समन्वय साधणे
- o पर्यावरणातील संबंधित चलांची जुळणी करण्याची शक्यता पाहून, प्रणालीची सुयोग्य स्थिती साधणे
- o काही अदृश्य आणि मोजता न येणाऱ्या आणि भविष्यदर्शी पण बहुधा सहजगत्या आकलनीय नसलेल्या आणि व्यवसायात दुर्लक्षित राहिलेल्या चलांना ओळखणे आणि समजणे.

आर्थिक व राजकीय पर्यावरणाचे विश्लेषण करण्यासाठी आणि भविष्यात उपयोगी पडतील असे चित्र तयार करण्यासाठी ह्याचा विशेषतः उपयोग होऊ शकतो.

**आपली प्रगती तपासा**

१. मुक्त प्रणाली पद्धती म्हणजे काय ?
२. मुक्त प्रणाली पद्धतीचा शिक्षणात कसा उपयोग होतो, त्याची चर्चा करा.
३. मुक्त प्रणाली पद्धतीचे उपयोग सांगा.

❖❖❖❖

# ३

# अध्यापकांचे व्यावसायिक सामाजिकरण

**प्रकरणाची रचना :-**

३.० उद्देश्य

३.१ प्रस्तावना

३.२ अर्थ

३.३ अध्यापकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाचे टप्पे व पायऱ्या

३.४ एक अभिरुचि समूह या नात्याने व्यावसायिक व्यवसायसंबंधित आणि आयोजनात्मक मुद्दे

३.५ व्यवस्थापक, सकारी, विद्यार्थी व पालकांबरोबरचे संबंध.

३.६ विद्यार्थी नियंत्रण परिकल्पना

## ३.० उद्देश्य :-

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही खालील बाबींचे आकलन करु शकता.

- अध्यापकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाचा अर्थ स्पष्ट करु शकाल.
- अध्यापकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाच्या टप्पांचे वर्णन करु शकाल.
- अभिरुचि समुह या नात्याने व्यावसायिक भूमिका स्पष्ट करु शकाल.
- शिक्षकांच्या व्यावसायिक सामाजिकरणातील व्यवसाय व आयोजना संबंधित मुद्दे स्पष्ट करु शकाल.
- व्यवस्थापक, सहकारी, विद्यार्थी व पालकांशी शिक्षकांच्या संबंधाची चर्चा करु शकाल.
- विविध प्रकारच्या विद्यार्थी व पालकांशी शिक्षकांच्या संबंधांची चर्चा करु शकाल.
- विविध प्रकारच्या विद्यार्थी नियंत्रणाचे विश्लेषण करु शकाल.

## ३.१ प्रस्तावना :-

सामाजिकीकरण ही जीवनाच्या आदि पासून अंतापर्यंतची प्रक्रिया असून प्रत्येक व्यक्ति कार्यक्षम भागीदार बनण्याच्या दृष्टीने समुहाचे किंवा समाजाचे रितीरिवाज शिकत असतो. ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे एक व्यक्ति किंवा समूह-सभासद प्रभावी सहभागात त्यांना आवश्यक असलेले कौशल्य, अभिवृत्ति, मुल्य व ज्ञान विकसित करतात. अध्यापकांचे

व्यावसायिक सामाजिकरण म्हणजे एका स्नातकाचे परिपूर्ण व्यावसायिकात झालेले संक्रमण. जेव्हा कार्य स्थितीची वास्तविकता आणि शैक्षणिक कार्यक्रमांच्या अपेक्षा मुल्य, मानके यात समप्रमाणता येते तेव्हा हे संक्रमणाचे सुलभीकरण होते.

## ३.२ अर्थ :-

व्यावसायिक समाजिकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे एक व्यक्ति स्वतःच्या व्यवसायाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या शिकते व व्यावसायिक संस्कृतिचा एक सभासद म्हणून उदयोन्मुख होते.

वीडमॅन, ट्वेल, स्टेन (२००१) यांनी सामाजिकरणाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

"सामाजिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे व्यक्ति ज्ञान कौशल्य आणि स्वभावविशेष विकसित करतात जे त्यांना समाजाचे कमी-जास्त प्रमाणात प्रभावी सभासद बनवितात."

त्यांच्या मते, सामाजिकरण ही एक अर्ध जागृत मताची प्रक्रियाही मानण्यात येते ज्याद्वारे व्यक्ति वर्तनात्मक मानके व स्तरांचे आत्मिकरण करतात आणि त्यांच्या व्यावसायिक क्षेत्राशी ओळख व त्या क्षेत्राविषयीच्या जबाबदारीची जाणीव विकसित करते.

**बॉमन आणि लोहरर (२०००)**

व्यावसायिक सामाजिकरण म्हणजे –

- समूहाच्या संघटनांची ध्येये व सामाजिक प्रेषणकार्य साध्य करण्याचे प्रयत्न,
- व्यावसायिक ज्ञानाचा पुरस्कार,
- व्यावसायिक भाषा व तंत्रज्ञान शिकणे, आणि घटकाशी संबंधित इतर जीवनाच्या भूमिकांमध्ये व्यावसायिक भूमिकेचे समावेष्टन करणे.

हॉकिन्स आणि इवेन्सच्या मतानुसार व्यावसायिक सामाजिकरणात मुल्य, मानक, कौशल्ये व वर्तनाचा समावेश असतो. (सिक्रेस्ट, नॉरपुड आणि किटली २००३)

ओलेसन आणि व्हिट्टेकर यांच्या मते, "व्यावसायिक सामाजिकरण ही एक सांस्कृतिक बदलाची प्रक्रिया असून ज्यात सांस्कृतिक दृष्ट्या वेगळे दोन किंवा अधिक समुहांच्या कमी-अधिक प्रमाणातील अखंड संबंधाची परिणीती एकमेकांच्या सांस्कृतिक तत्त्वांच्या अंगिकार करण्यात होते."

पिमा आणि हडगीन्स (१९९६) यांच्या अनुसार, "व्यावसायिक तादात्म्य किंवा ओळख प्राप्त करण्यात एखादे कार्य तडीस नेण्यास आवश्यक ज्ञान व कौशल्य प्राप्त करण्याचा समावेश

तर होतोच पण त्याचबरोबर अशा अभिवृत्ति, मुल्य, मानक, भाषा व दृष्टिकोनाचाही समावेश होतो, जे अनुभवांचे अर्थबोधन करणे, इतरांबरोबर आंतरक्रिया करणे, योग्य कृतिंना प्राधान्य देणे, आणि योग्य वर्तन निश्चित करणे यासाठी आवश्यक असतात."

## ३.३ व्यवस्थापकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाचे टप्पे व पायऱ्या :-

व्यावसायिक सामाजिकरणाची विभिन्न प्रतिमाने आहेत. ती खालीलप्रमाणे :-

**सिम्पसन प्रतिमान :-**

१ ली पायरी : नेमून दिलेल्या विशेष कार्यात नैपुण्य

२ री पायरी : कार्य वातावरणाशी संबंधित इतर महत्त्वाच्या घटकांबद्दलची आत्मियता

३ री पायरी : व्यावसायिक समुहाच्या मुल्यांचे आत्मिकरण, त्यांनी शिफारस केलेल्या वर्तनाचा अंगिकार

**हिनशॉ प्रतिमान :-**

१ ला टप्पा : पूर्वअनुमानीत अपेक्षित भूमिकेचे सामाजिक समूहाच्या अपेक्षित भूमिकेत संक्रमण,

२ रा टप्पा : या टप्प्यात दोन घटक आहेत.

१. कार्य वातावरणाशी संबंधित इतरांबद्दलची आत्मीयता
२. पूर्वअनुमानित भूमिका व या इतरांनी पुरस्कृत केलेल्या भूमिकेमधील असंगती जाणून घेण्याची क्षमता.

या टप्प्यात संघर्षमय अपेक्षांच्या संचाला दिल्या जाणाऱ्या तीव्र भावात्मक प्रतिक्रियांचा समावेश असू शकतो. जर या व्यावसायिकांचे आदर्श सुयोग्य वर्तनाचे प्रदर्शन करतील तसेच ते सिद्ध करु शकतील की संघर्षमय मुल्ये व स्तरांची प्रणालीचे यशस्वीपणे समावेशन करता येऊ शकते तर असे संघर्ष यशस्वीपणे सोडवितो येऊ शकतात.

३ रा टप्पा : आदर्श मुल्ये व वर्तनाचे आत्मीकरण. आत्मीकरणाचे प्रमाण व संघर्षाच्या निवारणाची कमी- अधिकता ही चले असून ती एकमेकांना प्रभावित करतात.

व्यावसायिक सामाजिकरणाची व्याख्या तीन टप्प्यांमध्ये करण्यात येते.

- नेमणूक किंवा भरती
- व्यावसायिक सिद्धतेची तयारी
- संस्थाकीय सामाजिकरण

पहीले दोन टप्पे नोकरीपूर्व किंवा अनुमानात्मक सामाजिकरणाचे टप्पे समजले जातात जे व्यावसायिक शिक्षणाच्या काळापूर्वी आणि दरम्यान येतात. संस्थाकीय सामाजिकरण हे नोकरी

अंतर्गत काळातील मानण्यात येते जेव्हा व्यक्ति दिलेल्या कार्य वातावरणात लायक व्यावसायिकेच्या भूमिकेचे अर्थबोधन व अनुमान करते.

ओफेसन व्हिट्टेकर (१९७०) व स्टेटॉन व हंट (१९९२) यांनी शिक्षकांच्या सामाजिकरण प्रक्रियेचे कालक्रमिक प्रतिमान तयार केले. हे प्रतिमान तीन वर्गांचे आहे. जीवनचरित्र, नोकरीपूर्व अनुभव आणि नोकरी अंतर्गत अनुभव.

यात पहिल्या दोन प्रक्रिया प्राथमिक भूमिका बजावतात. जीवनप्रक्रिया व नोकरीपूर्व अनुभव हे शिक्षकांच्या सामाजिकरणाचे पूर्वरुप किंवा प्राथमिक रुप समजल्या जाते. राईट (१९५९) व राईट आणि टुस्का (१९६७) सारखे अनेक लेखक असे आग्रही मत मांडतात की शिक्षकांच्या त्यांच्या प्राथमिक बाल्यावस्थेतील अनिवार्य व जवळच्या इतर लोकांशी आलेल्या संबंधाच्या प्रभाव त्यांच्या भविष्यातील शिक्षकी पेशाच्या कार्य निवडीवर पडतो. शिक्षक एक ठरावीक साचा तयार करतात, ज्याचा प्रभाव त्यांच्या वर्तनावर व शिक्षकाच्या भूमिकेवर पडतो. काही लोकांसाठी हे एक आदर्श शिक्षक कसा असावा याचे मार्गदर्शन तत्त्व बनते.

"व्यावसायिक सामाजिकरण" किंवा स्वतंत्र संशोधन पत्र, ऐच्छिक सेवा, शिक्षक व इतर सहकाऱ्यांबरोबर यासारखे “अनौपचारिक सामाजिकरण” काही लोक कमी महत्त्वपूर्ण मानतात; परंतु काहींसाठी या क्रिया महत्त्वाच्या असतात. मॅक किने व त्यांचे सहचारी असे आग्रही मत मांडतात की "विद्यार्थ्यांना दिलेल्या अध्ययनाच्या संधि तसेच अनुभव व ज्ञान व कौशल्य त्यांना महाविद्यालयीन जीवनाच्या कार्यपद्धतीचे आकलन, परिपूर्ण शिक्षण अनुभव, सामाजिक कल्पना तसेच आपल्या शिस्तीचे नैतिक तत्त्व व स्तर समजण्यास मदत करते."

दुसरे लेखक या कृति कार्यांची व्याख्या इतर किंवा अनौपचारिक अभ्यासक्रम असे करतात ज्यात पारंपारिक वर्गकक्षाच्या बाहेरील कार्यक्रमांची चर्चा मॅक्किने आदिंनी केली आहे. त्यांच्या मते, व्यावसायिक सामाजिकरण निष्क्रिय अध्ययनापेक्षा कृतिशील अध्ययनाला प्रोत्साहन देते. अशा कृतिशील अध्ययनाची प्रक्रिया भिन्न प्रकारच्या विद्यार्थी लोकसंख्येसाठी योग्य असून यामुळे सलोख्याचे वातावरण हमखास निर्माण होते व घटत्या भरतींवर उपाय ठरु शकते. त्यामुळे हुशार, होतकरु विद्यार्थ्यांची गळती थांबुन त्यांना स्नातक कार्यक्रमांसाठी तयार करणे सुलभ जाते. दुसरीकडे ब्रुक्स (१९९७) व्यावसायिक सामाजिकरणास एकटेपणाच्या समस्येचे समाधान करणारे मानतात जे अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाच्या उपयोगाने साध्य होते.

व्यावसायिक सामाजिकरण व विद्यार्थी निष्पत्ति यात सकारात्मक संबंध दिसून येतो. निअपोलिटॉन (१९९२) यांनी एक लहान प्रमाणातील इन्टर्नशीप कार्यक्रमच्या विद्यार्थ्यांच्या कारकीर्द नियोजनाच्या स्पष्टतेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला त्यांनी असा निष्कर्ष काढला की, ज्या विद्यार्थ्यांनी या इन्टर्नशीप कार्यक्रमांत सहभाग घेतला, त्यांचा कारकीर्द निवडीवर व उच्च शिक्षण निवडीवर अधिक आत्मविश्वास होता. पास्करेला (१९८०) सुचवितात की अनौपचारिक सामाजिकरण आणि विद्यार्थ्यांचा महाविद्यालयीन अनुभव, त्याच्या शैक्षणिक उच्च आकांक्षा, त्यांचा बौद्धिक विकास, शैक्षणिक उपलब्धि यांचा परस्पर संबंध आहे.




**आकृती १: शिक्षकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाचे बीड मॅन, ट्वेल आणि स्टेन (२००१) यांचे प्रतिमान**

अशाप्रकारे, व्यावसायिक सामाजिकरण ही दोन पायऱ्यांची प्रक्रिया आहे. त्या म्हणजे औपचारिक व अनौपचारिक ज्यात प्रशिक्षणादरम्यान प्राप्त केलेली मुल्ये व कौशल्ये यांचे कार्य परिस्थितीच्या मागणीप्रमाणे समायोजन करणे आवश्यक असते.

अध्ययन शैली उपपत्तिनुसार, "अध्ययन ही चार टप्प्यांची प्रक्रिया आहे. मूर्त अनुभव, चिंतनात्मक, निरीक्षण, अमूर्त संकल्पनाकरण आणि उत्स्फुर्त प्रायोगिकरण" (कोल्ब, १९७४) भारी यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना अध्ययनाद्वारे शालेय कार्यात समरस, एकरुप होण्यास व खूप मेहनत करण्यास प्रोत्साहित करायला हवे. (ऑस्टिन १९८४; कुह १९९६; पॅस्करेला आणि टेरेन्झिनी १९९१).

अशाप्रकारे विद्यार्थ्यांना शोध प्रकल्प हाती घेणे, मोठे शालेय कार्यक्रम हाताळणे वगैरेंसाठी प्रोत्साहन द्यायला हवे. मॅक्किने आणि त्यांच्या सहचारींच्या मते, (१९९८) वर्गाबाहेरील कार्यक्रम व कृति विद्यार्थ्यांच्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेकडे अग्रसर होण्यास मदत करतात. आणि महाविद्यालयातील चिकाटी याबाबत त्यांच्या समाधानात सकारात्मक संबंध असतो. त्याचप्रमाणे अधिकाधिक विद्यार्थी-शिक्षकगणांबरोबरीने वर्गकक्षाबाहेर विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन कार्य हे सर्व विद्यार्थ्यांच्या संस्थेविषयीच्या समाधानाशी (ऑस्टीन १९९३) चिकाटीशी (ग्रॉसेट १९९१), शैक्षणिक वृद्धिशी (टेरेन्झीनी व राईट १९८७, पास्केरेला १९८५), शैक्षणिक वृद्धिशी (टेरेन्झीनी व राईट १९८७), ज्ञान संवर्धनाशी (कुइ १९९३, स्प्रींगर आदि १९९५)

आणि कारकीर्द अभिरुचि व निवडीशी (ॲस्टिन १९९३) सकारात्मक शालेय कार्यक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाचा अभ्यास केला. या अभ्यासाच्या निष्पत्तिनुसार १) विद्यार्थ्यांची चिकाटी (कॅरल १९८८, ख्रिस्ती व दिहॅम १९९१, पास्कटेला व चॅपमॅन (१९८३) २) शालेय वृद्धि (टेरेन्झिनी व राईट १९८७) आणि ३) अध्ययनातील आंतरिक अभिरुचि यांच्याशी सकारात्मक सहसंबंध असल्याचे आढळून आहे.

मॅक्किनी व सहकाऱ्यांच्या मते, (१९९८) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व्यावसायिक सामाजिकरणाची व्याख्या अशा स्वरुपात केली ज्यात "त्यांच्या क्षेत्रात किंवा भविष्यातील व्यवसायात अपेक्षित भूमिका, वर्तन किंवा मानकांचे अध्ययन होते." याच विद्यार्थ्यांनी व्यावसायिक सामाजिकरणाच्या सुधारणेसाठी विविध मार्ग सुचविले. या दृष्टीने त्यांनी कार्यक्रमाची सुधारणा करणे, शिक्षक गणांबरोबर अधिकाधिक आंतरक्रिया, व्यवसाय विकल्पांबद्दल अधिक माहिती, शिक्षक प्रशिक्षणाचा शेवटचा सेवा-काळात कार्यक्रमांत सुधारणा आणि समुपदेशनाचा उपयोग इ. गोष्टींवर भर दिला.

दुसरीकडे शिक्षक गणांच्या मते व्यावसायिक सामाजिकरण म्हणजे विद्यार्थ्यांचा संशोधन प्रक्रियेत सहभाग, परिसंवाद, आयोजन, व्यवसायाशी संलग्न पदविका, शिक्षकगणांशी अनौपचारिक संबंध, विद्यार्थ्यांना व्यावसायिक परिषदांना नेणे, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या सामाजिक कार्यामध्ये भाग घेणे, शाखा-निहाय संशोधन परिचर्चा, क्षेत्र-भेट, व्यवसाय-दिवस, शाखा-निहाय वृत्तपत्र इ. द्वारे विद्यार्थ्यांचे व्यवसाय शिक्षण.

अनौपचारिक सामाजिकरणाच्या विभिन्न फायद्यांमुळे जास्तीत जास्त संशोधक याचा पुरस्कार करीत असले तरी त्यात अनेक अडथळे आहेत. बऱ्याच शिक्षकांची अशी तक्रार असते की ज्या संस्था अशा प्रकारच्या सामाजिकरणाचा पुरस्कार करतात त्यांना अधिक काम, अधिक वेळ व अधिक मेहनतीची आवश्यकता असते तसेच अधिक किंमत मोजावी लागते. याशिवाय जे शिक्षक व आयोजक सुधारणांच्या विरुद्ध असतात, त्यांच्याकडून बदलांना प्रखर विरोध होतो. शिवाय पालक व फायदे करण्याऱ्या लोकांकडूनही या व्यावसायिक अनौपचारिक सामाजिकरणाला विरोध होतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना अशा वातावरणाशी जुळवून घेणे कठीण होऊ शकते व अतिरिक्त कार्य करण्यास ते अनुत्सुक असू शकतात.

कॉलीन्सन (१९९९) ने उत्तम शिक्षकांच्या वैशिष्ट्यांचे संशोधन करीत असतांना उत्तम शिक्षकांना आवश्यक तीन प्रकारच्या ज्ञानाची व्याख्या केली आहे. व्यावसायिक ज्ञानाची पारंगतता किंवा शिक्षकाचे त्याच्या विषयावर असलेले प्रभुत्वाचे प्रमाण याचबरोबर अंतर व्यक्तिगत व आंतरव्यक्तिगत ज्ञान ही तेवढेच महत्त्वपूर्ण व अनिवार्य असते. अंतरव्यक्तिगत ज्ञानास लोक-कौशल्यही म्हंटले जाते. याचा अर्थ "शिक्षकांचे त्यांच्या परिसराशी असलेले संबंध व आंतरक्रिया." हॉवे व कॉलीन्सन (१९९५) यांनी अंतरव्यक्तिगत ज्ञानाला दुजोरा दिला आहे कारण हे ज्ञान शिक्षकांना टीकेप्रति तसेच विकेंद्री मतांच्या प्रति सहिष्णू बनविते. तसेच हे ज्ञान त्यांना अध्ययन-अध्यापनात नवनवीन पद्धतिंचा अंगिकार करण्यास प्रवृत्त करते.

स्टर्नबर्ग व हॉवर्ड (१९९५) अंतरव्यक्तिगत ज्ञान व विभिन्न प्रकारच्या यशस्वी अनौपचारिक सामाजिकरण यांच्या संबंधावर भर देतात.

दुसरीकडे आंतरव्यक्तिगत ज्ञानाची व्याख्या आपण कोण आहोत अशी होते. हे ज्ञान कार्य नितितत्त्व, आत्मियतेचे किंवा पालनाचे नितितत्त्व तसेच अध्ययनाकडील मनाचा काळ याच्याशी संबंधित आहे. शिक्षकांची स्वतःची नितितत्त्वे तसेच शिक्षणाबद्दलची त्यांची आत्मियता विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याच्या त्यांच्या क्षमतेचा प्रभाव निःसंशयपणे विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेवर, त्यांच्या जबाबदारी व आत्मविश्वासावर पडतो.

थोडक्यात विडमेन (१९८९) च्या मतानुसार दोन्ही औपचारिक व अनौपचारिक सामाजिकरणाचा प्रभाव विद्यार्थ्यांची मुल्ये, आकांक्षा व व्यवसाय निवडीवर पडतो.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाचा अर्थ स्पष्ट करा.
२) शिक्षकांच्या व्यावसायिक सामाजिकरणाच्या पायऱ्यांची चर्चा करा.
३) शिक्षकांच्या अनौपचारिक सामाजिकरणाची कोणती आवश्यकता आहे ?

## ३.४ एक अभिरुचि समूह या नात्याने व्यावसायिक व्यवसायसंबंधित आणि आयोजनात्मक मुद्दे :

**अभिरुची-समूह या नात्याने व्यावसायिक :-**

समर्थन समूह (शिवाय दबाव समूह, वजन खर्ची करणारा समूह, व इतर अभिरुचि समूह व विशेष अभिरुचि समूह) लोकमत तसेच धोरणांना प्रभावित करण्यासाठी विभिन्न प्रकारचे समर्थन वापरतात. या समूहांनी राजकीय व सामाजिक प्रणालींच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्या आहेत व अजूनही बजावत आहेत. हे समूह आकारानुसार प्रभावानुसार व हेतूनुसार वेगवेगळे आहेत. यातील काहींचे लांब पल्ल्याचे दूरच्या काळाचे सामाजिक हेतू असतात तर काही समूह तत्कालीक मुद्यांवर केंद्रीभूत असतात व अशा मुद्यांना प्रतिसाद देतात.

कृतिंचे हेतू हे राजकीय विश्वास, नैतिक किंवा व्यापारविषयक स्थितीवर अवलंबून असू शकतात. हे समूह त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी विभिन्न प्रकारच्या पद्धती वापरून बघतात; ज्यात वजन खर्ची करणे, प्रसार माध्यम मोहिम, प्रसिद्धी, टुम, मतदान तसेच संशोधन व धोरण आखणी वगैरेचा समावेश असतो. काही समुहांना पाठबळ असते. त्यामुळे हे समुह राजकीय प्रक्रियेवर आपला प्रभाव टाकतात. पण काही समुहांकडे असे प्रभावी मार्ग नसतात.

विशेष अभिरुची समूह (SIG) हा एक असा समूह गट आहे ज्याची रुचि ज्ञानाच्या, अध्ययनाच्या किंवा तंत्रज्ञानाच्या विशिष्ट क्षेत्राचा पुरस्कार करण्यात असते. यातील सभासद त्यांनी निश्चित केलेल्या खास क्षेत्रावर प्रभाव पाडण्यासाठी किंवा उपाययोजना करण्यासाठी एकमेकांशी सहकार्य करतात. या दृष्टीने ते एकमेकांना भेटतात, संप्रेषण करतात व परिषदा आयोजित करतात.

**शिक्षक अभिरुचि समूह या नात्याने शिक्षक संघटना :-**

ए. एम, कार सॉन्डर्स व पी. ए. विल्सन (१९३३) यांनी त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याद्वारे अध्यापनाला एक व्यवसाय म्हणून त्याचा खरा व कायदेशीर दर्जा प्राप्त करुन दिला. त्यांनी आपल्या या कार्यात १६ व्यवसायांची नोंद कली त्यातील एक अध्यापन होते.

अध्यापन हे ज्ञानाच्या अंगावर आधारित आहे. अध्यापनकर्ते शिक्षकी व्यवसायाच्या व्याप्तित येण्याआधी शिस्तबद्ध उद्‌बोधनाच्या कठीण मार्गातून जात असतात. ते स्वतःला जीवनभर अध्यापनाच्या कार्यासाठी पाहून घेतात. ते आचार संहितेला बांधील असतात.

या व्यवसायातील व्यक्ति त्यांची व्यावसायिक परिस्थिती पडताळल्या नंतर व्यावसायिक दृष्ट्या अर्थपूर्ण पद्धतीने एकत्रित येतात. अशा व्यावसायिक संघटना व्यावसायिकरणाचा पुरस्कार करतात व व्यावसायिक ओळख, तादात्म्य, स्वायत्तता व दर्जा याबाबतीत योगदान करतात.

शिक्षण संघटना आपल्या सभासदांच्या अभिरुचिंना राजकीय व सामाजिक कार्यक्रम, सामुहिक करार, प्रकाशन, परिषद, तालीम, प्रशिक्षण या माध्यमातून चालना देतात. या संघटना आपल्या सभासदांची सुरक्षितता व कल्याणाची काळजी घेतात, सुचना आदान-प्रदान घडवून आणतात आणि आचार-संहिता तयार करुन त्याचा पुरस्कार करतात. यातील कांही संघटना सार्वजनिक धोरणाच्या निर्माण कार्यात उघडपणे प्रत्यक्ष दबाव समुह म्हणून कार्यरत असतात. शिक्षक संघटना त्यांच्या सभासदत्त्व, आंतरिक प्रशासन, ध्येये व कार्यक्रम व प्रभावानुसार एकमेकांपेक्षा वेगळी असतात.

शिक्षकांचा अभिरुचि समूह शिक्षकांना त्यांच्या व्यवसायाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेण्याच्या संधि प्रदान करतात. हे समुह शिक्षक व संचालक व जनतेमधील दुवा बनण्याचे कार्य करतात. तसेच कायदेसंबंधी मोहीमेत सहकार्य करतात. अशाप्रकारे व्यावसायिक या नात्याने शिक्षकांच्या प्रभावी कार्यासाठी शिक्षक संघटनांचे महत्त्व अवादातीत आहे.

अध्यापनाच्या व्यावसायिकरणातील एक अत्यंत महत्त्वाची कडी या नात्याने शिक्षक संघटनाचे महत्त्व शिक्षण समितिने (१९६४-६६) मानले आहे. या समितिने शिक्षक, संघटनांचे खालील कार्य नमुद केली आहेत :-

i. त्यांच्या सभासदांसाठी वैयक्तिकरित्या व सामुहिकरित्या त्यांचा हक्काचे संरक्षण करणे व त्यांना सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक दर्जा प्राप्त करुन देणे.
ii. त्यांच्या व्यावसायिक अभिरुचिचे संरक्षण करणे व सेवा व कार्याची समाधानपूर्ण स्थिती प्राप्त करुन देणे.

iii. परिचर्चा, प्रकाशने, वाचनालय सेवा, संशोधन व ज्ञानवृध्दि कार्यक्रमां द्वारे व्यावसायिक वृद्धिच्या संधि प्राप्त करुन देणे.

iv. सातत्याने बदलणाऱ्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीच्या आव्हानांचा सामना करण्याच्या दृष्टीने शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्य करणे.

v. शिक्षक संघांची स्थापना करुन विषय अध्यापनात सुधारणा घडवून आणणे.

vi. सभासदांना पाळावयाच्या आचार सहिता स्थापीत करणे व त्यांचे सभासदंना पालन करण्यास भाग पाडणे.

शिक्षकांच्या व्यावसायिकरणास वृद्धिंगत करण्यात शिक्षक अभिरुचि समूह मदत करतात. त्यांनी चालना दिलेले काही कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत:-

- परिचर्चा व परिसंवादाचे आयोजन.
- उद्‌बोधन व सेवांतर्गत पाठ्यक्रम चालवणे.
- विषय शिक्षकांची संघटना बनवणे.
- परिक्षांचे आयोजन करण्यास शिक्षकांना मदत करणे.
- वर्षातून दोनदा शिक्षकांसाठी नियमित स्वरुपात प्रशिक्षण अभ्यासक्रम चालवणे.
- आवश्यक अभ्यासक्रमाशी संबंधित लेखन साहित्य पुरवणे, संशोधन कार्य हाती घेणे.
- अभ्यासक्रम विकसनात मदत करणे, परिक्षांचे आयोजन करणे व मुल्यमापन करणे.
- मासिक पत्रिका, वृत्तपत्रे, शोध पत्रके प्रकाशित करणे. सभासदांसाठी व्यावसायिक नितितत्त्वे किंवा आचार संहिता विकसित करुन त्यांच्याकडून यांचे पालन करुन घेणे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) अभिरुचि समुह म्हणजे काय ?

२) शिक्षक अभिरुचि समुहाचे कार्य स्पष्ट करा.

---

---

---

---

---

**व्यवसायात्मक व आयोजनात्मक मुद्दे :-**

कोहेन व सहकारी त्यांच्या प्रतिमानाद्वारे कमी क्षमता असलेल्या शाळा व शालेय प्रणाली द्वारे केलेल्या व्यावसायिक विकासातील गुंतवणूकीचा नकारात्मक किवा शुन्य परिणाम होण्याची कारणे स्पष्ट करतात. त्यांच्या मते एखाद्या संघटनेत खालील क्षमता असणे आवश्यक आहे.

- शिक्षकांनी प्राप्त केलेल्या नवीन कौशल्य तसेच ज्ञानाशी त्यांनी केलेल्या संकीर्ण आंतरक्रियेच्या प्रयत्नांना पाठबळ देणे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अध्ययन कार्यात गुंतवण्याचे नवनवीन विद्यमान तंत्र व या प्रकारच्या विशेष अभ्यासास पूरक परिस्थिती प्रमाणे विशिष्ट विद्यार्थ्यांसाठी आवश्यक विषयवस्तू व अभ्यासक्रमात सुधारणा घडवून आणण्याच्या शिक्षकांच्या कार्यास प्रोत्साहन देणे.
- मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत ध्येयांची माहिती पोहोचवणे तसेच ती प्राप्त करण्यासाठी कोणत्या शैक्षणिक साधनांचा उपयोग होऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन करणे.
- जोपर्यंत उच्चतम कार्यक्षमतेची प्राप्ती होत नाही तोपर्यंत शिक्षक व विद्यार्थ्यांच्या कार्यक्षमतेबद्दल टिका-टिप्पणी न करणे.
- ज्या ज्ञान व कौशल्याच्या अध्ययनाची लोकांना संधि मिळाली नसेल अशा ज्ञान व कौशल्यां प्रदशनाची त्यांच्याकडून अपेक्षा न करणे.

अशाप्रकारची परिस्थिती बहुतेक शाळा व शालेय प्रणालींसाठी संघटनेच्या पुनर्रचनेचा प्रभावपूर्ण कार्यक्रम तयार करु शकते. या साठी संघटनांनी खालील गोष्टींची निश्चितता करणे आवश्यक आहे.

- शिक्षकांकडून अपेक्षित शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये निष्णात असणे. ही तज्ञता फक्त शिक्षकांना वेगवेगळ्या प्रकारे कसे शिकवायचे एवढ्या पुरतीच मर्यादित न राहू देता त्याही पुढे जाऊन शिक्षकांबरोबर वर्गात कार्यरत राहून वेळोवेळी येणाऱ्या व्यावहारिक समस्यांचे समाधान सामुहीकरित्या सोडवून शैक्षणिक कार्यक्रमात सातत्याने सुधारणा घडवून आणणे.

- शिक्षकांच्या व व्यावसायिक विकासकांच्या संधारणीय आंतरक्रियेच्या कार्यास हातभार लावण्याच्या तसेच आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने असलेल्या साधनांचे योग्य प्रबंधन करणे.

- शैक्षणिक कार्यात येणाऱ्या समस्यांमध्ये कोणत्या समस्यांना प्राधान्य द्यावे व कोणत्या समस्या दुय्यम स्थानावर ठेवाव्या याच्या स्पष्ट नोंदी करणे व नंतरच व्यावसायिक विकासास आवश्यक साधने निश्चित करणे. शिक्षक व विद्यार्थी दोहोंसाठी शाळेत ही अध्ययनास पूरक वातावरण निर्माण व्हायला हवे. म्हणूनच कोणत्या गोष्टींना प्राथमिकता देणे हे जाणून घ्यायला हवे.

- शिक्षक व प्रबंधकांमध्ये गुणवत्ता, क्षमता, कुशलता व कार्यक्षमतेच्या आधारावर सार्वजनिक आणि अधिकारात्मक तफावत निर्माण करणे.

- शालेय संस्थेच्या सभासदांना 'काय करावे' व 'कसे निर्माण' करावे हे शिकण्याची क्षमता विकसित करणे. या दृष्टीने असे सभासद शोधणे ज्यांना 'काय करावे' याचे योग्य ज्ञान आहे व जे या कार्यात मदत करु शकतात.

प्रभावी व्यावसायिक विकासासाठी संघटनीय क्षमतेच्या रुपातील कौशल्याची आवश्यकता असते. यासाठी वैविध्यपूर्ण संस्थाकीय भुमिकांची जरुरी असते.

**विचारात घेण्याची आवश्यकता असलेले वादातीत मुद्दे व मान्यता :**

- शिक्षकांचे वस्तुनिष्ठ व सर्वंकश मुल्यमापन
- सर्व शिक्षक त्यांच्या कौशल्य व ज्ञानपातळीत समसमान आहेत अशी मान्यता, यामुळे शिक्षक एकमेकांकडून प्रभावीपणे शिकण्याची शक्यता ढासळते. त्याचप्रमाणे निकटवर्तीय सहकाऱ्यांमध्ये असलेल्या तज्ञांकडूनही या मान्यतेमुळे शिकण्याची शक्यता ओसरते.
- अध्यापन हा वैविध्यपूर्ण व्यवसाय नाही.
- शिक्षक एकमेकांशी अलिप्त होऊन कार्य करतात.
- अधिकाधिक संस्थांना निष्क्रियता व असहायतेची संस्कृति व्यापते. शिक्षक व आयोजक अशी संस्कृति अकार्यक्षम संस्थांच्या कार्यप्रणालीच्या परिणामामुळे शिकतात; ते स्वतः तसे विचार करतात किंवा वागतात म्हणून नाही. संस्थाकीय सुधारणा ही संस्कृति बदलु शकते.
- बदल व सुधारणाशी संबंधित समस्यांना अधिक काळ व पैसा लागतो या सबबीसाठी त्याचा विरोध करणे.

म्हणून सुधारणेच्या कार्यात तीन गोष्टी मुलतः व एकाच वेळी बदलणे :-

१) मुल्ये व शाळेतील लोकांचा काय करण्यायोग्य आहे व काय करता येऊ शकते याबद्दलचा विश्वास.
२) रचनात्मक परिस्थिती जेथुन कार्य साध्य होते.
३) योग्य मार्ग ज्यातून लोक कार्य करण्यास शिकतात.

कोणत्याही बहुविध-सांस्कृतिक वातावरणात व्यावसायिक संबंध-सलोखा टिकविण्यासाठी आयोजक, अध्यापक व इतर कर्मचारी यांच्यात प्रामाणिक वचनबद्धता, संवेदनशीलता, दुसऱ्यांना समजून घेण्याची वृत्ती असणे आवश्यक असते. त्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

- **वैयक्तिक तफावताचा आदर करणे :-** ज्याप्रमाणे शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याचा त्याच्या निराळेपणामुळे आदर करतात त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांचा त्यांच्या स्वतःच्या आगळ्या मुल्यांमुळे, मान्यतांमुळे व मतामुळे आदर करायला हवा.

- **सुखसोयीच्या क्षेत्रातून बाहेर पडणे :-** जे लोक आपल्या सारखे असतात त्यांच्याबरोबर आपण आरामात असतो. पण अशामुळे आपल्याला आपल्या सहकाऱ्यांना अधिक जाणून घेता येत नाही.

- **दुसऱ्यांबद्दल टिका टिप्पणी करणे टाळणे :-** संदर्भाची चौकटी म्हणून आपल्या समुहाचे मानक वापरु नये. 'वेगळे' म्हणजे 'कमी प्रतिमा' नव्हे. प्रत्येक मानवात अंतर्गत योग्यता असतेच.

- **प्रभावीपणे संप्रेक्षण करण्यास शिकणे :-** निम्न स्तरीय संदर्भात तसेच उच्च स्तरीय संदर्भात संप्रेक्षण करण्यास तरबेज होणे आवश्यक आहे. काळजीपूर्वक ऐकणे व निरीक्षण

करणे जरुरीचे असते. भाषा प्रभुत्त्व नसलेल्या लोकांना समजून घ्यायला पाहिजे. योग्य लयीत, आवाजात व स्पष्टपणे केलेले भाषण सगळ्यांना समजते.

- **सकारात्मकतेला महत्त्व देणे :-** संस्कृतीतील सकारात्मक गोष्टींचे आदान-प्रदान व्हायला पाहिजे. स्तूती व शाबासकी सारख्या चेतकांद्वारे सकारात्मक वातावरण वाढीस लावायला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षकांच्या व्यावसायिक सामाजीकरणासंबंधीचे संस्थाकीय वादग्रस्त मुद्यांची चर्चा करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.५ शिक्षकांचे व्यवस्थापक, सहकारी विद्यार्थी व पालकांबरोबरचे संबंध :-

**शिक्षक व व्यवस्थापक :-**

शिक्षकांनी एक कार्यरत पगारी कर्मचारी या नात्याने खालील गोष्टी लक्षात ठेवायला पाहिजे.

अ) विद्यमान नियमांप्रमाणे त्यांनी आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या. त्याचवेळी जे नियम व्यावसायिक फायद्याच्या दृष्टीने अडसर ठरतील त्यांना बदलण्यासाठी पुढाकार घेण्याची जबाबदारी तसेच गरज भासल्यास व्यावसायिक संघटनांच्या माध्यमाने चळवळी घडवून आणण्याची जबाबदारी घ्यावी.

ब) योग्य माध्यम व वाहिनीद्वारे व्यवसायाचे व्यापारीकरण संचालीत करणे.

क) कोणत्याही फायद्याच्या नोकरीपासून किंवा जबाबदारी पासून दूर राहणे जी विद्यमान व्यवसायाची जबाबदारी पार पाडण्यास अडथळा निर्माण करु शकतील; किंवा जी विद्यार्थी, सहचारी व समाज किंवा शिक्षक समुहाबरोबरच्या संबंधाला इजा पोहोचवेल.

ड) संस्थांच्या धोरण निर्मितीस सहकार्य करावे व दिलेली कार्ये त्या त्या शाखेच्या नियमावर हुकूम पार पाडावी.

इ) व्यवसायाचे हित लक्षात ठेवून संस्थेच्या फायद्यासाठी अधिकाऱ्यांशी सहाकार्य करावे.

फ) कराराशी तोपर्यंत बांधील रहावे जोपर्यंत .........

१) कराराअंतर्गत दिलेले कार्य पूर्ण होत नाही.

२) परस्पर संगनमताने करार खारीज होत नाही.

३) कायद्याच्या चौकटीद्वारे करार खारीज होत नाही.

ग) पदातील बदल करण्याआधी यथायोग्य सूचना द्यावी किंवा त्याची अपेक्षा करावी.

ह) अगदी अपरिहार्य कारणाखेरीज अनावश्यक सुट्या घेणे टाळावे. आवश्यक जबाबदारी पूर्ण करुन किंवा त्याकार्याची योग्य व्यवस्था करुनच सुट्या घ्याव्या.

**शिक्षक व सहकारी :-**

यांच्या संबंधांबाबत खालील गोष्टी योग्य व नैसर्गिक आहेत व असाव्यात.

अ) इतरांनी त्यांच्याशी जसे वर्तन करावे अशी अपेक्षा असते तसेच वर्तन दुसऱ्यांशी त्यांनीही करायला पाहिजे.

ब) दुसऱ्या शिक्षखांबद्दल आदराने बोलावे व व्यवसायच्या फायद्याच्या दृष्टीने त्यांचे सहकार्य घेण्यास तयार असावे.

क) वरच्या अधिकाऱ्यांकडे आपल्या सहकाऱ्यांविरुद्ध गुप्तपणे तक्रारी करणे टाळावे.

ड) सहकाऱ्याच्या संबंधात त्यांची जात, पात, धर्म किंवा लिंग आड येऊ देऊ नये. त्याचप्रमाणे या गोष्टींचा आपल्या स्वार्थी फायद्यासाठी वापर करणे टाळावे.

**शिक्षक व विद्यार्थी :-**

या संदर्भात शिक्षकांनी खालील गोष्टींची काळजी घ्यावी :-

अ) स्वतःचे मतप्रदर्शन करतांना विद्यार्थ्यांच्या हक्कांचा व प्रतिष्ठांचा आदर करावा.

ब) विद्यार्थ्यांच्या जात, धर्म, त्यांच्या शारिरीक वैशिष्ट्याचा विचार न करता त्यांच्याशी न्याय्यपूर्ण व निःपक्षपातीपूर्ण वर्तन करणे.

क) विद्यार्थ्यांना त्यांची गुणसंपत्ति वाढवण्यास, व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यास, समाज कल्याणासाठी कार्य करण्यास प्रोत्साहन देणे.

ड) विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखणे व समजणे.

इ) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, शारिरीक श्रमाबद्दलचा आदर तसेच लोकतंत्र व शांतीचा आदर्शवाद रुजविणे.

फ) विद्यार्थ्यांबद्दल प्रेम भाव ठेवणे व कोणत्याही कारणास्तव त्यांच्याशी द्वेषभावनेने वर्तन न करणे.

ग) विद्यार्थ्यांच्या उपलब्धीवर त्यांचे मुल्यांकन करणे. हे मुल्यांकन जास्तीत जास्त वस्तुनिष्ट व प्रामाणिक असावे.

ह) शालेय वेळेच्या पलीकडेही विद्यार्थ्यांच्या कामी येणे, त्यांच्या संपर्कात राहणे. कोणत्याही प्रकारच्या आर्थिक फायदा किंवा मोबदल्याची अपेक्षा न करता त्यांना मदत व मार्गदर्शन करणे.

ल) आपल्या राष्ट्रीय परंपरा व ध्येयांचे आकलन विकसित करण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

म) विद्यार्थ्यांना एकमेकांविरुद्ध, सहकाऱ्यांविरुद्ध तसेच व्यवस्थापकांविरुद्ध चिथावण्याचे टाळणे. (परंतू शिक्षकांना स्वत:चे मत अभिव्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे व ते त्यांना परिचर्चा, सभा किंवा इतर जाहीर स्थानांवर विद्यार्थ्यांच्या अस्थितीत करण्याची मुभा असावी)

**शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग :-**

I. शिक्षकांनी या कर्मचाऱ्यांना आपले सहकारी व सम-भागीदार मानून सहकार्याने कार्य करावे.

II. शिक्षकांनी शिक्षक व शिक्षकेत्तर सभासदांच्या सामाईक कर्मचारी समितिंना सहाय्य करावे.

**शिक्षक व पालक :-**

**शिक्षकांनी लक्षात ठेवायच्या गोष्टी :-**

अ) शिक्षक संघटना व समुहांच्या माध्यमाने संस्था विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्कात राहील याचे प्रयत्न करणे आवश्यक तेव्हा विद्यार्थ्यांच्या उपलब्धिचा अहवाल पाठवणे व संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीच्या दृष्टीने पालक-शिक्षक सभेचे आयोजन करुन एकमेकांच्या कल्पना व मतांचे आदान-प्रदान करणे.

## ३.६ विद्यार्थी-नियंत्रण परिकल्पना :-

विद्यार्थी-नियंत्रण परिकल्पनेची व्याख्या दोन रचनांच्या संयोगाने करता येते. स्वायत्तता विरुद्ध नियंत्रण व मानवता विरुद्ध अधिकारिता. स्वायत्तता विरुद्ध नियंत्रण ह्या संकल्पनेचा उगम 'बोधात्मक मुल्यमापन' उपपत्तितून झाला. (डेसी & रायन १९८५). या उपपत्तिनुसार प्रौढ व्यक्तिंची मुलांशी वागतांना एक सर्वसाधारण प्रवृत्ति असते जी बालकांच्या स्वायत्तत्तेला पाठींबा देण्यापासून त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यापर्यंतच्या स्तरापर्यंत जाते. जे शिक्षक विद्यार्थ्यांच्या वर्तनाला बक्षिसे, तुलना या सारख्या बाह्य नियंत्रणाद्वारे प्रेरणा देतात ते वर्तनाचे नियंत्रक समजले जातात. त्याचप्रमाणे जे अश्या बाह्य नियंत्रणरुपी प्रेरणांचा कमीत कमी उपयोग करतात व याऊलट जे बालकांच्या कल्पना, समस्या व त्याचे स्वयंकतृत्त्व या संदर्भात त्यांच्या अंतर्गत प्रेरणांना मानतात त्यांना स्वायत्तताचे पाठीराखे समजल्या जाते.

'शिक्षक नियंत्रण विरुद्ध स्वायत्तता रचना' याचे चार वर्ग पडतात :-

- अति नियंत्रण
- मध्यम नियंत्रण
- अति स्वायत्तता
- मध्यम स्वायत्तता

अति प्रमाणांतील नियंत्रक शिक्षक उपाय शोधून काढतात व चोख बाह्य प्रेरक या उकलीचे अंमलीकरण करण्यासाठी वापरतात. मध्यम प्रतिचे नियंत्रक शिक्षक उकल शोधून

काढतात पण या उकलीचे अंमलीकरण करण्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या अंतर्गत जबाबदारीच्या आधारावर प्रेरणा देतात. उदा. "काय करायला हवे ते ठरवा" किंवा त्यांच्या मनात समस्येबाबतची काळजी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात ज्यात दुसऱ्यांचं ऐकण्याची प्रेरणा असते व “ते तुमच्याच भल्यासाठी आहे”. अशी उकलीच्या अंमलीकरणाची प्रेरणा देतात.

मध्यम प्रतिचे स्वायत्त शिक्षक मुलांना तुलनात्मक माहितीचा उपयोग करण्यास प्रोत्साहन देतात जी त्यांना त्यांच्या समवयस्क मित्रांनी समस्या कशी शोधली व त्यावर कोणते उपाय केले याबद्दल त्यांना आकलन करुन देतात.

उच्च प्रतिच्या स्वायत्ततेवर विश्वास करणारे शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या समस्या शोधण्यास, त्यावर उपाय तयार करण्यास व ते स्वतः वापरुन बघण्यास प्रोत्साहन देतात.

शिक्षक उद्बोधनाच्या ‘मानवतावादी विद्यार्थी नियंत्रण’ की ‘अधिकारवादी विद्यार्थी नियंत्रण’ या दुसऱ्या भागाचे आकलनही व्हायला हवे. मानवतावादी स्थितीज्ञानातून शाळा ही अशी शालेय संस्था म्हणून बघितल्या जाते तेथे विद्यार्थी सहकारी-आंतरक्रिया व अनुभवाद्वारे शिकतात. या प्रतिमानात अध्ययन व वर्तन यांकडे नैतिक अंगाने न बघता मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय अंगाने बघितल्या जाते. ही परिस्थिती प्रत्येक विद्यार्थ्याची व्यक्तिगततेच्या महत्त्वावर भर देते. तसेच विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण गरजांच्या पूर्तीसाठी योग्य वातावरण निर्मितीला प्राधान्य देते.

मानवतावादी शिक्षणकर्ते हे हितकर्ते, सहनशील आणि सहजगत्या विद्यार्थ्यांसाठी कामी येणारे असे असतात. ते विद्यार्थ्यांच्या सूचनेचा व कल्पनांचा आदर करतात व विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त व स्वातंत्र्यासाठी प्रोत्साहित करतात.

याऊलट, अधिकारवादी स्थितीज्ञानात वर्ग-वातावरण हे अत्यंत नियंत्रित व कडक किंवा ताठर असते. यात निती नियमांच्या कडक पालनावर भर असतो. या परिस्थितीत गैरवर्तन हे वैयक्तिक उपमर्द मानल्या जातो व विद्यार्थ्यांवर दंडात्मक अधिकार वापराद्वारे कडक नियंत्रण ठेवले पाहिजे असे मानल्या जाते. अशा प्रकारचे शिक्षणकर्ते विद्यार्थ्यांना संशयित नजरेने बघतात, त्यांच्यावर अविश्वास दाखवितात आणि त्यांच्याशी बहुतेकदा रागाने किंवा अयोग्य पणे बोलतात. जे विद्यार्थी गैरवर्तन करतात त्यांच्याविषयी ते निर्णायक भाषेते आपली प्रतिक्रिया दर्शवितात.

**आपली प्रगती तपासा :-**

१) शिक्षकाचे व्यवस्थापक, सहकारी, विद्यार्थी व पालकांबरोबर कसे संबंध असावे ?
२) विद्यार्थी नियंत्रण परिकल्पनेची चर्चा करा.

**उपसंहार :-**

शिक्षणाचे व्यावसायिक सामाजिकरण हे त्यांच्या व्यावसायिक वृद्धिसाठी अत्यंत आवश्यक असते. ह्या प्रक्रियेमुळे त्यांचे त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित होतात. शिक्षक-संस्था किंवा संघटना एक अत्यंत महत्त्वपूर्ण अभिरुचि समुह म्हणून शिक्षकांच्या व्यावसायिक अभिरुचिंसाठी कार्य करते.

**संदर्भ :-**

कोचरन, एम. & झेचनर, k.m. २००५. " स्टडींग टिचन एज्युकेश : द रीपोर्ट ऑफ दे एरीया पॅनेल ऑन रिसर्च अँड टिचर एज्युकेशन." भाहवाह, एन जे : लॉरेन्स हरीबम असोसिएट्स.

व्हॉहमॅन, डब्ल्यु. आर. लोइरर, डी. झे. २०००, "फ्रॉम नर्स टु नर्स अॅनेस्थेटीस्ट : द इन्फ्युएन्स ऑफ एज अँड जेंडर ऑन प्रोफेशनल सोशलायझेशन अॅन्ड अ करीअर कमीटमेंट ऑफ अॅडवान्स प्रॅक्टीस नर्सेस," जरनल ऑफ प्रोफेशनल नर्सींग, व्हॉल्युम 16, नं. १.

वीडमॅन, जे. सी; ट्वेल डी & स्टेन, इ. एल. २००१, 'सोशलायझेशन ऑफ ग्रॅज्युएट अँड प्रोफेशनल' 'स्टुडंट्स इन हायर एज्युकेशन,' एएसएचइ – एरीक, हायर एज्युकेशन रीपोर्ट, व्हॉल्युम 28, नं. 3, सॅन फ्रान्सिस्को, (एक्सेस्ड् १५ जॅनेवारी, २०१०. अॅव्हेलेबल ऑन विले इन्टरसायन्स).

❖❖❖❖

# ४

# शिक्षण, सामाजिक स्तरीकरण आणि विकास

**प्रकरणाची रचना :-**

४.१ शिक्षण आणि सामाजिक स्तरीकरण
- ४.१.१ सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ
- ४.१.२ वैशिष्ट्ये
- ४.१.३ सामाजिक स्तरीकरणाचे विभाग
- ४.१.४ स्तरीकरणाचे व्यक्तीच्या रहाणीमानावर व गटावर झालेले परिणाम
- ४.१.५ स्तरीकरणाची कारणे
- ४.१.६ स्तरीकरणाची पद्धती
- ४.१.७ सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार
- ४.१.८ स्तरीकरणविषयी महत्त्वाचे स्पष्टीकरण

४.२ स्तरीकरणाची विशिष्ट कार्यासंबंधीची उपपत्ती
- ४.२.१ स्तरीकरणाची विरोध उपपत्ती
- ४.२.२ निओ-मार्क्सिस्ट

४.३ सामाजिक वर्गाची निर्धारके

४.४ समानता - वैशिष्ट्ये
- ४.४.१ प्रवेश
- ४.४.२ सामाजिक स्तरीकरणाची तत्त्वे

४.५ स्तरीकरण आणि शैक्षणिक संधीमधील समानता
- ४.५.१ शैक्षणिक संधीमधील समानता
- ४.५.२ शैक्षणिक संख्येचा वेगवेगळा दर्जा
- ४.५.३ भारतीय संदर्भातील अनुकूल भेदभाव
- ४.५.४ मोफत शिक्षण आणि शिष्यवृत्त्या
- ४.५.५ शैक्षणिक संधीमधील समानता
- ४.५.६ शिक्षणाच्या संधीमधील समानतेमध्ये येणाऱ्या अडचणी
- ४.५.७ नुकसान भरुन काढणारे शैक्षणिक कार्यक्रम
- ४.५.८ जबाबदाऱ्या
- ४.५.९ समृद्ध भरपाई करणारे शैक्षणिक कार्यक्रम
- ४.५.१० नियमित व भरपाई शिक्षणामधील संबंध

४.५.११ ज्ञानात्मक विकास

४.५.१२ वाचन

४.५.१३ गणित

४.५.१४ आव्हान

४.५.१५ शिक्षण हा हक्क आणि सामाजिक स्तरीकरणाचा घटक

४.५.१६ शैक्षणिक समानतेची व्याख्या

४.५.१७ असमानतेचे स्पष्टीकरण

## ४.१ शिक्षण आणि सामाजिक स्तरीकरण :-

समाजशास्त्रामध्ये स्तरीकरण म्हणजे समाजातील व्यक्तींचे सामाजिक वर्ग आणि जातीमध्ये झालेले श्रेणीयुक्त वर्गीकरण होय. हे श्रेणीयुक्त वर्गीकरण दृश्य किंवा अदृश्य (स्पष्ट किंवा अस्पष्ट) याप्रमाणे असते. किंवा काही काही समाजामध्ये असतसुद्धा नाही. परंतू राज्य पातळीवर हे समान असते. आपण आपल्या समाजातील लोकांचे त्यांच्याकडे असलेल्या दुर्मिळ स्त्रोतांनुसार वर्गीकरण करत असतो. पैसा आणि मालमत्ता हे आपल्या समाजातील दुर्मिळ स्त्रोत आहेत. त्यामुळे जे लोक पैसा आणि मालमत्ता यांनी युक्त असतात अर्थातच श्रीमंत लोक याचा वापर प्रतिष्ठा मिळविण्यासाठी करतात असे म्हटले जाते की काही आदरणीय लोक काही वेगळे दुर्मिळ स्त्रोत म्हणजेच लोकांचा आदर मिळवून त्याचा वापर प्रतिष्ठा मिळविण्यासाठी करतात. राजकीय नेते हे यापैकी एक आहेत. कारण ते राजकीय गटातील सभासदांना त्यांच्याकडील सत्तेने नियंत्रित करतात. लोकांचे त्यांच्या संपत्ती, प्रतिष्ठा, आणि गटातील स्थिती यावरुन दिलेले स्थान किंवा पदवी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय. स्तरीकरण हे श्रीमंत व गरीब यांना, शक्तीमान व शक्तीहीन यांना वेगळे करते. ज्यांच्याकडे दुर्मिळ स्त्रोत आहेत त्यांना उच्च पद आणि ज्यांच्याकडे कमी स्त्रोत आहेत त्यांना कनिष्ट पद दिले जाते. सामाजिक स्तरीकरणामध्ये असलेले आपले पद आपल्या जीवनावर खूप परिणाम करते. आपण कुठे राहतो, कोणत्या शाळेत जातो, कोठे काम करतो, काय खातो आणि कोणाशी लग्न करतो यावर त्याचा परिणाम होतो. आपल्या लैंगिक वर्तनावर, खेळ, छंद आणि आरोग्य या सर्वांवर समाजाने आपल्याला दिलेल्या स्थानाचा परिणाम होतो. म्हणून समाजशास्त्रज्ञानाचे सामाजिक स्तरीकरण हे खूप अभिरुचीचा विभाग आहे.

### ४.१.१ सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ :-

स्तरीकरण हा शब्द भूगर्भशास्त्रातील Strata म्हणजेच नैसर्गिक बदलांमुळे खडकांचे झालेले स्तर या पासून घेतलेला आहे. ज्याप्रमाणे खडकांचे स्तर एकमेकांवर रचलेले असतात त्याचप्रमाणे समाजातदेखील परंपरेनुसार आर्थिक दर्जावर आधारलेले अनेक स्तर असतात.

**व्याख्या :-**

रेमंड डब्ल्यू मूरे यांच्ये शब्दात, “उच्च व कनिष्ट अशा सामाजिक घटकांमध्ये झालेली समाजाची समतल विभागणी म्हणजे स्तरीकरण होय.”

प्रत्येक समाज हा कमी-जास्त प्रमाणात वेगवेगळ्या गटामध्ये विभागलेला आहे. प्राचीन काळीसुद्धा समाजाची विभागणी विविध स्तरामध्ये झालेली होती किंवा प्राचीन समाजातसुद्धा सामाजिक स्तरीकरण झालेले होते.

गिलबर्ट यांच्याप्रमाणे, "ज्यांचे परस्परसंबंध श्रेष्ठत्त्व - कनिष्टत्त्वाच्या कल्पनेवर आधारनेवर आधारलेले असतात. अशा कायम स्वरुपाच्या गटात केले जाणारे समाजाचे विभाजन म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय. "

कुर्ट बी मेयर यांच्याप्रमाणे, "सामाजिक स्तरीकरण ही विभेदनाची अशी पद्धती आहे की जिच्यामध्ये सामाजिक दर्जाची उतरंड समाविष्ट असते. आणि दर्जाच्या उतरंडीमध्ये विशिष्ट असे स्थान असणाऱ्या व्यक्तीची परस्पर तुलना करुन वरिष्ट, समान, कनिष्ट असे संबोधले जाते. "

लंडबर्ग लिहितात, "असमानता, लोकांमधील फरक यांनुसार समाज हा ठळकपणे स्तरीत झालेला आहे आणि यानुसार उच्च व कनिष्ट असा दर्जा त्यांना दिलेला आहे. "

पीटर रॉबर्ट साँडर्स यांच्याप्रमाणे आधुनिक पाश्चिमात्य समाजामध्ये स्तरीकरण हे सामाजीक व आर्थिक वर्गातील उच्च वर्ग, मध्यम वर्ग आणि कनिष्ट वर्ग यांवर अवलंबून असते. प्रत्येक वर्ग हा पुढे त्याहून लहान वर्गामध्ये त्यांच्या व्यवसाय व घटकावरुन विभागला जातो.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, व्यक्ती एकमेकांचे वेगवेगळ्या विभागात वर्गीकरण करुन त्या वर्गांना उच्च व कनिष्ट असा दर्जा देत असत. या वर्गीकरण करण्याच्या क्रियेलाच सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात आणि या परिणामी दर्जीकृत वर्गीकरणाला स्तरीकरण बांधणी असे म्हणतात. या वर्गीकरणाला Strata असे संबोधत असत. सर्वांनुमते त्याला जाती / वर्ग असे म्हणत.

## ४.१.२ वैशिष्ट्ये :-

सामाजिक स्तरीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) सामाजिक स्तरीकरण हे व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक स्तराची स्पष्ट बांधणी आहे.

२) सामाजिक स्तरीकरण हे समाजातील जात, वर्ग, दर्जा व सत्ता यांवर आधारलेले असते किंवा समाजातील लोकांना विविध भागामध्ये रचलेले असते.

३) सामाजिक स्तरीकरण हे व्यक्तीच्या गुणकौशल्यांमधील नैसर्गिक फरकामुळे निर्माण होते.

४) सामाजिक स्तरीकरणामुळे समाज स्थिर होण्यास मदत होते आणि त्याला एकत्रितपणे मान्यता मिळते.

५) सामाजिक स्तरीकरण हे लढाई तंटे कमी करते आणि समाजाच्या रचनेसाठी मदत करते.

६) सामाजिक स्तरीकरण हे वंश, सामाजिक व आर्थिक दर्जानुसार केलेले नैसर्गिक व ऐच्छिक पृथ्थकरण आहे.

### ४.१.३ सामाजिक स्तरीकरणाचे विभाग :-

सामाजिक स्तरीकरणाचे विभाग पुढीलप्रमाणे आहेत : सामाजिक वर्ग, लिंग, वंश आणि मानववंशसंबंध, वय आणि दुबळेपणा.

**a) सामाजिक वर्ग :-**

- मिळकत आणि संपत्ती यांमधील भेद आणि त्यांची समाजातील विभागणी.
- सामाजिक गतीशिलता आणि वर्ग आणि जीवनामधील संधीतील दुवा.
- वर्गाचे बदलते स्वरुप आणि त्याचे अर्थव्यवस्था व व्यावसायिक रचना यांच्याशी असलेले नाते.

**b) लिंग :-**

- जीवशास्त्रीय मतानुसार लिंग आणि सामाजिक मतानुसार लिंग यातील फरक.
- निसर्ग व समाजावर होणारा लिंग - सामाजिकतेचा परिणाम / महत्त्व.
- व्यवसाय, कुटुंब आणि सामाजिक कार्य आणि अपेक्षा यातील लिंगानुसार असमानता.

**c) वंश आणि मानववंशसंबंध :-**

- आधुनिक समाजातील वेगवेगळ्या वांशिक आणि मानववंशसंबंधित गटांचे स्वभाव, आकार आणि विभागणी.
- शिक्षण, रोजगार आणि जीवनसंधी यातील वंश व मानववंश संबंधाशी संबंधित भेदभाव आणि असमानता
- मानववंश संबंधासाठी ठरावीक साच्यामध्ये व परिणामांमध्ये प्रसार माध्यमांचे कार्य.

**d) वय :-**

- वयाची सामाजिक बांधणी, बालपण, पौगंडावस्था, वृद्धावस्था याबद्दलची विविध मतानुसार जागरुकता
- वयानुसार असमानता उदा. रोजगार, बेरोजगारी, कमी वेतन, फायद्याच्या जवळ जाण्याची संधी आणि सामाजिक वर्तणूकीस विरोध.

**e) दुर्बलता :-**

- सामाजिक दुर्बलतेची उभारणी
- दुबळेपणाविषयी असमानता थोडक्यात शिक्षणाची बांधणी, रोजगार आणि संधी
- दुर्बल व्यक्ती आणि गट यांसाठी नकारात्मक साचा आणि त्यांचे परीणाम यांच्या उभारणीमध्ये प्रसारमाध्यमांचे कार्य.

### ४.१.४ सामाजिक स्तरीकरणाचे व्यक्तीच्या आणि समाजाच्या रहाणीमानावर झालेले परिणाम :-

सामाजिक स्तरीकरणाच्या वरील घटकांचा अभ्यास सामाजिक नातेसंबंध, पद्धती, रचन आणि वादाचे विषय यांचा कसून अभ्यास करण्यासाठी करावयास हवा. जेथे शक्य होतील. तेथे उपसंस्कृती, विरुद्ध संस्कृती, ऐतिहासिक उदाहरणांचा वापर करावा जेणेकरुन विद्यार्थी सध्याच्या सामाजिक विषयांविषयी उत्तेजित होतील आणि त्यांच्या जीवनामध्ये त्यांना आंतरदृष्टी प्राप्त होईल.

### ४.१.५ सामजिक स्तरीकरणाची कारणे :-

सामाजिक स्तरीकरणाची महत्त्वाची ५ कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) असमानता :- व्यक्तीच्या नैसर्गिक क्षमतांमध्ये असलेल्या फरकामुळे असमानता निर्माण होते.

२) संघर्ष :- समाजातील वेगवेगळ्या स्तरातील संघर्षामुळे सामाजिक स्तरीकरण उदयास येते. उदा. उच्चभ्रू व्यक्ती आपल्याकडे असलेल्या जास्त सत्तेच्या आधारावर समाजातील जास्त गरजा मिळविण्याचा प्रयत्न करतात.

३) सत्ता :- आपल्या मताप्रमाणेच साध्ये प्राप्त करुन सत्तेने समाजावरील आपला प्रभाव राखला जातो.

४) संपत्ती :- सामाजिक स्तरीकरण हे संपत्तीतील फरकामुळे निर्माण होते.

५) अस्थिरता :- समाजातील अस्थिरता हे एक महत्त्वाचे कारण आहे. सामाजिक स्तरीकरण समाजात स्थिरता व व्यक्तींना कष्ट करण्यात उदयुक्त करते.

### ४.१.६ स्तरीकरणाची पद्धती :-

समाजातील व्यक्तींचा दर्जा हा वर्ग आणि प्रतिष्ठा याप्रमाणे बदलतो. वर्गाचा दर्जा हा संपत्ती, आयक आणि संधी यांवर आधारलेला असतो. व्यक्तींकडून मिळणाऱ्या आदर व प्रतिष्ठेवरुन दर्जा निर्माण होतो. वर्ग आणि दर्जा हे सत्ता आणि व्यक्तीच्या स्तरीकरणासाठी उपयोगी पडणारे स्त्रोत आहेत. रचनात्मक अधिकारी विश्वास करतात की स्तरीकरणाची पद्धती विकसित झाली कारण समाजाला नेतृत्त्व गुण आणि नेतृत्त्व करण्यास तयार आहेत यांची गरज होती. संघर्ष उपपत्तीकार म्हणतात की स्तरीकरण उदयास आले कारण काही वर्गांना दुर्मिळ स्त्रोतांची वारसाहक्काने मक्तेदारी मिळाली होती व ते त्यांचा उपयोग आपली उच्च स्थिती राखून ठेवण्यासाठी करत.

संशोधन असे निर्देशित करते की स्तरीकरण हे जास्त स्पष्ट झाले कारण संपत्ती आणि वाढलेली कामगारांची विभागणी.

साध्या समाजामध्ये थोड्याच प्रमाणात कामगारांची विभागणी आणि स्तरीकरण झाले आहे. कारखानदारी समाजामध्ये जास्त पैसा, जास्त कामगार विभागणी आणि जास्त स्तरीकरण आहे. स्तरीकरणाचे अनेक प्रकार आहेत. जाती व्यवस्थेमध्ये जातीच्या असलेल्या स्थितीवरुन

जन्मानंतर स्थिती प्राप्त होते आणि ती जात आयुष्यभर कायम रहाते. वर्गव्यवस्था ही कारखानदारी समाजातच आढळते आणि संपत्ती व दर्जा यांच्या कमी-जास्त प्रमाणावरून त्याची गती निश्चित होते. गरीब व श्रीमंत यांच्यात मोठ्या प्रमाणात फरक आढळतो. तसेच रहाणीमान, आरोग्य आणि शैक्षणिक संधी यांमध्येही फरक आढळतो. हेच जीवनसंधींवर परिणाम करते.

### ४.१.७ सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार :-

**१) जात :-** जातीची व्याख्या अशी करता येईल की, सामाजिक स्तरीकरणामध्ये अनुवंशिकतेनुसार लग्न करुन व्यवसायानुसार त्याचा व त्यानुसार व्यक्तिचा दर्जा ठरविला जातो, त्याला जात असे म्हणतात. उदा. सामाजिक स्तरीकरणामध्ये ब्राह्मण जातीला उच्च स्थान दिलेले आहे.

**२) वर्ग :-** सामाजिक स्तरीकरण हे वर्गावर आधारलेले आहे. वर्ग हा दर्जा आहे आणि समाजामध्ये प्रत्येक गटानुसार, याचा दर्जा बदलत असतो. वर्ग म्हणजे व्यक्तीची समाजातील आर्थिक स्थिती होय. वेबरच्या मतानुसार वर्ग हा स्तरीकरणातील सर्वोच्च घटक नाही. तो म्हणतो ज्याप्रमाणे कारखान्याचे मॅनेजर हे त्या फर्मवर नियंत्रण ठेवतात म्हणजेच ते एकटे हे काम करत नसून त्यांचा पूर्ण समुदाय यावर नियंत्रण ठेवतो.

**३) दर्जा :-** दर्जा म्हणजे व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक आदर किंवा समाजातील प्रसिद्धी. सामाजिक स्तरीकरण हे दर्जावर देखील आधारित आहे. वेबर म्हणतो की, राजकीय सत्ता ही भांडवलशाही समाजातील मूळ नाही आणि एखाद्याच्या वैयक्तिक दर्जातीलही नाही.

**४) सत्ता :-** सत्ता म्हणजे इतरांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्याची क्षमता होय. उदा. काही व्यक्तींच्या हाती खूप कमी मालमत्ता किंवा दर्जा असूनही जास्त सत्ता धारण करणारे असतात.

### ४.१.८ सामाजिक स्तरीकरणाचे महत्त्वाचे वर्णन :-

समाजाचे स्तरीकरण का होते? या प्रश्नावर अनेक समाजशास्त्रज्ञ यांच्या वादविवादानंतर आणि त्यांच्या वेगवेगळ्या दृष्टीकोनातून अनेक नवीन विषयांच्या विवादाला आकार मिळाला. स्पेन्सर विश्वास करतो की वरिष्ठ व्यक्ती स्वतःहून शिकतात आणि नेते बनतात. आणि कनिष्ट व्यक्ती नेहमीच समाजामध्ये खालच्या दर्जानुसार तसेच रहातात. मार्क्स युक्तिवाद करतो की, गरीब लोकांनी त्यांच्या दैनी अवस्थेबद्दल नेहमी जागरुक रहावे व बंड करावे.

सध्याच्या नवीन शास्त्रज्ञांच्या स्तरीकरण उपपत्तींवर, रचनात्मक कार्यावर आणि संघर्ष उपपत्तींवर जुन्या लेखकांच्या उपपत्तींचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला आहे.

## ४.२ स्तरीकरणाची विशिष्ट कार्यासंबंधीची उपपत्ती / दृष्टीकोन :-

रचनात्मक अधिकारी स्पेन्सरचे म्हणणे शुद्ध करतात की समाजामध्ये कोणत्याही जीवाला स्वतःला शिस्त लावावयास व चांगल्या अवस्थेत ठेवण्याचा हक्क आहे.

वरील विचारानुसार समाजाच्या कार्यासाठी स्तरीकरण आवश्यक आहे. गुंतागुंतीची कारखानदारी पद्धतीला एककेंद्रीपणाची आवश्यकता आहे आणि सत्ता ही अशा लोकांच्या हाती एकवटली पाहिजे की जे नेते बनण्यास खरोखरच समर्थ आहेत. नेतृत्त्वासाठी शिक्षण, मेहनत, जबाबदारीची भावना हे गुण आवश्यक आहेत. समाज हा अशा लोकांचा पैसा देऊन सत्कार करतो की जे नेते त्यांना असे नेतृत्त्वगुण दाखवितात. संपत्ती आणि दर्जा हे वेगवेगळे स्त्रोत सत्ता पुरवितात. म्हणून जे समाजाला असे दुर्मिळ स्त्रोत पुरवितात ते सत्ताधारी बनतात. म्हणून समाजाच्या गरजांमुळे असमानता निर्माण होते. जर समाजामध्ये सगळ्या कामासाठी सारख्या गरजांची आवश्यकता असती तर सर्व लोकांमध्ये समानता असती.

### ४.२.१ स्तरीकरणाची विरोध उपपत्ती / संघर्षवादी दृष्टीकोन :-

विरोध उपपत्तीकारांनी रचनात्मक उपपत्तीला नकार दिला ते म्हणतात की, लोकांच्या दुर्मिळ स्त्रोतांच्या इच्छा / आकांक्षा, घट्ट संबंध असलेल्या लोकांमधील स्त्रोतांच्या मिळकतीसाठी असलेले तंटे या सर्व कारणांमुळे असमानता विकसित झाली. या विचारानुसार स्त्रोत हे बुद्धीचे किंवा कठीण कामाचे बक्षीस नाही परंतू ते वारसाहक्काने, जुलुम / जबरदस्तीने, पिळवणूकीने मिळविले जातात. जेव्हा एका गटापेक्षा दुसरा गट जास्त स्त्रोत मिळवितो तेव्हा असमानता निर्माण होते.

वर्चस्वाच्या झगड्यातून स्तरीकरण अस्तित्त्वात येते. काही समूहांच्या इतर काही समूहांवरील वर्चस्वामुळे किंवा प्रभुत्त्वामुळे सामाजिक विषमता निर्माण होते. ज्यांचे दुर्मिळ वस्तू व सेवांवर नियंत्रण असते ते शिक्षणाची माध्यमे, प्रसारमाध्यमे, धर्म आणि राजकारण यांद्वारे सत्ता आणि प्रतिष्ठा प्राप्त करतात. उच्च वर्गाच्या प्रचारामुळे जर जनसामान्यांवर परिणाम झाला तर त्यांना 'चुकीची जागृती' असे मार्क्स म्हणतो. ते विश्वास ठेवतात की उच्च वर्ग हा श्रेष्ठ असून त्याला सत्तेचा हक्क आहे. आणि दुसऱ्या पद्धतीत जर जनसामान्यांनी उच्च वर्गाची मते उलथवून लावली आणि त्यांच्या पिळवणूकीबाबत जर ते जागृत झाले तर त्याला 'वर्ग जागृती' असे म्हणतात.

जर जनसामान्यांमध्ये चांगली नोकरी असेल व ते समाधानी असतील तर तेथे कमी प्रमाणात जागृतीच्या बाबतीत संघर्ष उद्‌भवतात. जेव्हा जनसामान्यांची जास्त पिळवणूक होते आणि वर्ग जागृती निर्माण होते तेव्हा जास्त प्रमाणात संघर्ष उद्‌भवतात.

### ४.२.२ निओ मार्क्ससीस्ट :-

निर्मितीच्या साधनांच्या मालकीबाबतच्या नातेसंबंधाचा विचार केल्यास म्हणजे कारखान्यांच्या मालकी, बँका इ. थोडक्यात तुम्ही अशा वर्गामध्ये असाल की राष्ट्राची संपत्ती मिळवू शकता किंवा नियंत्रित करु शकता किंवा नसाल.

मार्क्ससीस्ट पिळवणूक या संकल्पनेचे असे स्पष्टीकरण देतो की ज्यांच्याकडे निर्मितीची मालकी आहे व जे या निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये काम करुन गुजराण करतात. यांच्यातील नातेंसंबंध, कामगार असे सांगतात की, हे मध्यम स्थितीतील लोक त्यांना जास्त फायदा होण्यासाठी कमीत कमी मजूरी मजूरांना देतात.

या वर्गातील लोकांच्या अभिरुची परस्पर भिन्न असतात. कारखानदारांना फायदा / नफा वाढवायचा असतो आणि मजूरांना त्यांची मजूरी वाढवायची असते.

मार्क्ससीस्ट म्हणतात की तुम्ही दोघांसाठीही काम करु शकणार नाही.

## ४.३ सामाजिक वर्गाची निर्धारके :-

सामाजिक वर्ग म्हणजे समाजातील उच्च किंवा कनिष्ट स्थिती असलेल्या व्यक्तींचा समूह होय. मॅक्स वेबर म्हणतात की वर्ग म्हणजे व्यक्तिंचा एकत्रित समूह. ज्यांना कोणताही माल घेण्याचा आणि व्यवस्थित दर्जानुसार रहाण्याचा हक्क आहे. सामाजिक वर्गाला सांस्कृतिकरित्या ज्यांना व्यवस्थित स्थिती आणि दर्जा आहे असा समूह असेही म्हटले जाते.

सामाजिक वर्ग हा वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतो. उदा. संपत्ती, संपत्तीमुळे मिळणारी सत्ता, जीवन संधी. इ.

## ४.४ समानता वैशिष्ट्ये :-

### ४.४.१ प्रवेश :-

आधुनिक समाजाचा अपवाद न वगळता कारण आपण सामाजिकरित्या स्तरीत झालेले आहोत. याचा अर्थ असा की सामाजिक गट उदा. कुटुंब, वर्ग किंवा वांशिक गट इत्यादिंना आर्थिक स्त्रोत, सत्ता आणि प्रतिष्ठा यांपासून मिळणाऱ्या फायद्यांच्या बाबतीत असमान प्रवेश आहे. अशा प्रकारच्या असमानता नेहमीच निर्माण होते असे नाही. मानवी इतिहासामध्ये समानतेचा फायदा समाजामध्ये होता. परंतु या फायद्यांच्या बाबतीत काही फरक होता. ते फायदे वय, लिंग, क्षमता यांवर आधारित होते. परंतू सर्व कुटुंबांमध्ये फायद्यांच्या बाबतीतले हक्क सारखेच होते.

कायद्यान्वये आर्थिक स्त्रोतांच्या बाबतीत, सत्ता किंवा प्रतिष्ठेला अनुसरुन असमान कायदे होते त्यांची प्रतिकृती पुढीलप्रमाणे :-

१) समानतेनुसार समाज
२) दर्जेनुसार समाज
३) वर्गानुसार समाज

१) समानतेवरील समाज हा स्तरीत नव्हता. आर्थिक स्त्रोत, सत्ता, आणि प्रतिष्ठा याबाबतीत कोणत्याही गटामध्ये असमानता नव्हती.

२) वर्मावरील समाज हा स्तरीत होता. सामाजिक गटामध्ये आर्थिक स्त्रोत, सत्ता, प्रतिष्ठा यांच्याबाबतीत असमानता होती. अशा स्तरीत समाजामध्ये जन्माच्यावेळी दिलेले सभासदत्त्व जीवनभर अबाधित रहात असे.

वंश हे शास्त्रीयदृष्ट्या व्यक्तीला वर्गीकृत करण्यासाठीचे साधन नव्हते. उच्च शिक्षणासाठीचा प्रवेश हा वंश, लिंग, आर्थिक किंवा सामाजिक वर्ग, वय, भाषा, धर्म, स्थान आणि दुर्बलता यांचा विचार न करता दिला जाई. समान प्रवेश आणि वार्षिक हुशारी हेच उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेले घटक आहेत.

३) दर्जावरील समाज हा थोड्या प्रमाणात स्तरीत आहे. सामाजिक गटामध्ये आर्थिक स्त्रोत किंवा सत्ता याबाबतीत असमान प्रवेश नव्हते तर प्रतिष्ठेच्या बाबतीत असमानता होती.

१) समाजाची वेगवेगळ्या गटांमधील विभागणी ही मुख्यत्त्वे संपत्ती, सत्ता आणि प्रतिष्ठा यांनुसार वेगळी होती.
२) साध्य केलेल्या दर्जावर / सत्तेवर दर्जा अवलंबून होता.
३) दर्जावरती जात अवलंबून होती.

### ४.४.२ सामाजिक स्तरीकरणाची तत्त्वे :-

स्तरीकरण हे असमानतेच्या पद्धतीने समाजाचे झालेले स्तर निर्देशित करते. त्याची खालीलप्रमाणे पाच तत्त्वे आहेत.

१) स्तरीकरण हे सामाजिक आहे नैसर्गिक नाही.

२) स्तरीकरण हे समाज बदलला तरीही दीर्घकालीन आहे.

३) स्तरीकरण हे सर्व सामाजिक परिस्थितीत समाजव्यापी पद्धतीमध्येही सर्व व्यापी आहे.

४) स्तरीकरण हे सूक्ष्म तसेच मोठ्या अशा दोन्ही स्थितीत आढळते.

## ४.५ स्तरीकरण आणि शैक्षणिक संधींमधील समानता :-

### ४.५.१ शैक्षणिक संस्थांमधील दर्जात्मक तफावत :-

गरीब कुटुंबातील मुले ही कमी प्रतीच्या संस्थेमध्ये म्हणजेच जेथे व्यवस्थित साधनसामुग्री, शिक्षक, शैक्षणिक साहित्य आणि साधने यांची कमतरता आहे तेथे शिक्षण घेतात. नेहमी शहरी शाळा आणि महाविद्यालये यांचा दर्जा, हा ग्रामीण शाळा आणि महाविद्यालयांपेक्षा जास्त चांगला असतो. शैक्षणिक संस्थांमधील हा फरक विद्यार्थ्यांमधील दर्जात्मक असमानतेस कारणीभूत आहे.

### ४.५.२ भारतीय संदर्भातील अनुकूल भेदभाव :-

शैक्षणिक संधीतील समानता निर्माण करण्यासाठी काही उपाय त्वरीत करणे आवश्यक आहे. हे उपाय गरजेवर आधारीत असतील जसे अयोग्य दर्जा, दुर्बल मुले व मुली यांना मिळणाऱ्या गरजांना पूर्ण करतील.

#### १) प्राथमिक शिक्षण :-

प्राथमिक शिक्षण हे सर्व व्यक्तींच्या मूलभूत गरजा भागविणारे असावे. तेथे अभ्यासक्रमाच्या, श्रेणींमध्ये कोणत्याही प्रकारचा फरक असू नये. प्राथमिक शिक्षणाच्या शैक्षणिक

संधींमध्ये समानता आवश्यक असून तेथे सर्व मुलांना भेदभाव न करता सक्तीचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

**२) माध्यमिक शिक्षण :-**

मुले व मुली यांच्यातील व्यक्तिगत भेदभाव असल्यामुळे माध्यमिक शिक्षणातील अभ्यासक्रम हा वेगवेगळ्या पद्धतीने त्यांच्या गरजा, अभिरुची व क्षमता लक्षात घेऊन त्याची ओळख करुन देणे गरजेचे आहे.

**३) उच्च व्यावसायिक शिक्षण :-**

व्यक्तिच्या उच्च शिक्षणाच्या आणि व्यावसायिक शिक्षणाच्या वेळी त्यांची क्षमता किंवा गुणवत्ता आणि दर्जात्मक सातत्य बघूनच शिक्षण द्यावे.

**४) (नुकसान) भरपाई शिक्षण :-**

सामाजिक, आर्थिक परिस्थितीने गांजलेल्या लोकांसाठी विशेष कार्यक्रमाची योजना करुन काही प्रमाणांत ही उणीव भरुन काढणे म्हणजे भरपाई शिक्षण म्हणतात. ते कोणत्याही प्रकारचे मूलभूत शिक्षण पूर्ण न करता प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश होऊ शकतात.

**सार्वजनिक शाळा पद्धती :-**

शैक्षणिक संधींतील समानता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक शाळा पद्धती प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही वेळी अंगीकारणे आवश्यक आहे. ती पद्धत पुढीलप्रमाणे असेल.

१) ती सर्व मुलांना कोणत्याही भेदभावानुसार खुली आहे का?
२) तेथील प्रवेश गुणवैशिष्ट्यांवर आधारीत आहेत का?
३) तेथे पुरेशा सोयीसुविधा व आवश्यक चांगला दर्जा सांभाळला जातो का?
४) तेथे ट्युशन फी घेतली जाते का?
५) मध्यम आणि कमी वर्गाच्या गरजा तेथे भागविल्या जातात का?

राष्ट्रीयीकरण, ही शिक्षण पद्धतीतील महत्त्वाची पायरी आहे. ज्यामुळे शैक्षणिक संधींमध्ये समानता निर्माण होते. देशामध्ये शिक्षणाचा प्रसार व नियंत्रण करण्यासाठी एकच माध्यम असावयास हवे. कोणतीही वैयक्तिक संस्था यांना शिक्षणावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार नाही. समान शैक्षणिक सुविधा या राष्ट्रीय शिक्षण पद्धतीतच पुरविल्या जातात.

**४.५.३ मोफत शिक्षण आणि स्कॉलरशिप्स :-**

६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत आणि वैश्विक माध्यमिक शिक्षण पुरविणे हे घटनात्मकरीत्या बंधनकारक आहे. पूर्ण शिक्षण हे मोफत असावे. मोफत पुस्तके व लिखाण

साहित्याची उपलब्धता गरीब विद्यार्थ्यांना करुन द्यावी. तसेच विवाहित विद्यार्थ्यांना समानतेची हमी देण्यासाठी अनेक स्कॉलरशिप्स तसेच अनेक अभ्यासक्रम निवडण्याची संधी द्यावी.

### ४.५.४ शैक्षणिक संधींमधील समानता :-

शैक्षणिक संधींमधील समानता ही सामाजिक पद्धतीला आवश्यक असणारा दुवा आहे. समान शैक्षणिक संधींमधील नावीन्यता ही सामाजिक पद्धती दाखविते. आधुनिक कारखानदारी समाजामध्ये शिक्षण हे कायदेशीररित्या उत्तम जागरीक व समाजातील उत्पादित सदस्य निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे. औपचारीक शिक्षण हे मुख्यत्त्वे तयार केलेले नाही कारण आर्थिक उत्पादनामध्ये सहभागी होण्यासाठी लागणारी कौशल्ये ही कुटुंब व दुसऱ्या कोणत्याही घटकामधून मिळू शकत नाहीत. औपचारिक शिक्षणाचा नवीन कारखानदारी समाजातील सहभाग हा राज्यातील नागरीकांसाठी आवश्यक आहे. औपचारिक संस्था-शाळा, कॉलेज आणि विद्यापीठे ही याच हेतूने निर्मिलेली आहेत.

बॉर्डनने कुटुंब आणि समवयस्कांमधील बंधनांमधील नाते लक्षात घेऊन कोणत्याही गोष्टीची निवड यांचे नाते दाखविले. त्याचे कार्य शैक्षणिक संधींमधील, असमानता दूर करण्यास महत्त्वाचे ठरले.

बॉर्डन सांगतो की, दुय्यम दर्जाचे स्तरीकरण दूर करण्यासाठी एकूण दोन मार्ग आहेत. पहिल्यामध्ये शैक्षणिक पद्धतीचा समावेश होतो. जर त्याने सर्व विद्यार्थ्यांना एकच सक्तीचा अभ्यासक्रम त्यांच्या आवडत्या घटकांतील निवड आणि पद्धतीचा कालावधी पुरविला तर हे स्तरीकरण दूर होईल. कोणत्याही व्यक्तीला खूप काळ त्या कोर्सचा परिणाम होणार नाही आणि पूर्ण वेळ त्या शिक्षणामध्ये तो बांधला राहिल. शिक्षणाच्या अनेक पद्धतीतील त्याला आवडत्या व त्याला झेपणाऱ्या अभ्यासक्रमाचा तो स्वीकार करेल किंवा सोडून देईल. बॉर्डनचा शैक्षणिक संधींमधील असमानता दूर करण्याचा उपाय म्हणजे सामाजिक, स्तरीकरणाचे निर्मूलन होय. तो म्हणतो की शैक्षणिक संधींमधील असमानता दूर करण्यासाठी याचा सरळ आर्थिक समानतेवर परिणाम करणाऱ्या संधींचे निर्मूलन होय. याचा परिणाम म्हणजे ही असमानता शाळेपेक्षा बाहेरुनच निर्मूलीत करण्याची संधी आह. बॉर्डन असा निष्कर्ष काढतो की शैक्षणिक संधींमधील असमानता दूर करायची असेल तर एकतर समाज हा अस्तरीत असावा नाही तर शाळेतील शिक्षण पद्धती ही सारखी असावी.

### ४.५.५ शिक्षणाच्या संधींमधील साधनांमध्ये येणाऱ्या अडचणी :-

शिक्षण हे समानता आणि सामाजिक न्यायाची उभारणी करते परंतू शिक्षणाची पद्धती स्वतःच असमानता निर्माण करते. शिक्षणामधील संधीतील असमानता पुढील कारणांमुळे निर्माण होते.

- दारिद्र्य कारण गरीब लोकांना शिक्षणाचा खर्च परवडत नाही.
- ग्रामीण भागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी भागातील पूर्ण साधन सामुग्रीयुक्त शाळातील विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करावी लागते.

- ज्या ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शैक्षणिक संख्या अस्तित्त्वात नाहीत तेथील मूलांना बाजूच्या ठिकाणच्या मुलांच्या तुलनेत तेवढ्या शिक्षणाच्या संधी मिळत नाहीत.
- कुटुंबातील वातावरण वेगवेगळे असल्यामुळे मोठ्या प्रमाणात असमानता निर्माण होते. ग्रामीण किंवा झोपडपट्टीतील मुलांना शहरी भागातील सुशिक्षित पालक असणाऱ्या मुलांइतक्या चांगल्या संधी मिळत नाहीत.
- भारतामध्ये मोठ्या प्रमाणात लिंगभेद आढळतो. मुलांइतके मुलींना शिक्षणाच्या बाबतीत पाठिंबा दिला जात नाही.
- मागास वर्ग उदा. SC आणि ST आणि आर्थिकदृष्ट्या मागास भागातील वर्गांना इतरांच्या तुलनेत शैक्षणिक संधी कमी मिळतात.

### ४.५.६ भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रम :-

**व्याख्या :-** सामाजिक, आर्थिक परिस्थितीने गांजलेल्या लोकांसाठी, आवश्यकतेपेक्षा भाषा, कला, गणित आणि वाचन, यांमध्ये कमी यश मिळविलेल्यांसाठी विशेष कार्यक्रमांची योजना करुन काही प्रमाणात ही उणीव भरुन काढणे म्हणजे भरपाई कार्यक्रम होय.

**धोरण :-**

१) जे विद्यार्थी कला, गणित, वाचन यामध्ये अपेक्षेपक्षा कमी संपादणूक दाखवितात अशा थोडक्याच विद्यार्थ्यांना भरपाई कार्यक्रमाअंतर्गत पूरक शिक्षण द्यावे.

२) भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रम हे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना ज्यांना विशिष्ट शैक्षणिक सुविधांची गरज नाही त्यांना हेतू करत नाही जेव्हा विशिष्ट शिक्षण हे विद्यार्थ्यांना भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमांच्या प्रवेश पद्धतीतेच देण्यात यावे.

३) भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमाचा आराखडा हा एक पूरक कार्यक्रम या दृष्टीने तयार केलेला असतो. त्यामध्ये मूलभूत प्राथमिक सूचना दिलेल्या नसतात.

४) विद्यार्थी या कार्यक्रमांत पात्र आहेत की नाही हे चाचण्यांद्वारे शोधले जाते. आणि त्यानुसार कार्यक्रम ठरवून त्याची परिणामकारकता पाहिली जाते.

५) चाचणी परीक्षा पद्धती ही विद्यार्थ्यांच्या प्रगतीतील मूल्यमापन आणि विद्यार्थ्यांची नियुक्तीसाठी वापरले जाते.

६) पूर्ण कार्यक्रमासाठी ४० टक्क्यांपेक्षा कमी भाषा, गणित आणि वाचन यातील संपादणूक पाहून चाचणी घेतली जाते.

७) भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमामध्ये पालकांचाही सहभाग असतो.

८) विद्यार्थ्यांना त्यांच्या एक ते चार दर्जानुसार सूचनेस प्राधान्य दिले जाते. या दर्जांच्या सुधारणेसाठी अगदी योग्य उपाय पुरविलेले असतात.

९) वार्षिक मूल्यमापन कार्यक्रम, रेकॉर्ड हाताळणी, ही व्यवस्थित पद्धतीत केलेली असते. ज्यावरुन भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमांच्या उपयुक्ततेची खात्री पटते.

### ४.५.७ जबाबदाऱ्या :-

१) संचालक हा पुढील कारणांसाठी जबाबदार असतो.
   A. विकास, कार्यवाही, कार्यमान-मूल्यांकन याबाबतीतील हमी
   B. शिक्षणाचा मुख्य नेता, तर्कशास्त्रज्ञ यांच्यातील योग्य जुळणी.

२) प्रादेशिक संचालक हा जबाबदार असतो.
   A. विकास, कार्यवाही, कार्यमान-मूल्यांकन, आणि भरपाईयुक्त कार्यक्रमाची ओळखीच्या हमीबाबत
   B. चाचणीची सामुग्री, आवश्यक माहिती आणि स्त्रोतांची उभारणी व नोंदविलेल्यांची संख्या यांची माहिती पुरविणे.

३) जिल्हाधिकारी जबाबदार असतो.
   A. भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमांतील स्टाफ यांच्यातील जुळणी
   B. शालेय दर्जावरील भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमांची कार्यवाही आणि मूल्यमापन याबाबतीतील हमी.

४) शाळेतील मुख्याध्यापक आणि सहकारी जबाबदार असतात.
   A. विकास, कार्यवाही, वार्षिक मूल्यमापन, CEP मधील सुधारणा यातील हमी
   B. जिल्हाधिकारी आणि / किंवा प्रादेशिक संचालक शाळेतील भरपाईयुक्त शिक्षणातील गरजांचे शिफारसपत्र देणे.
   C. शाळेतील CEPचा विकास करण्यासाठी पूर्ण समितीचा वापर करणे.
   D. भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमासाठी पुढील आराखड्याची कार्यवाही करणे.
   E. प्रादेशिक संचालक आणि जिल्हाधिकारी यांना नोंदविलेल्या संख्या, चाचणी सामुग्री, वार्षिक मूल्यमापनाचा रिपोर्ट, आणि आवश्यक ती सर्व माहिती पुरविणे.

### ४.५.८ समृद्ध करणारे भरपाई शैक्षणिक कार्यक्रम :-

भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमांतील विकासाबाबत पारंपारिकरीत्या असे मानले जाते की ज्या विद्यार्थ्यांना कमी अभ्यासक्रमातून आणि अपुऱ्या ध्येयातून जास्तीत जास्त फायदे मिळतात. मूल्यमापनाची परिणामकारकता अभ्यासक्रमातील कमतरता ही वेगवेगळ्या चाचण्यांद्वारे पाहिली जाते.

### ४.५.९ नियमित आणि भरपाईयुक्त शैक्षणिक वर्गातील जुळणी :-

नेहमीप्रमाणे भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रमातील हेतूच्या स्पष्टतेतील कमतरता ही शिक्षक आणि संस्थांमध्ये पहावयास मिळते. येथील मुलांना इतर मुलांच्या तुलनेत कमी ज्ञान मिळते.

नियमित वर्गशिक्षक हे नेहमी वाचून रिपोर्ट देतात तर इतर कधी कधी सूचना, माहिती, मते व साहित्य देतात. नियमित वर्गशिक्षक आणि वाचून दाखविणारे शिक्षक हे नेहमी सूचनांच्या आराखड्याला आणि पोहोचविण्याला कोण जबाबदार आहे याबाबतीत द्विधा मनःस्थितीत असतात. अभ्यासक्रम आणि शिक्षण यामध्ये समरुपता असावयास हवी. आपण कोणती साधने वापरतो, कोणत्या पद्धतीने वापरतो आणि सूचनांच्या पद्धती यांमध्येही समरुपता असावी लागते. जेव्हा पहिले वाचन आणि नंतरचे शिक्षण यामध्ये तफावत जाणवते तेव्हा संघर्ष निर्माण होतो.

**४.५.१० ज्ञानात्मक विकास :-**

शैक्षणिक कार्यक्रम हे शिक्षणाच्या ज्ञानात्मक व परिणामात्मक अशा दोन्ही संधी पुरवितात. ज्यामध्ये कसे शिकावे आणि विद्यार्थी कसा असावा हे सांगितले जाते.

पीटरसन म्हणतात की कमी साध्यता असलेले विद्यार्थी वेगवेगळे ज्ञानात्मक दर्जा असलेले असतात. जसे की स्मरणशक्ती, स्वतः प्रश्न सोडविणे, उजळणी, वेळापत्रक, ध्येयाची बांधणी प्रश्न विचारणे, नवीन अभ्यासांची कौशल्ये इ. आणि भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रम त्यांच्या या दर्जाचा विकास करते. असे लक्षात घ्यायला हवे की जेव्हा वर्गशिक्षकांव्यतिरिक्त, कोणीही एखादा घटक/कृती शिकवितो तेव्हा वैचारिक वर्ग नवनवीन अडचणी निर्माण करतो आणि सोडवितो. त्यामुळे भरपाईयुक्त शैक्षणिक कार्यक्रम हे विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक विकास करतात की कसे शिकावे.

**४.५.११ वाचन :-**

विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेमध्ये वाढ होण्यासाठी खूप प्रयत्न केले गेले. आर्थिक दर्जा आणि वाचनातील साध्यता यांच्यातील संबंध तसेच राहिले. सुशिक्षितपणा हा मूलभूत कौशल्यांमधून किंवा कमीत कमी स्पर्धेमधून येत नाही तर सुशिक्षित माणूस हा नवनवीन भाषेच्या माध्यमातून शिकत असतो. त्यामुळे शिक्षणाच्या वाचन, लेखन, तोंडी भाषा यांच्या घटकांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

**४.५.१२ गणित :-**

ज्ञानात्मक विकासासाठी वाचनाचे कार्यक्रम पुरेसे नाहीत जोपर्यंत गणिताचे ज्ञान होत नाही. रॉम्बर्ग यास असे निदर्शनास आले की गणितातील भरपाईयुक्त कार्यक्रमाचे एकूण तीन विभाग आहेत. समृद्ध कार्यक्रम; जे विद्यार्थ्यांना कमी आयक मिळविण्यास मदत करते. बौदि्धक कार्यक्रम-जे मध्यम वर्गाकडे आहे आणि वेगळे कार्यक्रम जे विद्यार्थ्यांना वेगळ्या पद्धतीने वागविते.

रॉम्बर्ग (१९८६) सांगतो की, गणितीय कार्यक्रम हे अक्षरशः या पद्धतीचे हजारो तुकडे केले तरी त्याचा अंश होणार नाही. ते मुलांना गणित शिक्षणाची योग्य संधी पुरविते. गणिताला असे म्हटले जाते की, भाषा आणि विज्ञान जे पूर्ण जगाला वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये, नात्यांमध्ये, प्रश्न सोडविण्यामध्ये आणि विचारांमध्ये मदत करतो.

**४.५.१३ आव्हान :-**

वंचित विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम हा वाचन आणि गणित यांच्या सूचना देणारा थोडका / मोजका नसावा. तो जेवढा जास्त आणि तौलनीय असावा कारण तो उच्च ध्येय प्राप्त करणाऱ्या मुलांसाठी असतो.

वंचित विद्यार्थ्यांना वाचन, भाषा, कला, लिखाण, गणित, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, आरोग्य, शरीर शास्त्र शिक्षण किंवा दुसऱ्या भाषेचा अभ्यास यासाठी असलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळण्याची गरज आहे. त्यांना तांत्रिक शिक्षणामध्येही प्रवेश मिळण्याची गरज आहे. कौशल्ये, ज्ञान, समजूतदारपणा, मर्मदृष्टी या गोष्टी सर्व मुलांना असणे आवश्यक आहे.

**४.५.१४ शिक्षण हा हक्क आणि सामाजिक स्तरीकरणाचा घटक :-**

मानवी समाजामध्ये अनेक सामाजिक विविधता अस्तित्त्वात येते. समाज हा तेथील व्यक्तीना असलेल्या सामाजिक स्थितीवरुन वेगवेगळ्या दर्जावर विभागलेला आहे.

हा वर्ग स्पष्ट किंवा अस्पष्टपणे मजूरांच्या विभागणीवर अवलंबून आहे आणि इतिहासकालीन संदर्भांनी त्यावर परिणाम झालेला आहे. या उभ्या श्रेणीयुक्त विभागणीलाच सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात. स्पष्टीकरणाची संकल्पना ही नेहमी रचनात्मक सामाजिक असमानतेला लागू पडते. म्हणजे कोणत्याही व्यक्तींच्या गटातील असमानतेचा पद्धतशीर अभ्यास जो सामाजिक पद्धती व नात्यांवर परिणाम करतो.

काही समाजामध्ये शिक्षण हे स्तरीकरणास, कारणीभूत असलेला महत्त्वाचा घटक आहे कारण ज्ञान, कौशल्ये आणि वर्तन यांचा शाळेमध्ये झालेला विकास सामाजिक विकासाला कारणीभूत ठरतो. जसे की मूलभूत शिक्षण हा सुद्धा सामाजिक न्याय आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क आहे. तो कोणत्याही सामाजिक वर्ग, आयक आणि कोणत्याही ठिकाणचा असला तरीही जवळजवळ जगाच्या लोक संख्येच्या १/३ लोक हे अशिक्षित आहेत.

हुशारी + परिश्रम = गुणवत्ता

शिक्षणाच्या प्रसारावरुन कनिष्ट सामाजिक वर्गातील खूप मोठ्या संख्येने मुले आणि वेगवेगळ्या वांशिक गटातील स्त्री-विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. तरीही तेथील नातेसंबंधातील फरकामुळे अजुनही असमानता वाढत आहे.

**४.५.१५ शैक्षणिक समानतेची व्याख्या :-**

१) पुरवठा (शिक्षणाचे प्रमाण आणि दर्जा, शिक्षण पद्धतीचे सुसंघटन)
२) प्रवेश (निवड आणि त्याची पद्धती), वापर (व्यक्तिच्या जीवनातील शिक्षणाचा अर्थ)
३) निष्पत्ती (पदवी आणि कामगिरी आणि त्यांच्या व्याख्या).

आपण समान संधीबाबतीतील प्रवेश हे विद्यार्थी आणि पदवीधर विद्यार्थी यांच्या विभागणीतील तुलना ही सामाजिक वर्ग, लिंग आणि वांशिक गट यांनुसार करतो. हे सर्व समाजामध्ये सामाजिक संशोधनामध्ये सामाईक आहे. तसेच ही विभागणी पालकांचे समाजिक आणि सांस्कृतिक दर्जा पाहूनही केली जाते.

शिक्षणाच्या कार्याचा सगळ्यात आशावादी मुद्दा आहे की समाजातील असमानता दूर करणे.

### ४.५.१६ असमानतेचे स्पष्टीकरण :-

गतीशीलतेच्या संकल्पनेत व्यक्तिच्या मूळ सामाजिक स्थानात किंवा सामाजिक दर्जात बदल होणे असा अर्थ अभिप्रेत आहे.  व्यक्तीप्रमाणेच स्तरीकरण व्यवस्थेतील एखाद्या समूहाचे सामाजिक स्थान वा दर्जा बदलणे म्हणजे गतीशीलता होय.  सामाजिक गतिशीलतेच्या प्रक्रियेत व्यक्ती किंवा समूहांनी स्तरीकरण व्यवस्थेअंतर्गत विविध स्तरांपैकी एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाणे अभिप्रेत आहे.

आर्थिक स्पर्धा आणि जागतिकीकरण यांचा सामाजिक असमानतेवर परिणाम होतो. आणि त्यामुळे कमी किंवा जास्त प्रमाणात शैक्षणिक असमानतेवरही परिणाम होतो.  काही देशांमध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या लोकसंख्येत स्त्रीयांचे प्रमाण जास्त आहे. स्त्रीयांचे शिक्षणातील वाढते प्रमाण लक्षात घेता शैक्षणिक पद्धतीतील रचना, सध्याची अर्थव्यवस्था, सामाजिक आणि सांस्कृतिक गट हे सतत बदलत आहेत.

पहिला निष्कर्ष असा की स्वीडनही अशा बाबतीत वेगळा नाही.  समानता ही सगळ्या वर्गामध्ये नाही आणि दुसऱ्या महायुद्धानंतरही नव्हती.

सुरुवातीच्या कुटुंब समाजीकरणामध्ये असमाणता प्राथमिकरीत्या अंगवळणी पडली होती. शालेय जीवनात आणि समवयस्क गटांमध्ये सरावाने वेगवेगळी असमानता अंगवळणी पडले होते.

**प्राथमिक स्वरुपातील प्रश्न :-**

१) सामाजिक स्तरीकरण आणि असमानतेच्या संकल्पना, ज्ञान आणि दृष्टीकोन तुमच्या स्वतःच्या अनुभवांना कसे प्रकाशित करतात ?

२) सामाजिक स्तरीकरण हे तुमच्या स्वतःच्या जीवनातील एक घटक कशा प्रकारे आहे ?

३) सामाजिक स्तरीकरण आणि असमानता याविषयी तुमचा दृष्टीकोन काय ?

४) तुम्ही सामाजिक स्तरीकरण आणि असमानतेचे वर्णन आणि स्पष्टीकरण कशा प्रकारे कराल ?

५) वर्ग, सत्ता, आर्थिक स्त्रोत, प्रतिष्ठा, सामाजिक गतिशीलता आणि दारिद्य यांचे स्त्रोत आणि विभागणी म्हणजे काय ?

६) गेल्या शतकामध्ये अमेरिकेतील सामाजिक स्तरीकरण आणि असमानता कसे आणि का बदलत गेले आणि या बदलांचे वैशिष्ट्ये काय ?

७) अमेरिका ही मध्यम वर्गीय जनसामान्यांचा समाज आहे ?

८) दारिद्र म्हणजे काय ?  दारिद्याचे प्रमाण कोण निर्देशित करते ?

९) कोण गरीब आहे हे कशाने ठरविले जाते ?  दारिद्र हे कसे व का कमी केले पाहिजे ?

**खालील प्रश्नांची उत्तरे द्या :-**

१) सामाजिक स्तरीकरण म्हणजे काय ?

२) सामाजिक स्तरीकरणाचे महत्त्वाचे प्रकार कोणते ? स्पष्ट करा.

३) सामाजिक स्तरीकरणाची वैशिष्ट्ये कोणती ?

४) सामाजिक स्तरीकरणाची कारणे कोणती ?

५) सामाजिक स्तरीकरणाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

६) स्तरीकरणाच्या पद्धतीतील फरक स्पष्ट करा.

७) वेबरची स्तरीकरणाची त्रिसूत्री कोणती ?

८) स्तरीकरणाचे दृष्टीकोन स्पष्ट करा.

९) सामाजिक व रचनात्मक गतीशीलता म्हणजे काय ?

१०) सामाजिक गतीशीलतेची व्याख्या द्या.

११) स्तरीकरण निर्माण होण्याचे पाच महत्त्वाचे मुद्दे लिहा.

१२) कोणत्या भागामध्ये सामाजिक असमानता निर्माण होते ?

१३) समानतेचे प्रकार स्पष्ट करा.

१४) सामाजिक वर्गावर परिणाम करणाऱ्या गोष्टी कोणत्या ?

१५) वांशिकता म्हणजे काय ?

१६) सामाजिक असमानता म्हणजे काय ?

❖❖❖❖

# ५

# शालेय शिक्षण अनुभवाचे परिणाम अनुभवाच्या व्यक्तिगत जीवनात शालेय शिक्षण परिणामाचे अवलोकन करण्याचे मुख्य अभिगम.

**प्रकरणाची रचना :-**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

शिक्षण व समाज हे एकत्र विणलेले असल्यामुळे व्यक्तिंच्या जीवनावर प्रभाव पाडतात. परिवार, कार्यस्थळ, राजकारण यासारख्या बहुविध संस्थाकीय क्षेत्रांवर तसेच एका प्रौढ व्यक्तिच्या अभिवृत्ती, मान्यता व वर्तनावरही या शालेय शिक्षणाचा काय परिणाम होतो ते तपासणे समर्पक ठरेल.

**शालेय शिक्षण अनुभवाचे प्रौढांवर होणाऱ्या परिणामाचे शोधात्मक प्रतिमान :-**



**ज्ञानात्मक व बोधात्मक विकास :-**

ज्यांना शालेय शिक्षणाचा अनुभव जास्त असते त्यांचे बहुविध क्षेत्रातील ज्ञान त्यांच्यापेक्षा कमी शिक्षित समवयस्क व्यक्तिपेक्षा अधिक असते. उदाहरणार्थ, अद्ययावत घटना, देशी, विदेशी, राजकारण, पर्यावरण, विज्ञान इ. उच्च शिक्षित लोकांमध्ये कमी शिकलेल्या लोकांपेक्षा जास्त प्रमाणांत बोधात्मक लवचिकता व समस्या-निराकरणाचे कौशल्य दिसून येते. शिवाय उच्च शिक्षित व्यक्ति जनसंपर्क माध्यमे संप्रेषणतंत्रांच्या जास्त संपर्कात असतात व त्यात सहभागी होतात.

शालेय शिक्षण अनुभव व्यक्तिंमध्ये त्यांच्या संपूर्ण जीवन प्रवासात चिरस्थायी अध्ययन ग्रहणशीलता निर्माण करते. शिक्षित लोकांचे विशिष्ट तथ्यात्मक ज्ञानावर वर्चस्व असते, त्यांच्यात उच्च स्तरीय साक्षरी ज्ञानाचे कौशल्य दिसून येते. उदा. गद्य-साक्षरता (कथनात्मक गद्याचे आकलन), दस्तऐवज साक्षरता (नित्यनेमाने दररोज हाती पडणाऱ्या दस्तऐवजाचे आकलन, संख्यात्मक साक्षरता (मूलभूत गणिती कौशल्याचे अस्सल संदर्भात आकलन) ही कौशल्ये कमी शालेय शिक्षण घेतलेल्या लोकांपेक्षा जास्त असतात. शैक्षणिक ज्ञानप्राप्ति / आणि साक्षरता प्राविण्याच्या स्तरात दृढ संबंध आहे.

प्रौढ साक्षरता प्राविण्यावर शाळेत शिकलेल्या कौशल्याचे प्रतिबिंब असते. शिक्षण सामाजिक-आर्थिक दर्ज्याचे निदर्शक आहे. तसेच शिक्षण सामाजिकरणाचा प्रतिनिधीही असतो. शिक्षणाच्या सामाजिक-आर्थिक दर्जा व्यक्तिंच्या मानसशास्त्रीय स्वास्थासही प्रभावित करतो. उच्च म्हणूनच उच्च शिक्षित व्यक्तिंमध्ये त्यांचा त्यांच्या जीवनावर पूर्ण नियंत्रण असल्याची भावना असू शकते. परिणामतः ते स्वतःच समजून त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करतात.

जास्त शालेय शिक्षणाचा अनुभव असलेल्या व्यक्ति नवनवीन कल्पनांचे स्वागत करतात; तसेच कमी शिक्षित लोकांपेक्षा लवकर नवीन बदलांचा स्विकार करतात. उदाहरणार्थ, एक चांगला शिकलेला शेतकरी नवीन शेतकी तंत्रांचा स्विकार करील व निर्माणात्मक तंत्रज्ञानाच्या बदलाच्या विरोधाचा सामना करील.

जास्त शालेय शिक्षण घेतलेल्या व्यक्ति जनसंपर्क माध्यमांच्या सतत संपर्कात राहून आपले ज्ञान वाढवितात. ते वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके वाचण्याची जास्त शक्यता असते. ते दुरदर्शन बघण्यात किंवा आकाशवाणी ऐकण्यात कमी वेळ घालवितात. त्यांचा असा विश्वास असतो की मुद्रण माध्यमे इतर माध्यमांपेक्षा अधिक प्रामाणिक व अस्सल ज्ञान प्रसारित करतात. अशाप्रकारे वैविध्यपूर्ण माध्यमे वेगवेगळ्या प्रमाणात शालेय शिक्षण घेतलेल्या व्यक्तिमध्ये ज्ञानाचे अंतर अधिक वाढवितात जनसंपर्क माध्यमांबरोबरचा व्यक्तिंचा अनुभव त्यांच्या अद्ययावत घटना तसेच इतर जीवनशैली संबंधित सद्यस्थितीच्या गोष्टी शिकण्याच्या संधीचे निदर्शक असते. अशा शिक्षित व्यक्ति त्यांचे अध्ययन वाढविण्यासाठी अधिक जास्त संधीच्या शोधात असतात तसेच तशा संधिही निर्माण करतात. ते औपचारिक व अनौपचारिक शिक्षणात स्वेच्छेने जागरुक असतात तसेच त्याचा फायदा करुन घेण्याचा त्यांच्यात आत्मविश्वास असतो. समृद्ध माहिती ते इतर कमी शालेय शिक्षण घेतलेल्या लोकांपेक्षा सहज प्राप्त करु शकतात. यामुळे त्यांना सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जगाविषयी अधिक ज्ञान असते ज्याचा उपयोग ते आपले भविष्य घडविण्यासाठी करतात.

ज्याप्रमाणे सामाजिकरण ही शालेय शिक्षण अनुभवाची फलश्रुति आहे त्याचप्रमाणे शालेय शिक्षण व्यक्तिच्या सामाजिक-आर्थिक दर्जाही सुचविते. व्यक्तिची सामाजिक रचनेतील स्थिती शालेय शिक्षण निश्चित करते व अध्ययनाबद्दल निश्चित मुल्ये असलेल्या सांस्कृतिक समुहात त्याचा प्रवेश साध्य करण्यास कारणीभूत ठरते.

शिक्षण प्राप्तिचा स्तर श्रम शक्तिच्या सहभागावर प्रभाव पाडतो. कमी स्तराच्या शिक्षणाची परिणीती कारकीर्दीतील स्थैर्याच्या कठीणतेत होते अश्या व्यक्ती सारख्या नोकऱ्या बदलत असतात. याउलट एक उच्च स्तरीय शिक्षण अधिक स्थैर्य असलेल्या कायम स्वरुपी नोकरी प्राप्त करुन देते जी जास्त फायद्याची असते व व्यक्तिच्या दर्ज्यावर व कमाईच्या क्षमतेवर प्रभाव टाकते. याची परिणीती घराशी संबंधित समृद्धिची वाढ होण्यातही होते.

**कार्यक्षेत्र स्थिती :-**

व्यक्ति अनुभवित असलेल्या कार्यक्षेत्रातील स्थिती व संदर्भावर शालेय शिक्षणाचे विविध परिणाम होतात. व्यक्ति ज्या प्रमाणांत शालेय शिक्षण प्राप्त करते त्याप्रमाणे त्याचा प्रभाव ते करीत असलेल्या कार्यावर पडतो. व त्याच्या स्वतःच्या कार्यावरील तसेच इतरांच्या कार्यावरील त्याच्या निरंत्रणासही शालेय शिक्षण प्रभावित करते. इतरांच्या कार्यावरील त्याच्या नियंत्रणासही प्रभावित करते. पांढरपेशा कार्यात शिक्षित व्यक्ति स्थिरावते. त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रातील त्याच्या कामाच्या स्वरुपावर व वेगावर त्याचे नियंत्रण असते.

शालेय शिक्षण कार्यसमाधानासही प्रभावित करते. याची परिणीती जास्त चांगल्या प्रकारच्या कार्य निष्पत्तित होते. उच्चशिक्षित व्यक्ति जास्त शारीरीक श्रमाची नोकरी घेण्याची शक्यता कमी असते. ते इतरांवर देखरेख करण्याचे काम बघतात व स्वतःच्या कार्यावर त्यांचे नियंत्रण असते व त्यांना कार्यात स्वायत्तता मिळते. असे लोक पठडी बाहेरील कामात जास्त मग्न असतात व व्यवसायात निर्देशन, नियंत्रण आणि नियोजन, वेळेचा ताण आणि मोठ्या प्रमाणातील कार्य संबंधित जबाबदारी अशा गोष्टी त्यांच्या कार्यात सामील असतात. परंतु जर कार्यक्षेत्र स्थिती व वातावरण, कमाई व व्यावसायिक प्रतिष्ठा नियंत्रित असतील तर उच्च शिक्षित व्यक्ति या कमी शिक्षित व्यक्तिंपेक्षा कमी समाधानी असतात.

निम्न स्तरीय शालेय शिक्षणाची परिणीती निळ्या पेशाच्या किंवा श्रमिक स्वरुपाच्या नोकरी मिळण्यात होते. अशा नोकरीमध्ये जास्त शारीरीक श्रम असते व कमी बौध्दिक श्रमाची कार्ये दिली जातात. अश्या कार्यात व्यक्तिला नियंत्रणाच्या कमी संधि असतात.

एका निर्विकल्प अनुमानानुसार शालेय शिक्षण अनुभव असे ज्ञान, कौशल्य व मुल्ये विकसित करते, जे एक मुख्य आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये असण्याची एकतर अपेक्षा करतो किंवा आपल्या उच्च दर्जाच्या पांढरपेशा नोकरीसाठी असे कार्य करण्यास इच्छुक असतो.

**सामाजिक सहभाग व पाठिंबा :-**

उच्च स्तरीय शालेय शिक्षणाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तिंचे त्यांच्या सामाजिक विश्वात अधिक मजबुत व प्रभावी सामाजिक संबंध असतात. ते सांस्कृतिक कार्यक्रम व आयोजनामध्ये भाग घेतात. त्यांचे विशाल सामाजिक आंतरजाल असते व कमी शिक्षीत लोकांपेक्षा ते

सामाजिक पाठींब्याची अधिक अपेक्षा करतात. शालेय शिक्षण त्यांना प्रौढ सामाजिक जीवनात सहभागी होण्यास सक्षम बनवितात. उदाहरणार्थ, स्वयंसेवी समुहात शामील होणे, आयोजित कार्यक्रमांत जास्तीत जास्त भाग घेणे, स्वयंमदतीच्या गटात समाविष्ट होणे. व्यक्तिंची सामाजिक गटांबरोबर बांधिलकी अल्यामुळे शालेय शिक्षण हे सामाजिक पाठिंब्याशी संबंधित असते. उच्च स्तरीय शिक्षणामुळे समस्येसंबंधी इतरांशी बोलण्याची शक्यता वाढते कारण इतरांवर आपण सल्ल्यासाठी व प्रोत्साहनासाठी विश्वास ठेवू शकतो ही भावना निर्माण होते.

**मानसशास्त्रीय स्वास्थ्य :-**

जास्त प्रमाणातील शालेय शिक्षणाचा अनुभव असलेल्या व्यक्तिंचे मानसशास्त्रीय स्वास्थ्य व हीत हे सकारात्मक असते. असे आढळून आले आहे. उदाहरणार्थ, त्याचे स्वयंनियंत्रण, जीवन ध्येय, ताण-तणाव व निराशा तसेच भावनिक स्वास्थ्यांचा दर्जा हा कमी शिक्षित लोकांपेक्षा नेहमी उंच व चांगला असतो. त्यांचे स्वतःवर अधिक नियंत्रण असते व त्यांचे जीवनध्येय ही उच्च असते.

शैक्षणिक प्राप्ति व मानसशास्त्रीय ताण व निराशा यात विरुद्ध संबंध असतो. उदाहरणार्थ, जास्त शैक्षणिक प्राप्ति कमी ताण व निराशेचा अनुभव. शालेय शिक्षण जास्त झालेल्या व्यक्तिंना चांगल्या पगाराचे व त्याच्या अपेक्षा व योग्यतेनुसार काम मिळणे सुलभ जाते. अशाप्रकारचे कार्य केल्याने स्वतःवर पूर्ण नियंत्रण असल्याची भावना निर्माण होते ज्याचा परिणाम ताण, निराशा, राग इ. नकारात्मक भावना येण्याची शक्यता कमी होण्यात होतो. अशी व्यक्ति बौद्धिकदृष्ट्या लवचिक असून त्याचा उच्च सामाजिक स्तर असतो.

परिणामतः त्याला विशाल सामाजिक जाळे प्राप्त होते जे त्याच्या मानसशास्त्रीय निराशेमधून बाहेर पडण्यासाठी मजबुत पाठबळाचे कार्य करते.

अधिक शालेय शिक्षण असलेल्या व्यक्तिंना जास्तीत जास्त नियंत्रण, मार्गदर्शन, व आयोजन करता येण्यासारखे कार्य मिळते. त्यामुळे त्यांचे स्वयंनियंत्रण व नैपुण्याची भावना कोणत्याही प्रकारच्या नैराश्याला कमी करण्याची शक्यता असते.

मानसशास्त्रीय ताण व निराशा ही व्यक्तिच्या जीवनातील भौतिक परिस्थितीची प्रतिक्रिया असते, जी तिच्या कार्यक्षेत्रामुळे उद्‌भवलेल्या सामाजिक–आर्थिक परिस्थितीशी निगडीत असते. शैक्षणिक प्राप्ति व व्यक्तिच्या शैक्षणिक दर्जा व बौद्धिक कौशल्यानुसार पाठिंबा देणाऱ्या सामाजिक संबंधाची त्यांना उपलब्धता असते.

**परिवाराचा प्रभाव :-**

शालेय शिक्षण अनुभवाचा परिणाम परिपक्व कुटुंब जीवनावर होतो हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. जितके शालेय शिक्षण झाले आहे, त्या योग्यतेच्या प्रमाणांत व्यक्ति आपल्या जीवनसाथीची निवड करुन त्याचा वैवाहिक आयुष्यातील चढउतारांवर प्रभाव पाडण्याचा धोका निर्माण करतो. शालेय शिक्षण अनुभव लग्नसमय व मुलांच्या जन्माच्या वेळांवरही प्रभाव पाडतात. उदाहरणार्थ उच्च शिक्षित व्यक्ति योग्य वेळेआधी मुलांचे जन्म किंवा लग्नकार्य होऊ देणार नाही. त्याचप्रमाणे समान शैक्षणिक प्राप्तिच्याच सहचाऱ्याची निवडही शालेय शिक्षणावर अवलंबून असते. परंतू असा सहचाऱ्याचा शैक्षणिक स्तर सुखी व समाधानी संसाराचे द्योतक नव्हे. स्त्रियांचे उच्च शिक्षण बालजन्म उशिरा होऊ देण्यावर भर देतो. कारण अशा स्त्रियांना घर, कार्य व मातृत्त्व यात समतोल साधणे आवश्यक असते.

याचा परिणाम मुलांना बालवाडीत पाठपणे किंवा जोपर्यंत यासाठी त्यांची आर्थिक स्थिती भक्कम होत नाही तोपर्यंत थांबणे यात होतो. म्हणजेच शालेय शिक्षण जितके जास्त तितके लग्नकार्य व बालजन्म लांबणीवर टाकण्याची प्रवृत्ति असते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जितके जास्त शालेय शिक्षण तितकीच लग्न मोडण्याची प्रवृत्ति वाढण्याची शक्यता असते. कारण अशा स्त्रिया त्यांचे हक्क, अधिकार याबाबत जागरुक असतात व त्यांना मुल्ये, कार्याची अधिक संधि, आयुष्यातले प्राधान्य इ. विषयी इत्यंभूत माहिती असते. ज्यामुळे ते पारंपारिक सामाजिक मानक व जोखडातून स्वतःला सोडवण्याची धडपड करु शकतात.

**राजकीय सहभाग :-**

जास्त शालेय शिक्षण अनुभव असलेल्या व्यक्ति कमी शिक्षित लोकांपेक्षा राजकीय घडामोडीत जास्त गुंतलेले असतात. नागरिक जबाबदाऱ्यांबद्दल ते आपली मते मांडू शकतात व राजकारणात रस घेतात. ह्या व्यक्ति स्थानिक, राज्यस्तरीय व केंद्रिय मतदान प्रक्रियेत अर्थपूर्ण भाग घेण्याची जास्त शक्यता असते. त्यांच्या उच्च स्तरीय नागरिकतेच्या भावनांचा मतदान तसेच राजकीय अभिवृत्ति वर प्रभाव असतो.

शिक्षणामुळे व्यक्तिची गुंतागुंतीच्या व अमूर्त राजकीय कल्पनांवर यशस्वीपणे काम करण्याची क्षमता वाढते. यामुळे त्यांचे राजकीय वर्तुळातील मुद्यांबद्दलचे ज्ञान विकसित होऊन त्यांचा राजकीय क्षेत्रातील प्रवास सहजसाध्य व निश्चित होतो. अशाप्रकारे राजकीय प्रक्रियेत ह्या व्यक्ति चांगली रुचि दाखवितात. व यात भाग घेणे ही नैतिक जबाबदारी समजतात. अशा व्यक्ति कमीत कमी खर्चात, भ्रष्टाचार न होऊ देता योग्यपणे व अर्थपूर्ण मतदान प्रक्रिया पार पाडू शकतात.

**मूल्ये व फावला वेळ :-**

संशोधन असे सुचित करते की व्यक्तिंचा सामाजिक वर्ग व पार्श्वभूमी ते किती काळ शालेय शिक्षण घेतील व मूल्ये अंगिकारतील याला आकार देतात. शिक्षण व्यक्तिला स्वातंत्र्याचे महत्त्व शिकवते. अशाप्रकारे त्यांचे सामाजिक फायदे किंवा लाभ त्याच्या प्रौढ काळातील व्यावसायिक स्तराला प्रभावित करीत असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या मूल्यप्रणाली वरही होतो. तसेच याचा परिणाम त्यांच्या फावल्या वेळाच्या उपयोगावरही होतो. शिक्षित व्यक्ति त्यांच्या फावल्या वेळाचा सदुपयोग नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्यात किंवा स्वतःचे सांस्कृतिक दृष्टिकोन विस्तारित करण्यात करतात. उदाहरणार्थ, कलेची जोपासना, नृत्य आदि कला शिकणे किंवा त्याचा आनंद घेणे.

**संदर्भ साहित्य :-**

Pallas, Aaron M. “The Effect of schooling on individual lives.” Handbook of the Sociology of Education, Maureen T. Hallinan, Springer Publication.

❖❖❖❖

# ६

# सांस्कृतिक विकासावर शिक्षणाचे होणारे परिणाम

**प्रकरणाची रचना :-**

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ संस्कृती : आढावा
 i. अदृश्य संस्कृती
 ii. संस्कृतीचे प्रकार (विषयानुसार)
 iii. संस्कृतीचे प्रकार
 iv. शिक्षण व संस्कृतीचे पश्चायन
 v. सांस्कृतिक वाढ व विकास
६.३ शिक्षण व संस्कृती
 i. शिक्षणावर संस्कृतीचा प्रभाव
 ii. संस्कृतीवर शिक्षणाचा परिणाम

## ६.० उद्दिष्टे :-

हे घटक वाचल्यानंतर तुम्हाला

- संस्कृती या संकल्पनेचा आढावा येईल.
- शिक्षण व संस्कृतीमधील संबंधांचे आकलन होईल.
- शिक्षणावर संस्कृतीचा प्रभाव लक्षात येईल.
- शैक्षणिक विकासाचा संस्कृतीवर होणाऱ्या परिणामांचे आकलन होईल.

## ६.१ प्रस्तावना :-

गोल्ड मेयर यांच्या शब्दात "जगात प्रत्येक तासागणित जन्मास येणाऱ्या हजारो असंस्कृत मानवांना सुसंस्कृत करणे हा शिक्षणाचा प्रमुख हेतू आहे." शिक्षण जर अध्ययन कर्त्याला सुसंस्कृत बनवण्यास असमर्थ ठरले तर ते निरुपयोगी आहे. व्यक्तीमध्ये परिवर्तन करण्यास शिक्षण हे एक प्रमुख अस्त्र आहे. शिक्षण व्यक्तीला सुसंस्कृत बनवते तर दुसऱ्या अर्थाने समाजातील संस्कृतीचे संवर्धन, संक्रमण व विकास करते. थोडक्यात शिक्षण व संस्कृती हे दोन्ही त्यांच्या स्वरुप व कृतींनी एकमेकांवर परस्परावलंबी, पूरक आहेत. त्यामुळे संस्कृती व शिक्षण यांना विभक्त करता येत नाही. किंवा संस्कृती व शिक्षण हे अविभक्त आहेत.

व्यक्तीच्या जीवनात संस्कृती महत्त्वाचे कार्य बजावते. संस्कृतीच्या विविध घटकांचे शिक्षण व्यक्तीला नैसर्गिक व सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी व्यक्तिला समाजप्रिय बनविण्यासाठी फुरसतीच्या वेळेचा योग्य वापर करण्यासाठी आणि दुसऱ्या संस्कृती व औदार्य यांचा अर्थ समजून घेण्यासाठी मदत करते. कुटुंब, समाज व शाळा यांच्याकडून संस्कृतीचे शिक्षण दिले जाते. व्यक्तीच्या जीवनातील संस्कृतीचे महत्त्व आणि समाजाच्या आणि समाजीकरणाच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य लक्षात घेता संस्कृतीतील झालेल्या बदलांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. ज्यामुळे संस्कृतीला एक नवीन आकार मिळाला आहे. प्रथम शिक्षणाचा संस्कृतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यापूर्वी संस्कृती या संकल्पनेबद्दल थोडक्यात समजून घेऊ.

## ६.२ संस्कृती :- आढावा

क्रोएबर आणि क्लकहॉन यांनी वेगवेगळ्या भाषेच्या बांधणीतून संस्कृती या शब्दाच्या इतिहासाचा अभ्यास केला. त्यांनी वेगवेगळ्या शीर्षकाखाली उदा. मानसशास्त्रीय, जनुकीय संस्कृतीच्या अर्थाची पाहणी केली. त्यांना १६४ व्याख्या दिल्या. त्यांनी स्वतःच्याही काही व्याख्या दिल्या परंतू त्यांनी त्या व्याख्यांना १६५ वा नंबर दिला नाही कारण त्या व्याख्या आधीच्या व्याख्यांवर आधारित किंवा सामावलेल्या होत्या. संस्कृतीमध्ये अदृश्य / दृश्य, स्पष्ट, अस्पष्ट यांचा समावेश होतो. संस्कृतीच्या महत्त्वाच्या भागामध्ये पारंपारिक कल्पना, (उदा. इतिहासकालीन मिळालेल्या व निवडलेल्या) आणि त्याच्याशी संबंधित मूल्य, संस्कृतीच्या पद्धती या एकाच हातात एकवटल्या असतील तर पुढील कृतींवर परिणाम होतो.

व्यक्तीच्या वर्तणूकीचा सूक्ष्म अभ्यास करण्यासाठी उघडणाऱ्या दरवाजाची संस्कृती ही चावी आहे. वेगवेगळ्या समाजामध्ये वेगवेगळ्या सणांना ही का वेगळी असते? काही समाजामध्ये व्यक्ती संत का बनतात? या सगळ्यांचे स्पष्टीकरण त्या सामाजातील संस्कृतीमधून चांगले मिळू शकते.

सगळ्या समाजामध्ये स्वतःची संस्कृती असते. आपण काय खावे व प्यावे, प्रेम व तिरस्कार, खेळ व काम, म्हणजेच काय विचार करावा या सगळ्यांवर संस्कृतीचे बंधन असते. प्रत्येक समाजामध्ये विशिष्ट कल्पना असतात त्या सहजपणे दुसऱ्या समाजातील भाषेमध्ये भाषांतरीत करता येत नाहीत. जेव्हा त्यांचे भाषांतर केले जाते तेव्हा एकतर त्याचा मूळ अर्थ किंवा गुण नष्ट होण्याची अडचण असते. फ्रेंच शास्त्रज्ञ म्हणतो की, "भाषांतर हे स्त्रीसारखे आहे. जेव्हा ते सुंदर असते तेव्हा ते विश्वासार्ह नसते व जेव्हा ते विश्वासार्ह असते तेव्हा ते सुंदर नसते."

संस्कृतीचा आणखी एक घटक असा की आपण शिकावे आणि किती हे हुशारीचे कार्य आहे. परंतु आपण काय शिकतो हे संस्कृतीचे कार्य आहे. अर्थातच आपण त्या गोष्टी शिकतो ज्या आपल्या संस्कृतीमध्ये आहेत. आपत्ती ध्येय ही समाजातील संस्कृतीनुसारच ठरविली जातात. उदा. एस्किमाना साहित्यासाठी नोबेल पारीतोषिक मिळवायचे आहे. तरीही संस्कृतीचा आणखी एक घटक म्हणजे जो जीवशास्त्रीय घटकांवर व चरित्रावर परिणाम करतो. त्यामुळे व्यक्तीचे सामाजिक जीवन समजून घेण्यास व स्पष्ट करण्यास लागणाऱ्या संकल्पनेची संस्कृती ही चावी आहे.

समाजातील विविध मूल्यांचे शिक्षण, प्रमाणव दर्जा हे संस्कृतीमुळेच कळते. आणि एकापिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. थोडक्यात लोक जे करतात ते म्हणजे संस्कृती. यामध्ये ज्ञान, श्रद्धा, कला, तात्पर्य, कायदे आणि मानवाच्या क्षमता व सवयी, छंद यांचा समावेश होतो.

संस्कृतीचा महत्त्वाचा हेतू हा समाजाला उपयोगी पडणारे शिक्षण देणे हा आहे. थोडक्यात संस्कृतीकडून कल्पना, वागणूक व मूल्यांची मालकी मिळविणे असे निर्देशित होते.

**i) अदृश्य संस्कृती :-**

दृश्य आणि अदृश्य संस्कृतीला स्पष्ट किंवा अस्पष्ट, किंवा उघड/बंदिस्त संस्कृती असे म्हटले जाते. काही संस्कृतीचे शिक्षण हे बाहेरील गोष्टींमधून होते. जास्त सांस्कृतिक शिक्षणामध्ये आणि सांस्कृतिक विविधतेच्या चर्चेमध्ये दृश्य घटकांवर उदा. भाषा, पोशाख, अन्नाच्या पद्धती, धर्म, आणि श्रद्धा यांच्यावर लक्ष दिले जाते. त्यामुळे हे दृश्य घटक अदृश्यपणे आपल्याला संस्कृतीचे ज्ञान देतात. संस्कृतीच्या अस्पष्ट आणि अदृश्य घटकांनाही महत्त्व आहे. सुरुवातीला कसे बोलावे कोणत्या गोष्टी टाळाव्यात, भावनिक अनुभव, शारीरीक व्यथा, त्या व्यथा कशा व्यवस्थितपणे सांगाव्या, एखाद्याच्या बोलण्याकडे काळजीपूर्वक लक्ष देणे, मोठ्याने व अती लहान आवाजात न बोलता पुरेशा आवाजात कसे बोलावे, यासारखे घटक आपण न पहाताही शिकतो. आपणाला भेटणाऱ्या व्यक्तींमध्ये हे घटक वेगवेगळे असलेले दिसतात. काही व्यक्ती आपल्याला असहकार्ययुक्त किंवा उद्धट दिसतात. त्यानुसार आपण व्यक्तींना चांगला, सभ्य अशा प्रकारची नावे देऊन टाकतो.

अदृश्य संस्कृतीतील फरकामुळे काही वेळा आंतरगटामध्ये काही परिस्थितीत वाद होऊ शकतात. दुसऱ्यांच्या संस्कृतीचा विचार न करता आपल्या वैयक्तिक गोष्टींकडे लक्ष दिल्यामुळे हे कठीण होऊन बसते. आणि नेहमी आपण त्यांना दोष देतो. तेव्हा आपण संस्कृतीचा अनुभव घेत असतो याचा विचार करत नाही.

**ii) संस्कृतीचे प्रकार :-**

वरील विषयानुसार संस्कृतीचे एकूण चार प्रकार आहेत.

**१) व्यक्तिगत संस्कृती :-** प्रत्येक व्यक्तीमध्ये काही विशेष गुण आणि दर्जा असतात जे त्याला वेगवेगळ्या विषयांवर विचार करण्यास व सर्व क्षेत्रांतील उपक्रमांमध्ये वर्तणूक करण्यास मार्गदर्शन करतात. ही व्यक्तीची वैयक्तिक आवड, नावड, रुची, विचार करण्याच्या पद्धती व साचा, सामाजक वर्तणूक व्यक्तिची व्यक्तिगत संस्कृती घडवितात.

**२) जातीय संस्कृती :-** व्यक्तीगत संस्कृतीच्या बाबतीत वेगवेगळ्या समाजातिल दुसऱ्या संस्कृतीच्या तुलनेत राहणीमानाचे वेगवेगळे गुण दाखवितात. वेगवेगळ्या समाजातील सर्व सभासद वेगवेगळे गुण दाखवितात यालाच जातीय संस्कृती असे म्हणतात.

**३) राष्ट्रीय संस्कृती :-** त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्राचे काही वेगवेगळे गुण आणि विशेष लक्षणे असतात जी राष्ट्रीय आदर्श, मूल्य, वैचारिक पद्धती व वर्तणूक यांना बंधनकारक असतात. याच राष्ट्रीय गुणांना राष्ट्रीय संस्कृती असे म्हणतात.

**४) जागतिक संस्कृती :-** दळणवळणाच्या व संप्रेषणाच्या साधनांमध्ये झपाट्याने वाढ झाल्या कारणाने जग हे अतिशय लहान झाले आहे. याचा परिणाम म्हणजे जगातील वेगवेगळी राष्ट्रे ही जग या समाजामध्ये सारखी मूल्य. उदा. सहकार्य, सहानुभूती, सामाजिक कार्य, सामाजिक जागृती आणि सामाजिक हळवेपणा इ. च्या साहाय्याने एकत्रितपणे रहातात. यालाच जागतिक संस्कृती असे म्हणतात. किंवा यामुळेच जागतिक संस्कृती तयार होते.

**iii) संस्कृतीचे प्रकार :-**

अनुक्रमणिकेप्रमाणे प्रत्येक समाजातील संस्कृतिचे दोन प्रकार आहेत.

**१) भौतिक संस्कृती :-** मानवाने आपल्या भौतिक फायद्यासाठी बनविलेल्या सर्व वस्तू ज्यांचा उपयोग शांतता व युद्धासाठी करता येईल त्या सर्वांचा समावेश भौतिक संस्कृतित होतो. उदा. कपडे, भांडी, घरे, रस्ते, दागिने, दूरदर्शन, आकाशवाणी, वेगवेगळी यंत्रे आणि दळणवळणाची व संप्रेषणाची साधने.

**२) अभौतिक संस्कृती :-** अभौतिक संस्कृतीमध्ये आदर्श, वर्तणूक, आणि मूल्ये, यांचा समावेश होतो जी व्यक्तीच्या वर्तणूकीला आकार देतात. उदा. भाषा, साहित्य, कला, संगीत, धर्म, शासन, परंपरा इ.

**iv) शिक्षण व संस्कृतीचे पश्चायन :-**

शास्त्रीय संशोधन आणि तांत्रिक विकासामुळे संस्कृतीचे भौतिक स्वरुप खूपच पुढे गेले आणि त्याचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणावर झाला. आधुनिक समाज हा हळूहळू ही तंत्रे आणि शास्त्रीय संपादित गोष्टी यांचा आपल्या दररोजच्या जीवनामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात स्वीकारत गेला. त्याचवेळी मात्र संस्कृतीचे अभौतिक स्वरुप खूपच मागे राहिले. याच भौतिक आणि अभौतिक संस्कृतीतील मोठ्या फरकाला सामाजिक आणि सांस्कृतिक पश्चायन असे म्हणतात. भौतिक संस्कृतीतील प्रगतीच्या चालीमुळे ती मंदावणे शक्य नव्हते त्यामुळे अभौतिक सांस्कृतिक रचनेमधील विचार आणि रहाणीमान यांत वेगाने बदल होणे गरजेचे होते. ही रथाची दोन चाके असल्यामुळे एकत्रितपणे पुढे जाणे गरजेचे होते. शास्त्रीय शोध, चौकशी व संशोधन यांमुळे खूप भारतीय लोक हे भौतिक संस्कृतीच्या प्रगतीची फळे अनुभवत आहेत. परंतु अजूनही खूप मोठ्या संख्येने सर्वसामान्य लोक हे दूर्लक्षित, सूस्त व पूर्णपणे मागासलेले आहेत. शिक्षण हे संस्कृतीचे पश्चायन नष्ट करु शकते आणि सर्वसामान्य लोकांना प्रगतीच्या मार्गाने व आधुनिकतेकडे चांगल्या तऱ्हेने वाटचाल करण्यास उदयुक्त करु शकते.

**v) सांस्कृतिक वाढ व विकास :-**

समाजातील सांस्कृतिक वाढ व विकास हे वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून आहेत जे घटक समाज, शिक्षण आणि विचारातील विकास या घटकांना ताब्यात ठेवते. समाजातील

वेगवेगळ्या संस्था आणि कर्ये ही उद्दिष्टाधिष्ठित / गरजाधिष्टित असतात. त्यामुळे वेळेनुसार त्या संस्कृतीचे स्वरुप बदलतात. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास कृती आणि कार्ये ही गरजेनुसार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. त्यामुळे संस्कृती ही समाजशास्त्रीय स्थिती आणि जैविक गरजा यांपासून पूर्णपणे बनलेली आहे. ती अनुवंशीक किंवा जैविकदृष्ट्या संचारित नाही. संस्कृतीत सतत बदल होत असतो. त्यामुळे संस्कृती ही सतत चालणारी प्रक्रिया आहे त्यामुळे संस्कृती ही समाजातील प्रत्येक व्यक्तीला एकत्र बांधून /जोडून ठेवते. ज्यावेळी समाजामध्ये काही नवीन गोष्टी घडतात त्यावेळी संस्कृतीची वाढ व विकास होतो. त्यामुळे संस्कृती ही व्यक्तीच्या मानवतावादी व मुक्ततेमध्ये झालेल्या प्रगतीमधील वाढ आहे.

**उजळणी :-**

योग्य पर्याय वापरुन रिकाम्या जागा भरा.

१) अदृश्य संस्कृतीला ________ संस्कृती असेही म्हटले जाते.
a) उघड b) व्यक्त c) आच्छादित d) विकास

२) ________ हे सांस्कृतिक पश्चायन उभारणीमधील महत्त्वाचे साधन आहे.
a) शिक्षण b) शोध c) मानवतावाद d) आधुनिकता

३) वेगवेगळ्या समाजातील सर्व सभासद वेगवेगळे गुण दोष दाखवितात कारण –
a) मुक्तता b) सामाजिक संस्कृति c) प्रगतीतील वाढ d) जागतिक संस्कृती

४) संस्कृती ही ________ परिस्थिती आणि ________गरजा यांपासून पूर्णपणे बनलेली आहे.
a) संवेदनशील / तंत्रज्ञान b) भौतिक / अभौतिक c) निष्क्रिय / राजकीय d) समाजशास्त्रीय जैविक

## ६.३ शिक्षण आणि संस्कृती :-

शिक्षण आणि संस्कृती हे पूर्णपणे एकमेकांवर अवलंबलेले आहेत. समाजात अस्तित्त्वात असलेली संस्कृती ही तेथील शिक्षणाचे स्वरुप ठरविते. उदा. झर एखाद्या समाजामध्ये संस्कृतीचे अध्यात्मिक स्वरूप असेल तर शैक्षणिक पद्धती नैतिक व शाश्वत मूल्यांच्या साध्यतेवर जोर देईल. वेगळ्या पद्धतीने सांगायचे झाल्यास जर सांस्कृतिक स्वरुप भौतिकतेसंबंधी असेल तर अर्थातच तेथील शैक्षणिक स्वरुप हे भौतिक मूल्यांच्या साध्यतेला बढती देतील. जेणेकरून तेथून सूख आणि भौतिक स्वास्थ्य मिळेल. कोणत्याही संस्कृतीच्या पूर्णपणे विरहित समाजाला कोणत्या प्रकारचे निश्चित असे शैक्षणिक सुसंघटन नसेल. म्हणून कोणत्याही देशाच्या संस्कृतीचा तेथील शैक्षणिक स्वरुपावर बराच मोठा परिणाम होत असतो.

संस्कृती आणि शिक्षण यातील नाते उघड आहे की शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय हे मुलांवर त्यांच्या वडिलोपार्जित संस्कृतीचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे कोणत्याही मानवी

गटामध्ये हजारो वर्षांच्या अनुभवानंतर संस्कृतीच्या विविध घटकांचा आणि तुकड्यांचा समावेश होतो आणि ते पूर्णत्वाने पुढील पिढीकडे सोपविले जातात. म्हणून प्रत्येक माणूस हा एका विशिष्ट संस्कृतीमध्ये जन्मतो आणि जीवनाच्या प्रवासात विविध मुल्यांनी व वर्तणुकीच्या पद्धतींनी मार्गदर्शन करते. त्यामुळे प्रत्येक वेळी नवीन प्रयोगाच्या वेळी त्याचे संरक्षण होते. अर्थातच संस्कृतीही मानवाच्या जीवनामध्ये महत्त्वाचे काम बजावते. उदा. नैसर्गिक वातावरणाच्या जुळणीमध्ये सामाजिक वातावरणाच्या जुळणीमध्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासामध्ये व सामाजिकरणामध्ये.

प्रत्येक समाजामध्ये एक विशिष्ट प्रकारची संस्कृती किंवा पद्धती असते व ती एकमेवाद्वितीय आहे. समाजामध्ये सुसंवादीपणे रहाण्यासाठी तेथील सभासदांना संस्कृतीला (संस्कृतीमध्ये) मान्य असलेल्या विविध पद्धतींची माहिती असावयास हवी. याची शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे (विद्यार्थ्यांना) मुलांना व नवीन सभसदांना माहिती दिली जाते. व्यक्तीने व्यवस्थित रीतीने जगण्यासाठी निसर्गाच्या विविध गोष्टींशी आपल्या वर्तनाने यशस्वीपणे लढा द्यायला हवा. अगदी सोप्या, साध्या पद्धतीने म्हटले जाऊ शकते की वैश्विकदृष्ट्या शिक्षणाचा खरा हेतू म्हणजे व्यक्तिला त्याच्या संस्कृतीची पद्धत आणि त्या पद्धतींचे यशस्वीरित्या लढा देऊन स्वीकार करणे याबाबतीत माहिती देणे होय. स्पष्ट पणे गर्भितार्थ असा की विशिष्ट देशातील मुलांना जगाकडे कसे पहावे व आपल्या देशातील कोणत्याही गोष्टी त्याप्रमाणे कशा कराव्या याचे शिक्षण द्यायला हवे.

### i) शिक्षणावर संस्कृतीचा प्रभाव :-

वर सांगितल्याप्रमाणे संस्कृती आणि शिक्षणामध्ये देवाणघेवाणीचे नाते आहे. वेगवेगळ्या स्वरुपामध्ये दोन्हीही एकमेकांना पूरक आहेत. संस्कृतीचे शिक्षणावर झालेले परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१) शिक्षणाची ध्येये आणि आदर्श हे मुख्यत्त्वे समाजातील मुल्ये व उदाहरणांवरुन निश्चित केली जातात.

२) समाजातील संस्कृतीप्रमाणे अभ्यासक्रमाची रचना केली जाते. सांस्कृतिक मूल्ये पूर्णपणे समजण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना समाजातील आदर्श व गरजा यांनुसार केलेली असते.

३) शिकविण्याच्या पद्धती आणि संस्कृती या एकमेकांशी पूर्णपणे जोडलेल्या आहेत. बदलत्या सांस्कृतिक स्वरुपामुळे शिकविण्याच्या पद्धतीमध्ये अनेक चांगले परिणाम होतात. शिक्षक केंद्रित शिक्षणाच्या जागी सध्या बालक केंद्रित शिक्षण पद्धतीने जागा घेणे याचे उत्तम उदाहरण आहे. समाजप्रिय पद्धती उदा. प्रोजेक्ट (प्रकल्प) पद्धती, परीसंवाद, चर्चासत्र, चर्चालेख इ. यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग शिकणे व शिकविणे यांमध्ये केला जातो कारण संस्कृतीचा असलेला परिणाम होय.

४) शिस्तीवरदेखील सांस्कृतिक मूल्यांचा परिणाम होतो. सध्याचे विचारांचे व रहाण्याचे सांस्कृतिक स्वरुप हे आपल्या शिस्तीच्या संकल्पनेशी सरळपणे जोडलेले आहे. प्राचीन काळातील दडपशाहीच्या शिस्तीची जागा सध्याच्या आधुनिक व मध्ययुगीन जीवनातील मूल्यांनी घेतली आहे.

५) सध्याची पाठ्यपुस्तके ही सांस्कृतिक मूल्ये व आदर्शांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने लिहिलेली आहेत.

६) ज्या शिक्षकाने सांस्कृतिक मूल्ये व आदर्श यांचे चांगले ग्रहण केले आहे तोच आपले लक्ष्य यशस्वीरित्या पूर्ण करु शकतो. तेच शिक्षक विद्यार्थ्यामध्ये उच्च आदर्श व मूल्य यांची रुजवणूक करु शकतात.

७) शाळा ही समाजाची लहान प्रतिकृती आहे. शाळेतील सर्व कार्यक्रम व उपक्रम हे सांस्कृतिक आदर्श व मूल्यांनुसार आयोजलेले असतात. म्हणून शाळा ही समाजातील सांस्कृतिक स्वरुपाला बढती देणारे, साचेबद्ध, सुधारणा व विकास करणारे केंद्र आहे.

**ii) शिक्षणाचा संस्कृतीवरील परिणाम :-**

जेथे तेथे मानवी गट आहेत तेथे संस्कृती आहे. म्हणजेच पर्यावरणाचा मानवनिर्मित भाग आणि वर्तनाचा शिकलेला साचा जेथे संस्कृती आहे, ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे संक्रमित करण्याचे कार्य हे शिक्षण करते. कारण मानव प्राणी हे नेहमी गटाने रहात असल्याने तेथे संस्कृती व शिक्षण वेगवेगळ्या प्रकारे अस्तित्वात असते. शालेय शिक्षण हे शिक्षित संस्कृतिपुरतेच मर्यादित आहे. अशिक्षित गटामध्ये शिक्षणाचे कार्य हे खूप कमी आहे.

ज्याप्रमाणे आतापर्यंत संस्कृतीचा शिक्षणावर पगडा होता त्याचप्रमाणे जगामध्ये शिक्षणाचाही खूप मोठ्या प्रमाणावर संस्कृतीवर परिणाम झालेला आहे.

जगाच्या संस्कृतिवर शिक्षणाचा परिणाम खालील विविध मार्गांनी झालेला आहे.

**१) सांस्कृतिक जोपासना :-**

प्रत्येक देश हा इतरांच्या तुलनेत आपल्या संस्कृतीचे – श्रेष्ठत्त्व मोठ्या दिमाखात व विश्वासाने दाखवत असतो. म्हणून तो आपल्या संस्कृतिची जोपासना तिच्या मूळच्याच स्वरुपामध्ये करण्याचा प्रयत्न करत असतो. हे जबाबदारीचे काम करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. म्हणून शिक्षण हे संस्कृतिची जोपसना करते.

**२) संस्कृतिचे संक्रमण :-**

संस्कृतीच्या जोपासनेच्या प्रक्रियेमध्ये संस्कृती संक्रमणाचा अंतर्भाव होतो. एका पिढीकडून दूसऱ्या पिढीकडे होणारे संस्कृतीचे संक्रमण हे तिच्या जोपासनेची चांगल्या प्रकारे हमी देते. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ ऑटावे यंच्या शब्दात, "शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे सामाजिक मूल्ये व आदर्श यांचे समाजातील तरुण व हुशार व्यक्तींमध्ये संक्रमण करणे होय."

**३) संस्कृतीचा विकास :-**

समाजाची प्रगती व सतत विकास होण्यासाठी आवश्यक व योग्य प्रकारे सांस्कृतिक मूल्ये व आदर्श यांच्यामध्ये समाजात कोणतेही थर न बनवता बदल करवून आणणे हे शिक्षणाचे कार्य आहे. शिक्षण हे व्यक्तीला संस्कृतीच्या विविध पद्धतींमध्ये संशोधनाने सुधारणा आणि खूप संशोधनाने व्यक्तींच्या अनेक गरजांमध्ये सुधारणा घडवून आणते.

## ४) संस्कृतिची अखंडता :-

संस्कृती हे समाजाचे रक्त आहे. संस्कृतीशिवाय समाजाचा नाश व मरण आज ना उद्या अटळ आहे. शिक्षण हे आपल्या वेगवेगळ्या उपक्रम व कार्यक्रमांद्वारे संस्कृतीची अखंडता उचलून धरते / टिकवून ठेवते. समाज संस्कृतिचे जतन व संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे करण्यासाठी शाळेची स्थापना करतो. असे निदर्शनास आले आहे की काही शाळा विद्यार्थ्यांमध्ये अनिष्ट सांस्कृतिक लहानमोठेपणा व गुंतागुंतीचे श्रेष्ठत्त्व विकसित करण्याचा प्रयत्न करतात. मुलांना जास्तीत जास्त प्रमाणांत वेगवेगळ्या संस्कृतींचा एकमेकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी प्रेरणा द्यायला हवी. थोडक्यात शिक्षणाने मुलांना त्यांच्यामध्ये सहिष्णूता आणि वर्तनामध्ये देवाण-घेवाणीच्या बाबतीत मिळतेजुळते करुन घेण्यास व त्यांचा विकास करण्यास मदत करणे आवश्यक आहे. आधुनिक समाजामध्ये याच प्रकारची सांस्कृतिक एकात्मता आणि सांस्कृतिक एकीकरण यांची भयानक आवश्यकता आहे. डॉ. एस. राधाक्रिष्णन म्हणतात की, भारतीय संस्कृतीचे महत्त्वाचे स्वरुप म्हणजे याचा बारमाही स्वभाव त्यांनी निरीक्षण केले की भारतीय संस्कृतीमध्ये बदल होतात, तसेच काही तसेच राहतात. भारतीय चैतन्याची शक्ती आपणास कठीण काळी आधार देते. हे अनाकलनीय आहे जे राष्ट्राला चरित्र व सामर्थ्य देते.

## ५) व्यक्तिमत्त्व विकास :-

शिक्षण हे वेगळ्या प्रकारे सांस्कृतिक स्वरुपाच्या वागण्याला, बोलण्याला, विचारांना आणि सांस्कृतिक मूल्यांच्या घटकांना वेगळे काम देते म्हणून (जेणेकरुन) मुले शारीरीकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या व भावनिकदृष्ट्या जास्त प्रमाणात विकसित होतील. म्हणून शिक्षणाचे मूलांचा व्यक्तिमत्त्व विकास हे ध्येय साध्य होते.

## ६) संस्कृतीचे पश्चायन दूर करणे :-

शास्त्रीय शोध व नूतनीकरणामुळे भौतिक संस्कृतीचा जोराने विकास होत आहे. त्याचवेळी अभौतिक संस्कृती ज्यामध्ये आदर्श, मूल्य आणि प्रमाण हे मागे पडत असल्याने त्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर दरी निर्माण होत आहे. शिक्षण हे एकमेव साधन आहे की ज्यातील कार्यक्रम आणि विकसित कार्यक्रमांमुळे हे पश्चायन नष्ट केले जाते.

## ७) एकात्मता प्राप्त करणे :-

मनुष्यजातीतील एकात्मतेसाठी संस्कृतिचा प्रसार, पूर्ण जगामध्ये होणे आवश्यक आहे. सांस्कृतिक अलगपणा जायला हवा. आणि तेथे कोणत्याही दोन संस्कृतीमध्ये पडदा नसावा. डॉ. झाकीर हुसैन यांना असे निरीक्षणास आले की, सुशिक्षित लोकांचा, संस्कृतीच्या ध्येयाकडे पहाणाचा दृष्टीकोन हा सकारात्मक असतो हे त्यांचे वैशिष्ट्य आहे शैक्षणिक व संस्थापकीय कार्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन हा प्रेमळ असावयास हवा.

## ८) सांस्कृतिक दुष्टपणाचे शासन :-

सांस्कृतिक दुष्टपणावर शिक्षण सुधारणा घडवून आणते. शिक्षण हे अहंकार व चुकीच्या कल्पना यांना संस्कृतीचे महत्त्व स्पष्ट करुन दुरुस्त करते.

शैक्षणिक ज्ञान फक्त सौंदर्यशास्त्र कला व सौंदर्य यांचे गुणग्रहण करत नाही तर उदार मन व आत्मा यांनाही दर्शविते. शंस्कृती मनाला मुक्त करते. साक्षरता नैतिक शिक्षण आणि कलेतील शिक्षण सांस्कृतिक मूल्यांच्या खऱ्या तंत्रांची जाणीव घडविते.

## ९) शिक्षण आणि वांशिक पूर्वग्रह व विरोध :-

शिक्षण हे वांशिक अपाय आणि विरोध कमी करते, जे इतर संस्कृतिविषयीच्या कल्पनांचा निकाल असते. स्वतःच्या संस्कृतीचे ग्रहण करणे, अभिमान वाटणे आणि जतन करणे हे देशभक्तीनुसारच आहे. परंतू याला प्रतिकारात्मक बदल घडल्यास दुसऱ्या संस्कृतीच्या आगमनाची दार मिटली जातात. आणि दोन संस्कृतीमध्ये मोठ्या प्रमाणावर दरी निर्माण होते. हे संस्कृतीच्या वाढीकडे घेऊन जाणारे नाही. संस्कृतीचा प्रसार हा व्यक्तीच्या सांस्कृतिक गटासाठी आणि मानवतावादी दृष्टीकोनासाठी खूप चांगले आहे.

## १०) पूर्णत्त्व त्याअर्थी मानवी संस्कृती :-

एकाच्याच स्वतःच्या संस्कृतीला खूप महत्त्व दिल्यास एकात्मता नाहिशी होईल आणि वैश्विक समजूतदारपणाचा अभाव निर्माण होईल, जे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. वेगवेगळ्या संस्कृतीचा प्रसार केल्यासच हे शक्य आहे. मानवी संस्कृतीला शिक्षणाने पूर्णत्त्वासारखे वागविले पाहिजे. "जसे की एखादे विविध पाकळ्या असलेले फूल, त्यामध्ये प्रत्येक पाकळी ही एका सांस्कृतिक गटाचे जणू प्रतिनिधीत्त्व करत आहे." शिक्षणाने विविधतेने एकता निर्माण करण्यासाठी झगडले पाहिजे.

## ११) शाळेचे कार्य :-

शाळा हे सुलभ केलेले पर्यावरण आहे जे समाजातील आजच्या संस्कृतीचे स्पष्टीकरण करते आणि शालेय शिक्षण हे मुलांना तसेच ग्रहण करण्यास शिकविते शाळा ही सांस्कृतिक उभारणीमध्ये कार्य करण्यासाठी संस्कृतीचा दर्जा ठरविते. शिक्षण हे संस्कृतीचे शोषक व परावर्तक आहे. हे आजच्या वाढला पिढीमध्ये सांस्कृतिक मूल्ये आणि समाजाची पद्धती रुजवण्याचे मुख्य माध्यम आहे. सरकारच्या लक्षवेधी कामामुळे आणि शिक्षणाच्या अनेक शाखांमुळे लोकांना शिक्षणाचे महत्त्व लक्षात यायला लागले आहे. जास्तीत जास्त लोक शिक्षणामध्ये रस घेऊ लागले आहेत. पालकही मुलांना शाळेमध्ये पाठवू लागले आहेत. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली आहे. जास्तीत जास्त इंग्रजी माध्यमाच्या शाळा, ICSE, CBSE आणि राज्य विद्यापीठाच्या शाळा उघडल्या आहेत त्यांना पुरेशी विद्यार्थी संख्याही मिळत आहे. हे गतीशिलतेचे चांगले दर्शक आहे. सध्या समाजाने एकत्र शिक्षणही स्वीकारले आहे. शाळांमधील लैंगिक शिक्षणाच्या विरोधाचे प्रमाणही कमी झाले आहे. हे सगळे शिक्षणाचे सकारात्मक निकाल आहेत.

## १२) आंतर सांस्कृतिक समजूतदारपणा / सामंजस्य :-

शिक्षण हे वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये आंतर-सांस्कृतिक समजूतदारपणा वाढीस लावते. डॉ. राधाक्रिष्णन म्हणतात की, राष्ट्राचे मोठे पण हे तेथील भौतिक शक्ती व संपत्तीवरुन मोजले जात नाही तर तेथील व्यक्तींमधील आंतर सांस्कृतिक नातेसंबंधावरुन मोजले जाते. आंतर

सांस्कृतिक सामंजस्य व्यक्तीच्या स्वार्थी व अरुंद विचारसरणीचा विकास करण्याशी, इतर संस्कृतीतील महत्त्वाच्या मौल्यवान गोष्टींना शोधून काढण्याशी संबंधित आहे. शैक्षणिक योजकांकडून अशा प्रकारचे शैक्षणिक अनुभव आणि कार्यक्रम पुरविण्याची आवश्यकता आहे जेणेकरुन सहकार्याची भावना, आदान प्रदान, सांस्कृतिक अभ्यास वृद्धींगत होईल. शिक्षणालाहे राष्ट्रीय संस्कृतीचे ध्येय साध्य करणे अत्यंत आवश्यक आहे जर राष्ट्रीय एकता टिकवायची असेल तर क्लॉसमेट म्हणतात, "आता सांस्कृतिक शिक्षण हे विद्यार्थ्यांना व्यक्तीच्या समाज आणि जगाच्या दृष्टीने असलेला फरक आणि आवड समजण्यास मदत करते."

### १३) संस्कृतीचे शिक्षण आणि संस्कृतीसाठी शिक्षण :-

व्यक्तीला चांगल्या कल्पना आणि कला आत्मसात करण्यास शिक्षण मदत करते. ते व्यक्तीची आवड आणि सामाजिक बांधिलकी वाढविते. सुसंस्कृत मनुष्य हा आपलेच खरे करणारा, भांडणारा, दूराग्रही नसतो. तो आपल्या भावना तीव्रतेने चूकीच्या भाषेतून व्यक्ती करत नाही. अशा व्यक्तीच्या जडण – घडणीत शिक्षण महत्त्वाचे कार्य बजावते.

### १४) पारंपारिक संस्कृतीतील परिवर्तन :-

संस्कृती ही सतत गतीमान आहे. समाजाच्या बदलाबरोबरच ती बदलते. कोणत्याही राष्ट्राला स्थिर संस्कृती नाही. भारतही त्याला अपवाद नाही. प्रत्येक पिढी हे नवीन काहीतरी मिळविते किंवा जुन्याना नवीन आकार देते. भारतातील कौटुंबिक बंधने ही जगातील सर्वात घट्ट बंधने आहेत. एकत्र कुटुंब पद्धती ही हळूहळू कमी होत आहे. छोटे कुटुंब, स्वातंत्र्य, यांना मार्ग करुन देत आहे त्यामुळे वाढता एकटेपणा आणि असुरक्षिता निर्माण होत आहे. आपण पाहू शकतो की छोटे कुटुंब आणि त्यांची संस्कृती ही सुशिक्षित कुटुंबामध्ये जोराने, अर्धवट शिकलेल्यांमध्ये त्यापेक्षा थोडी कमी तर अशिक्षित लोकांमध्ये हळूहळू स्वीकारली जाते. शिक्षणामुळे वेगवेगळ्या संस्कृतीशी संबंध येतो त्यामुळे जेवणाच्या पद्धती, पोशाखाच्या पद्धती, कलेमध्ये आणि धार्मिक विश्वासामध्ये बदल होतात. जास्त प्रमाणात लोक अशा बदलांचा जराही विरोध न करता स्वीकारतात.

शिक्षणातील विकासामुळे भटक्या जाती व जमातींना समाजीकरणामध्ये खूप खालचा दर्जा होता. त्यांना आपणही इतर जमातींसारखे आहोत असा विश्वास देण्यात आला. महत्त्वाचा फायदा असा की आंतर-जातीय विवाहांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. याची परीणती ही हुंडा पद्धती विरोधात मोहिम हाती घेण्यात आला.

लोकसंख्या वाढ हे पर्यावरणाच्या, समाजाच्या पद्धतीला आणि आर्थिक सूव्यवस्थेला मोडकळीत आणणारा घटक आहे. जीवनाच्या सगळ्या मार्गावरती याचा परिणाम पहावयास मिळतो. सुशिक्षित लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात लहान कुटुंबाचा कायदा स्वीकारला आहे. दृक माध्यमे ही अशिक्षित लोकांना लहान कुटुंबाचे फायदे व मोठ्या कुटुंबाचे तोटे सांगताना चूकीच्या धामिक रुढी व परंपरा उदा. मुलगा हा वंशाचा दिवा अशांबद्दल शिक्षण देत आहेत.

**१५)** स्त्रीचा दर्जा हा भारतीय समाजामध्ये वाढत आहे. जास्तीत जास्त लोक लिगांमधील समानता स्वीकारत आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून केलेले कायदे आणि

सरकारमान्य व विनासरकारमान्य संस्थांनी केलेले कार्यक्रम हे याला उत्तेजन देत आहेत. शिक्षणाचा हक्क, पालकांच्या संपत्तीवरील सारखा हक्क, रोजगारीचा हक्क, समान रोजगार इ. मुळे स्त्रीच्या सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि जीवनाच्या अनेक घटकांमध्ये बदल झाला आहे. केंद्र सरकारच्या दालनामध्ये स्त्रीयांना आरक्षित तिकिटे हे स्त्रियांच्या दर्जा सुधारण्याचेच दर्शक आहे.

शिक्षणाने सांस्कृतिक तसेच स्त्रीयांच्या दर्जामध्ये अनेक बदल घडवून आणले. सध्या स्त्रियांना त्यांच्या पालकांच्या संपत्तीमध्ये समान वाटा आहे. सारख्या कामासाठी सारखा रोजगार, हे सर्व ठिकाणी मान्य आहे. अर्थातच काही ठिकाणी विरोध दिसला. परंतु पुढे शिक्षणामुळे लोकांच्या मनामध्ये बदल घडवून आणण्यास आणि सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यास यश आले आणि आपल्या संस्कृतीचा तो अविभक्त भाग बनला.

**१६) मानव जातीकडून समान संस्कृतीची पूर्तता :-**

मानवाच्या शर्यतीमध्ये शिक्षणाचा बौद्धिक, भावनिक, सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्ट्या बंधन आहे. एडिसनच्या शब्दांत सांगायचे झाल्यास, जेव्हा शिक्षण हे भव्य मनाने कार्य करते तेव्हा ते प्रत्येक गुप्त सद्गुण आणि निर्दोषता बाहेर काढते. शिक्षण हे सांस्कृतिक मूल्यांकडे दुर्लक्ष करत नाही, कारण ती पर्यावरणाला अर्थ देतात. व्यक्ती ही आपण रहात असलेल्या परिस्थितीतूनच शिकत असतो. उदा. ज्या व्यक्ती भेटतात, कल्पनांचे आदान-प्रदान, भौगोलिक परिस्थिती आणि त्यावेळचा इतिहास इ. शिक्षण हे समाजात रहाणाऱ्या व्यक्तींमध्ये सांस्कृतिक भावना निर्माण करण्याचे व वाढविण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे.

**१७)** बाल मजूरांकडे पहाण्याचा दृष्टीकोन हे एक वेगळे क्षेत्र आहे ज्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर बदल झाला आहे. भारतीय समाजामध्ये बालकामगारांकडे पहाण्याच्या संस्कृतीमध्ये विकास झाला आहे. सरकारच्या सहकार्यामुळे, ६-१४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण या कायद्यामुळे, प्रसारमाध्यमांचा सकारात्मक दृष्टीकोन सरकारचे सर्व शिक्षा अभियानासारखे उपक्रम, प्रौढ शिक्षण उपक्रम, यामुळे सर्वसामान्य लोकांना शिक्षणाचे महत्त्व व गरज कळत आहे. त्याचा परिणाम म्हणून जास्तीत जास्त मुले व प्रौढ शिक्षण घेऊ लागले आहेत. त्यामुळे ते त्यांच्या हक्क कर्तव्यांबाबत जास्त जागरुक झाले आहेत. कल्याणकारी कार्यक्रमांना स्वीकारले जात आहे व त्याचा प्रसार लगेच होत आहे. तरीही अजून याच्यामध्ये खूप मार्गक्रमण करावयाचे आहे.

**१८) शिक्षक – सांस्कृतिक उभारणीमधील दुवा :-**

शिक्षक हा संस्कृतीचा संरक्षक व समतावादी मध्यस्थ आहे असे सूक्ष्म परिक्षणाअंती निदर्शनास आले आहे. तो संस्कृतीचा शिल्पकार आहे कारण जुन्या सांस्कृतिक अनुभवांवरुन तो नवीन अनुभवांची रचना करतो व नवीन सिद्धांत मांडतो.

वरील सर्व चर्चेनंतर असे लक्षात येते की शिक्षणाचा संस्कृतीच्या विविध घटकांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. शिक्षणातील विकास हा समाजातील संस्कृतीत सुधारणा घडवून आणतो. शिक्षण हे समाजातील प्रत्येक गोष्टीमध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करण्यास उत्सुक असते.

**सारांश :-**

सामाजिक व सांस्कृतिक बदलातील महत्त्वाचे साधन असल्यामुळे शिक्षणाला खूप मोठ्या प्रमाणावर संधी आहे. प्रत्येकाने असे लक्षात घ्यावे की, शिक्षणाने केवळ ज्ञानातच भर पडते असे नाही तर कसब, रुची, वर्तणूक, मुल्यांमध्ये विकास होता. सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीत सुधारणा होते. आणि त्याचवेळी व्यक्तीच्या सामाजिक व सांस्कृतिक दर्जामध्येही वाढ होते.

शिक्षण हे सांस्कृतिक बदल घडवून आणते ज्याचा परिणाम म्हणून समाजामध्ये अनेक बाबतीत चांगले बदल होतात. निरीक्षणाअंती असे समजले की यामुळे मूल्यांमध्ये विविधता, विचारसरणी भौतिक संस्कृतीतील बदल, कल्पना, कौटुंबिक नाती, राजकीय संस्कृती, राज्य, राष्ट्रीय दर्जा, सामाजिक कार्यक्रमांमधील सहभाग म्हणजेच थोडक्यात मानवी कृतीतील अनेक घटकांमध्ये बदल झाला.

**अभ्यासार्थ प्रश्न :-**

१) वरील मजकूराप्रमाणे / नुसार संस्कृतीचे दोन प्रकार आहेत. ते खाली लिहा.

i. ________
ii. ________

२) वरील विषयानुसार संस्कृतीचे चार प्रकार आहेत. त्यांची खालील यादी करा.

i. ________ ii. ________
iii. ________ iv. ________

३) शिक्षणाची सहा कार्ये आहेत. ती खाली लिहा.

i.
ii.
iii.
iv.
v.
vi.

**प्रश्न :-**

१) क्रोएबर आणि क्लकहॉन यांच्या संस्कृतीच्या व्याख्या स्पष्ट करा.

२) मजकुराप्रमाणे व विषयाप्रमाणे संस्कृतीचे वर्गीकरण करा.

३) संस्कृती ही सतत चालणारी प्रक्रिया आहे, समर्थन करा.

४) शिक्षणाचा संस्कृतीवर परिणाम होतो, सिद्ध करा.

५) शिक्षण संस्कृतीवर कशा प्रकारे परिणाम करते ? स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ७

# शिक्षण आणि विकास
# आर्थिक विकासावरील शिक्षणाचा परिणाम

**घटक संरचना :**

७.०. उददे्श
७.१. परिचय
७.२. अर्थशास्त्र शिक्षणाशी कसे संबंधित आहे ?
७.३. शिक्षणाचे अर्थशास्त्र
७.४. एक गुंतवणूक म्हणून शिक्षण
७.५. शिक्षण हा एक उद्योग
७.६. शिक्षण हे मानवी भांडवल आहे.
७.७. आर्थिक वाढ व विकासासाठी शिक्षण.
७.८. शिक्षण व आर्थिक विकासातील संबंध
७.९. शिक्षणाचा परतावा
७.१०. शिक्षणाचा परिणाम
७.११. शिक्षणाचा उत्पादन क्षमतेवरील परीणाम
७.१२. शिक्षण व कौशल्य विकासाच्या परिणामावरील पुरावे.
७.१३ सारांश
७.१४ स्वाध्याय

## ७.०. उददे्श :

हा घटक वाचल्यानंतर तुम्हाला खालील गोष्टी शक्य होतील :

- अर्थशास्त्र व शिक्षणातील संबंध समजणे.
- शिक्षणाच्या विविध बाजू समजणे जसे गुंतवणूक म्हणून, उद्योग म्हणून, मानवी भांडवल, सामाजिक भांडवल, बौध्दिक भांडवल म्हणून इ.
- व्यक्तीगत व राष्ट्राच्या वाढ व विकासावरील शिक्षणाचा प्रभाव समजणे.
- शिक्षणाच्या उत्पादनक्षमता व विकासावरील परिणामांच्या अभ्यासाच्या तीन प्रतिकृती समजणे.

## ७.१. परिचय :

अर्थशास्त्र म्हणजे मानवाच्या 'संपत्ती कमावण्याचा' व 'संपत्ती खर्च करण्याच्या' कृतींच्या संदर्भातील मानवाचे विज्ञान. हे मानवी इच्छा व त्या पूर्ण करण्याच्या साधनांशी संबंधित आहे. समस्या ही आहे की मानवी इच्छा अमार्याद आहेत व साधने मात्र मर्यादित आहेत. म्हणून त्याला प्राधान्यानुसार चतुराईने निवड करावी लागते. हीच गोष्ट राष्ट्राला सुध्दा लागु पडते. एक लोकशाही हे एक कल्याणकारी राज्य असावयास हवे, राज्याची संसाधने मर्यादित आहेत आणि म्हणून राज्याला त्याने लोकशाही पध्दतीने ठरविलेल्या पूर्व निर्धारीत धोरणे व प्राधान्यानुसार निधीचे वाटप करावयास हवे. शिक्षण हे विकासाचे सर्वात महत्वाचे क्षेत्र आहे जेथे कोणत्याही कल्याणकारी राज्याला प्रगती साधण्यासाठी वइतर प्रगतीशील व प्रगत राष्ट्रांबरोबर चालण्यासाठी लक्ष दयावयास हवे. नागरीकांचे शिक्षण देशाच्या आर्थिक वाढीवर परीणाम करते आणि उलटपक्षी शिक्षणासाठीची आर्थिक ध्येय-धोरणे आणि निधी वाटप नागरीकांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम करते. या दोहोंमधील परस्परसंबंध आपण तपशीलवारपणे पाहूया.

## ७.२. अर्थशास्त्र शिक्षणाशी कसे संबंधित आहे?

तत्वज्ञान, समाजशास्त्र व मानसशास्त्र यांना शिक्षणाचे तीन आधार मानले जातात. परंतु आता अर्थशास्त्र सुद्धा ज्ञानाच्या या तीन शाखांपेक्षा शिक्षणाशी कमी संबंधित नाही. संक्षिप्तपणे, अर्थशास्त्र व शिक्षणाच्या आंतर संबंधाची सामाईक क्षेत्रे खालील प्रमाणे आहेत.

i) अर्थशास्त्र शिक्षणाची काही प्रमुख उददीष्टये ठरविले.

ii) अर्थशास्त्र शिक्षणाचे महत्व स्पष्ट करते कारणप की देशाची आर्थिक वाढ ही मुख्यत्वेकरुन शिक्षणाच्या विकासावर आधारीत आहे.

iii) शिक्षण ही स्वतः आर्थिकदृष्टया एक गुंतवणूक आहे.

iv) शिक्षण गरीबीचे उपशमन (कमी) करते कारण शिक्षण कुशल कामगार तयार करते आणि कार्यासाठी व विकासासाठी योग्य प्रवृत्ती निर्मित करते. तसेच ते अधिक चांगल्या जीवनमानाविषयी जाणसुध्दा निर्माण करते.

v) शिक्षण हे रोजगार रचना, व्यावसायिक मूल्यांचे चित्र ठरविते आणि लोकांच्या आर्थिक स्थैर्याची खात्री देते.

vi) शिक्षणाच्या सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक हेतूंव्यतिरिक्त शिक्षणाचे फक्त 'भाजी व भाकरी' हे साधे उददीष्ट नजरेआड करुन चालणार नाही. वस्तुतः शिक्षणाचे चरितार्थ चालविण्याचे उददीष्ट आणि ते सुध्दा चांगल्या आर्थिक चरितार्थ चालवणे हे एक महत्वाचे उददीष्ट आहे.

## ७.३. शिक्षणाचे अर्थशास्त्र :

**आर्थिक मालमत्ता म्हणून शिक्षण:** मालमत्तेला आर्थिक मालमत्ता बनण्यासाठी दोन अटी पूर्ण करावयास हव्यात.

१) उपलब्धता मर्यादित हवी. (२) ते वाटणी करण्यास पात्र हवे.

आर्थिक मालमत्ता दोन प्रकारच्या आहेत. (१) मूर्त मालमत्ता-भौतिक किंवा प्रत्यक्ष मालमत्ता. मूर्त संपत्तीच्या निर्मितीत शिक्षण एक महत्वाची भूमिका बजावते. ते माणसाला त्याच्या सामान्य कार्यात अधिक बुध्दिमान, अधिक लवचिक व अधिक विश्वासपात्र बनविते. (२) अमूर्त मालमत्ता - मानवी इच्छा-आकांक्षा पूर्ण करणाऱ्या सेवा शिक्षण ही अमूर्त आर्थिक मालमत्ता आहे. ते मानवी इच्छा तृप्त करते. त्याचा पुरवठा मर्यादित आहे आणि ते विभाजनपात्र आहे. हे लक्षात घ्यावयास हवे की शिक्षण बुध्दिमत्ता व सद्‌गुणांचा विकास करते. उच्च प्रतीची आर्थिक सुस्थिती ही मानसिक बाहय-दृष्टीकोन, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्यावर अवलंबून असते. एक जागृत मन, योग्य ज्ञान, सुयोग्य कौशल्य आणि इष्ट प्रवृत्ती आर्थिक विकासाला चालना देते. ते गतीशीलता वाढवते व पुढे प्रवाहित ऊर्जा मुक्त करते. मानवाच्या विधायक तीव्र इच्छा या शिक्षणाद्वारे निर्मित होतात. अधिक चांगले सुसंघटीत कौशल्य व प्रगल्भ शोधकवृत्ती हे शिक्षणाचे प्रत्यक्ष फलित आहेत. यामुळे एकसंघ व्यक्तिमत्व निर्माण होण्यास मदत होते आणि त्यांना सुसंवादी जीवन जगण्यास मदत करते.

शिक्षण ही उत्पादकाची तसेच गिऱ्हाईकाची (उपभोक्त्याची) अशी दोघांचीही मालमत्ता आहे. ती उत्पादकाची मालमत्ता आहे कारण ते इतर मालमत्ता निर्मितीच्या प्रक्रियेत वापरले जाते. जे शिक्षित आहेत ते इतरांना शिक्षित करु शकतात आणि त्याद्वारे अधिक संख्येने शिक्षित लोक निर्माण होऊ शकतात. शिक्षक, वकील, इंजिनिअर, तंत्रज्ञ इ. बनण्यासाठी याची गरज असल्याने ही उत्पादकाची मालमत्ता आहे. मजा लुटणे यासारख्या एखाद्याच्या इच्छांच्या समाधानासाठी फक्त जर वापरले तर ही गिऱ्हाईकाची मालमत्ता ठरेल.

## ७.४. शिक्षण एक गुंतवणूक :

पूर्वी शिक्षणाचा शेवट शिक्षणातच होतो व शिक्षण म्हणजे अनुत्पादक खर्च असे समजले जाई. म्हणून विकसनशील देशांजवळ संसाधनांची कमतरता निर्माण झाल्यास त्यांच्या शिक्षणावरील अर्थसंकल्पिय वाटयात नेहमीच कपात करण्यात येई. शिक्षण हा अत्यावश्यक खर्च आहे असा आधुनिक दृष्टीकोन आहे. ती एक उत्पादक गुंतवणूक आहे. त्याचा परतावा उपयोगी, क्रियाशील आणि कार्यक्षम नागरीकांच्या स्वरुपात असतो. ते देशाच्या कल्याणात अधिक योगदान देतात. शिक्षण ही राष्ट्रीय विकसनशील गुंतवणूक आहे.

एच.जी.वेल्सनुसार, ''कोणत्याही देशाकरीता शिक्षणातील गुंतवणुकीला एक अद्वितीय महत्व आहे कारण या क्षेत्रातील कमी गुंतवणुकीचे परिणाम कधीही भरुन निघू शकत नाहीत. मानवी इतिहास शिक्षण आणि विपदा अधिकाधिक स्पर्धात्मक बनतो.'' व्यक्तीसाठी व समाजासाठी शिक्षणाचे अगणित परिणाम आहेत. बऱ्याच लोकांसाठी शैक्षणिक प्रक्रियेपासून 'उपयोगी मूल्य' असते कारण मानव प्राणी हा जिज्ञासू असल्याने तो शिकणे व नवीन ज्ञान मिळविण्याचा आनंद लुटतो. शिक्षणाला पुरेशा प्रमाणात 'गुतवणूक मूल्य' सुध्दा आहे. जे अधिक कमाई करतात, रोजगाराच्या उच्च पातळी गाठतात आणि अधिक समाधानकारक व्यवसायाचा आनंद लुटतात. शिक्षण लोकांना जीवनाचा आनंद पूर्णार्थाने लुटण्यात, साहित्य व संस्कृतीचे गुणग्रहण करण्यास, अधिक माहितीप्रचुर करण्यात आणि समाजात समस्त झालेले नागरीक घडविण्यात सक्षम बनवू शकते.

## ७.५. शिक्षण हा एक उद्योग आहे :

एकूण राष्ट्रीय उत्पन्न (GNI) हे शेती, उद्योग व शिक्षणासारख्या विविध क्षेत्रावर अधिकाधिक परतावा मिळण्यासाठी वर्षानुवर्षे खर्च केले जाते. शिक्षण हा एक वृध्दी उद्योग आहे आणि तो एकूण अर्थव्यवस्थेला गरज असलेल्या सेवा निर्माण करतो व रोजगार पुरवितो. इतर उद्योगाप्रमाणे हा सुध्दा देशाच्या एकूण राष्ट्रीय नफ्यात (GNP) योगदान देतो. अशा प्रकारे राष्ट्राच्या एकूण अर्थव्यवस्थेत हा पुरेसे योगदान देतो आणि याच्या व्यतिरिक्त अर्थव्यवस्था खूपच दुबळी होऊन जाईल. हे लक्षात घ्यावयास हवे की शिक्षण कोणतीही मूर्त मालमत्ता, जी मानवी इच्छा पूर्ण करेल, निर्माण करत नाही. या सर्व बाबी दर्शवितात की शिक्षण हा उद्योग आहे. हे उघडच आहे की शिक्षण हे पुरवठा-मागणी पृथक्करणाला जबाबदार आहे. विद्यार्थी, पालक व नोकरवर्ग आणि सरकार शिक्षणाची विविध किंमतींना मागणी करत असल्याने आणि ही मागणी शिक्षित मानवीबळ, चांगले प्रशिक्षित नागरीक व शिक्षित लोक इ. स्वरुपात शैक्षणिक निष्पत्तीद्वारे पूर्ण होत असल्याने, मागणी-पुरवठा सिध्दान्त शिक्षणालासुध्दा लागु पडतो. विविध प्रकारच्या व संख्येच्या शिक्षणाचा पुरवठा हा संगत किंमत समाविष्ट करतो. हे सर्व पुन्हा एकदा सुचवितात की शिक्षण हे आर्थिक पृथक्करणाच्या दृष्टिने बघितले जाऊ शकते. शिक्षण हे लोकसंख्येच्या मूर्त व अमूर्त इच्छा पूर्तीसाठी उत्पादक क्षमता असलेला समाज निर्माण करतो.

शिक्षणातील गुंतवणुक ही दीर्घकालीन गुंतवणूक समजली जाते कारण याचा परतावा विशिष्ट कालावधीनंतरच येणे सुरु होते म्हणजे समजा शिक्षण संपल्यावर ते कमवायला लागतात. अलिकडेच जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे शिक्षणाचे आणि विशेषतः उच्च व तंत्र शिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे. वस्तुतः शिक्षण हा एक व्यवसाय बनला आहे. विविध शिक्षण पुरविणाऱ्यांना मुख्यत्वेकरुन नफा कमविण्यातच रस आहे. व्यवसायात वापरल्या जाणाऱ्या बऱ्याच संज्ञा जसे शिक्षण पुरविणाऱ्यांसाठी 'आधारस्तंभ' आणि 'उद्योजक', विद्यार्थ्यांसाठी 'गिऱ्हाईक' या शिक्षण पध्दतीत विस्तृत प्रमाणात वापरल्या जातात. फी व तत्सम खर्च हा गगनाला भिडला आहे जो दारीद्रयरेषेवरील व सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे. WTO व GATT कराराने शिक्षणाला सेवेच्या रुपात आणण्याकरीता निर्णायक भूमिका बजावलेली आहे ज्यामुळे शिक्षणाच्या जगातील देशांदरम्यान व्यापार (देवाणघेवाण) होऊ शकतो. बरेचसे युरोपीय देश, अमेरीका आणि ऑस्ट्रेलिया यांच्या GNP चा मोठा हिस्सा हा तिसऱ्या जगातील देशांना शिक्षण विकून येतो.

आदर्शरित्या शिक्षणाने गरीब व श्रीमंतातील दरी कमी करण्यासाठी महत्वाचा घटक म्हणून कार्य करावयास हवे. शिक्षण अधिक चांगल्या नोकऱ्यांसाठी अधिक चांगल्या संधी उपलब्ध करते. अधिक चांगल्या नोकरीमुळे एखाद्याला चांगले उत्पन्न कमावणे शक्य होते. अधिक चांगले उत्पन्न राहणीमानाचा दर्जा उंचावते तसेच अधिक चांगली बचतसुध्दा घडवून आणते. अधिक चांगल्या बचतीमुळे भांडवली मालमत्ता व शिक्षणातील गुंतवणूक अधिक करण्यास मदत होते. यामुळे त्यांच्या मुलांना दर्जायुक्त शिक्षण मिळण्यास मदत होते. हे चक्र असेच चालू राहते. हे भारतीय संविधानाने शिक्षण संस्थांमध्ये सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना आरक्षण देण्यामागचे एक सबळ कारण आहे. तरीसुध्दा लोकसंख्येचा एक मोठा गट हा शिक्षणापासून आणि खास करुन उच्च व तांत्रिक शिक्षणापासून वंचित राहतो. याला कारण म्हणजे उदारमतवादी, खाजगीकरण व जागतिकीकरणाची धोरणे होत ज्यामुळे दर्जायुक्त शिक्षण हे त्याच्या उच्च शैक्षणिक मुल्यामुळे मध्यम वर्ग व कनिष्ठ वर्गाच्या आवाक्याबाहेर गेले आहे.

त्यामुळे फक्त उच्च वर्गीय दर्जायुक्त शिक्षणाचा फायदा घेण्यासाठी गुंतवणुक करण्यास सक्षम ठरतात व त्यायोगे गरीब व श्रीमंतातील दरी टिकून राहते व अधिक रुंद होते. भारतीय लोक चांगले आयोजक परंतु कमकुवत अंमलबजावणीदार मानले जातात. समस्या निवारणासाठी बऱ्याच योजना व कार्यक्रम उभारले जातात परंतु अपेक्षित परिणाम मिळण्यापासून कोसो दूर राहतात. एखादयाने जागतिकीकरणाचे फायदे विसरता कामा नये. परंतु ही वस्तुस्थिती आहे की फायदे हे खालच्या स्तरापर्यंत पोहचलेले नाहीत तर उलट श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत व गरीब अधिक गरीब बनत आहेत. योग्य व परिणात्मक सरकारी हस्तक्षेपच परिस्थिती वाचवू शकतो. शिक्षणाचा अधिकाधिक राज्य निधी या परिस्थितीला बऱ्याच प्रमाणात वाचवू शकतो.

## ७.६. शिक्षण हे मानवी भांडवल आहे :

अशी कोणतीही गोष्टी जी काळानुरुप उत्पन्नाचा स्त्रोत बनते ती भांडवल असते. भांडवल हे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत, ज्यात तात्काळ किंवा दिर्घ कालावधीत उत्पन्न निर्माण करण्याची किंवा संचयित करण्याची क्षमता असते, महत्त्वाची भूमिका बजावते. या संदर्भात एच.जी.जॉन्सन ने भांडवलाचे खालील प्रकार वर्गीकरण केले आहे.

i) **भांडवली मालमत्ता :-** जी मालकाकडून निर्मितीसाठी किंवा उपयोगासाठी विशिष्ट सेवा पुरविते.

ii) **मानवी भांडवल :-** (सोईस्कररीत्या कामगार संबोधले जाते) याचे ठळक वैशिष्टय म्हणजे भांडवलाच्या वापराचा अधिकार स्वभावतः व कायदेशीररीत्या हा भांडवलात अंतभूर्त असलेल्या व्यक्तीला बहाल केलेला आहे मग आर्थिक किंवा गुंतवणुकीचा स्त्रोत काहीही असो.

iii) **सामाजिक भांडवल किंवा सामूहिक भांडवल :-** याच्या मूलतः गरजेमुळे किंवा कारभाराच्या सोयीसाठी, याच्या उत्पादनाच्या किंवा उपयोगाच्या सेवा व्यक्तीगत वापरणाऱ्यावर (उपभोक्त्यावर) लादल्या जात नाहीत परंतु मुख्यत्वेकरुन सामाजिक कराराद्वारे चुकविल्या जातात.

iv) **बौध्दिक भांडवल :-** याचे अधोरेखित वैशिष्टय म्हणजे एकदा निर्माण झाली की ही मालमत्ता मुक्त असते म्हणजेच एखाद्याकडून याचा वापर हा इतरांची उपलब्धता कमी करत नाही. शिक्षण हे एक आवश्यक मानवी भांडवल आहे कारण ते मानवाचे गुण व क्षमता प्रत्यक्षरित्या प्रवर्धित करते. ते बौध्दिक योगदान सुध्दा देते आणि अंशतः निदानपक्षी सामाजिक भांडवल बनवते. मानवी गुणांची किंमत खूप आहे कारण मानवी मेंदू व शक्तीच भौतिक भांडवल उभे करते जे किंमतीवान आहे. अर्थतज्ञ मानवाला खालील कारणांसाठी भांडवलाचे एक स्वरुप समजतात.

१) मानवी भांडवलाची निर्मिती व विकास किंमतींची मागणी करतो.
२) कुशल मानवी संसाधने राष्ट्रीय उत्पादनात भर घालतात.
३) मानवी संसाधनावरील खर्च हा राष्ट्रीय संपत्तीशी मिळता-जुळता असतो.

मानवी भांडवलाच्या निर्मितीवर परिणाम करणारे घटक म्हणजे औपचारिक शिक्षणातील, सुधारीत आरोग्यातील, नोकरी प्रशिक्षणावरील, मानवी शक्तीच्या सुस्थितीकरणावरील, स्थलांतरणावरील गुंतवणूक. यामधील मुख्य घटक हा औपचारीक शिक्षण आहे कारण हा मानवाची कमाई शक्ती व चालू संपत्ती मूल्य वाढवून मानवी भांडवलाचे आर्थिक मूल्य वाढवितो. शिक्षण महत्वाचे आहे कारण ते माणसाला अधिक चांगला उत्पादक बनविते. शिक्षण हे आर्थिक स्थैर्याची हमी म्हणूनसुध्दा कार्य करते कारण शिक्षण व्यावसायिक मूल्य, रोजगार रचना इ. ठरविते. ही सुध्दा प्रस्थापित बाब आहे की देशाची आर्थिक प्रगती ही शैक्षणिक विकासाच्या समप्रमाणात आहे.

ज्ञान हे भांडवल आहे.

बौध्दिक भांडवल, ज्ञान किंवा व्यावसायिक लायकी हे चार भांडवलांपैकी एक आहे. भांडवल ही उत्पन्न निर्मितीची व पर्यायाने आर्थिक वाढीची किल्ली आहे. भांडवल ही अशी कोणतीही बाब आहे जी किंमत सामावते परंतु काळाच्या ओघात उत्पन्नाचा ओघ निर्माण करते. शुल्टझ् नुसार एक शिक्षित मनुष्य शिक्षण प्राप्त करण्याकरिता स्वतःला खूप गुतवितो आणि ती गुंतवणूक सुध्दा भांडवलात आहे. शैक्षणिक खर्च हा म्हणूनच उपभोग नाही किंवा खर्च नाही परंतु गुंतवणूक खर्च आहे.

## ७.७. आर्थिक वाढ व विकासासाठी शिक्षण :

देशाची आर्थिक वाढ ही मुख्यत्वेकरुन शैक्षणिक विकासावर आधारीत आहे. आर्थिक वाढ ही प्रगती व अधिक चांगल्या जीवनशी समतुल्य आहे. जलद आर्थिक वाढ ही देशाच्या नागरीकाला उच्च राहणीमानाचा आनंद लुटण्यास मदत करते. यामुळे अधिक चांगल्या सामाजिक सेवा घडून येते. काही अर्थतज्ञ मानतात की आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचा तो भाग जो भौतिक गुंतवणुकीत समर्पित आहे. यानुसार विकसित देश त्यांचा भांडवल साठा प्रचंड गुंतवणुकीद्वारा सतत वाढवत राहतात आणि विकसनशील देश त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या कमी पातळीमुळे त्यांच्या भांडवल साठयात तुलनात्मकदृष्टया कमी संचय करतात. दुसरा मतप्रवाह आहे की गुंतवणुकीची राशी ही वाढीची किल्ली नाही आहे तर शिक्षणापासून येणारी तांत्रिक माहिती ही खरी किल्ली आहे.

तरीही अर्थतज्ञांचा दुसरा गट समजतो की दरडोई उत्पन्न हे आर्थिक वाढीचे द्योतक आहे. त्यादृष्टिने इराण, सौदी अरेबिया आणि कुवेत सारखे समृध्द् तेल उत्पादक देश ज्यांचा दर उन्नत आहे ते भक्कम अर्थव्यवस्थेची फुशारकी मारु शकतात. तरीही काही इतर अर्थतज्ञ या दृष्टिकोनाचे आहेत की चांगला प्रेरित कामगार वर्ग हा देशाचे उत्पन्न वाढवू शकतो. परंतु मर्यादित भांडवलासह किंवा साधनांशिवाय आणि कार्य स्थळाशिवायचा अधिकचा कामगार वर्ग हा विकासाच्या मार्गात अडथळाच निर्माण करतो. वरील दृष्टीकोनाचा विचार करता जॉन वेझीने आर्थिक विकासाची सुधारीत व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे, ''आर्थिक विकास म्हणजे कामगार वर्गाचा विकास, भौतिक भांडवलाचे संचयन, ज्ञानाच्या साठयातील व समाजातील उपलब्ध कौशल्यातील भर यांचा एकूण परिणाम.

**समीक्षा अभ्यास:**

१) आर्थिक विकासाचा अर्थ काय ?

२) आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शिक्षण कशी मदत करते? स्पष्ट करा.

३) 'शिक्षण हा एक उद्योग आहे' हा आशय स्पष्ट करा.

४) शिक्षणाला मानवी भांडवल असे का संबांधले जाते?

५) 'दरडोई उत्पन्न हे आर्थिक विकासाचे योग्य मोजमाप (परिणाम) नाही' हे विधान स्पष्ट करा.

**रिकाम्या जागा भरा.**

१) देशाच्या आर्थिक वाढीत शिक्षणाचे महत्व . . . . . . . . .स्पष्ट करते.

२) शिक्षण . . . . . . . . . . चे उपशमन करते कारण ते कुशल कामगार तयार कते आणि कार्यासाठी व विकासासाठी योग्य प्रवृती निर्मित करते.

३) शिक्षण ही . . . . . . . . . . .बनण्यासाठी विभाजनास पात्र व्हावे व त्याचा पुरवठा मर्यादित हवा.

४) . . . . . . . . . . .यासारख्या एखादयाच्या इच्छांच्या समाधानासाठीच जर शिक्षण वापरले गेले तर ती गिऱ्हाईकाची (उपभोक्त्याची) मालमत्ता ठरते.

५) शैक्षणिक खर्च हा गुंतवणूक खर्च आहे कारण तो काळाच्या ओघात . . . . . . . . .चा ओघ निर्माण करतो.

६) जलद आर्थिक वाढ ही देशाच्या नागरीकाला उच्च . . . . . . . . . . . आनंद लुटण्यास मदत करते व त्यामुळे अधिक चांगली . . . . . . . .घडून येते.

## ७.८. शिक्षण व आर्थिक विकासातील संबंध :-

तत्वज्ञानी अर्थतज्ञ अॅडम स्मिथ आणि अर्थशास्त्राच्या शिस्तीचा सर्वात अष्टपैलू योगदाता मार्शल यांनी शिक्षण व विकासातील संबंध फार पूर्वीच ओळखला होता. अॅडम स्मिथ 'इनक्वायरी इनटू द नेचर अँड कॉझेस ऑफ नेशन्स' या त्याच्या पुस्तकात म्हणतो, ''शिक्षण एका सामान्य कार्य करणाऱ्या माणसाला सुध्दा खूपच अप्रत्यक्ष फायदे देते. ते त्याची मानसिक क्रिया उत्तेजित करते, ते त्याच्यात शहाणपणाची जिज्ञासू वृत्तीची सवय वाढविते, ते त्याला त्याच्या कामात अधिक बुध्दिमान, तप्तर व विश्वासपात्र बनविते, ते त्याच्या जीवनातील कामाच्या तासांच्या वेळ वाढविते; ते मूर्त संपत्तीच्या निर्मितीकरीता असलेले सर्वात महत्वाचे साधन आहे.'' अॅडम स्मिथने निरिक्षण केले आहे की शिक्षणाद्वारे बुध्दिमत्ता संपादनात खरोखरीच खर्च येतो, जे निश्चित व संबंधित व्यक्तीने जाणलेले भांडवल बनते व अजून म्हणजे ती बुध्दिमत्ता त्यांच्या भविष्याचा तसेच त्यांच्या समाजाचा भाग बनते.

या क्षेत्रातील अलिकडील जाणिवेने अंतर्दृष्टी दिली आहे की शिक्षणाचे आर्थिक योगदान हे शिक्षणाद्वारे निर्माण झालेल्या मानवी भांडवलाच्या रुपात स्पष्ट केले जाऊ शकते. शूम्पीटर आर्थिक वाटीच्या संदर्भात संघटन व नवीन संशोधनाच्या परिणामाची बाजू घेतांना जोर देऊन सांगतो, 'उपलब्ध संसाधनांची सुधारणा इतर सर्व बाबतीत फक्त शिक्षणाद्वारेच शक्य आहे.' कार्ल मार्क्सने शिक्षणाविषयीची कळकळ या आधारवर केली आहे की 'हे (शिक्षण) श्रमाच्या

विभागणीच्या अमानवी परिणामास तोलास तोल आहे.' थिओडर शूल्टझ्ने सुध्दा अधिक वाढीसाठी शिक्षणाच्या क्षमतांवर स्पष्टपणे जोर दिलेला आहे.

मानवी संसाधन विकासाद्वारे आर्थिक विकास हा अविकसित व विकसनशील देशांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. हार्बिसन आणि मायसेर्स या मताचे आहेत की मानवी संसाधनाच्या विकासाची शैक्षणिक प्रक्रिया ही सामाजिक व राजकीय संस्थांच्या रुपांतरणासाठी गरजेची आहे ज्यासाठी आधुनिकीकरणाकडे झेपावणाऱ्या देशांचे लोक झगडत असतात.

तथापि हे लक्षात घ्यावयास हवे की दिलेल्या सामाजिक व्यवस्थेत शिक्षण पदध्दती आणि आर्थिक वाढ हे परस्परांशी अशा रितीने संबंधित आहेत की एक दुसऱ्या शिवाय अस्तित्वात असू शकत नाही. म्हणून शिक्षणातील अधोगती ही आर्थिक विकासावर परिणाम करेल आणि मंद आर्थिक विकास हा शिक्षण पध्दती व दर्जावर परिणाम करेल.

अर्थतज्ञ व शिक्षणतज्ञांनी एक अतिशय क्लिष्ट सामाजिक समस्येवर हल्ला करण्यासाठी हातात हात गुंफले आहेत. ती समस्या म्हणजे अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक म्हणून देशाच्या संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेची योजना.

अर्थतज्ञांना वाटते की शिक्षणतज्ञांनी कमीत कमी किंमतीत अभियंते, डॉक्टर्स, शिक्षक व इतर तांत्रिक कर्मचारी निर्माण करावेत. अर्थतज्ञ संख्यात्मक मापदंडाने जातात तर शिक्षणतज्ञ हे दर्जाविषयी चिंतीत आहे. जॉन वेझी म्हणतात ''दिलेल्या पध्दतीत एक पदवीधर निर्माण करण्यासाठी माध्यमिक शाळेत दहा लोक व प्राथमिक शाळेत शंभर लोक हवेत.'' अर्थतज्ञ व शिक्षणतज्ञ यांच्यातील भागीदारीतील लक्षणीय मुदद्ा हा आहे की दोन्हीही उत्पादनातील वाढीवर परिणाम केल्याविना किंमतीतील थोडया घसरणीएवढे शैक्षणिक कार्यक्रमासाठीच्या निधीच्या सोईविषयी चिंतीत नाही. अर्थतज्ञांची इच्छा आहे की शिक्षण पुरविणाऱ्यांनी असा काही नवीन उपक्रम काढावा की जेणेकरुन शाळांची उत्पादकता ही किंमतीतील अल्प वाढ किंवा काहीही वाढ न करता वाढावी. शिक्षणातील संख्या व दर्जा वाढविण्यासाठी दर्जेदार कामगार, कार्यक्षम संचालक, सुप्रशिक्षित शिक्षक, शैक्षणिक नवीन उपक्रम व संशोधन हे आवश्यक आहे. पण याला पुढील आर्थिक पाठिंबा गरजेचा आहे. निधी खूपच तोकडा आहे आणि उपलब्ध निधी हा इतर विकास कार्यक्रमांकडे वळविला जातो या विवादाखाली शिक्षणासाठीचे वाटप खूप ताणले गेले आहे. डीन रस्क यांच्या नुसार, ''शिक्षण ही काही चैन नाही जी विकास झाल्यानंतर परवडेल. ती विकसनाच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे.''

शिक्षणात दर्जात्मक सुधारणा करण्याची व मानवी संसाधन अधिक उत्पादनक्षम बनविण्याची ताकद आहे. वरील वाक्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे १९२० चा USSR देश. ''असे प्रस्थापित केले आहे की प्राथमिक शिक्षण घेतलेल्या लोकांचे कार्य त्याच वयाच्या व तेच काम करणाऱ्या अशिक्षित लोकांपेक्षा दीडपट अधिक उत्पादनक्षम होते तर माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांचे कार्य हे दुप्पट उत्पादनक्षम तर पदवीधरांचे कार्य चौपट उत्पादनक्षम होते.'' २० व्या शतकातील जपान हे दुसरे उदाहरण आहे.तो अधिक जलद आर्थिक विकास साधू शकला जरी त्याच्या नैसर्गिक संसाधनांची अल्पता, लोकसंख्येची उच्च घनता आणि या क्षेत्रातील उशिराचा शिरकाव अशा गंभीर समस्या होत्या. याचे कारण अंशतः का होईना, म्हणजे दुसऱ्या महायुध्दानंतर त्यांच्या शिक्षणावरील सार्वजनिक खर्चातील वाढ होय.

विकसनशील देशांतील साक्षरता ही विकासित देशातील साक्षरतेपेक्षा खूपच कमी आहे. निरक्षरता ही अशा प्रकारे अविकासाशी अनुषंगिक आहे. १९६१-७१ च्या दरम्यान भारतातील साक्षरतेतील वाढ ही फक्त ६% होऊ शकली. निरक्षरता हे अविकसित देशांचे सर्वसाधारण वैशिष्टय असलयाने आणि कमी उत्पन्न गटातील सामान्य बाब असलयाने, ती आर्थिक विकासात अडथळा ठरते असे आढळून आले आहे की अशिक्षित लोक शेती, कुटुंब कल्याण कार्यक्रम, ग्रामीण भागात नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब या क्षेत्रातील आर्थिक वाढीसाठी निर्मित सुविधांचा पुरेपुर वापर करण्यात किंवा उत्पादन वाढविण्यासाठी जमा रकमेचा कार्यक्षम वापर करण्यात ना उदयुक्त असतात ना पात्र असतात.

आर्थिक विकासात व्यावहारीक (प्रात्यक्षिक) कार्य आणि मानवी कार्य यामधील विधायक दृष्टीकोन मोलाचा ठरतो. अशी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका असतो ज्यात शिक्षण एखादयाला प्रात्यक्षिक कार्य टाळून खूप कमवायचा व बुध्दिवादी वर्गाच्या मालकिची फळे चाखायचा अधिकार देते. शिक्षणाला लोकांच्या प्रवृत्ती व सवयीतील बदलावर परिणाम करण्यात महत्वाची भूमिका पार पाडावयाची आहे.

जेव्हा लोक उत्पादन प्रक्रियेत विशाल प्रमाणात सहभागी होतात तेव्हाच आर्थिक वाढ ही खरोखरीच अर्थपूर्ण बनते. वाढीचे खरे आव्हान हे पूर्ण रोजगार पुरविण्यात आहे. लघुउद्योग क्षेत्र हे आपल्या अर्थव्यवस्थेच्या त्या वस्तुस्थितीचे प्रतिक आहे जे साधनांद्वारे उत्पादनापेक्षा लोकसमुहाद्वारे उत्पादन प्रतीत करते.

**समीक्षा प्रश्न :**

१) काम करणाऱ्या माणसावरील शिक्षणाच्या परिणामवर ॲडम स्मिथचा दृष्टीकोन कोणता होता ?

२) शिक्षणाच्या गरजेसाठी कार्ल मार्क्सने मुदद् का उपस्थित केले ?

३) ''मूर्त संपत्तीच्या उत्पादनासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे'' कसे ?

४) हार्बिसन व मायसर्स नुसार शिक्षणाची गरज काय ?

५) शिक्षणाच्या संदर्भात १९२० च्या USSR च्या उदाहरणापासून तुम्ही काय निरिक्षण नोंदवाल ?

६) निरक्षरता व विकासातील संबंध काय ?

## ७.९. शिक्षणाचा परतावा / मोबदला :

शिक्षणाचा खाजगी व सामाजिक परतावा यामध्ये महत्वाचा भेद केला जाऊ शकतो. खाजगी परतावा हा एखादी व्यक्ती ज्याने अधिकचा अभ्यासक्रम प्राप्त केलेला आहे त्याला मिळणाऱ्या फायदयांशी संबंधित आहे. यामध्ये आर्थिक फायदे जसे जीवनभराची उच्च कमाई, बेरोजगारीची कमी पातळी आणि अधिक व्यवसाय समाधानकारकता समाविष्ट आहेत. त्यामध्ये सुधारीत आरोग्य व दीर्घायुष्य सुध्दा सामावले जाऊ शकते. सामाजिक परतावा हा किती शिक्षण प्राप्त करावयाचे याचा निर्णय घेणाऱ्या व्यक्ती किंवा कुटुंबापेक्षा व्यक्तींना मिळणाऱ्या विधायक (किंवा कदाचित नकारात्मक) परिणामांशी संबंधित आहे. ते म्हणूनच असे फायदे (कदाचित किंमत सुध्दा) आहेत जे निर्णय घेणाऱ्यांकडून विचारात घेतले जात नाहीत. जर असे 'बाहय

फायदे' पुरेसे असतील, तर सरकारी मध्यस्थीविना ते शिक्षणातील बऱ्याच कमी गुंतवणुकीत परिणत होऊ शकतात.

बऱ्याच निरिक्षकांनी सुचविलेले आहे की शाळेत जाण्याचे बरेच सामाजिक फायदे आहेत आणि या आधारावर शिक्षणाचे अर्थसहाय्य व सोईसुविधा देण्यात सरकारी सहभाग सुचविलेला आहे. खरोखरीच, शैक्षणिक धोरणाची चर्चा करतांना बऱ्याच उत्कृष्ट अर्थतज्ञांनी सरकारने व्यापार व उदीम यामध्ये नियंत्रण न आणण्याचे त्यांचे नेहमीचे धोरण सोडून दिले. उदाहरणार्थ द वेल्थ ऑफ नेशन्स मध्ये ॲडम स्मिथ म्हणतात, ''सामान्य माणसाच्या शिक्षणापासून राज्य कोणत्याही लक्षणीय फायदा उचलत नाही. त्यांना शिक्षण दिल्यास ते अविश व अंधश्रध्देच्या भ्रमाच्या कमी अधिन राहतील जी अज्ञानी देशातील वारंवार आढळणारी सर्वात भयंकर अव्यवस्था आहे.'' या मुद्यांचे अधिक समकालिन उदाहरण म्हणजे मिल्टन फ्रिडमनचे शाळा शिकवण्यातील सरकारच्या भूमिकेवरील मत : ''एक स्थिर व लोकशाही समाज हा बहुतांश नागरीकांकडून काही सामाईक मूल्यांचा विस्तृत स्विकाराविना आणि साक्षरता व ज्ञानाचा किमान स्तर असल्याविना शक्य नाही. शिक्षण दोहोंमध्ये योगदान देते. त्या अनुषंगाने, एखादया मुलाच्या शिक्षणापासून मिळणारा लाभ हा फक्त त्या मुलाला किंवा त्यांच्या पालकांनाच मिळत नाही तर समाजातील इतर सदस्यांना सुध्दा मिळतो; माझ्या मुलाचे शिक्षण एक स्थिर व लोकशाही समाजाचे संवर्धन करुन इतर लोकांच्या कल्याणात हातभार लावते.''(फ्रिडमन १९५५)

## ७.१०. शिक्षणाचे परिणाम :

वेगवेगळया स्तरावरील शाळांना अर्थसहाय्य देण्यात व सुविधा पुरविण्यात सरकारचा वैशिष्टयपूर्ण रित्या प्रत्यक्ष मजबूत सहभाग असतो. म्हणून या क्षेत्रातील सार्वजनिक धोरणांचा देशाच्या मानवी भांडवलाच्या संचयावर फार मोठा प्रभाव असतो. आरंभिक दरडोई GDP च्या दिलेल्या स्तरासाठी मानवी भांडवलाचा सुरुवातीचा उच्च साठा हा मानवी भांडवालचे भौतिक भांडवलाशी असलेले उच्च गुणोत्तर दर्शवितो. हे उच्च गुणोत्तर कमीत कमी दोन मार्गाद्वारे उच्च आर्थिक वाढ निर्माण करु शकते. पहिला म्हणजे, अधिक मानवी भांडवल प्रगत देशांकडून उत्कृष्ट तंत्रज्ञान ग्रहण करणे सुकर करते. हा मार्ग विशेषतः माध्यमिक व उच्च पातळीवरील शाळेसाठी महत्वाचा असण्याची शक्यता आहे.

दुसरे म्हणजे मानवी भांडवल जुळवून घेण्यास भौतिक भांडवलापेक्षा अधिक कठीण आहे. म्हणून असा देश जो मानवी भांडवलाच्या भौतिक भांडवलाशी असलेलया उच्च गुणोत्तराने सुरुवात करतो - जसे युध्दोत्तर काळात भौतिक भांडवल नष्ट झालेले असते - तो भौतिक भांडवलाची राशी जुळवून घेऊन वेगाने प्रगती करु शकतो. बऱ्याच देशातील वृध्दी मंडळातील उच्च स्तरीय शाळा तारतम्य जाणणाऱ्या कृती अवलंबितात ज्या औपचारिक कामगार बाजारातील सुशिक्षित स्त्रियांच्या कार्यक्षम लुबाडणुकीस अटकाव करतात. या कृती दिलेल्या असतांना हे आश्चर्यकारक नाही की स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी अधिक संसाधने समर्पित केल्याने वाढीव वृध्दी दिसणार नाही. स्त्रीचे प्राथमिक शिक्षण कमी जन्मदराला उत्तेजित करुन अप्रत्यक्षपणे वृध्दी संवर्धन करते.

## ७.११. शिक्षणाचा उत्पादनक्षमतेच्या सुधारणावरील प्रभाव :

कामगार बाजाराच्या निष्पत्तीच्या स्पष्टीकरणासाठी वेगवेगळे सिध्दांन्त विस्तृतपणे वापरले जातात. या प्रतीकृती रोजगार संधी आणि उत्पादनक्षमतेवरील शिक्षणाच्या प्रभावाच्या अभ्यासाचे वेगवेगळे दृष्टीकोन पुढे मांडतात. खाली अशा प्रकारच्या तीन प्रतिकृती दिल्या आहेत.

i) **मानवी भांडवल प्रतिकृती :**

मानवी भांडवल सिध्दांन्त हा कामगार बाजार निष्पत्ती स्पष्ट करण्यासाठी विस्तृतपणे वापरला जातो. या सिध्दांताचे सार म्हणजे उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी मानवी संसाधनात गुंतवणूक केली जाते आणि म्हणून पर्यायाने रोजगार संधीत व कमाईत वाढ होते. व्यक्ती औपचारिक शिक्षण आणि/किंवा कार्यानुभवाद्वारे कौशल्य प्राप्त करतो आणि ही कौशल्ये त्याची त्याच्या मालकाच्या दृष्टीने असलेली किंमत वाढवतात व त्याची भविष्यातील कमाई वाढवितात.मानवी भांडवल सिध्दान्ताचे विविध कळीचे मुदद् हे लक्षात घेण्याजोगे आहेत. पहिला म्हणजे हा गुंतवणूक निर्णयाचा सिध्दान्त आहेः यात व्यक्ती भविष्यातील फायदे मिळविण्यासाठी सदयस्थितीत किंमत अंगावर ओढून घेतो. हे गुंतवणुक परिणाम खास करुन महत्वाचे आहे कारण मानवी भांडवल संपादनाचे फायदे विशेषतः बऱ्याच वर्षानंतर उच्च कमाई ओघाच्या स्वरुपात दीर्घकालात वाढतात. दुसरे म्हणजे फायदे भविष्यात वाढणार असल्याने गुंतवणुकीद्वारे मिळणाऱ्या परतीच्या रकमेच्या प्रमाणाविषयी खास करुन अनिश्चितता असते. मानवी भांडवल गुंतवणूक ही सामान्यतः धोकेदायक गुंतवणूक असते. तिसरे म्हणजे मानवी भांडवल संपादनाच्या किंमतीचा मुख्य घटक हा विशेषतः संधी मूल्य असते. काम न करता निःसंदेह उत्पन्न. शिक्षणाविषयीचे निर्णय शाळेसाठी समर्पित वेळाची राशी आणि शैक्षणिक कार्यक्रमाची निवड हे दोन्ही – - मानवी भांडवल निर्मितीचे 'गुंतवणुक' व 'उपभोग' या दोन्ही घटकांनी प्रभावित होईल. नंतरची बाब ही वस्तुस्थिती दर्शविते की काहींसाठी अध्ययन ही आनंददायक कृती असेल परंतु इतरांसाठी कमी आनंददायक किंवा दु:खदायक सुध्दा असेल. इतर घटक समान असल्याने ज्या व्यक्ती अध्ययनाचा आनंद लुटतात ते शाळेत दीर्घकाळ राहण्याची शक्यता असते.त्याचप्रमाणे इतर गोष्टी समान असल्याने विद्यार्थी आवडीचे व उत्तेजक शैक्षणिक कार्यक्रम निवडण्याची शक्यता अधिक असते. एक महत्वाचा भेद म्हणजे मानवी भांडवल निर्मितीतील खाजगी व सामाजिक परतावा. खाजगी परतावा तो असतो जो शिक्षण संपादन करत असलेल्या व्यक्तीने गुंतविलेल्या किंमतीवर व मिळविलेल्या फायदयावर आधारीत आहे. या फायदयात शाळेचे उपभोग व गुंतवणुक परिणाम दोन्ही समाविष्ट आहेत. सामाजिक परतावे हे समाजाने एकूण गुंतविलेल्या किंमतीवर व मिळविलेल्या फायदयांवर आधारीत आहेत. खाजगी व सामाजिक किंमत तसेच खाजगी व सामाजिक फायदे यात फरक असू शकतो. हा भेद महत्वाचा आहे कारण व्यक्तीला त्यांचा अभ्यासक्रम अधिक शिक्षित कामगाराच्या जीवनभर कमाई चित्रावर जे तत्सम कमी शिक्षित कामगाराच्या कमाई चित्राच्या वर असते, आधारलेले अपेक्षित असू शकते.

ii) **दर्शक प्रतिकृती / गाळणी प्रतिकृती :**

मानवी भांडवल सिध्दान्त व्यक्तींच्या उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी म्हणून शिक्षणाच्या भूमिकेवर जोर देतो. शिक्षणाचा एक विरोधाभासी दृष्टीकोन जेथे व्यक्तीच्या उत्पादनावर काहीही परिणाम नाही तो म्हणजे दर्शक प्रतिकृती. या सिध्दांन्तानुसार शिक्षण हे व्यक्तीच्या उत्पादन

क्षमतेचे दर्शक/प्रतीक म्हणून कार्य करु शकते. या सिध्दान्ताच्या केंद्रस्थानी अपूर्ण माहितीचे महत्व आहे. त्यांच्या भाडेतत्वाच्या निर्णयात, सेवेचा लाभ घेणाऱ्यांना (मालक, संचालक) सक्षम कामगारांच्या क्षमतेविषयी अपूर्णरीत्या माहिती दिली जाते. त्यामुळे ते नवीन भाडेतत्वावरील कामगारांच्या भविष्यातील उत्पादनक्षमतेचे दर्शक म्हणून शिक्षणाचा उपयोग करु शकतात. जर सेवेचा लाभ घेणाऱ्यांचा विश्वास परिणामतः प्रत्यक्ष अनुभवाने बळकट झाला (म्हणजे, अधिक शिक्षित कामगार हे अधिक उत्पादनक्षम सिध्द् झाले) तर सेवेचा लाभ घेणारे शिक्षणाचा दर्शक म्हणून वापर चालू ठेवतील, सेवेचा लाभ घेणारे अशा प्रकारे अधिक शिक्षित कामगारांना अधिक उच्च मजुरी (पगार) देतील, शिक्षण (जे प्राप्त करणे महाग असते) आणि मजुरीतील विधायक संबंधांची बाजू पाहतांना, व्यक्तीला शिक्षणात गुंतवणूक ही उत्तेजनार्थ बाब ठरेल.दर्शक प्रतिकृतीचे मध्यवर्ती गृहितक हे आहे की असे व्यक्ती की जे जन्मजात अधिक कुशल किंवा सक्षम आहेत त्यांच्यासाठी शिक्षण प्राप्त करणे हे कमी खर्चिक आहे, जर हे गृहित सत्य असेल तर उच्च क्षमतावान व्यक्ती कमी क्षमतावान व्यक्तीपेक्षा शिक्षणात अधिक गुंतवणूक करतील, उच्च व कमी क्षमतावान व्यक्ती शाळेतील गुंतवणुकीपासून मिळणाऱ्या समान क्षमतेच्या फायदयांना सामोरे जातील परंतु कमी क्षमतावान कामगार अधिक किंमतीला तोंड देतील आणि म्हणून कमी शिक्षण संपादन करतील. या परिस्थितीत, सेवेचा लाभ घेणाऱ्यांचा शिक्षण आणि कामगारांची उत्पादनक्षमता यातील संबंधाविषयीचा विश्वास बळकट होईल. शालेय जीवनाचा (गृहितानुसार) कामगाराच्या उत्पादनक्षमतेवर काहीही परिणाम नसला तरीही सेवेचा लाभ घेणाऱ्यांना अधिक उच्च शिक्षित कामगारांना अधिक उच्च पगार देणे प्रेरक ठरते आणि अधिक उच्च क्षमतावान व्यक्तींना शिक्षणातील गुंतवणूक प्रेरक ठरते.या प्रतिकृतीत, शिक्षण हे 'वर्गीकरण साधन' ठरते जे कमी क्षमतावान कामगरांपासून उच्च क्षमतावान कामगरांना अलगड करते. मानवी भांडवल सिध्दान्ताप्रमाणे, दर्शक/गाळणी प्रतिकृती ही शाळेत जाणे व कामगार बाजार निष्पत्ती जसे कमाई यामधील अस्तित्वात असलेला विधायक संबंध स्पष्ट करु शकते. तथापि, या दोन सिध्दान्तांमध्ये महत्वाचे फरक आहेत. मानवी भांडवल प्रतिकृतीत, शिक्षण हे खाजगीरीत्या व सामाजिकरीत्या उत्पादनक्षम आहे. याउलट, दर्शक प्रतिकृतीत शिक्षण हे खाजगीरीत्या उत्पादनक्षम आहे (उच्च क्षमतावान व्यक्ती शिक्षणात गुंतवणूक करुन फायदा उचलतो) परंतु सामाजिकरीत्या उत्पादनक्षम नाही कारण शिक्षणाचा समाजाने निर्माण केलेल्या एकूण मालमत्ता आणि सेवांवर परिणाम नाही होत. दुसरा महत्वाचा फरक म्हणजे मानवी भांडवल प्रतिकृतीत शालेय जीवन कामगारांच्या उत्पादनक्षमता आणि तद्नुसार कमाई वर कारणीभूत प्रभाव टाकते. दर्शक प्रतिकृतीत, शिक्षणाचा कामगाराच्या उत्पादनक्षमतेवर काही परिणाम नाही होत म्हणून शिक्षणाचा कमाईवर कारणीभूत प्रभाव नाही. उलट शालेय जीवन व कमाईतील विधायक संबंध निर्माण होतो कारण दोन्ही चले ही तिसऱ्या एका घटकाशी -कामगार क्षमतेशी निगडीत आहेत. बऱ्याच परिस्थितीत कामगार क्षमता ही दुर्लक्षिली जाते. म्हणून शिक्षण व कमाईमधील विधायक संबंध निर्माण होतो की नाही हे ठरविणे कठीण होते कारण शालेय जीवन (शिक्षण) कामगाराची उत्पादक क्षमता वाढविते (मानवी भांडवल स्पष्टीकरण) किंवा शालेय जीवन उच्च व कमी क्षमतावान व्यक्तींना अलग करते.

### iii) **व्यवसाय (नोकरी) जुळवणी किंवा माहिती-आधारीत प्रतिकृती :**

मानवी भांडवल प्रतिकृतीत, व्यक्ती शैक्षणिक कार्यक्रमाच्या किंमतीनुसार आणि ते निर्माण करत असलेले संबंधित जीवनभराच्या कमाईच्या ओघ (आणि इतर फायदे) यानुसार पर्यायी शैक्षणिक निवडीच्या फायदयाचे भाकित करण्यासाठी किंवा ओळखण्यासाठी मदत करण्यात माहिती भूमिका बजाऊ शकते. शैक्षणिक प्रक्रियेचा एक पर्यायी दृष्टीकोन म्हणजे तो

व्यक्तीला त्यांच्यासाठी कोणता उपजिवीकेचा मार्ग सर्वोत्तम आहे हे ठरविण्यास मदत करतो. याबाबतीत शिक्षण व्यक्तीला ते चांगल्या प्रकारे निभाऊ शकणाऱ्या व्यवसाय व नोकरीच्या प्रकारांच्या तुलनात्मक फायदयाविषयी माहिती पुरविण्याची भूमिका बजाऊ शकतात. हे तंत्र नोकरी जुळवणी किंवा माहिती आधारीत प्रतिकृती चे वैशिष्टय आहे. याचे यथार्थ दृश्य हे मानवी भांडवल सिध्दान्ताशी बऱ्याच रितीने सारखे आहे ज्यात या सूचक अर्थाचा सुध्दा समावेश आहे की खाजगी व सामाजिक असे दोन्ही फायदे आहेत. तथापि, मुख्य जोर हा वेगळा आहे. मानवी भांडवल सिध्दांन्त कामगार बाजाराने किंमत केलेल्या कौशल्याच्या प्राप्तीवर जोर देतो तर नोकरी जुळवणी प्रतिकृती एखादयाच्या क्षमता व समर्पकतेविषयी माहिती प्राप्त करण्यावर जोर देते. मानवी भांडवल सिध्दान्त शाळा शिकण्याद्वारे प्रदान केलेल्या कौशल्यातील प्रत्यक्ष वाढीवर लक्ष केंद्रीत करते तर माहिती आधारीत प्रतिकृती कौशल्याच्या दिलेल्या संचाच्या सर्वात उत्पादनक्षम उपयोजना ओळखण्यासाठी शिक्षणाच्या भूमिकेवर प्रकाश टाकते. नोकरी जुळवणी दृष्टीकोनाचा कार्यानुभवाच्या परताव्याच्या स्पष्टीकरणासाठी महत्वाचा सूचक अर्थ आहे. तो नोकरीला वैयक्तिक स्वभाववैचित्र्य असलेला किंवा अढळ कामगार म्हणून बघतो.

## ७.१२. शिक्षण व कौशल्य विकासाच्या परिणामावरील पुरावे :

बरेच लोक शिक्षणातील गुंतवणूक या विश्वासाने करतात की तसे करुन भविष्यातील फायदे मिळतील जसे अधिक रोजगार संधी, उच्च कमाई आणि अधिक आवडीचा व विविध उपजिविकेचे मार्ग. तसेच बरीच सार्वजनिक धोरणे वैयक्तिक नागरीकाला त्यांची शैक्षणिक प्राप्ती वाढविण्यासाठी आणि त्यांची कौशल्ये व ज्ञान वाढविण्यासाठी उत्तेजन देतात. वाढीव शैक्षणिक प्राप्ती व कौशल्ये त्यांच्या स्वतःच्या भल्यासाठीच मौल्यवान नाहीत तर ते अधिक चांगल्या कामगार बाजारात आणि सामाजिक निष्पत्तीत परिणत होत असल्यामुळे सुध्दा मूल्यवान आहेत.

शाळेत जाण्याचे व्यक्तीसाठी व समाजासाठी असंख्य परिणाम असू शकतात. बऱ्याच लोकांसाठी शैक्षणिक प्रक्रियेपासून काही उपभोग्य मूल्य आहे. मानव हा जिज्ञासू प्राणी आहे आणि अध्ययनाचा व नवीन ज्ञान प्राप्त करण्याचा आनंद लुटतो. गुंतवणूक बाबींवर प्रकाश टाकतांनासुध्दा शिक्षण लोकांना जीवनाचा आनंद पूर्ण लुटण्यात, साहित्याचे व संस्कृतीचे रसग्रहण करण्यात आणि अधिक माहितीप्रचुर व समाज सहभागी नागरीक बनण्यात सक्षम बनवू शकतात. शाळेत जाण्याचे हे व इतर क्षमतायुक्त परिणाम जरी महत्वाचे असले व दुर्लक्षिले जाऊ दयायचे नसले तरी शिक्षणाचे रोजगार क्षमता, उत्पादनक्षमता आणि कमाईचे परिणाम सुध्दा पुरेसे महत्वाचे आहेत. बऱ्याच अभ्यासांनी नोंदविलेले आहे की ''कोण पुढे जातो ? '' चा एक चांगला भाकिततज्ञ म्हणजे शाळेत जाणे (शिकणे) होय. अधिक शिक्षित कामगार अधिक जास्त पगार कमावतात, त्यांच्या जीवनभरात अधिक कमाई वाढ दाखवितात, कमी प्रमाणात बेरोजगारी अनुभवतात आणि दीर्घकाळ कार्य करतात.उच्च शिक्षण हे दीर्घायुष्य, चांगले आरोग्य आणि गुन्हेगारीतील कमी सहभाग यांच्याशीसुध्दा संबंधित आहे. शिक्षणाच्या विविध स्तरांच्या व्यक्तींच्या गटावरील सामग्रीपासून जीवनचक्र कमाई चित्राचे अंदाजे मत आणि अधिकचे शिक्षण प्राप्त करण्याच्या किंमतीवरील प्रत्यक्ष किंमत आणि काम न करता निःसंदेह उत्पन्नाशी संबंधित संधी मूल्य - - माहितीचे एकत्रिकरण हे अधिकच्या शिक्षणातील गुंतवणुकीवरील परताव्याच्या सुचित दराचा अंदाज करण्यास परवानगी देते. उदाहरणार्थ, विद्यापीठ पदवीची माध्यमिक शाळा पदविकाशी तुलना करता परताव्याचा अंदाजे दर काढला गेला. यासाठी या दोन्ही गटांसाठी

माध्यमिक शाळा पूर्ण केल्यानंतर कामगार बळात प्रवेश करण्याच्या तुलनेत विद्यापीठात हजर राहण्याच्या प्रत्यक्ष व संधी किंमतीवरील माहितीसह जीवन चक्र कमाई चित्र वापरले गेले.

दुसरा दृष्टीकोन हा कमाई कार्याच्या अंदाजित किंमतीवर आधारीत आहे ज्यामध्ये कमाईचे परिणाम हे पूर्ण केलेल्या शालेय वर्षाच्या (किंवा शिक्षण प्राप्तीची सर्वोच्च पातळी), कामगार बाजार अनुभवांच्या वर्षाच्या आणि इतर चले जी कमाईवरील इतर परिणामांवर नियंत्रण ठेवतात त्यानुसार मागे जाते. हा कमाई कार्य दृष्टीकोन विस्तृतपणे वापरला जातो कारण हा शिक्षणाच्या परताव्याच्या दराची अंदाजे किंमत तात्काळ पुरवितो तसेच कमाईवरील इतर परिणामांच्या संबंधी परिमाणातील अंतर्दृष्टी देतो.

शिक्षण व कमाई मधील मजबूत विधायक संबंध हा समाज शास्त्रातील एक अतिशय सुप्रस्थापित संबंध आहे. तथापि, बरेच समाज शास्त्रज्ञ, शिक्षण हे कमाईवर कारणीभूत परिणाम करते हा पुरावा म्हणून हा परस्परसंबंध स्पष्ट करण्यास नाखुष आहेत. मानवी भांडवल सिध्दान्तानुसार शालेय जीवनाने कमाई वाढते कारण ते कामगाराचे कौशल्य वाढविते व अशा प्रकारे नोकरवर्ग अधिक उत्पादनक्षम बनून चालक-मालक लोकांसाठी अधिक मूल्यवान होतो. तथापि, पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे, कमाई व शिकण्यातील विधायक संबंध उत्पन्न होऊ शकतो कारण शिक्षण व कमाई हे दोन्हीही न नोंदलेल्या घटकांशी जसे क्षमता, चिकाटी आणि महत्वाकांक्षा यांच्याशी (यानंतर पुढे फक्त क्षमता संबोध) परस्परसंबंधित आहेत. जर तेथे कमी शिक्षित आणि उच्च शिक्षित यांच्यामध्ये पध्दतशीर फरक असेल जो शिकण्याचे निर्णय व कामगार बाजार यश या दोन्हींवर परिणाम करतो तर शिक्षण व कमाईमधील परस्परसंबंध इतर घटक सुध्दा प्रतीत करु शकतो. दर्शक/गाळणी सिध्दान्तानुसार, असे फरक उद्‌भवू शकतात जर चालक-मालक (सेवा घेणारे) शिक्षणाचा क्षमता किंवा चिकाटीसारख्या न नोंदलेल्या उत्पादकतेशी संबंधित घटकांचा दर्शक म्हणून वापर करतात. अशा परिस्थितीत शाळा शिकण्याच्या परताव्याच्या प्रमाणित अंदाजे किंमतीला वरती सरकवण्याचा पक्षपात होण्याची शक्यता असते कारण ते न नोंदलेली क्षमता विचारात घेत नाहीत. अधिक सर्वसाधारणपणे अधिक क्षमता किंवा प्रेरीत असलेले अधिक शिक्षणाच्या अभावी सुध्दा अधिक यशस्वी होण्याची शक्यता असते. म्हणजेच कमाईवरील इतर नोंदलेले परिणाम नियंत्रित केल्यानंतर कमाई व शिक्षणामध्ये जो परस्परसंबंध अस्तित्वात असतो तो कमाईवरील शिक्षणाच्या कारणीभूत प्रभावापेक्षा न नोंदलेल्या परिणामांचे योगदान प्रतीत करु शकतो. हा ''वगळलेला क्षमता पक्षपात'' मुदद्ा फक्त आपण कमाई व शाळा शिकणेमधील विधायक संबंध कशा प्रकारे स्पष्ट करतो या प्रश्नासाठीच नाही तर सार्वजनिक धोरणातील शिक्षणावरील लावावयाचा जोर यासाठी सुध्दा मूलभूत महत्वाचा आहे. थोडा जास्तीचा परतावा-एखादयासाठी शिक्षणाच्या कमी स्तरासह अधिकच्या शिक्षणाचा प्रभाव- हा सरासरी परताव्यापेक्षा वराच खाली असू शकतो. अशा परिस्थितीत शिक्षण तुलनात्मकदृष्टया अलाभार्थी गटांचे रोजगार किंवा कमाई भवितव्य सुधरविण्यात फारसे परिणामकारक ठरु शकणार नाही.

**समीक्षा अभ्यास :**

**रिकाम्या जागा भरा :**

१) शिक्षणाचा खाजगी परतावा हा एखादा . . . . . . . . .ज्याने अधिकचा अभ्यासक्रम प्राप्त केलेला आहे त्याला मिळणाऱ्या फायदयांशी संबंधित आहे.

२) बऱ्याच . . . . . . . . . . . मुळे शिक्षणाचे अर्थसहाय्य व सोईसुविधा देण्यात सरकारी सहभाग गरजेचा आहे.

३) मानवी भांडवल सिध्दान्त व्यक्तीच्या उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी म्हणून भूमिकेवर जोर देतो.

४) एक स्थिर व लोकशाही समाज हा बहुतांश नागरीकां जवळ . . . . . . . . . .आणि. . . . . . ज्ञानाचा किमान स्तर असल्याविना शक्य नाही.

## ७.१३ सारांश :

अशी कोणतीही बाब जी मानवी इच्छा पूर्ण करते ती मालमत्ता आहे. एखादी मालमत्ता ही मर्यादित असल्यास आणि विभाजनास पात्र असल्यासच ती आर्थिक मालमत्ता होते. शिक्षण हे अशा प्रकारे आर्थिक मालमत्ता आहे. शिक्षण ही एक अमूर्त आर्थिक मालमत्ता आहे म्हणजेच ती एक सेवा आहे. शिक्षण ही उपभोक्त्याची तसेच उत्पादकाची अशी दोघांची मालमत्ता आहे. शिक्षण हे लोकसंख्येच्या मूर्त आणि अमूर्त गरज पूर्तीसाठी उत्पादक क्षमतेसह समाज निर्माण करतो. शिक्षण मुख्यत्वेकरुन मानवी भांडवल आणि तसेच बौध्दिक व सामाजिक भांडवलाची सुध्दा भरपाई करते. मानवी संसाधन विकास किंवा मानवी भांडवल निर्मिती ही खूप प्रमाणात शिक्षणावर अवलंबून आहे.

शिक्षण आणि आर्थिक विकासात परस्पर योगदानासह व्यस्त संबंध आहे. शिक्षण समाजातील लोकांना आर्थिक व सामाजिक लुबाडणुकीविरुध्द जागृत करते. ते तसेच व्यक्तीची किंवा समूहाची उत्पादनक्षम कार्यक्षमता वाढविते- वस्तुतः संपूर्ण उत्पादन पध्दतीची कार्यक्षमता वाढविते. मानवी भांडवल निर्मितीला संख्यात्मक व गुणात्मक असे दोन्ही परिणाम आहेत. बरेच संशोधक वाद घालतात की शिक्षणाचा दर्जा हा संख्येपेक्षा अधिक महत्वाचा आहे. भारतीय संदर्भात प्रचंड समूहाला शिक्षित करणे हे सरकारसमोरील भयंकर आव्हान आहे. त्याच वेळेस शिक्षणाचा दर्जा सुध्दा जागतिकीकरणाच्या उदयामुळे अत्यंत अत्यावश्यक बनला आहे. भारताला आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी सरकारच्या वतीने सहप्रयत्नांची हमी दिलेली आहे.

## ७.१४ स्वाध्याय :

१) ''मूर्त संपत्तीच्या उत्पादनासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे'' कसे ?

२) शिक्षणातील दर्जात्मक सुधारणेपेक्षा संख्यात्मक सुधारणा या तर्काशी तुम्ही सहमत आहात काय ? तुमचा दृष्टीकोन सप्रमाण सिध्द करा.

३) शिक्षणाची विविध अंगे स्पष्ट करा.

४) आर्थिक विकासावरील शिक्षणाच्या परिणामाच्या अभ्यासाचा तीन प्रतिकृतींचे वर्णन करा.

५) भारताच्या जलद आर्थिक विकासासाठी तुम्ही सुचवू शकणाऱ्या शिक्षणाच्या प्रकारांची रुपरेषा दया.

❖❖❖❖

# ८

# शिक्षण आणि विकास

विकास चलाचे कार्य म्हणून विकासाला शैक्षणिक निष्पत्तीवरील (विशेषतः समूह शिक्षण आणि उच्च शिक्षण) परिणाम.

**घटक संरचना**

८.०. उददेश
८.१. परिचय
८.२. समूह शिक्षणाची अंगे
८.३. सर्वांसाठी शिक्षण का ?
८.४. सर्व शिक्षा अभियान (SSA)
८.५. SSA कार्यक्रमाचे मध्यवर्ती डावपेच
८.६. जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (DPEP)
८.७. अनौपचारीक शिक्षण (NFE)
८.८. भारतातील अनौपचारीक शिक्षणाची गरज व महत्व
८.९. स्त्रिया व मुलींचे शिक्षण
८.१०. ग्रामीण शिक्षण
८.११. प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षण
८.१२. राष्ट्रीय साक्षरता मोहिम (NLM)
८.१३. किमान अध्ययन पातळी मर्यादा (MLL)
८.१४. विकासाचा उच्च शिक्षणाच्या शैक्षणिक फलनिष्पत्तीवरील परिणाम
८.१५. भारतातील उच्च शिक्षणातील दर्जा
८.१६. उच्च शिक्षण आणि सामाजिक नितीतत्वे
८.१७. भारत आणि उच्च शिक्षण
८.१८. भारतातील खाजगीकरण आणि उच्च शिक्षण
८.१९. उच्च तांत्रिक शिक्षण
८.२०. निरंतर शिक्षण
८.२१. विकासाचा शैक्षणिक निष्पत्तीवरील परिणाम.
८.२२ स्वाध्याय

## ८.०. उददेश :

हा पाठ वाचल्यानंतर तुम्हाला खालील बाबी शक्य होतील.

- भारतातील सर्वांसाठी शिक्षणाची गरज जाणणे.
- भारतातील सरकारचे विविध शैक्षणिक कार्यक्रम जसे सर्व शिक्षा अभियान (SSA), DEPE, NFE, NLM, MLL, ग्रामीण शिक्षण, प्रौढ व निरंतर शिक्षण यांचे महत्व जाणणे.

- उच्च शिक्षणाची अंगे आणि उच्च शिक्षणातील शैक्षणिक निष्पत्तीवरील विकासाचा परिणाम जाणणे.
- सरकारने उच्च तांत्रिक शिक्षणातील केलेले प्रयत्न समजणे.
- शैक्षणिक निष्पत्तीवरील विकासाच्या सर्वकष परिणामांचे मूल्य-मापन करणे.

## ८.१. परिचय.

१९४७ मधील स्वातंत्र्याच्या काळात भारताने एक शैक्षणिक पध्दती वारसा म्हणून घेतली जी संख्यात्मक दृष्टीनेच फक्त लहान होती असे नाही तर ठळक प्रादेशिक व संरचनात्मक असमतोलने सुध्दा भरलेली होती. फक्त १४ टक्के लोकसंख्या शिक्षित होती आणि तीन मुलांपैकी फक्त एका मुलाचे नाव प्राथमिक शाळेत नोंदविले होते. पटावरील कमी संख्या आणि साक्षरतेच्या कमी पातळीला तीव्र प्रादेशिक व लैंगिक विषमतेची जोड होती. शिक्षण हे विकास प्रक्रियेच्या परिपूर्णतेशी अत्यावश्यकरीत्या संबंधित आहे हे जाणून राज्याच्या हस्तक्षेपाचे महत्वाचे क्षेत्र म्हणून शैक्षणिक पध्दतीतील सुधारणा आणि त्यांची पुनर्रचना स्विकारली गेली. त्यानुसार साक्षर लोकसंख्येची गरज आणि ०६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना सार्वत्रिक शिक्षण भारतीय राज्यघटनेतील तसेच त्यानंतरच्या पंचवार्षिक योजनेतील काटेकोर व्याख्येसह व शब्दचित्रमय चौकटीवर पुरविले गेले.

सरकार व इतर संस्थांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी भारतीय शिक्षण पध्दतीच्या भल्यासाठी त्याच्या विविध अंगावर प्रभाव पाडला असला तरी त्यात काही नियमबाहय गोष्टी अस्तित्वात आहेत. भारतातील शिक्षण पध्दती सुधारण्याचे प्रयत्न अजुनसुध्दा सुरु आहेत आणि त्याचे परिणाम शिक्षणाच्या वेगवेगळया क्षेत्रात दिसून येतात. शिक्षणाच्या विविध अंगातील विकास जो या काळात घडून आला त्याचा प्रभाव सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, तंत्रज्ञानविषयक आणि इतर क्षेत्रावर आहे. उलटपक्षी या अंगांनी शिक्षणाच्या विकासाच्या दिशेने कार्य केले आहे. हे प्रकरण शैक्षणिक निष्पत्तीवरील आणि खास करुन 'समूह शिक्षण' आणि 'उच्च शिक्षण' यावरील विकासाच्या परिणामाच्या पृथक्करणाला समर्पित आहे.

## ८.२. समूह शिक्षणाची अंगे :

स्वातंत्र्य मिळाल्यापासून राष्ट्रीय धोरणाचे ठळक वैशिष्टय म्हणजे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या योजनेखाली ०६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची हमी ही घटनात्मक जबाबदारी आहे. हा ठराव राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ (NPE) आणि कृती कार्यक्रम (POA) १९९२, मध्ये परिणामकारकरितीने मांडलेले आहेत. NPE व POA मधील समाविष्ट जोराच्या (मुद्द्याच्या) पाठपुराव्यासाठी बऱ्याच योजना व कार्यक्रम सुरु केले गेले. यामध्ये फळा मोहिम (OB), अनौपचारीक शिक्षण (NFE), शिक्षक शिक्षण (TE), महिला समस्या (MS) सारख्या योजना; राज्यानुसार मूलभूत शैक्षणिक प्रकल्प जसे आंध्र प्रदेश प्राथमिक शिक्षण प्रकल्प (APPEP), बिहार शैक्षणिक प्रकल्प (BEP), लोक जंबिश प्रकल्प, राजस्थान (LJP), उत्तर प्रदेशातील सर्वांसाठी शिक्षण प्रकल्प, राजस्थानातील शिक्षा कर्मी प्रकल्प (SKP), प्राथमिक शिक्षणासाठी पोषण आहाराचा राष्ट्रीय कार्यक्रम आणि जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम यांचा समावेश होतो.

## ८.३. सर्वांसाठी शिक्षण का?

भारतात सर्वांसाठी प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी जोमाने करण्यासाठी सबळ कारणे आहेत. सामाजिक न्याय आणि समता हे स्वतः सर्वांसाठी मूलभूत शिक्षण पुरविण्यासाठी प्रखर मुदद्‌ आहेत. ही प्रस्थापित बाब आहे की मूलभूत शिक्षण हे जीवनाची अपेक्षित मर्यादा, बालमृत्यू आणि मूलांची पोषण स्थिती इ. शी संबंधित मानवी सुस्थितीची पातळी सुधारते. अभ्यासअंती हे सिध्द झाले आहे की सार्वत्रिक मूलभूत शिक्षण हे अर्थपूर्ण रितीने आर्थिक वाढीत योगदान देते. इतर बाहय कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) UEE साठी घटनात्मक, कायदेशीर आणि राष्ट्रीय विधानाने सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा (UEE) हेतू मान्य केला आहे.

२) घटनात्मक अधिकार १९५० सांगतो, ''या घटनेच्या आरंभापासून दहा वर्षाच्या कालावधीत राज्याने सर्व मुले १४ वर्षांची होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण पुरवण्याचा प्रयत्न करावयास हवा.''

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ''आपण एकविसाव्या शतकात शिरण्यापूर्वी १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना समाधानकारक दर्जाचे मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची खात्री दिली जावी.''

४) उन्नीकृष्णन निकाल, १९९३- ''या देशाच्या प्रत्येक मुलाला/नागरीकाला त्याच्या वयाची चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत शिक्षणाचा अधिकार आहे.''

५) शिक्षण मंत्र्यांचा ठराव १९९८- ''सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा मोहिम स्वरुपात पाठपुरावा केला जावा हा UEE प्रती पवित्र व केंद्रीकृत दृष्टीकोनाचा पाठपुरावा करण्याच्या गरजेवर जोर देतो.''

६) मोहिम स्वरुपातील UEE वरील राष्ट्रीय समितीचा अहवाल, १९९९- UEE चा पवित्र व केंद्रीकृत दृष्टीकोनासह आणि UEE साठी जिल्हा प्राथमिक शिक्षण योजनेच्या तयारीवरील जोरासह मोहिम स्वरुपात पाठपुरावा केला जावा. शिक्षणाच्या मूलभूत आधाराला त्याने आधार दिला.

७) मानवी अधिकाराच्या वैश्‍विक निवेदनाचे २६ वे कलम, १९४८ सांगते की, ''शिक्षण हे मानवी व्यक्तीच्या पूर्ण विकासासाठी आणि मानवी अधिकार व मूलभूत स्वातंत्र्यप्राप्ती आदराच्या बळकटीकरणासाठी दिशादर्शक असावे. त्याने सर्व देश, जाती किंवा धार्मिक गटातील सामजस्य, सहिष्णुता आणि मैत्री वृध्दिगंत करावी आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांती टिकविण्याच्या कृतींना हातभार लावावा.

**<u>आतापर्यंतची रुपरेषा (चित्र) :</u>** जागतिकीकरणाच्या भाषेत, साक्षर लोकांची मागणी सतत वाढत असली तरी शिक्षणाचा अधिकार व अध्ययनाचा अधिकार अजूनसुध्दा वास्तविकता न राहता दृष्टीकोनच राहिलेला आहे. आज बहुसंख्य स्त्रियांसह १००० दशलक्ष लोकांना निरक्षर

दर्जा जडलेला आहे. विकसनशील देशांतील १३० दशलक्षापेक्षा अधिक मुले, त्यातील जवळ-जवळ दोन तृतीयांश मुली असून त्यांना प्राथमिक शिक्षणाची सुविधा नाही. या चिंताजनक मुलांच्या पार्श्वभूमीवर, अधिकारावरील १९८९ च्या संयुक्त राष्ट्र अधिवेशनात प्रत्येक मुलाचा शिक्षणाचा अधिकार पुनः निग्रहाने मांडला.

भारतीय चित्र थोडे वेगळे आहे. विकासाचा परिणाम शिक्षणाच्या क्षेत्रात बघितला जाऊ शकतो. बऱ्याच प्रयत्नांचा परिणाम म्हणून भारताने संस्था, शिक्षक आणि प्राथमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या वाढीच्या भाषते भरपूर प्रगती केली आहे. देशातील शाळांची संख्या चारपट वाढली आहे - १९५०-५१ मधील २,३१,००० पासून १९८९-९० मधील ९,३०,००० पर्यंत, तर प्राथमिक मधील पटावरील संख्या सहा पट वाढली आहे - १९.२ दशलक्ष ते ११० दशलक्ष. उच्च प्राथमिक पातळीवर या काळात पटावरील सख्या १३ पट तर मुलींच्या संख्येत ३२ पट एवढी भरघोस वाढ झाली. प्राथमिक स्तरावर एकूण पटावरील गुणोत्तराने (GER) १०० टक्के पार केले. शाळेत शिकण्याची सुविधा मिळणे ही आता मोठी समस्या राहिली नाही. प्राथमिक स्तरावर, देशाच्या १४ टक्के ग्रामीण लोकसंख्येला शिक्षणाच्या सुविधा एक किलो मीटरच्या आत आहेत आणि उच्च प्राथमिक स्तरासाठी हा आकडा ८४ टक्के आहे.

देशाने प्राथमिक शिक्षण क्षेत्रात नजरेत भरण्यासारखे कार्य संपादन केले आहे. परंतु गांभिर्य नसलेली बाब ही आहे की ६ ते १४ वयोगटातील २०० दशलक्ष मुलांपैकी ५९ दशलक्ष मुले अजुनसुध्दा शाळेत हजर राहत नाहीत. यापैकी ३५ दशलक्ष मुली असून २४ दशलक्ष मुले आहेत. तेथे गळतीचा दर, अध्ययन संपादनाची कमी पातळी आणि मुलींचा, भटके व इतर अलाभार्थी गटांचा कमी सहभाग यांच्याशी संबंधित समस्या आहेत. या देशात अजुनसुध्दा कमीतकमी एक लाख वसतिस्थाने अशी आहेत ज्यांच्या एक किलोमीटरच्या परिसरात शिक्षण सुविधा नाहीत. यासोबतच विविध पध्दतीविषयक मुद्दे् जसे अपूरी शालेय पायाभूत मांडणी, अकार्यक्षम शाळा, शिक्षकांच्या अनुपस्थितीचे लक्षणीय प्रमाण, शिक्षकांच्या असंख्य रिक्त जागा, शिक्षणाचा कमकुवत दर्जा आणि अपूरा निधी हे आहेतच.

थोडक्यात या देशाला प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे (UEE) आभासी ध्येय म्हणजेच पटावरील १०० टक्के संख्या आणि सर्व वसतीस्थानातील शालेय सुविधेसह मुलांचा टिकाव, संपादन करणे बाकी आहे. ही दरी भरुन काढण्यासाठीच सरकारने सर्व शिक्षा अभियान सुरु केले.

## ८.४. सर्व शिक्षा अभियान (SSA) : भारतातील सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम:

सर्व शिक्षा अभियान हे विशिष्ट कालावधीत राज्यांच्या भागीदारीसह संयुक्त दृष्टीकोनाद्वारे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे (UEE) पूर्वीपासून बाळगलेले ध्येय संपादण्यासाठी टाकलेले ऐतिहासिक पाऊल आहे. SSA देशाच्या प्राथमिक शिक्षण क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्यास कटीबध्द आहे ते २०१० पर्यत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना उपयुक्त व दर्जेदार प्राथमिक शिक्षण देण्याचे ध्येय ठेवते.

SSA हा शालेय पध्दतीची कामगिरी सुधारण्यासाठीची गरज ओळखण्यासाठी चा आणि मोहिम स्वरुपात समाज मालकिचे दर्जेदार प्राथमिक शिक्षण पुरविण्यासाठीचा एक प्रयन्त आहे. तसेच ते लैगिंक व सामाजिक दरी कमी करण्यास तोंड देते.

- **<u>अंमलबजावणीची संरचना :</u>**

केंद्र व राज्य सराकारे एकत्रितपणे व स्थानिक सरकारे आणि समाजाच्या सहभागातून SSA ची अंमलबजावणी करतील. प्राथमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय प्राधान्य दर्शविण्यासाठी, पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्र्यांच्या उपाध्यक्षतेखाली एक राष्ट्रीय सर्व शिक्षा अभियान मोहिम स्थापन केली आहे. राज्यांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी मुख्यमंत्री/शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली DEE साठी राज्यस्तरीय अंमलबजावणी संस्था स्थापन करावी, बऱ्याच राज्यांमध्ये हे आधीच केलेले आहे.

सर्व शिक्षा अभियान हे राज्य व जिल्हयातील सध्या अस्तित्वात असलेली संरचनेत व्यत्यय आणणार नाही तर या सर्व प्रयन्तांमध्ये फक्त संयोगीकरण करण्याचा प्रयत्न करेल. समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी खालील दिशेने शालेय स्तरापर्यत कार्यात्मक विकेंद्रीरणाची खाली करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

- **<u>विस्तारक्षेत्र आणि कालावधी :</u>**

SSA देशाच्या संपूर्ण विस्ताराला मार्च २००२ पूर्वी व्यापेल आणि प्रत्येक जिल्हयातील कार्यक्रमाचा कालावधी हा त्याच्या विशिष्ट निकडीनुसार त्याने तयार केलेल्या जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना (DPEP) वर अवलंबून असेल. तथापि या कार्यक्रम कालावधीची वरची मर्यादा ही दहा वर्षे म्हणजेच २०१० पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

## ८.५. SSA कार्यक्रमाचे मध्यवर्ती डावपेच :

- **<u>संस्थात्मक सुधारणा :-</u>** SSA चा भाग म्हणून राज्यांमध्ये संस्थात्मक सुधारणा घडवून आणल्या गेल्या. राज्यांनी त्यांच्या प्रचलित शैक्षणिक पध्दतींचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करावयाचे होते. ज्यामध्ये शैक्षणिक प्रशासन, शाळांमधील संपादन पातळी, आर्थिक मुदद्, विकेंद्रीकरण आणि समाज मालकियत, राज्य शैक्षणिक कायदयाची सुधारणा, शिक्षकांचा योग्य उपयोग करण्याचे आणि शिक्षक भरतीचे तर्क-शुध्दीकरण, देखरेख व मूल्यमापन, मुलींचे, SC/ST आणि अलाभार्थी गटांचे शिक्षण, खाजगी शाळा आणि ECCE शी संबंधित धोरणे यांचा समावेश होतो. बऱ्याच राज्यांनी प्राथमिक शिक्षणासाठीची वाटप योजना सुधारण्यासाठी याआधीच संस्थात्मक सुधारणा अंमलात आणल्या आहेत.

- **<u>टिकावू अर्थसहाय्य :-</u>** सर्व शिक्षा अभियान या पूर्वपक्षावर आधारीत आहे की प्राथमिक शिक्षण मध्यस्तीचे अर्थसहाय्य हे टिकावू हवे. हे राज्य व केंद्रसरकारमधील दीर्घकालिन आर्थिक भागिदारीची मागणी करते.

- **<u>समाज मालकियत :-</u>** हा कार्यक्रम परिणामकारक विकेंद्रीकरणाद्वारे मध्यस्ती आधारीत शाळांच्या समाज मालकियत ची मागणी करतो, यामध्ये स्त्रियांचे गट, VEC सदस्य आणि पंचायत राज संस्था सदस्य यांच्या सहभागाने भर टाकली गेली. अशा प्रकारे समाजाचा सहभाग हा शिक्षणातील विकसनामुळे शिक्षणाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीतील वाढीव परिमाण आहे.

- **<u>संस्थात्मक क्षमता बांधणी :-</u>** SSA हे राष्ट्रीय आणि राज्य स्तरीय संस्था जसे NIEPA/NCTE/SCERT/SIEMAT यासारख्या संस्थांसाठी प्रमुख क्षमता बांधणी भूमिकेचा विचार करते. दर्जात्मक सुधारणेसाठी संसाधन व्यक्तींच्या टिकाऊ आधार पध्दतीची गरज असते. या दृष्टीने विविध प्रयत्नांची भर टाकली गेली जो पुन्हा एकदा शिक्षणातील विकासाचा परिणाम आहे.

- **<u>मुख्यप्रवाही शैक्षणिक प्रशासनातील सुधारणा :-</u>** हे संस्थात्मक विकास, नवीन दृष्टीकोनांची भर आणि मूल्य परिणामकारक व कार्यक्षम पध्दतींचा अवलंब याद्वारे मुख्यप्रवाही शैक्षणिक प्रशासनातील सुधारणांची मागणी करते.

- **<u>पूर्ण पारदर्शकतेसह समाज आधारीत देखरेख :-</u>** या कार्यक्रमाला समाज आधारीत देखरेख पध्दती आहे. शैक्षणिक व्यवस्थापन माहिती पध्दती (EMIS) ही सूक्ष्म योजना व सर्वेक्षणापासून शालेय स्तरीय सामग्रीचा समाज आधारीत माहितीशी परस्परसंबंध जोडेल. या व्यतिरिक्त, प्रत्येक शाळेला एक सूचना फलक असेल जो शाळेला मिळालेले सर्व अनुदान व इतर तपशील दर्शवेल. अशा प्रकारे शिक्षण पध्दतीला अधिक पारदर्शक करेल.

- **<u>योजनेचे एक एकक म्हणून वसतिस्थान :-</u>** SSA हे योजनेचे एक एकक म्हणून वसतिस्थानासह योजनेच्या समाज आधारीत दृष्टीकोनावर कार्य करते. वस्तीस्थान योजना ही जिल्हा योजना सूत्रीकरणाचा पाया राहिल व अशा प्रकारे संपूर्ण क्षेत्राच्या व्याप्तीची हमी देईल.

- **<u>समाजाप्रती उत्तरदायित्व :-</u>** SSA हे शिक्षक, पालक आणि PRI मधील सहकार्य तसेच उत्तरदायित्व व पारदर्शकता यांचा विचार करते. यामुळे शैक्षणिक कार्यक्रम गरज-आधारीत आणि समाज निगडीत बनले.

- **<u>मुलींचे शिक्षण :-</u>** मुलींचे शिक्षण आणि खास करुन ज्या अनुसूचित जाती आणि अनुसुचित जमातींपैकी आहेत त्यांचे शिक्षण ही सर्व शिक्षा अभियानातील एक प्रमुख चिंतेची बाब आहे. यामुळे लोकांच्या अन्यथा दुर्लक्षिलेल्या गटाला शिक्षणाच्या प्रवाहात आणणे शक्य झाले.

- **<u>विशिष्ट समूहावरील लक्ष :-</u>** SC/ST मुले, धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक, अलाभार्थी गट आणि अपंग मुले यांच्या शैक्षणिक सहभागावर लक्ष राहिल व कुणालाही शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर टाकले जाणार नाही.

- **<u>पूर्व प्रकल्प अवस्था :-</u>** SSA पूर्ण देशभर सुनियोजित पूर्व प्रकल्प अवस्थेसह सुरु झाला ज्याने वाटप व देखरेख पध्दती सुधारण्यासाठी क्षमता विकासाकरीता खूप मोठया संख्येने मध्यस्ती पुरविल्या. हा अशा प्रकारे सुनियोजित व चांगली अंमलबजावणी झालेला एकमेव कार्यक्रम आहे.

- **<u>दर्जावरील जोर :-</u>** SSA हा अभ्यासक्रम सुधारुन, बाल केंद्रीत क्रिया आणि परिणामकारक अध्यापन पध्दतीद्वारे शिक्षणाला प्राथमिक स्तरावर उपयुक्त व मुलांशी निगडीत करण्यावर विशेष जोर देते.

- **<u>शिक्षकांची भूमिका :-</u>** SSA शिक्षकांच्या निर्णायक भूमिकेला ओळखतो आणि त्यांच्या विकास गरजांवरील जोर सुचवितो. BRC/CRC ची स्थापना करुन, पात्र शिक्षकांची भरती करुन, अभ्यासक्रम संबंधित साहित्य विकासातील सहभागाद्वारे शिक्षक विकासाच्या संधी, वर्गकृतीवर जोर आणि शिक्षकातील मानवी संसाधनाच्या विकासासाठी योजलेल्या शिक्षकांना उणिवा काढण्यासाठी भेटी.

- **<u>जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना :-</u>** SSA च्या चौकटीनुसार प्रत्येक जिल्हा हा एक जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना तयार करेल ज्यात प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील पवित्र व एकत्रीत गुंतवणूक प्रतित होईल.

सर्वशिक्षा अभियानाच्या घटकांत शिक्षकाची नेमणूक, शिक्षक प्रशिक्षण, प्राथमिक शिक्षणाची दर्जात्मक सुधारणा, अध्यापन अध्ययन साहित्याची सुविधा, शैक्षणिक पाठबळासाठी विभाग व समुह संसाधन केंद्राची स्थापना, वर्ग व शालेय इमारतींचे बांधकाम, शिक्षण हमी केंद्राची स्थापना, विकलांगांचे एकत्रीत शिक्षण आणि दूरशिक्षण यांचा समावेश होतो.

## ८.६. जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प (DPEP) :

पूर्वीचा प्रघात विभाग आधारीत गुंतवणूक जसे फळा मोहिम किंवा अनौपचारिक शिक्षण (NFE) कार्यक्रम याप्रती होता. या व इतर कार्यक्रमांची योजना केंद्रीकृत व आराखडयाच्या स्वरुपाची होती. सर्वांसाठी शिक्षण (EFA) पुढाकार आता अधिक क्षेत्र व लोकांशी संबंधित बनत आहे.

DPEP खाली निवडलेले जिल्हे हे ते आहेत जिथे स्त्री साक्षरता ही राष्ट्रीय सरासरी ३९.२% च्या खाली आहे आणि जेथे ''संपूर्ण साक्षरता मोहिमेने'' (TLCS) प्राथमिक शिक्षणाची मागणी यशस्वीरित्या निर्माण केली आहे.

तथापि DPEP चा जोर व कार्यक्रम हा बिहार प्रकल्प किंवा उत्तरप्रदेश शिक्षण प्रकल्प यापेक्षा अधिक विस्तृत आहे. DPEP चा मुख्य जोर पुढील बाबींवर आहे.

i) जिल्हास्तरीय योजना आखणी,

ii) समाजसहभाग आणि विकेंद्रीकृत व्यवस्थापन पध्दतीचा अवलंबकरणे,

iii) मुली, भटक्या जाती, भटक्या जमाती आणि विकलांग यांच्या शिक्षणावर जोर देणे,

iv) चांगल्या सेवेसाठी मागणी निर्मितीच्या प्रक्रियेद्वारे शिक्षणाचा दर्जा सुधारणे,
v) प्राथमिक शिक्षणातील गळतीच्या एकूण दरातील घसरण ही सर्व विद्यार्थ्यांकरता १० टक्क्याच्या कमी करणे.

भारतीय प्राथमिक शिक्षणाचे अपयश टाळणे कठीण आहे. भारताच्या राजकीय स्वातंत्र्याच्या साठ वर्षानंतर भारत हा २००६ च्या 'मानव विकास अहवाल' यामध्ये १७५ देशात १२६ व्या क्रमांकावर आहे. भारताचा प्रौढ साक्षरता दर हा ६१% असा अत्यंत निराशजनक आहे जो कॅमेरुन (६८%), अंगोला, कांगो, युगांडा (६७%), रवांडा (६५%), आणि मालवी (६४%), पेक्षा खाली आहे. आजच्या ४०% भारतीय प्रौढांना 'त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित एक छोटे व साधे वाक्य नुसते वाचता व लिहिता येऊ शकत नाही' हे दर्शविते की त्यांना अत्यंत पायाभूत प्राथमिक शिक्षणाच्या समकक्ष शिक्षण मिळालेले नाही. याउलट चीनची प्रौढ साक्षरता ९०% आहे. (स्त्रोत : UNDP मानव विकास अहवाल)

भारताने प्राथमिक शिक्षण हजेरी दर वाढविण्याच्या संदर्भात आणि साक्षरता लोकसंख्येच्या अंदाजे दोन-तृतीयांश पर्यंत विस्तारण्यात प्रचंड प्रगती केली आहे. भारतातील आर्थिक वाढीचा एक प्रमुख दावेदार म्हणून भारताच्या सुधारीत शिक्षण पध्दतीचा दाखला नेहमीच दिला जातो. शिक्षणातील बहुतांश प्रगतीचे श्रेय हे विविध खाजगी संस्थांना जाते. भारतातील खाजगी शिक्षण बाजाराची किंमत २००८ मध्ये अंदाजे ४० अब्ज डॉलर आणि २०१२ पर्यंत ६८ अब्ज डॉलरपर्यंत वाढेल. तथापि, भारत आव्हानांना तोंड देतोच आहे. शिक्षणातील गुंतवणूक वाढत असूनसुध्दा ३५% लोकसंख्या निरक्षर आहे आणि फक्त १५% विद्यार्थी माध्यमिक शाळेत पोहोचतात. आखलेले कार्यक्रम हे अतिशय महत्वाकांक्षी आणि भारतीयांच्या गरजांच्या अनुरुप आहेत. परंतु हे पुन्हा एकदा सिध्द झाले की भारतीय हे उत्कृष्ट आयोजक आहेत परंतु निकृष्ट अंमलबजावणीदार आहेत.

## ८.७. अनौपचारीक शिक्षण (NFE):

मुलांच्या शिक्षणाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी औपचारीक शिक्षण पध्दती अपूर्ण आढळून आली आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या अधिकृत सूचना (१९६० मधील) १९९४ पर्यंत सुध्दा साध्य झालेलया नाहीत. उलट ध्येय हे पकडीतून निसटत राहिले आहे आणि लक्ष हे वेळोवेळी पुढील काळात ढकलण्यात आले आहे. NPE निःसंशयपणे नमूद करते, ''शाळा विना वसतीस्थानातील मुले, कामकरी मुले आणि मुली जी दिवसभराच्या शाळेत हजर राहू शकत नाहीत त्यांच्या शाळातील गळतीसाठी खूप मोठया प्रमाणावर अनौपचारीक शिक्षणाचे पध्दतशीर कायक्रम सुरु केले जातील.'' शाळांतून गळालेले व वंचित मूलांना औपचारिक शाळांमध्ये शिक्षण दिले जाऊ शकत नसल्याने त्यांना NFE केंद्रात शिक्षण पुरविले जाते. हा दृष्टीकोन पुढील विधानास चपरवल बसविलेला आहे ''जर कृष्ण पर्वताकडे येत नसेल तर पर्वताने कृष्णाकडे जायला हवे. जर मुले शाळेत येत नसतील तर शाळांनी मुलांकडे जायला हवे.''

जी मुले विविध कारणास्तव शाळेत जाणे चालू ठेवू शकत नसतील आणि जी अजिबात शाळेत जाऊ शकत नसतील त्यांना घटनात्मक सूचनेच्या पूर्ततेसाठी अनौपचारिक शिक्षणाची गरज आहे. जे प्रौढ त्यांची उपजिविका चालावी म्हणून विविध धंद्यात गुंतलेले असल्याने किंवा

त्यांना कार्यात्मक आणि अशंकालीन शिक्षणाची गरज असल्याने किंवा त्यांना कार्यात्मक आणि अंशकालीन शिक्षणाची गरज असल्याने प्राथमिक शाळेत अभ्यास करु शकत नाही त्यांना फक्त NFE केंद्राद्वारे शिक्षण पुरविले जाऊ शकते.

अनौपचारीक शिक्षणाची संकल्पना मागील काही दशकात बदललेली आहे. अनौपचारीक शिक्षणाला बऱ्याच लोकांकडून औपचारीक शिक्षण पध्दतीला पूरक समजले जाते आणि काही इतरांसाठी ती औपचारीक पध्दतीला पर्याय आहे. तथापि दोन्हीही बऱ्याच अंशी बरोबर आहेत आणि NFE वस्तुतः एखाद्या विशिष्ट कालखंडात किंवा विशिष्ट नेमून दिलेल्या वेळेच्या आत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे लक्ष ठेवते.

प्रा. माल्कम आडिसेशेह यांनी निरिक्षण नोंदविले आहे की अनौपचारीक शिक्षणााची मर्यादा विस्तृत आहे कारण ते औपचारीक पध्दतीच्या बाहेरील सर्व अध्ययनाला समजते आणि त्याला जागा किंवा काळाचे बंधन नाही. १५ ते ६० वयोगटातील सर्व शिकणाऱ्यांसाठी आणि शालेय पूर्व, शाळेतून गळालेले किंवा शाळेत न गेलेल्या सर्वांसाठी याचे वर्गीकरण केले जाऊ शकते. अनौपचारीक अध्ययन हे अध्यायनाच्या समाविष्ट बाबीनुसार सुध्दा वर्गीकृत केले जाऊ शकते जेथे मुख्य जोर हा साधारण शिक्षणावर आहे आणि जेथे समाविष्ट बाबी व्यावसायिक आहेत त्यावर सुध्दा जोर आहे. जर आपण औपचारिक शिक्षण पध्दतीचा अभ्यासाचे तास व जागा, विद्यार्थ्यांचा प्रकार, अध्यापन-अध्ययन पध्दती, अभ्यासक्रमाच्या समाविष्ट बाबी, विद्यार्थी व शिक्षकांची पात्रता आणि मूल्यमापन पध्दती याविषयक सक्तीचा कठोरपणा दूर सारला आणि तरीही अध्ययनाच्या स्पष्ट उददेशासह पध्दतशीर अध्ययन प्रक्रिया संघटित केली तर आपल्याला अनौपचारीक शिक्षण पध्दती मिळेल ज्यात लवचिकतेचे आणि म्हणूनच अनौपचारीकतेचे विविध प्रमाण असतील.

NFE हे विकासाचे एक साधन समजले जाते जे फक्त आर्थिकदृष्टया फायदेशी आहे असे नाही तर गुणधर्माने राजकीय तसेच सांस्कृतिक सुध्दा आहे. ते उत्पादकता वाढविण्यास मदत करणारे असल्याने, त्याला कौशल्य विकास कार्यक्रमाचा भाग म्हणून सुध्दा संबोधले जाते. विकसनशील देशांमध्ये जेथे शिक्षण हे सार्वत्रिक झालेले नाही तेथे NFE साक्षरतेला चालना देणाऱ्या तरफेचे कार्य करते.

NFE हे सर्वसामान्य विकासाशी संबंधित आहे-यात आरोग्यरक्षणार्थ खबरदारी, कुटुंब नियोजन, पर्यावरण, उस्त्रोग, शेती, इ. चा समावेश होतो. अनौपचारीक शिक्षण पध्दतीकडे येणारे लोक साक्षरता व आकडेमोड व्यतिरिक्त कौशल्य व सामंजस्य ही शिकतात. NFE हे लोकांचा जीवन दर्जा सुधारण्याशी आणि सामाजिक तसेच राष्ट्रीय विकासाशी घनिष्ठ संबंधित आहे. NFE चा विकासावर प्रचंड प्रभाव आहे आणि जेवढा नागरीक व संपत्तीच्या निर्माण कर्त्यांवर आहे तेवढाच देशाची उत्पादकता व लोकांच्या लायकिची निष्पत्ती व निर्देशकावर आहे.

कृती कार्यक्रमाने (१९८६) निर्दशनास आणले आहे की NFE अत्यावश्यक वैशिष्टये म्हणजे संघटनात्मक लवचिकता, अभ्यासक्रमाची अनुरुपता, शिकणाऱ्याच्या गरजेशी निगडीत करण्याकरीता अध्ययन कृतीतील विविधता आणि व्यवस्थापनेचे विकेंद्रीकरण NFE च्या वेगवेगळया प्रतिकृती विकसित केल्या गेल्या आहेत आणि नियोजित समूहाच्या गरजा व स्थितीला

अनुरुप होण्यासाठी सुयोग्य प्रतिकृती विकसित करण्यासाठी व स्विकारण्यासाठी कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या विविध संस्थांना उत्तेजन दिले जाते.

## ८.८. भारतातील अनौपचारीक शिक्षणाची गरज आणि महत्व :-

हे सार्वत्रिकपणे मान्य केले गेले आहे की लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी एक शिक्षित व ज्ञानी नागरीक एक पूर्व आवश्यक अट आहे. विकसित देशात जरी माध्यमिक शिक्षणापर्यंतचे शिक्षण हे हेतुस्तव सक्तीचे केले गेले असले तरी विकसनशील देशात प्राथमिक शिक्षण हे लोकशाहीच्या परिणामकारक चलनवलनासाठी आवश्यक समजले जाते. १९४७ मध्ये जवळजवळ ८५% लोकसंख्या निरक्षर होती आणि ६-११ वयोगटातील फक्त ३१% मुले शाळेत जात होती. ही त्यावेळी राष्ट्रीय चिंतेची बाब होती आणि तीच समस्या जी कमी प्रमाणात असू शकते, आजसुध्दा अस्तित्वात आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा हा हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने, असे जाणवते आहे की आपल्याला शालेय सुविधांच्या सोईंचे (a) नाव नोंदणी आणि (b) शाळेतील टिकाव यांच सार्वत्रिकरण करावयास हवे. परंतु दुदैवाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय कारणास्तव प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण हे अजूनसुध्दा एक दूरचे ध्येय राहिले आहे. ही वस्तूस्थिती आहे की औपचारीक शिक्षण हे मुलांच्या, ज्यामधील बरीच मुले की विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक कमतरतेने ग्रस्त आहेत. त्यांच्या वाढीव संख्येच्या गरजा पूर्ण करण्यास अपूरे सिध्द झाले आहे. फक्त औपचारीक शिक्षण पध्दतीने सार्वत्रित प्राथमिक शिक्षणाचा हेतू प्राप्त करणे कठीण आहे. आपल्या देशात अशाप्रकारे अनौपचारीक शिक्षण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी, संसाधनांची अडचण भरुन काढण्यासाठी विखुरलेल्या तुरळक लोकसंख्येच्या क्षेत्रात सेवा देण्यासाठी, औपचारीक शिक्षणाची अपूर्णता भरुन काढण्यासाठी, विद्यार्थ्यांना शिकताना कमावणे शक्य करण्यासाठी, उशिरा जागे झालेल्यांच्या गरज पूर्तीसाठी आणि सामाजिक व आर्थिकदृष्टया समाजातील वंचित वर्गांना शिक्षण पुरविण्यासाठी देण्यात येते.

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीपासून संस्थांच्या सर्व प्रकारातील वाढ, नाव नोंदणी आणि आधुनिकता आणि शैक्षणिक कार्यक्रमांची विविधता या दृष्टीने खूपच प्रगती केली आहे. त्याला एकूणच व्याप्ती, समान वाटप आणि शिक्षणाच्या दर्जाच्या दृष्टीकोनातून राष्ट्राची आकांक्षा प्राप्त आहे.

अनौपचारीक शिक्षण हे मुख्यतः राष्ट्रीय विकासासाठी आहे अर्थातच कुठल्याही प्रकारचे शिक्षण हे राष्ट्रीय विकासात कोणत्याही स्वरुपात योगदान देतेचे. परंतु NFE कार्यक्रम हे आपल्या बहुसंख्य लोकांसाठी जे बऱ्याच दशंकापूसन वंचित पददलित व प्रतिबंधित आहे आणि आता मुख्य प्रवाहात सामील होण्याची आकांक्षा ठेवून आहेत त्यांच्यासाठी दूरदृष्टीने पाहिलेले, आयोजित व अंमलबजावणी केले आहेत. त्यांच्यासाठी शिक्षण हे दर्जा वाढविण्यासाठी किंवा शैक्षणिक समाधानासाठी नाही परंतु त्यांचा रोजगार किंवा उत्पादकता वाढविण्यासाठी आहे अशा प्रकारे शिक्षण सामाजिक व व्यक्तिगत विकासाला प्रोत्साहन देतो. राष्ट्रीय विकास म्हणजे देशाचा, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि इतर विकास होय. विकासाची संकल्पना बदलते आहे आणि त्याची बरोबरी फक्त आर्थिक वाढीशी केली जाऊ शकत नाही.

त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे आपण विकासाला उद्योगी करण्यासाठी समतूल्य करु शकत नाही (किंवा त्या बाबीचे आधुनिकीकरण) उदाहरणार्थ, आपण न्याय व समानतेला खूपच महत्व देतो परंतु GNP मधील वाढ ही प्रचंड असमानता आणि अन्यायाशी संबंधित आहे, सामाजिक न्याय म्हणूनच विकास प्रक्रियेचा अत्यावश्यक भाग समजला जातो. तसेच आपण उपभोगवाद आणि मालमत्ता व सेवेच्या वाढीवर जोर देत होतो परंतु आता आपण माणसाच्या स्वतःच्या विकासावर जोर देतो.

NFE चा मुख्य उददेश हा ग्रामीण जनतेच्या मोठया भागाचा विकास आहे. ग्रामीण क्षेत्राला अंधश्रध्दा, अनारोग्य, निष्कृष्ट घरे आणि आर्थिक विकासाचे मर्यादित साधने यांची लागण झाली आहे. याचे ग्रामीण व शहरी श्रीमंत व गरीब, पुरुष व स्त्रिया यामधील विशाल तफावत सुध्दा दूर सारण्याचे ध्येय आहे.

राष्ट्रीय विकासाची बरोबरी ही बहुधा एकूण राष्ट्रीय उत्पन्न (GNP) शी केली जाते. परंतु त्याचा अर्थ फक्त आर्थिक वाढ नव्हे, आर्थिक वाढसुध्दा भांडवल व मजुरांद्वारे स्पष्ट केली जाऊ शकत नाही. तेथे फार मोठा अवशिष्ट घटक आहे जो फक्त शिक्षणाच्या संदर्भात स्पष्ट केला जाऊ शकतो. विकास प्रक्रियेतील उडड्ाण अवस्था ही तेव्हाच प्राप्त होते जेव्हा शिक्षण, विज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानातील उन्नतीने GNP मधील वाढ घडून येते आणि ज्यायोगे शिक्षणासाठी अधिक राशी उपलब्ध होते व त्याची प्रगती होण्यास मदत होते.

गांधीजींच्या कल्पनेनुसार भारतीय लोकांनी स्वातंत्र्य मिळविले परंतु औपचारीक शिक्षण समाजाच्या विविध क्षेत्रात परावलंबित्व, अन्याय आणि असमानता यांचा अपराध करीत आहे. पायाभूत शिक्षण व त्याचे तत्व 'प्रत्यक्ष कृतीने अध्ययन' वापरण्याचे सुचवून गांधीजी हे अनौपचारीक शिक्षणाचे खंदे पुरस्कर्ते म्हणून उदयास आले जे शिक्षण गरीब, दबलेले आणि वंचित व्यक्तींना उत्पादनक्षमता, समता आणि न्याय प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. याचे कार्यक्रम बहुधा विकास कार्याशी बांधिल असल्याने हे शिक्षण व विकास या दोघांचा संयोग घडवून आणते. NFE चे कार्यक्रम अनुरुप, सुसाध्य आणि विविध कडक शिस्त व औपचारीकतेपासून मुक्त असल्याने ते शिकणाऱ्यांकडून अधिक चांगल्या प्रकारे ग्रहण केले जातात. हे शिकणारे प्रेरीत झालेले असतात परंतु असंबंधित आणि अर्थहीन अध्ययन अनुभवाची कडू चव चाखलेले असतात. त्यांना आता स्वतःला शिक्षित करण्यात रस असतो आणि त्याद्वारे त्यांची उत्पादनक्षमता, नागरीकत्व आणि जीवनाचा दर्जा सुधारण्याची चालना मिळालेले असतात जेणेकरुन ते २१ व्या शतकातील उदयोन्मुख समाजाची आव्हाने पेलू शकतील. ही नवीन जाण आणि जोम हे शिक्षणातील विकासाचे विधायक परिणाम आहेत.

**समीक्षा अभ्यास :**

१) अनौपचारीक शिक्षण . . . . . . . वयोगटातील सर्व अध्ययनकर्त्यांना समावते.

(a) ६-१४ (b) १५-६० (c) १८-३५ (d) २१-६०

२) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण हे राष्ट्रीय धोरणाचे ठळक वैशिष्टय आहे. हा ठराव . . . . . . .मध्ये जोरदारपणे मांडला गेला.

(a) NPE १९८६ आणि POA १९९२ (b) राज्य शिक्षण धोरण

(c) UGC परिपत्रक (d) राष्ट्रीय साक्षरता मोहिम

३) लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी एक पूर्व आवश्यक अट म्हणजे . . . . . .

(a) शिक्षित व ज्ञानी नागरीक
(b) श्रीमंत व आरोग्य संपन्न नागरीक
(c) सदाचारी नागरीक
(d) कायदे पालक नागरीक

४) NFE चा मुख्य उददेश हा . . . . . . . . .मोठया भागाचा विकास आहे.

(a) शहरी लोकांच्या
(b) आदिवासी लोकांच्या
(c) ग्रामीण लोकांच्या
(d) शिक्षित लोकांच्या

५) DPEP खाली निवड झालेले जिल्हे ते असतात जिथे . . . . . . . . . . .

(a) पुरुष साक्षरता ही राष्ट्रीय सरासरीच्या खाली असते.
(b) प्रौढ साक्षरता ही राष्ट्रीय सरासरीच्या खाली असते.
(c) स्त्री साक्षरता ही राष्ट्रीय सरासरीच्या खाली असते.
(d) उच्च शिक्षण हे राष्ट्रीय सरासरीच्या खाली असते.

६) SSA . . . . . . . . . . आणि . . . . . . . . साधण्याचा विचार करते.

(a) लैगिंक आणि सामाजिक दरी.
(b) आर्थिक आणि राजकीय दरी.
(c) ग्रामीण व शहरी दरी.
(d) श्रीमंत व गरीब दरी.

## ८.९. स्त्रिया आणि मुलींचे शिक्षण :

स्त्रियांचा साक्षरता दर हा पुरुषांपेक्षा खूप कमी आहे. फारच थोडया मुलींची नाावे शाळेत घातली जातात आणि त्यातील बऱ्याच गळून जातात. यु.एस. वाणिज्य विभागाच्या १९९८ च्या एक अहवालानुसार भारतातील स्त्री शिक्षणातील मुख्य अडथळा म्हणजे अपुऱ्या शालेय सुविधा (जसे आरोग्यविषयक सुविधा), स्त्री शिक्षकांची कमतरता आणि अभ्यासक्रमातील लैगिंक पक्षपात (बहुतांश स्त्री व्यक्तीरेखांना दुर्बल व असहाय्य समजले जाते.)

१९४७ पासून भारत सरकारने दुपारचे जेवण, मोफत पुस्तके आणि गणवेष यासारख्या कार्यक्रमाद्वारे मुलींच्या शाळेतील हजेरीला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कल्याणकारी जोरामुळे १९५१ ते १९८१ मधील प्राथमिक पटावरील संख्या वाढली. १९८६ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाने प्रत्येक राज्याची सामाजिक चौकट आणि विशालित राष्ट्रीय उददेशानुसार अनुरुप शिक्षणाची पुनर्रचना करण्याचे ठरविले. याने ठासून सांगितले की शिक्षण लोकशाहीसाठी आवश्यक आहे आणि स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी मध्यवर्ती आहे. नवीन धोरण पुनर्रचित पाठाद्वारे (अभ्यासक्रम) सामाजिक बदल, शाळांसाठी वाढीव निधी, शाळांच्या संख्येतील विस्तार आणि धोरणातील सुधारणा यावर लक्ष्य केंद्रित करते. स्त्रियांची व्यावसायिक केंद्रे आणि माध्यमिक शिक्षण; माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण; ग्रामीण व शहरी संस्था यांच्या विस्तारावर जोर दिला गेला. या अहवालाने शाळेतील कमी हजेरी ही गरीबी आणि घरकाम व दिवसा भावंडाची काळजीसाठी मुलींवरील अवलंबीत्व यासारख्या समस्या जोडायचा प्रयत्न केला. राष्ट्रीय साक्षरता मोहिमेने खेडयात स्त्री शिक्षिकांद्वारे सुध्दा कार्य केले. आता जरी मुलींचे किमान विवाहवय १८ असले तरी बऱ्याच मुलींचे खूपच आधी लग्न होतात म्हणून माध्यमिक स्तरावर स्त्रीयांच्या गळतीचा दर उच्च आहे.

ब्रिटीश राज्यापासून पुढे भारतीय प्रजासत्ताकच्या स्थापने पर्यंत १९४७ मध्ये भारतातील स्त्रीयांच्या लोकसंख्येपैकी साक्षर स्त्रियांची संख्या २ ते ६% होती एकत्रित प्रयत्नाने १९६१ मधील १५.३% पासून १९८१ मधील २८.५% पर्यंत सुधारणा घडविली. २०१० पर्यंत स्त्रीयांची साक्षरता स्त्रीयांच्या एकूण लोकसंख्येच्या ५०% च्या पुढे गेली अर्थात ही आकडेवारी जागतिक प्रमाणाशी आणि भारतातील पुरुष साक्षरतेशी सुध्दा तुलना करता अजून सुध्दा खुप कमी आहे. नुकतीच भारत सरकारने स्त्री साक्षरतेसाठी साक्षरभारत मोहिम सुरु केली आहे या मोहिमेचे लक्ष्य स्त्रीयांची निरक्षरता सदय पातळीच्या निम्मे कमी करणे आहे.

## ८.१०. ग्रामीण शिक्षण.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने शिक्षणाला समाज विकासाद्वारे सामाजिक बदल घडवून आण्ण्यासाठीचे परिणामकारक साधन म्हणून पाहिले. प्रशासकीय नियंत्रणाची परिणामकारक सुरुवात १९५० मध्ये झाली आणि १९५२ मध्ये सरकारने खेडयांची समाजविकास विभागाच्या खाली वर्गवारी केली. समाज विकास विभाग हे अधिकारी मंडळ राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अंतर्गत असून ते १०० खेडयातील शिक्षणावर नियंत्रण ठेऊ शकते. एक विभागीय विकास अधिकारी १५० चौरस मैलाच्या क्षेत्रावर ज्यामध्ये ७०००० लोकांची लोकसंख्या सामावलेली असू शकते त्यावर देखरेख करतो सेटट्ी आणि रॉस अशा कार्यक्रमांची भूमिका विषद करतात जे पुढे व्यक्तीगत आधारावर समाज आधारावर किंवा व्यक्तीगत तसेच सामाजिक आधारावर विभागलेले असतात ज्यामध्ये विकासाचा सुक्ष्म स्तर हे खेडयांच्या पातळीवर एका नेमलेल्या कामगाराकडून पर्यवेक्षित केले जातात.

समाज विकास कार्यक्रमात शेती पशुधनविकास, सहाकर, ग्रामिण उद्योग, ग्रामिण अभियांत्रिकी (यामध्ये लघुकालवे, रस्ते, इमारतीचा समावेश होतो), कुटुंबकल्याण, कुटुंबनियोजन, स्त्री कल्याण, मुलांची काळजी व पोषण यांचा समावेश असलेले आरोग्य आणि आरोग्यरक्षण, प्रौढशिक्षण सामाजिक शिक्षण आणि साक्षरता सामावणारे शिक्षण, युवक कल्याण आणि समाज संघटन यांचा समावेश होतो. या प्रत्येक विकासाच्या क्षेत्रात विविध कार्यक्रम योजना व कृती आहेत ज्या बेरजात्मक विस्तारक्षम आणि निमुळते होत जाणारे असून ते सर्व समाज काही भाग किंवा विशिष्ट लक्ष्य असलेली लोकसंख्या जसे छोटे शेतकरी, कारागीर, स्त्रीया आणि दारिद्र्य रेषेखालील सामान्य लोक सामावतात.

काही अडथळे असूनसुध्दा १९५० च्या दरम्यान खाजगी संस्थांच्या पाठींब्यासह ग्रामीण शिक्षण कार्यक्रम चालूच राहिला. गांधीग्राम ग्रामीण संस्थेच्या स्थापनेपर्यंत ग्रामीण शिक्षणाचे पुरेसे जाळे प्रस्थापित झाले आणि ५२०० समान विकास विभाग भारतात स्थापन केले गेले. पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि स्त्रियांसाठी प्रौढ शिक्षण शाळा स्थापिल्या गेल्या. सरकार ग्रामीण शिक्षणाला अशा कार्यक्रमाच्या दृष्टीने पाहते जो तुलनेने सरकारी नोकरशहांच्या संचित कामापासून आणि सर्वसाधारण थंडपणापासून मुक्त राहिल. तथापि, काही बाबतीत आर्थिक अभाव हा भारतातील ग्रामीण शिक्षण संस्थांनी प्राप्त केलेल्या लाभाशी बरोबरी साधतो. भारतातील गरीबांमधील स्विकारार्हता शोधण्यासाठी काही कल्पना अयशस्वी ठरल्या आणि सरकारने केलेली गुंतवणूकीने काही वेळेसे फारच ? परिणाम दर्शविले. आज सरकारी ग्रामीण शाळा अल्पनिधी आणि अल्प कर्मचारी वर्ग असलेल्या राहिल्या आहेत.

बऱ्याच संस्थापना जसे ग्रामीण विकास संस्थापना (हैदराबाद) ही उच्च दर्जात्मक ग्रामीण शाळांची उभारणी करते परंतु त्याचा उपयोग घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या तोकडी आहे.

मुलांची शिक्षण क्षेत्रातील प्रगती ही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि इतर क्षेत्रातील विकासामुळे बऱ्याच उशीरा दृष्टोत्पत्तीस आली. बऱ्याच काळापासून मुलींचे शिक्षण हे राष्ट्रीय आणि राज्य कार्यक्रमांच्या अग्रस्थानी आहेत. प्राथमिक शिक्षण हा संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा अतिशय महत्वाचा भाग आहे. हा तो स्तर आहे जिथे मुल औपचारिक संस्थेत जायला सुरुवात करते आणि त्याचे औपचारिक, शिक्षण सुरु होते आणि याच स्तरावर मुलाची अधिकार बांधणी सुरु होते.

मुलींच्या शिक्षणातील प्रगतीने मूल्यांकन करण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक सहभागाला चालना देण्यासाठी सुयोग्य मध्यस्ती सुचविण्याकरीता वेळोवेळी विशिष्ट कमिशन आणि कमिटी स्थापन केल्या गेल्या. देशाच्या सुनियोजित सामाजिक-आर्थिक विकासाचा अविभाज्य घटक म्हणून मूलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी विविध डावपेच स्विकारले गेले. स्त्रियांची निरक्षरता आणि त्यांच्या प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता आणि टिकाव यातील अडथळे दूर सारण्याला विशिष्ट पाठबळ सेवा, वेळेचे लक्ष्य आणि परिणामकारक देखरेखीद्वारे अत्यंत महत्वपूर्ण प्राधान्य मिळणे सुरु झाले.

प्राचीन भारतात स्त्रियांचे समाजातील स्थान उच्च होते. त्यांना पुरुषांच्या तुलनेत शैक्षणिक संधी पुरविल्या जात होत्या. पडदा, सती, जबरदस्ती विधवेपण आणि बाल विवाहासारखे सामाजिक भस्मासूर समाजात बरेच नंतर घुसडले गेले आणि त्यांच्या दर्जात घसरण सुरु झाली. हे लक्षात घ्यावयास हवे की मुस्लिम राजवटीत मुलींच्या घरातील कुराण पठण शिक्षणाशिवाय तेथे मुलींच्या शिक्षणासाठी संस्था नव्हत्या.

धार्मिक तटस्थतेच्या तत्वप्रणालीमुळे ब्रिटीश मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्यास दिर्घ काळापासून नाखूष होते. स्वातंत्र्यानंतर भारत सरकार द्वारा स्थापित विद्यापीठ शिक्षण कमीशनने स्त्रीयांच्या शिक्षणावर विशेष जोर दिला. शिक्षणसंधींची समानता प्राप्त करण्याकरता अवलंबिलेले मुख्य डावपेच म्हणजे प्रत्येक मुलाला शाळेची सोय उपलब्ध करणे. अशी रचना करण्यात आली की सर्वांसाठी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण पुरवण्याचा भाग म्हणून शैक्षणिक सुविधांचा विस्तार हा स्त्रियांसहित समाजातील कमकुवत गटांना शिक्षण उपलब्ध करेल.

शिक्षणतज्ञ व धोरणकर्त्यांसाठी लैगिंक असमानता ही एक मोठी चिंतेची बाब राहिलेली आहे. भारतातील लैगिंक असमानता ही पुरुष आणि स्त्रियांमधील फरकाच्या दोन मुख्य स्त्रोतांपासून वाढते. १) कमाईक्षमता जी स्त्रीयांना पूर्णपणे पुरुषांवर अवलंबून ठेवते. २) सांस्कृतिक नितीबाह्य गोष्टी आणि परंपरा जी स्त्रीयांची स्वायतत्ता खूपच मर्यादित करतात. अलिकडील स्त्रीया बाहेरील कार्यात त्यांना अधिकाधिक गुंतवून घेत आहेत. शैक्षणिक प्राप्तीच्या वाढीव पातळीमुळे असा सहभाग सुखर केली आहे. हा प्रघात पुढे चालू ठेवण्यासाठी स्त्रीयांच्या शिक्षणाला अधिकाधिक प्राधान्य देऊन स्त्रीयांचे शिक्षण पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे. सुदैवाने समाजातील बदलते वारे हे आता अधिकाधिक स्त्रियांना सक्रीयपणे शिक्षण मिळवणे शक्य करत आहे. आता स्त्रिया माहिती तंत्रज्ञान, विज्ञान आणि अवकाश संशोधन यासारख्या क्षेत्रात व इतर अशाच क्षेत्रात जिथे उच्च कौशल्य गरजेचे आहे तिथे मोठया संख्येने आढळून येतात.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार (NPE) १९८६, भारत सरकारने विविध कार्यक्रम सुरु केले. असाच एक कार्यक्रम म्हणजे महिला समस्या ज्याचा मुख्य जोर हा स्त्रियांच्या सक्षमीकरणावर आहे. हा कार्यक्रम अध्ययन वातावरण निर्मित करण्याचा प्रयत्न करते जेथे स्त्रीया सामुहिक रितीने त्यांच्या क्षमतेची खाली करु शकतील माहिती व ज्ञानाची मागणी करण्याकरता ताकद मिळवतील आणि बदलासाठी पुढे जातील आणि त्यांच्या जीवनाचा ताबा घेतील या दिशेतील इतर पुढाकार म्हणजे खडू फळा मोहिम (OBB), जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (DPEP), शालेय शिक्षण समित्यांची स्थापना, सर्व शिक्षा अभियान (SSA) आणि दुपारचे जेवण योजना इ.

मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी विशेष योजना व कार्यक्रम सुध्दा सुरु केले गेले. फक्त स्त्रीयांसाठी वेगळया संस्था किंवा शाखा उघडणे, उच्च माध्यमिक स्तरापर्यंत आणि बऱ्याच राज्यात विद्यापीठ स्तरापर्यंत सुध्दा मोफत शिक्षण, दुपारचे मोफत जेवण, मोफत पुस्तके, मोफत गणवेश, चांगल्या हजेरीसाठी शिष्यवृत्ती, स्त्रियांचे शिक्षण/साक्षरता इत्यादी मधील चांगल्या कामगिरीसाठी खेडे, विभाग आणि जिल्हयांना सायकली, रोख बक्षिसे यासारख्या सुविधांनी या दिशेने विधायक परिणाम घडवून आणले आहे. भटक्या जाती व भटक्या जमातीतील मुलींना अधिक चांगल्या शाळेतील हजेरीबदद्ल अधिकचे फायदे मिळवतात. घटनात्मक सुविधेखाली संरक्षणात्मक तफावत धोरणाचा परिणाम म्हणून SC व ST मुलींची पटावरील संख्या लक्षणीय वाढली आहे. सध्या अस्तित्वात असलेले कार्यक्रम आणि सरकारच्या वतीने काही पुढकार यामुळे भारतातील बऱ्याच राज्यात मुलींच्या शिक्षणाचा विकास हा मुलांपेक्षा जलद झालेला आहे.

## ८.११. प्रोढ व निरंतर शिक्षण :

NPE मधील ४.१० ते ४.१३ मधील परिच्छेदात आणि कृतीकार्यक्रम १९८६ च्या VII व्या पाठात प्रौढ शिक्षणाचे चित्र उभे केले आहे. वाचणे व लिहीण्याच्या क्षमतेची निर्मिती सुकर करण्याव्यतिरिक्त हे धोरण प्रौढ शिक्षणाला राष्ट्रीय ध्येये जसे गरिबी निर्मुलन राष्ट्रीय ऐक्य, पर्यावरण जतन, लोकांच्या सांस्कृतिक सृजनशीलतेचे उत्तेजन, लहान कुटूंब नमुन्याचे पालन आणि स्त्री समानतेला चालना यांच्याशी जोडते. प्रौढ शिक्षणाला सर्व देशाची जबाबदारी सुध्दा समजले जाते. यात समाजातील सर्व विभाग जसे शिक्षक विद्यार्थी तरुण, नोकरवर्ग, स्वयंसेवी संस्था इ. हे केंद्र व राज्यसरकारे आणि त्यांचे राजकीय पक्ष आणि त्यांच्या समुहसंघटना यांच्या व्यतिरिक्त समाविष्ट आहेत.

NPE च्या समिक्षेसाठी एक समिती स्थापन करण्याचा ठराव पारित केला गेला. या ठरावाने लक्षात घेतले की ''स्वातंत्र्य प्राप्तीपासून सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न केलेले असूनसुध्दा बहुतांश लोक शिक्षणापासून वंचित राहणे चालूच आहे. जेथे शिक्षण हि मानवी विकासाची एक मुलभूत गरज आहे ही सुध्दा एक अत्यंत चिंतेची बाब आहे की जगातील निरक्षर लोकांपैकी ५०% लोक आपले आहेत आणि मुलांच्या मोठया गटाला प्राथमिक शिक्षणाच्या ग्राहय पातळीविना राहवे लागते. सरकार शिक्षणाला एक मानवी अधिकार म्हणून आणि अधिक मानवी व जागृत समाजाप्रती बदल घडवून आणण्यासाठीचे साधन म्हणून उच्च प्राथमिकता देते. शिक्षणाला स्त्रियांना आणि मागासवर्गीय व अल्पसंख्यांकांना समानतेचा दर्जा मिळवण्याकरता परिणामकारक साधन बनवणे गरजेचे आहे. यापेक्षा अधिक म्हणजे शिक्षणाला कार्याभिमुख व रोजगाराभिमुख बनवणे आवश्यक आहे. . . .''

## ८.१२. राष्ट्रीय साक्षरता मोहिम :

धोरणांचा पाठपुरावा करतांना १९८८ मध्ये एक राष्ट्रीय साक्षरता मोहिम स्थापली गेली. या मोहिमेचा जोर हा फक्त संस्थेवर नव्हता तर साक्षरता आकडेमोड कार्यशीलता आणि जाण यांचे विशिष्ट पूर्वलक्षित नमुने आणि घटक प्राप्त करणे यावर होता. या कार्यक्रमातर्गत देशात २,८४,००० केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये अंदाजे ८४ लाख प्रौढ अध्ययनकर्ते सहभागी आहेत. (साधारणतः ३५ लाख पुरुष व ४९ लाख स्त्रिया) साक्षरतेनंतरचे कार्यक्रम पुरविण्यासाठी सुमारे ३०,००० जन शिक्षण निलायमसना मंजुरी देण्यात आली आहे. मे, १९८८ मध्ये, त्या वेळच्या पंतप्रधानांच्या हस्ते NLM अंतर्गत एक समूह चळवळ सुरु करण्यात आली. २४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी त्याच दिवशी आणि त्यानंतर अशाच प्रकारच्या चळवळी सुरु केल्या. या कार्यक्रमाला निधी अभावी मार खावा लागला.

विशिष्ट क्षेत्रात आणि कालावधीत निरक्षरतेच्या संपूर्ण निर्मूलनासाठी योजना आखण्यात आल्या/कार्यान्वित करण्यात आल्या. केरळमधील कोटट्ायम हे १०० दिवसात पूर्ण साक्षर बनले (एप्रिल-जून, १९८९) केरळमधील एर्न्याकुलम जिल्हा हा एक वर्षात पूर्ण साक्षर बनला. (जानेवारी-डिसेंबर १९८९). केरळ,गोवा आणि पाँडिचरीत संपूर्ण साक्षरता चळवळीचे (TLC) प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत. १ मे १९८८ रोजी गुजरात विद्यापीठाने साक्षरता अभियान सुरु केले.

संपूर्ण साक्षरता चळवळ (TLC) आणि साक्षरोत्तर चळवळींनी (PLC) तामिळनाडूतील पुडड्कोटट्ीच्या लोकांचे जीवन अर्थपूर्णरीत्या दर्जेदारपणे बदलविले आहे. राष्ट्रीय अधिवेशनाने २३ जुलै १९९१ रोजी TLC ची स्थापना केली. प्रेरणादायक अवस्थेनंतर हया कार्यक्रमाचा शुभारंभ २ ऑक्टोबर १९९२ रोजी झाला त्यावर्षी TLC अंतर्गत नोंदविलेल्या २९०००० क्षमतेपैकी २५०००० अध्ययनकर्त्यांनी पहिले पुस्तक पूर्ण केले तर २००००० शिकणारांनी दुसरे पुस्तक पुर्ण केले आणि यापैकी १८०००० नी तिसे पुस्तक पूर्ण करुन TLC ची अंतिम पायरी गाठली.

TLC द्वारे या मोहिमेने राष्ट्रीय जागरुकतेचा प्रयत्न केला आहे. आज ती देशातील २०० पेक्षा अधिक जिल्हे व्यापते. केवळ पाच वर्षात ३३ दशलक्ष लोक कार्यात्मक रितीने साक्षर बनवले गेले आहे. या यशाने देशाला आता १०० दशलक्ष लोकांना साक्षर करण्याच्या ध्येयावर आणून ठेवले आहे. TLC ची निर्णायक वस्तुस्थिती ही आहे की हे त्याच्या वाचन, लिखाण आणि आकडेमोड यासारख्या लिखित ध्येयाच्या पलिकडे गेले आणि त्याने लोकांना व खास करुन स्त्रियांना अधिकार बहाल करण्याकडे नेले यापासून त्यांचे अधिकार आणि पुरवल्या जाणाऱ्या सुविधांविषयी त्यांची जाण वाढली. या कार्यक्रमाने नविन आत्मविश्वास दिला व त्यांना रोजगारीसाठी सक्षम बनवले तसेच त्याद्वारे स्वावलंबत्व, आरोग्याचे महत्व आणि मुलांची काळजीसाठी सक्षम बनवले. आजचे चित्र हे कर्नाटकच्या एका TLC कार्यकर्त्याच्या शब्दात सारांश रुपात पुढील प्रमाणे सांगितले जाऊ शकते ''आताचे वातावरण दर्शविते की चळवळीचे खरे पुढारी हे नवसाक्षर स्वतः आहेत. आपले यश यातच दडलेले आहे.''

## ८.१३. अध्ययनाया किमान मर्यादा (MLL):

विकासाचा प्रभाव हा शिक्षणाच्या संख्येसह दर्जात पाहिला जाऊ शकतो. आपल्या शाळांमध्ये पुरविल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जाविषयी खूप मोठया प्रमाणावर चिंता लागून राहिलेली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NPE) १९८६ हे सर्व विद्यार्थ्यांनी अध्ययनाचा किमान दर्जा प्राप्त करण्याच्या गरजेवर जोर देते. अध्ययनाच्या किमान मर्यादेवर (MLL) जोर देण्याची गरज ही दोन मूलभूत चिंतेद्वारे उत्पन्न झाली : (i) प्राथमिक स्तरावरील अतिशय जास्त अभ्यासक्रम आणि अध्ययनाच्या निष्कृष्ट दर्जा. (ii) न्यायाची गरज MLL दृष्टीकोन अध्ययनाची किमान पातळी जी वास्तविकपणे सर्व मुले अलाभार्थी मुले सुध्दा प्राप्त करु शकतात त्यावर जोर देण्याचा प्रयत्न करते. हा प्रयत्न म्हणूनच दर्जा आणि न्याय यांच्या एकत्रिकरणाचा आहे.

- अजून बराच पल्ला गाठायचा आहे. . . . . . .

रेखाटलेले प्रकल्प आणि कार्यक्रम हे भविष्याचे चित्र आहेत. सादर व्हावयाच्या त्यांच्या संधीची अधीरतेने वाट पाहत ते काळाच्या पडदयाआडून हळूहळू उद्‌भवत आहे. उत्कंठित देशाची साक्ष असलेली ही रेखाचित्रे देशाचा जुने मोडकळीत काढण्याचा निर्धार दर्शविते. त्यांचा उददेश हा शिक्षणाच्या स्थितीचे वैभवशाली चित्र रंगविणे असा कमी जरी असला तरी उबरत्या चित्राला सूचना प्रदान करणे असा जास्त आहे. भारताला एक संपूर्ण साक्षर समाजात रुपांतरीत करण्याच्या चळवळीत पुढकार घेणारे जे कलाकार आहेत त्यांना अभिवादन म्हणजे आतापर्यंत गाठलेल्या पल्ल्यांची एक आठवण आहे. सर्वांसाठी शिक्षणाच्या खडबडीत रस्त्यावर फक्त अर्धे अंतर पार करणे हे एक संपादन आहे आणि काही झाले तरी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. . . . .

**समीक्षा अभ्यास :**

चुकीचा पर्याय निवडा :

१) यु.एस. वाणिज्य विभागाच्या १९९८ च्या अहवालानुसार भारतातील स्त्रियांच्या शिक्षणातील प्रमुख अडथळा म्हणजे. . . . . . .

(a) अपुऱ्या शालेय सुविधा (b) स्त्री शिक्षिकांची कमतरता

(c) स्त्रियांची शिक्षणातील नावड (d) अभ्यासक्रमातील लैगिंक पक्षपात.

२) प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाच्या एकूण संरचनेचा एक महत्वाचा भाग बनतो कारण याच स्थितीला. . . . . . .

(a) मूल औपचारीक संस्थेत जायला सुरुवात करते.

(b) औपचारीक शिक्षणाची सुरुवात होते.

(c) मुलाची अधिकार बहालिची क्रिया वाढायला सुरुवात होते.

(d) दुपारचे जेवण सुरु होते.

३) भारतातील ग्रामीण शिक्षण संस्था मुख्यतः . . . . . . . . . मुळे अयशस्वी झाल्या.

(a) कमी निधी व अपूरा कर्मचारी वर्ग.

(b) भारतातील गरीब लोकांची काही कल्पना व स्विकारण्याची प्रवृत्ती.

(c) सरकारी गुंतवणुकीने काही वेळेला ? परिणाम दर्शविले.

(d) सक्रीयपणे बांधलेल्या उच्च दर्जेदार ग्रामीण शाळा.

४) राष्ट्रीय साक्षरता मोहिमचा जोर हा . . . . . . . वर आहे.

(a) लोकशाही (b) साक्षरता (c) क्रियाशीलता (d) जाण.

५) साक्षरता चळवळीच्या यशाचे कारण म्हणजे. . . . . . . . .

(a) हे त्याच्या वाचन, लिखाण आणि आकडेमोड यासारख्या लिखित ध्येयाच्या पलिकडे गेले.

(b) त्याने लोकांना आणि खास करुन स्त्रियांना अधिकार बहाल करण्याकडे नेले.

(c) या चळवळीचे पुढारी हे नवसाक्षर स्वतः आहेत.

(d) सरकारने भरपूर निधी पुरविला.

६) अध्ययनाच्या किमान मर्यादेवर जोर देण्याची गरज ही . . . . . . . या मूलभूत चिंतेद्वारे उत्पन्न झाली.

(a) अवाजवी अभ्यासक्रम (b) पाठयपुस्तकांची कमतरता.

(c) प्राथमिक स्तरावरील अध्ययनाचा निकृष्ट दर्जा (d) न्यायाची गरज.

## ८.१४. विकासाचा उच्च शिक्षणाच्या शैक्षणिक फलनिष्पत्तीवरील परिणाम :

मनुष्यबळ विकास हा उच्च शिक्षणाचा मुख्य जोर देण्याचा विषय नेहमीच राहिलेला आहे. उच्च शिक्षणाची प्राथमिक वाढीची अवस्था वसाहतवादाशी संबंधित आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच राज्याने शिक्षणाला सामाजिक विकासाचे साधन म्हणून प्रात्साहन दिले. तेव्हापासून आपली वाढ ही खरोखरीच लक्षणीय राहिली आहे. विद्यापीठ स्तरीय संस्थांची संख्या ही १९४७ मधील १८ पासून २००४ मधील ३०७ पर्यंत वाढली. विद्यार्थी संख्या नोंदणी ही १९४७ मधील २,२८,८०४ पासून २००३ मधील ९४,६३,८२१ पर्यंत अशी लक्षणीय वाढली. उच्च शिक्षणांतर्गत पायाभूत मांडणीतील वाढ ही जगात यु.एस.ए. खालोखाल दुसरी सर्वात मोठी अशी आहे. तरीही ती लोकसंख्येच्या फक्त ७% सामावते जी विकसनशील देशांपेक्षासुध्दा कमी आहे जसे इंडोनेशिआ (११%), ब्राझील (१२%) आणि थायलंड (१९%). विकसित देशात जसे यु.एस.ए., कॅनडा, ऑस्ट्रेलिया (> ८०%) आणि फिनलँड(> ७०%), शेकडा अधिक लोकसंख्या ही उच्च शिक्षित असल्याचे आढळते.

कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी प्रचंड वाढत आहे. आणि अशा प्रकारे आयोजक व शिक्षणतज्ञ उच्च शिक्षणाला पात्र उमेदवारांच्या वर्गवारी करण्याच्या तात्काळ समस्येला तोंड देत आहेत. शिक्षणावरील अधिक जोराने शाळा व कॉलेज स्तरावरील विद्यार्थी

संख्या वाढविली आहे. परंतु विद्यार्थ्यांचा दर्जा आणि शिक्षणविषयक नोंदीचा दर्जा हा घसरण दर्शवितो. UGC (१९९६) ने सुध्दा नोंदविले आहे की अयोग्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणे हे प्रत्येक बाबतीत खर्चिक आहे.

## ८.१५. भारतातील उच्च शिक्षणातील दर्जा.

सातव्या योजनेत दर्जातील वाढ व दृढीकरण ही उच्च शिक्षण क्षेत्रातील मुख्य चिंतेची बाब राहिलेली आहे. १९९१-९२ मधील विद्यार्थी नोंदणी ही ४४.२५ लक्ष होती. त्यापैकी ३६.९३ लक्ष सदस्य महाविद्यालयात आणि ७.३२ लक्ष विद्यापीठ विभागात होते. एकूण स्त्री विद्यार्थी संख्या १४.३७ लक्ष (३४.२%) आणि SC/ST विद्यार्थी १०% होते. विद्यार्थी नोंदणीतील वाढ १९८५-८६ पर्यंत प्रतिवर्षी ५% होती जी १९८६-८७ पासून पुढे जवळपास ४.१% पर्यंत कमी झाली. एकटया इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातील (IGNOU) नोंदणी एक लाख विद्यार्थ्यांपेक्षा जास्त होती.

उच्च शिक्षणाच्या विकासाकरीता NPE ने पुढील सुचना सुचविल्या आहेत. (१) स्वायत्त विद्यापीठ विभाग व महाविद्यालयांची निर्मिती (२) उच्च शिक्षणाची राज्य परिषद (३) संशोधनासाठी वाढीव पाठबळ (४) मुक्त विद्यापीठे व दूर शिक्षणाचे मजबुतीकरण (५) अस्तित्वात असलेल्या संस्थांचे दृढीकरण आणि शिक्षक व अध्यापनाच्या दर्जातील सुधारणा (६) नोकरीपासून पदवीला तोडण्याचे तंत्र (७) ग्रामीण विद्यापीठाच्या नवीन नमुन्यांची स्थापना आणि (८) सर्व क्षेत्रातील उच्च शिक्षणाला सामावणाऱ्या शिखर समितीची स्थापना.

तसेच शैक्षणिक कर्मचारी महाविद्यालय योजनेंतर्गत नवीन भरती झालेल्या आणि महाविद्यालय व विद्यापीठात सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी ४८ शैक्षणिक कर्मचारी महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. ज्यांनी ४६४ मार्गदर्शन व स्मृतींना उजाळा देणारे अभ्यासक्रम आयोजित केले ज्यामध्ये डिसेंबर १९९१ पर्यंत १२,९७० शिक्षक सामावले. UGC ने सर्वसामान्य विकास कार्यक्रम आणि विशिष्ट कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ३००० पेक्षा जास्त महाविद्यालयांना सहाकार्य करण्याशिवाय केंद्रीय विद्यापीठे आणि ९५ राज्य विद्यापीठे यांना विकास अनुदान पुरविले. सुमारे २९५ विभागांनी वेगवेगळया कार्यक्रमाखाली जसे प्रगत अभ्यासाची केंद्रे (CAS) विशिष्ट सहकार्य विभाग (DSA) आणि विभागीय संशोधन पाठबळ विशेष सहाकार्य स्विकारले. विज्ञान व तंत्रज्ञानातील पायाभूत मांडणीच्या समन्वयित मजबूतीकरणाच्या कार्यक्रमांतर्गत ११२ विभागांना सहकार्य केले गेले, शैक्षणिक प्रसारणासाठी UGC ने ७ दृकश्राव्य संशोधन केंद्रे आणि ७ शैक्षणिक प्रसार माध्यम संशोधन केंद्रे ही सॉप्टवेअर निर्मितीसाठी स्थापन केली. जवळजवळ २३३२ कार्यक्रम ज्यांना लोकप्रियतेने कंट्रीवाईड क्लासरुम प्रोगाम्स् असे संबोधले जातात निर्मित केले गेले. एक नवीन संघटना जिला शिक्षण व दळणवळणाचा अंतर विद्यापीठीय संघ संबोधले जाते. स्थापन केली गेली. SC/ST उमेदवारासाठी शिक्षक शिष्यवृत्ती आणि संशोधन शिष्यवृत्ती आणि अल्पसंख्यांकाच्या समावेशासह दुर्बल घटकांसाठी उपचारात्मक अध्यापन यासारखे कार्यक्रम चालू ठेवले. UGC ने ११० विद्यापीठांना आणि १२१६ महाविद्यालयांना सूक्ष्म/विशाल संगणकीय पध्दतीच्या स्थापनेसाठी सहकार्य पुरविले. इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या जोडीने (DOE) संगणक विज्ञानमधील बरेच अभ्यासक्रम राबवले गेले. एक माहिती व वाचनालय जाळे याला ''INFLIBNET'' म्हटले जाते तो सुचविलेला आहे.

सर्वसामान्य संशोधन सुविधा आणि उच्च दर्जात्मक सेवा पुरविण्याच्या दृष्टीने केंद्रकीय विज्ञान, खगोलशास्त्र, ॲस्ट्रोफिजिक्स आणि अणूऊर्जा मधील आंतरविद्यापीठीय केंद्रे स्थापली गेली.IGNOU ने मार्च १९९२ पर्यंत १.६४ लक्ष नाव नोंदणी करुन स्त्रिया, मागासलेलया भागातील आणि डोंगराळ प्रदेशातील लोक यासारख्या अलाभार्थी गटाच्या अध्ययन कर्त्यांना संधी प्रदान करुन उच्च शिक्षणाची व्याप्ती विषालीत केली. भारतीय समाजशास्त्र संशोधन परिषद (ICSSR) भारतीय ऐतिहासिक संशोधन परिषद (ICHR) भारतीय तत्वज्ञान संशोधन परिषद ICPR यांनी सुध्दा त्या त्या संबंधित क्षेत्रातील संशोधनाला पाठबळ देणाऱ्या त्यांच्या कृती चालू ठेवल्या. अशाप्रकारे उच्च शिक्षण क्षेत्रातील सैध्दांतिक सुधारणा घडवून आणल्या आहेत.

तरीसुध्दा सध्याच्या उच्च शिक्षणात बऱ्याच कमतरता आहेत. जसे कमी दर्जाच्या संस्थामधील वाढ, शैक्षणिक वेळापत्रक पाळण्यातील अपयश, नियमबाहय अभ्यासक्रम, शिक्षणाच्या दर्जातील तफावत आणि संशोधनसाठी पुरेशा पाठिंब्याचा अभाव उच्च शिक्षणाच्या भावी सुचना विचारात घेण्याकरता नियोजन समितीने आयोजित केलेल्या विचारमंथन अधिवेशनाने खालील क्षेत्रांवर जोर दिला आहे.

१) उच्च शिक्षणाचा एकत्रित दृष्टीकोन, २) उच्च शिक्षणातील उत्कृष्टता, ३)शिक्षणाचा न्याय आणि किफायतशीर विस्तार, या प्रक्रीयेत उच्च शिक्षणपध्दतीला आर्थिक दृष्टया स्वयंपाठबळ मिळवणे, ४) बदलत्या सामाजिक आर्थिक चित्राच्या संदर्भात उच्च शिक्षणाला अनुरुप बनवणे, ५) मूल्य शिक्षणाची बढती आणि विद्यापीठातील व्यवस्थापन पध्दतीचे मजबूतीकरण.

१) उच्च शिक्षणात समाविष्ट सर्वसाधारण, तांत्रिक, वैद्यकीय आणि शेतकी शाखा आणि जे रचना व धोरणांच्या संदर्भात विखुरलेले आहे त्याच्यात उच्चसंगती आणण्याकरता, NPE ने राष्ट्रीय उच्च शिक्षण परिषदेची (NCHER) स्थापना, जी आता अंतिम टप्प्यात आहे, तिचा विचार केला. यामुळे सुविधांचे जाळे व सहभाग आणि शिक्षक प्रशिक्षण/मार्गदर्शन सुविधा समाविष्ट असलेले मनुष्यबळ विकासाची खाली होईल.

२) उच्च शिक्षणातील उत्कृष्टता वाढण्यासाठी बरीच परिणामे योजली गेली आहे. राष्ट्रीय अधिकृत परिषद (NAC) स्थापली गेली सध्या अस्तित्वात असलेले CAS/DAS, COSIST आणि IUCES नियोजित INFLIBNET असे कार्यक्रम सुरु ठेवण्याशिवाय जैवतंत्रज्ञान, वातावरणीय विज्ञान यासारख्या उबरत्या क्षेत्रातील सुविधा पुरविण्यासाठी नविन आंतरविद्यापीठीय केंद्रे स्थापण्यात आली सर्व शाखांसाठी नमुना अभ्यासक्रम आधीच तयार करण्यात आलेला आहे. भारतीय विद्यापीठे आणि महाविद्यालयातील विज्ञानातील निम्न पदवी अभ्यासक्रम आणि गणिताचे अध्यापन सुधारण्यासाठी समितीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाणार होती.

३) उच्चशिक्षणात नोंद केलेल्या ४४.२५ लक्ष विद्यार्थ्यांची क्षमतेच्या त्यांना प्रौढ साक्षरता, निरंतर शिक्षण, लोकसंख्या शिक्षण आणि इतर विधायक कृती अशा कार्यक्रमात सक्रीयपणे गुंतवून, वापर करावयास हवा ८ व्या योजनते ९५ विद्यापीठे आणि २५०० महाविद्यालये समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या विस्तार कृतींचा प्रसार करावयास हवा.

४) असा अंदाज आहे की तेथे अधिकचे १० लक्ष विद्यार्थी असतील ज्यापैकी ९००००० हे निम्न पदवी स्तराचे असतील. संघ स्त्रोतांची पिळवणूक लक्षात घेऊन, उच्च शिक्षणातील हा विस्तार

न्याय्य आणि किफायतशी पध्दतीने जुळवून घ्यावयास हवा यासाठी मुख्यत्वेकरुन दूरशिक्षण पध्दतीचा मोठया प्रमाणावर विस्तार करावयास हवा आणि उच्च शिक्षण हे लोकसंख्यंया मोठया भागाला आणि श्वास करुन अलाभार्थी गट जसे स्त्रिया आणि मागासलेल्या व डोंगराळ भागातील लोक यांना पुरवून आणि संसाधन निर्मितीची परिमाणे वापरुन हे शक्य करावे. मुक्त विद्यापीठांनी ग्रामीण भागातील शिकणाऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रौढ अध्ययनकर्त्यांना व्यावसायिक स्वरुपाचे कार्यक्रम सुरु करावे. तथापि शिक्षणाच्या दर्जाची कुठल्याही किंमतीवर तडजोड केली जाऊ नये. फीमधील वाढीला परवानगी दिली जाऊ शकते परंतु त्याच त्याच वेळेस ती जबर असू नये. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्जे आणि SC/ST व दारिद्र्रेषेखालील विद्यार्थ्यांना आर्थिक सहायता उपलब्ध करण्याची सोय आहे.

५) नियोजन समितीने शिक्षणातील मूल्य शिक्षणासाठी एक मध्यवर्ती गट स्थापिला आहे. या गटाच्या सूचना हया मानव संसाधन विकास मंत्रालय, UGC, भारतीय विद्यापीठ संघटना (AID) आणि NCERT च्या सल्ल्याने अंमलबजावणीसाठी विचारात घेतल्या जातात.

६) विद्यापीठ पध्दतीच्या व्यवस्थापनेचे आधुनिकीकरण आणि पुनर्रचना ही सुध्दा योजलेली आहे. महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या स्वायतत्तेच्या कार्यक्रमांना सुध्दा उत्तेजन दिले आहे. विद्यापीठातील व महाविद्यालयातील संशोधन सुविधेसह इतर सुविधा हयाचे दृढीकरण व मजबुतीकरण केले जाईल.

पुढे असे ठरविण्यात आले की ICSSR, ICHR, ICPR आणि भारतीय प्रगत अभ्यास संस्था (IIAS), शिमला यांच्या संशोधन कृतींना आंतरशाखीय संशोधनाच्या वाढीसाठी विशेष लक्ष पुरविले जाईल असे सुध्दा ठरविण्यात आले की कला शाखेत अभ्यासवायच्या विषयातील संशोधनाला पाठिंबा देण्यासाठी पाऊले उचलली जातील. जे सध्या दुर्लक्षिलेले आहे.

नोकरी करण्यासाठी पदवी तोडण्याच्या दृष्टीने NPE ने राष्ट्रीय चाचणी सेवा (NTS) स्थापन करण्याचे चित्र पाहिले. हे ऐच्छिक आधारावर चाचणी घेते जेणेकरुन विशिष्ट नोकरीसाठी उमेदवाराची योग्यता पडताळली जाईल. ज्यामध्ये देशभरातील तौलानिक लायकीचा नमुना समाविष्ट असेल.

''बऱ्याच भागात आपली विद्यापीठ पध्दती ही नादुरुस्त अवस्थेत आहे. . . . . देशातील जवळजवळ अर्ध्या जिल्हयात उच्च-शिक्षणातील नावनोंदणी ही अत्यंत कमी आहे. आपली जवळजवळ ⅔ विद्यापीठे आणि ९०% महाविद्यालये हे दर्जात्मक परिमाणानुसार सरासरीपेक्षा कमी आहेत. . . . .मला चिंता आहे की बऱ्याच राज्यात विद्यापीठातील नेमणूका, कुलगुरुंच्या समावेशासह राजकारणाने प्रेरित आहेत आणि जाती-जमातीच्या विचारांना बळी पडलेले आहे. तसेच तेथे पक्षपातीपणा आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी आहे''- पंतप्रधान मनमोहन सिंग, २००७.

सध्याच्या स्पर्धात्मक वातावरण विद्यार्थ्यांना यांच्या विशेष क्षेत्रातील फक्त पुरेसे ज्ञान आणि आकलनच पाहिजे असे नव्हे तर स्पर्धात्मक प्रवाहाला तोंड देण्यासाठी आंतरव्यक्तीय आणि दळणवळण कौशल्य सुध्दा हवे. सध्याचे युग हे GOLIT च्या जाळायत अडकलेले आहे जेथे जागतिकीकरण, मुक्तबाजार अर्थव्यवस्था, उदारमतवाद आणि आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान हे

जगाच्या भविष्यकालीन प्रवाहाला दिशा देते. उभरत्या समाजाचे दुसरे लक्षणीय वैशिष्टय हे जोरातील बदल असावयास हवे-दिग्दर्शित अध्ययन ते स्वयंप्रेरित अध्ययन.

विद्यार्थी तसेच पालक आता उच्च शिक्षणाच्या दर्जाबदद्ल अधिकाधिक जागरुक आहेत. ते आता अगदी योग्य प्रकारे अभ्यासक्रमाचा दर्जा, शैक्षणिक वाटप, जीवन भराच्या अध्ययनासाठी अध्ययन वातावरण सुगमता आणि ज्ञानाच्या सुधारणेबदद्ल प्रश्न विचारतात.

१० व्या योजनेच्या दरम्यान UGC ने राष्ट्रीय स्तरावर ४७ महाविद्यालये निवडले आणि उत्कृष्टतेच्या क्षमतेसह महाविद्यालयांना ओळखले आणि उच्च शिक्षणाच्या विकासासाठी त्यांना प्रत्येकाला १ कोटी रुपये अनुदान दिले. त्याचप्रकारे विद्यापीठांना निवडण्यात आले आणि त्यांना उत्कृष्टतेच्या क्षमतेसह विद्यापीठाची मान्यता दिली. आणि प्रत्येकाला ३० कोटी रुपये अनुदान दिले. त्यापैकी मुंबई विद्यापीठ हे एक आहे. सध्या उच्च शिक्षण विभाग आव्हानात्मक वातावरणाला तोंड देत आहे.उत्कृष्टतेसाठीची स्पर्धा जलद कमी होत आहे. सध्याची औपचारीक अधिकृत पध्दती जी विविध मंडळे आणि परिषदाद्वारे कार्यान्वित आहेत ती दर्जात्मक पध्दतीच्या गरजांच्या अंमलबजावणीसाठी नक्कीच पाया प्रदान करते यात शंका नाही.

## ८.१६. उच्च शिक्षण आणि सामाजिक नितितत्वे :

उच्च शिक्षण हे कदाचित बदलांचे सर्वात वाईट मुळ कारण आहे आणि ते आपल्या काळाच्या आव्हानांना प्रतिक्रीया देण्यास अयशस्वी ठरले आहे. सामाजिक समर्पकतेशी याचा खूप संबंध आहे आणि विद्यापीठाची पदवी ही फक्त शिक्षित बेरोजगाराच्या सध्याच्या तांडयात भर घालते म्हणून प्रश्न उभा राहतो की उच्च शिक्षणाची भुमिका काय असावी जेणेकरुन संपूर्ण शिक्षण पध्दती ही सध्याच्या राजकीय आणि सामाजिक मुद्यांना अधिक प्रतिक्रीयाशील होईल आणि लोकाभिमुख पध्दती बनू शकेल.

राजकीय स्तरावर शाळा आणि विद्यापीठे ही राजकीय सामाजिकरणाच्या महत्वाच्या मध्यस्थ संस्था आहेत ज्या राजकीय पध्दती मजबूज करण्याप्रती वळविलेल्या प्रवृत्ती व मुल्ये वाढवतात परंतु महाविद्यालय आणि विद्यापीठे सुध्दा दिलेल्या भ्रष्टाचार व अपराधीपणाच्या पातळीसाठी त्यांच्या क्षेत्रातील राजकारणाच्या प्रवेशाच्या विरुध्द आहे. विद्यार्थ्यांचे राजकारण पूर्णतः लोकशाही पध्दतीने असावे यात वाईट काहीच नाही कारण यामुळे त्यांना भविष्यात जबाबदार नागरीक म्हणून लोकशाही कार्यप्रणालीचा जबरदस्त आधार मिळेल. परंतु कटू वस्तुस्थिती हि आहे की राजकीय पक्ष हे अध्ययनाच्या मंदिरांना त्यांच्या संकुचित, स्वार्थी कायदयासाठी वापरत आहेत.उच्चशिक्षण हे नक्कीच आता बदलाच्या उंबरठयावर येऊन ठेपले आहे. अध्ययनाच्या संस्था म्हणून उच्च शिक्षणाचा पूर्वीचा दृष्टीकोन हा झपाटयाने जागतिकीकरणाच्या दडपणाच्या प्रभावाखाली बाजारातील उपयुक्त वस्तुच्या पातळीत बदलत आहे. म्हणून उच्च शिक्षणासह संपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अत्यावश्यक घटक म्हणून आपल्या पारंपारिक बाहय मुल्यांची जपणूक ही तातडीची गरज आहे.

## ८. १७. भारत आणि उच्च शिक्षण :

आज जगातील जवळजवळ सर्वच देश उच्च शिक्षणाची जबाबदारी अंशतः तसेच पूर्णतः राज्याशी संबंधित धरतात. पुढे जाऊन असेही सांगता येऊ शकते की बहुतांश विकसनशील देशात उच्च शिक्षणाला सार्वजनिक मदतीद्वारे मोठया प्रमाणावर अर्थसहाय्य दिले जाते.

उच्च शिक्षणावरील राज्यांची जबाबदारी ही फार मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. मूलभूत पायाभूत मांडणीसुध्दा त्याच प्रमाणात वाढली आहे - ७५० पासून ११८३१ महाविद्यालये, २५० विद्यापीठे आणि संगणक उपयोजनाच्या प्रभुत्वावरील (MCA), अभ्यासक्रम प्रदान करणाऱ्या ७२९ संस्था, MBA अभ्यासक्रमासाठी ८२० अधिकृत व्यवस्थापन संस्था आहेत. १९५०-५१ मध्ये १,७४,००० विद्यार्थ्यांना सामावणारी २७ विद्यापीठे होती. परंतु २००२-०३ च्या अंतापर्यंत ९२,२७,८३३ विद्यार्थ्यांना सामावणारी १६ केंद्रीय विद्यापीठे, ११३ राज्य विद्यापीठे आणि १५,४३७ संलग्न महाविद्यालये होती. भारतातील उच्च शिक्षण नियमित आणि दूर शिक्षणाने बनलेले आहे. भारतातील उच्च शिक्षणाच्या वाढ व विकासासाठी केंद्र व राज्य सरकारे जबाबदार आहेत. UGC ही केंद्र व राज्य सरकारे आणि भारतातील विद्यापीठे यामधील संबंधी म्हणून कार्य करते. २००४-०५ वर्षाकरीता उच्च शिक्षणावरील केंद्र व राज्य सरकारी खर्च खालील तक्यात नमुद केला आहे.

- भारतातील उच्च शिक्षणावरील सरकारी खर्च (२००४-०५) कोटी रुपयात.

| सरकार | महसूल | भांडवल | एकूण |
|---|---|---|---|
| केंद्र | ११९१४१<br>(१९.३२) | ----- | ११९१४१<br>(१९.१५) |
| राज्य | ७९९१३<br>(८०.६८) | ८६६ | ८०७९६<br>(८०.८५) |
| एकूण | ९९०५५<br>१००.०० | ८६६ | ९९९३७<br>१००.०० |
| शेकडा GDP | ३.१९ | ०.०३ | ३.२२ |

**स्त्रोत :** बिझिनेस लाइन डेली. दि. ८/११/२००५ (कंसातील संख्या संबंधित एकूण राशीशी असलेली टक्केवारी दर्शविते.) उच्च शिक्षणावरील केंद्र व राज्य सरकारचा दोन्हींचा खर्च हा GDP च्या फक्त ३.२२ टक्के आहे. हे दर्शविते की भारतातील उच्च शिक्षणावरील गुंतवणूक कमी आहे.

## ८.१८. भारतातील खाजगीकरण आणि उच्च शिक्षण :

उच्च शिक्षणातील राष्ट्रीय स्तरावरील अलिकडील प्रघात म्हणजे सध्याच्या विद्यापीठ शिक्षण पध्दतीत अनधिकृतपणे फेरबदल करणे. सरकारने फक्त UGC च नव्हे तर सर्वच केंद्रीय

शिखर संस्था जसे अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (AICTE), भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय दंतवैद्यकीय परिषद, शिल्पकला परिषद, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) आणि इतर ज्या आपल्या उच्च व तांत्रिक शिक्षणाचा पायाभूत दगड आहेत त्यांच्या बदली राष्ट्रीय उच्च शिक्षण आणि संशोधन परिषद (NCHER) स्थापन करण्याची कल्पना पुढे आणली आहे.

## ८.१९. उच्च तांत्रिक शिक्षण :

२००८ पर्यंत भारताच्या माध्यमिकोत्तर हायस्कूल फक्त ७% भारताच्या महाविद्यालयीन वयाच्या लोकसंख्येला पुरेशा जागा प्रदान करत होत्या तर राष्ट्रभरात २५% अध्यापन जागा रिक्त होत्या आणि ५७% महाविद्यालयीन प्राध्यापक पदव्युत्तर किंवा Ph.D. पदवी विना होते. २००७ पर्यंत भारतात १५२२ पदवी देणारे अभियांत्रिकी महाविद्यालये होती ज्याची वार्षिक विद्यार्थी क्षमता ५,८२,००० होती आणि यासोबत १२४४ पॉलिटेक्निक्स् ज्यांची वार्षिक क्षमता २,६५,००० होती. तथापि, या संस्थांमध्ये शिक्षकांची कमतरता होती आणि शिक्षणाच्या दर्जावर चिंता उत्पन्न केली गेली आहे.

शिक्षकांच्या जबाबदारी व शैक्षणिक गुणवत्तेविषयी सर्वसाधारण आरोप आहेत जे काही प्रमाणात सत्य आहेत. केंद्र सरकार व UGC आकर्षक व योग्य पगार देऊन आणि काही प्रमाणात संघटीत संस्थामधील नोकरदारांपेक्षा अधिक चांगल्या सेवा शर्ती देऊन बुध्दिमता आकर्षित करण्याचा व अध्यापनाचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न करत आहेत. बरीच सरकारे या बाबतीत सुस्त आहेत आणि राज्य सरकारांकडून त्यांची अंमलबजावणी करण्यास विरोध व टाळाटाळ होते.

व्यवस्थापन शिक्षणासह तांत्रिक शिक्षण हे विविध आर्थिक क्षेत्राच्या विकास कार्यासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळ निर्मितीचे एक सक्षम साधन आहे. तांत्रिक शिक्षण हे बांधकाम, वाचनालय, प्रयोगशाळेतील उपकरणे यांची उच्च किंमत आणि नष्ट होण्याचा उच्च दर दर्शविते. गुंतवणुकीकडे अत्यावश्यक गुंतवणूक जी समाजाला बहुमुल्य परातावा देईल आणि सामाजिक-आर्थिक विकासात हातभार लावणारी म्हणून पाहावयास हवे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की अशा प्रकारची गुंतवणुक घडून येत नाही आहे.

सरकार सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत मांडणीच्या सोईच्या दृढीकरणासाठी व अत्युकृष्ट उपयोगासाठी, त्यांच्या उन्नती व आधुनिकीकरणासाठी, निर्णायक क्षेत्रे ओळखणे आणि अभियांत्रिकी व तंत्रज्ञानाच्या नवीन क्षेत्रातील पायाभूत मांडणीची निर्मिती एकूणच पध्दतीचे परिणामकारक व्यवस्थापन आणि तांत्रिक शिक्षण व इतर विकास क्षेत्रे यामधील संस्थात्मक जुळणी यासाठी पाऊले उचलत आहे.

तांत्रिक शिक्षणाच्या जोमदार क्षेत्रीय कार्यक्रमांतर्गत तंत्रज्ञानाच्या निर्णायक क्षेत्रातील सोईसुविधा वाढविण्यासाठी ५१० प्रकल्पांना सहाय्यता म्हणून ५३.४३ कोटी रु.चे अनुदान दिले आहे. उभरत्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील पायाभूत मांडणीच्या निर्मितीसाठी दुसऱ्या ६८५ प्रकल्पांना ७६.८४ कोटी रु. अनुदानाच्या स्वरुपात तर नवीन तंत्रज्ञानासाठी इतर २०२ प्रकल्पांना २७.१ कोटी रु. अनुदानाच्या स्वरुपात सहाय्यता केली आहे.

## ८.२०. निरंतर शिक्षण :

NPE च्या अंमलबजावणीचा भाग म्हणून खालील नवीन योजना सुरु केलेल्या आहेत.

ही योजना उद्योगांच्या गरजेसाठी योग्य अशा अभ्यासक्रम आणि साधन साहित्याच्या गठठ्याची तयारी आणि प्रसार यांचा विचार करते. ५ भारतीय तंत्रज्ञान संस्था (ITI), ४ तांत्रिक प्रशिक्षण संस्था (TTTI), १ भारतीय तांत्रिक शिक्षण संस्था (ISTE), ४ अभियांत्रिकी महाविद्यालये/विद्यापीठ विभाग आणि ४ पॉलिटेक्निक्स् यांची अंमलबाजवणी केलेल्या या योजनेंतर्गत ३०,००० पेक्षा जास्त कार्यकारी व्यावसायिकांनी प्रशिक्षण घेतलेले आहे.

- **संस्था-उद्योग ताळमेळ (इंटरॅक्शन) :** या योजनेंतर्गत उद्योगांशी ताळमेळ (अन्योन्य क्रिया) साधण्यासाठी २१ अभियांत्रिकी महाविद्यालये आणि ११ पॉलिटेक्निक्स्चे प्रस्ताव पारित करण्यात आले आहेत.

  तांत्रिक शिक्षणातील संशोधन आणि विकास : या योजनेंतर्गत १२६ R & D प्रकल्पांना सहाय्य देण्यात आले आहे.

- **नवीन परिणाम :** मागील चार दशकात, देशात तांत्रिक शिक्षणाचा सैध्दांतिक विस्तार घडून आला आहे. तरीसुध्दा तांत्रिक शिक्षण क्षेत्र हे काही गंभीर समस्यांनी ग्रस्त आहे असे अपूऱ्या पायाभूत मांडणीच्या सुविधा, पात्र शिक्षकांची कमतरता, संस्थेमधील न भरलेल्या जागा, संशोधन व विकास (R & D) सुविधांचा अभाव, संख्यात्मक विस्तारामुळे दर्जात्मक घसरण, पारंपारिक अभ्यासक्रम ज्यामुळे बेरोजगार व अल्परोजगार परिणत होतो. अमान्यताप्राप्त फोफावणाऱ्या संस्थांमधील परिस्थितीतर बदतर आहे. एक संबंधित बाब म्हणजे ब्रेन-ड्रेन (बुध्दीमान व्यक्ती परदेशात जाणे). अजून एक गंभीर समस्या म्हणजे TEIs आणि उपभोक्ता कार्यालये यांच्यामधील जुळणी व ताळमेळाचा अभाव.

वर नमुद केलेल्या समस्या सोडविण्यासाठी खालील क्षेत्रावर जोर देण्यात येत आहे.
१) पायाभूत मांडणीच्या सोईंचे आधुनिकीकरण आणि उन्नती
२) तांत्रिक व व्यवस्थापन शिक्षणातील दर्जात्मक सुधारणा
३) नवीन उद्योग धोरण आणि R & D प्रयोगशाळा ताळमेळ यास प्रतिसाद
४) संसाधनांची जमवाजमव.

केंद्र सरकारने जागतिक बँकेच्या सहकार्याने एक प्रचंड प्रकल्प सुरु केलेला आहे ज्यामुळे राज्य सरकारला १९९० ते १९९९ या कालावधीसाठी त्यांच्या पॉलिटेक्निक्सना त्यांच्या क्षमता, दर्जा आणि कार्यक्षमताची उन्नती शक्य होईल.

तंत्रज्ञान क्षेत्राच्या सुधारणेसाठीचा दुसरा पुढाकार म्हणजे तंत्रज्ञान माहिती अनुमान आणि मुल्यांकन परिषदेची (TIFAC) स्थापना याच्या उददेशात सध्याच्या तंत्रज्ञानाचे मुल्यमापन, तंत्रज्ञान अनुमान अहवालाची तयारी आणि भविष्यातील मालमत्ता व सेवेच्या संभव्य मागणीच्या स्वरुप व राशीचा अंदाज यांचा समावेश होतो. विद्यापीठ-उद्योग परस्परोपकारी सहजीवन

प्रतिक्रती तयार करण्यासाठी योजना पुढे मांडण्यात आल्या याचे मुर्त स्वरुप जवाहरलाल नेहरु तंत्रज्ञान विद्यापीठ, हैद्राबाद या स्वरुपात दिसत आहे. नविन उद्योग धोरणाने एक वातावरण निर्मिती केली आहे ज्यात IITs नी सध्याच्या व भविष्यातील तंत्रज्ञान विकासात नेतृत्व म्हणून नविन भुमिका स्विकारण्याची गरज आहे.

खुप मोठया प्रमाणावर तांत्रिक संस्था सुरु केल्या गेलया आणि काळाच्या ओघात तंत्रज्ञान क्षेत्रातील विकासाची निष्पत्ती म्हणून IITs ने आंतरराष्ट्रीय स्तरावर सल्ला देणे सुरु केल आहे. IIM सारख्या व्यवस्थापन संस्थांमध्ये उत्तेजन होते आणि ते उच्च, पात्र, व्यवस्थापकीय मनुष्यबळातील गतीस्थापक बनलेले आहे.

## ८.२१ विकासाचा शैक्षणिक निष्पत्तीवरील परिणाम :

शैक्षणिक विकासाचे शालेय शिक्षणात आणि उच्च व तांत्रिक शिक्षणातील काही परिणाम सारांश रुपाने खालीलप्रमाणे दिले जाऊ शकतात.

**१) लोकशाही प्रक्रियेची माहिती =** लोकशाहीचे नागरिक शिक्षित असले तरच ती यशस्वी होऊ शकते सामुहिक शैक्षणिक कार्यक्रमाद्वारे शालेय शिक्षणाचा विस्तार करुन बहुतांश नागरिक जे कधीकाळी निरक्षर होते ते आता साक्षर बनले आहे. आणि सरकारच्या लोकशाही प्रक्रीयेबदद्ल जाणकार बनले आहे. आणि राष्ट्र उभारणी व राज्याच्या बाबीत सक्रीय सहभाग घेत आहेत.

**२) अधिकार व कर्त्यव्याची माहिती =** शिक्षण व्यक्तीचे राष्ट्रीयकरण करते की त्याने कर्तव्याप्रती जागरुकता वाढवावी तो राज्याच्या बाबींमध्ये स्वेच्छेने भाग घेतो तो त्याच्या अधिकाराबदद्ल सुध्दा जागरुक झाला आहे आणि हा शिक्षणाचा परिणाम आहे.

**३) लोकशाही तत्वप्रणालीतील विश्वास =** भारतीय नागरीकांनी लोकशाही तत्वप्रणालीत विश्वास ठेवलेला आहे आणि हे फक्त सर्व स्तरावरील शिक्षणाच्या प्रसाराद्वारे शक्य झाले. त्याला आता समजले आहे की जीवन म्हणजे फक्त एकूण भौतिक इच्छेचे समाधान नाही तर स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यासारखी तत्वे जोपासणे हे अधिक मूल्यवान आणि आवश्यक आहे.

**४) मानवी गुणांचा विकास =** फक्त शिक्षणाद्वारेच उच्च नैतिक मुल्ये, मनमिळाऊपणा, दानशुरपणा, संयम, दया, सहानुभूती, बंधुत्व इ. सारख्या गुणांचा विकास आणि वाढ होऊ शकते आणि ही बाब अधिकाधिक लोकांमध्ये दिसून येत आहे.

**५) राजकीय कर्तव्य निभावणे =** लोकशाहीत सरकार हे लोकांकडून निवडले जाते आणि म्हणून एक चांगले सरकार निवडण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. भारतात शिक्षणाच्या अभावी अज्ञानी लोकांनी चुकीच्या लोकांना मत द्यावे म्हणून त्यांचे मन वळविण्यात आले आणि त्याचा परिणाम म्हणून सरकार हे बऱ्याच वेळा अपयशी ठरले आहे.

**६) फसवणूकीस अटकाव =** लोकशाहीची तत्वे ही कोणत्याही प्रकारच्या फसवणूकीस विरोध करतात परंतु अर्थातच जर राजकीय, सामाजिक आणि आर्थिक फसवणूक नष्ट केली तर शिक्षित लोक हे त्यांच्या अधिकाराविषयी जागरुक आहेत आणि फसवणूकीविरुध्द लढण्याचे त्यांना प्रशिक्षण असते.

**७) संस्कृतीचे संरक्षण आणि प्रक्षेपण =** गतकाळाची सलगता ही फक्त संस्कृती आणि सामाजिक वारशाद्वारे टिकवली जाते आणि जे पुढील पिढीला फक्त शिक्षणाच्या माध्यमाद्वारे दिले जाते. म्हणून संस्कृतीच्या प्रक्षेपणासाठी शिक्षण गरजेचे आहे.

**८) नाविन्यपूर्ण कल्पनांचा फैलाव =** शिक्षणाचा प्रभाव हा विविध नाविन्यपूर्ण कल्पनांच्या प्रसारात दिसू शकतो. सरकार विविध विकास कार्यक्रम आणि खास करुन दुर्बल घटकांसाठी आणते. शिक्षण त्यांना त्या कार्यक्रमाचे फायदे आणि सूचित अर्थ समजण्यास मदत करते आणि ते त्या कार्यक्रमात स्वेच्छेने भाग घेतात.

**९) साक्षरतेकडे प्रचंड उडड्राण =** सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या दुसऱ्या क्रमांकाच्या देशातील निरक्षरता दूर करण्यासाठी सरकार व स्वयंसेवी संस्थांच्या वतीने प्रचंड प्रमाणावरील प्रयत्न गरजेचे आहेत. साक्षरतेचे विविध कार्यक्रम आणि इतर विकास कार्यक्रमामुळे, भारत लक्षणीय प्रगती गाठू शकतो.

**१०) जागतिक दर्जाचे तांत्रिक ज्ञान =** सात आण्विक देशांपैकी आता भारत एक देश आहे. आपल्या शास्त्रज्ञांनी जागतिक स्तराचे अवकाश संशोधन, अग्निबाण तंत्रज्ञान, IT, सागरीविज्ञान आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या इतर शाखांमध्ये त्यांच्या पाऊलखुणा उमटविल्या आहेत. आपण आरोग्य,शेती, लोकसंख्या शिक्षण इ. क्षेत्रात प्रगत तंत्रज्ञान विकसित केले आहे आणि जगातील इतर बऱ्याच देशांचे सल्लागार आहोत. हे सर्व शिक्षणातील विकासामुळे शक्य झाले.

शिक्षणाने इतर क्षेत्रातसुध्दा स्वागतार्थ विधायक बदल घडवून आणले आहेत.

**११) स्त्रियांच्या दर्जातील सुधारणा :**

**१२) शेती आणि उद्योगातील विकासाद्वारे आणि विकासातून आर्थिक विकास:**

**१३) जागतिक नेतृत्वाच्या स्तरावर भारत पोहोचला आहे:**

**१४) आर्थिक विकासामुळे खुदद् शिक्षण क्षेत्राच्या विविध पातळीतील प्रगती:**

**१५) वातावरणाच्या संरक्षणासाठी गरजेची जाण:**

**१६) लोकसंख्या निर्माण कार्यक्रम इ:**

तसेच तेथे इतर बाबी सुध्दा आहेत जसे अनुसुचित जाती, जमाती आणि मागासवर्गीय समाजाचे शिक्षण, अपंगांचे शिक्षण, अल्पसंख्यांकाचे शिक्षण इ. जे या पाठात सविस्तर चर्चिवले नाहीत.

**समीक्षा अभ्यास :**

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

१) जेव्हा UGC म्हणते की अयोग्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणे हे प्रत्येक बाबतीत खर्चिक आहे तेव्हा UGC कडून कोणती समस्या संदर्भिली गेली आहे ?

२) उच्च शिक्षणाच्या विकासासाठी NPE ने पुढे मांडलेल्या सूचना कोणत्या ?

३) भारतातील उच्च शिक्षणाच्या मुख्य उणिवा/दोष कोणते ?

४) बुध्दिमान विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी आणि उच्च शिक्षणातील अध्यापनाचा दर्जा वाढविण्यासाठी केंद्र सरकार आणि UGC ने कोणते प्रयत्न केले आहेत ?

५) तांत्रिक व व्यवस्थापन शिक्षणातील पायाभूत मांडणीतील सुविधा वाढविणे गरजेचे का आहे ?

६) निरंतर शिक्षण क्षेत्रातील NPE च्या अंमलबजावणीचा भाग म्हणून कोणत्या नवीन योजना सुरु केलेल्या आहेत ?

## ८.२२ स्वाध्याय

१) स्त्रियांचे शिक्षण वाढविण्यासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांची यादी करा. या बाबतीत तुम्ही अजून काय सुधारणा सुचवाल ?

२) शैक्षणिक निष्पत्तीवरील विकासाचा परिणाम थोडक्यात स्पष्ट करा.

३) शाळा व विद्यापीठ शिक्षणातील राजकियीकरणावर तुमचे मत मांडा, तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

४) सरकारद्वारा उच्च शिक्षणावरील खर्च पुरेसा आहे काय ? का ?

❖❖❖❖

# १

# विकासात्मक गरजांसाठी शिक्षण, वैश्विक नागरीकत्वासाठी शिक्षण, नागरिकत्व शिक्षणासाठी अभ्यासक्रम

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विकासात्मक गरजांचा अर्थ

१.३ वैश्विक नागरिकत्वाची पार्श्वभूमी आणि ओळख

१.४ वैश्विक नागरिकासाठी शिक्षण : नागरिकत्व शिक्षणाचा अभ्यासक्रम

१.५ सारांश

१.६ स्वाध्याय

## १.० उद्दिष्ट्ये :-

हा घटक वाचल्यावर तुम्हाला खालील गोष्टी करता येतील:

- विकासात्मक गरजांच्या संकल्पनेचे आकलन होईल.
- 'वैश्विक नागरिकत्वा'च्या संकल्पनेचे आकलन होईल.
- 'वैश्विक नागरिकत्वासाठी शिक्षणा'संबंधी ज्ञान प्राप्त होईल
- नागरिकत्वासाठी शिक्षणाच्या अभ्यासक्रमाच्या महत्वाचे वर्णन करु शकाल.

## १.१ प्रस्तावना :-

शिक्षण ही समाजात निरंतर सतत चालणारी कृती आहे. आणि ज्या समाजात ती चालते, त्याच्या स्वरुपावरुन, शिक्षणाची ध्येये व पध्दती ठरत असतात. शिक्षण हे समुदायाच्या भौतिक व सामाजिक गरजांनुसार असले पाहिजे. सद्य परिस्थितीत, वैश्विकीकरणामुळे सामाजिक-आर्थिक परिस्थितीत खूपच बदल झालेला आहे. शिक्षण प्रणाली ही महत्वाकांक्षी समाजाच्या बदलत्या गरजानुसार असावी. विकासात्मक गरजांसाठी अशी दर्जेदार शिक्षण प्रणाली आवश्यक असते की, ज्याचा अभ्यासक्रम परिवर्तनशील आहे आणि ज्यात एकत्रित संस्था निहाय शिकण्याची व विकासाची प्रक्रिया आहे, शैक्षणिक संशोधनाला महत्व आहे, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये नवी तंत्रज्ञानाचा व पध्दतींचा समावेश आहे.

## १.२ विकासात्मक गरजांसाठी शिक्षण :-

मानव विकास अहवाला (२००४) (Human Development Report) नुसार, मानव विकासाच्या कल्पना हया नवीन नाहीत. त्या कमीत कमी ॲरिस्टोटलच्या काळाइतक्या जुन्या आहेत. ॲरिस्टॉटलच्या म्हणण्याप्रमाणे, संपत्ती ही उघडपणे आपण प्राप्त करु इच्छितो अशी वस्तू नसून, त्याचा उपयोग आपण दुसरे काहीतरी प्राप्त करण्यासाठी करतो (म्हणजेच, संपत्ती ही एवादी वस्तू नसून दुसरे काहीतरी प्राप्त करण्यासाठी लागणारे माध्यम आहे). आर्थिक प्रगती हे फक्त एक साधन आहे, आर्थिक वाढ हा मानव विकासाचा निकष नाही. मानव विकासासाठी शिक्षणाने खालील कार्य क्षमतांवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे – आरोग्यपूर्ण दिर्घायुष्य (ज्ञानी), माहितगार असणे, सामाजिक जीवनाची संधी. विकासात्मक गरजांसाठीच्या शिक्षणातून खालील गोष्टी साध्य करणे आवश्यक आहे. जन्माच्या वेळी मोजलेल्या आर्युमर्यादेनुसार दिर्घायुष्यी व निरोगी जीवन, प्रौढ शिक्षणाचा दर, तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या पटसंख्येनुसार ज्ञान (शिक्षण) , मोजलेल्या दरडोई उत्पन्नानुसार योग्य राहणीमान, शिक्षण, आरोग्य आणि संशोधन व धोरण नियोजन, अंमलबजावणी हया सर्व क्षेत्रात पूर्णपणे दर्जात सुधारणा व त्याची वेळोवेळी देखरेख केली गेली पाहिजे.

## १.३ वैश्विक नागरिकत्वाची पार्श्वभूमी आणि ओळख :-

पूर्वी आवश्यक विषयांच्या श्रेणीची मोठी परंपरा नव्हती. नागरिकत्व हा एक घटक समजला जात असे. ब्रिटीशांनी औपचारिकपणे नागरिकत्व शिक्षण देण्यास उत्तेजन दिले. शाळांना, नागरिकत्वाचे शिक्षण कसे दयायचे, याबाबत ठरविण्याची मुभा होती. पण प्राथमिक शाळेच्या शिक्षकांना, येवढया लहान मुलांना नागरिकत्वाचे शिक्षण देण्याचे औचित्य पटले नाही आणि माध्यमिक पातळीवर विविध विषयांच्या गोंधळात नागरिकत्वाचे शिक्षण मागे पडले.

२००२ मध्ये, प्रोफेसर बर्नार्ड क्रिक, यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या स्वतंत्र समितीने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार, माध्यमिक शाळेमध्ये, नागरिकत्व हा राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा पायाभूत विषय बनला, त्याला वैधानिक दर्जा प्राप्त झाला. हयाच्या उलट, प्राथमिक शाळेत, नागरिकत्व वैयक्तिक, सामाजिक व आरोग्य शिक्षणाचा (PSHE) एक भाग म्हणून शिकवावा, म्हणून 'उत्तेजन' दिले गेले. त्याप्रमाणे पात्रता आणि अभ्यासक्रम मंडळाने (QCA) PSHE आणि नागरिकत्व एकत्रित शिकविण्यासाठी एक न वैधानिक आराखडा प्राथमिक शाळांसाठी प्रसिध्द केला.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये २००८ पासून राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय अभ्यासक्रमामध्ये तीन मुख्य उदिद्ष्टये सांगितलेली आहेत, ज्यातून खालील गोष्टी साध्य होतील –

- प्रगती करतील असे विद्यार्थी
- आत्मविश्वासी व्यक्ती, की ज्या सुरक्षित व निरोग्य आयुष्य जगून, समाजाच्या प्रगतीला हातभार लावतील असे (सुजाण)/जबाबदार नागरिक

ही उदिद्ष्टये नागरिकत्व शिक्षणाला महत्व देतात पण नागरिकत्व शिक्षण हे प्राथमिक पातळीवर वैकल्पित असताना, ती कशी साध्य करायची हे कळत नाही. असे म्हंटले जाते, की प्राथमिक वर्षात सामाजिक प्रगती होते आणि शिक्षक व समाजाप्रती निरोगी दृष्टिकोन विकसित होण्यासाठी हा महत्वाचा टप्पा असतो. म्हणूनच प्राथमिक पातळीवर नागरिकत्व शिक्षणाची सुरुवात झाली.

२००२ मध्ये एक मोठा बदल झाला - नागरिकत्व हा वैधानिक (आवश्यक) विषय म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रमात समाविष्टित केला गेला. शालेय अभ्यासक्रमाचा भाग म्हणून तो ११-१६ वर्षे वयाच्या मुलांना इंग्रजीतून शिकविला जातो.

मुलांनी यशस्वी अध्ययनार्थी व्हावे, आत्मविश्वासी व्हावे आणि समाजाच्या भल्यासाठी कार्य करणारे जबाबदार नागरिक व्हावे हया राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या ध्येयांना, इंग्लंडचा 'नागरिकत्वासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम' आधारभूत ठरतो.

नागरिकत्वाचा अभ्यासक्रम हा मुलांनी आकलन करायला हव्यात अशा (लोकशाही, न्याय, हक्क आणि जबाबदाऱ्या, समानता आणि भिन्नत्व) महत्वाच्या संकल्पनांवर व विकसित करायला हव्यात अशा महत्वाच्या प्रक्रिया व क्षमतांवर (टिकाकुशल विचार करणे, शोध घेणे, समर्थन करणे, प्रतिनिधीत्व करणे, योग्य माहितीवर आधारलेले जबाबदारीपूर्वक कृती करणे) आधारित आहे. नागरिकत्वासाठी असलेल्या राष्ट्रीय अभ्यासक्रम शिकविण्यासाठी विविध प्रकारचा आशय त्यात समाविष्ट केलेला आहे - राजकारण आणि सरकार, कायदा व्यवस्था, प्रसार माध्यमे, बहुसंस्कृतीवाद, समान संधी, मानवी हक्क आणि वैश्विक शिक्षण-शिक्षक घटकानुरुप, राजकीय व सामाजिक मुदद्‌े नागरिकत्वाचे मुदद्‌े जीवनाशी जोडताता आणि त्यातून विद्यार्थ्यांना संशोधन, चर्चा व वादविवादासारख्या महत्वाच्या नागरिकत्वाच्या क्षमता तसेच दुसऱ्यांची मते मांडणे, टिकाकुशलपणे विचार करणे, मूल्यमापन करणे व आपले विचार प्रगट करणे या गोष्टी विकसित करण्यास मदत करतात. नागरिकत्वाच्या अभ्यासक्रमचा मुख्य उदद्येश विद्यार्थ्यांच्या समाजात वावरण्याच्या क्षमता विकसित करणे व आणि समाजात जाणकार, मार्मिक आणि जबाबदार नागरिक घडविणे. 'कार्यक्षम नागरिकत्व' चा उददेश हा मुलांना एकत्र काम करायला व प्रत्यक्ष कृती करायला लावणे आणि नागरिकत्वाच्या ज्ञानाचा उपयोग करुन चांगला समाज घडविणे हा आहे.

**उदा.** मानवी हक्क, विविधता आणि असमानता त्याचा अभ्यास केल्यावर विद्यार्थी 'वंशविद्वेषावंर आधारित एखाद्या प्रकल्प आपल्या शाळेत किंवा परिसरात सुरु करण्याचे ठरवितात.

शिकविण्याची पध्दती ही लोकशाहीवादी असावी - शास्त्रीय तपास, माहिती पुरविणारी, संभाषणात्मक, प्रयोगशाळा आणि स्वयंशोधन पध्दती, हया पध्दतींचा वापर करुन, वैश्विक पातळीवरील नागरिकत्वाची भावना निर्माण केली पाहिजे.

### परिणामकारक नागरिकत्वाची व्याख्या:

परिणामकारक नागरिकत्वामुळे, सध्याच्या जगात बौध्दिक शक्तीचा परिणामकारक कृतीशी मेळ घालता येतो. जागतिक नागरिकत्वाची कल्पना खूप विस्तीर्ण आहे. हयात वैश्विक

प्रश्नांचे सखोल ज्ञान आणि त्यांचे आकलन करण्याची प्रभावी क्षमता हयांचा समावेश होतो. जागतिक नागरिकाला सामाजिक व भौतिक, वैश्विक शक्तींचे, त्यांचा व्यक्तीवर होणारा परिणाम, संस्कृती व सांस्कृतिक फरक, हयाचे ज्ञान असते. तो जागतिक प्रश्नांचे वेगवेगळया दृष्टिकोनातनू विश्लेषण करु शकतो आणि जगाबदद्लच्या नवीन कल्पना निर्माण करु शकतो. थोडक्यात, जागतिक नागरिकाच्या बौध्दिक क्षमता हया चांगल्या विकसित असाव्या लागतात.

दुसरे म्हणजे, जागतिक नागरिकाला स्वतः बदद्लची जागतिक दृष्टिकोनातून जाण असली पाहिजे. ही स्वतः बदद्लची जाण हे मर्यादित अस्तित्वापुरती संकुचित असू नये. वैश्विक 'स्व' ची कल्पना निर्णायक आहे कारण त्याशिवाय जागतिक नागरिकत्वाला आवश्यक बौध्दिक क्षमता विकसित होणार नाहीत.

शेवटी, जागतिक नागरिकत्वामध्ये तत्कालीन जगाशी नैतिकदृष्टया आणि परिणामकारक पध्दतीने जुळते घेणे आवश्यक असते. हयात, ज्ञान व आकलनाचा उपयोग कृतीत आणण्याच्या क्षमतेचा समावेश होतो.

हे तीन मुख्य घटक जागतिक नागरिकत्वासाठी आवश्यक आहेत आणि ते एकमेकांना पूरक आहेत.

## १.४ जागतिक नागरिकाचे शिक्षण, नागरिकत्व शिक्षणासाठी अभ्यासक्रम :

**परिणामकारक नागरिकाचे गुण:**

बौध्दिक क्षमता, स्वतःची ओळख व त्याचा विकास, कृती आणि त्यासाठी आवश्यक, तत्कालीन जगात लागणारी कार्यक्षमता हे परिणामकारक नागरिकासाठी आवश्यक घटक आहेत.

जगाचे ज्ञान व त्या ज्ञानाचा विधायक उपयोग करण्याचे बौध्दिक कौशल्य हया बौध्दिक क्षमता जागतिक नागरिकत्वासाठी आवश्यक आहेत. हया क्षमतांमध्ये ज्ञान, प्रक्रिया व फलित हयांचा समावेश असतो. आपल्या आयुष्यावर परिणाम करणारे घटक - भौतिक आणि सामाजिक व त्यांची ऐतिहासिक पाश्र्वभूमी हयांची जाण आवश्यक आहे.

बहुशाखीय दृष्टिकोन (Multidisciplinary perspective) ही अशी क्षमता आहे की ज्यामुळे वेगवेगळया ज्ञान शाखांचे आकलन करुन, त्यातील चांगल्या बाबींचा उपयोग करता येतो. बहुतेक महत्वाचे जागतिक प्रश्न हे मानवी आकलनाच्या पलिकडचे असतात. ते सोडविण्यासाठी विविध शाखांतील बौध्दिक पध्दतींचा एकत्रित वापर आवश्यक असतो.

अध्ययन पध्दती लोकशाही असावी. वैश्विक नागरिकत्वाची जाण येण्यासाठी शास्त्रीय तपास, माहिती पुरविणे, संभाषाणत्मक पध्दती, प्रयोगशाळा व स्वंयशोधन पध्दती वापराव्यात.

**शिस्त:** ज्या शिक्षणातून स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित होत नाही, असे शिक्षण मिळविण्यापेक्षा, ते न मिळणे जास्त चांगले.

-थॉमस हॉडग्स्क्रिन

स्वतःच स्वतःवर घातलेली बंधने ही सर्वात योग्य शिस्त आणि अशा प्रकारच्या शिस्तीसाठी आवश्यक शिक्षणातून स्वातंत्र्य आणि निर्बंध हे प्रत्येक संस्थेने रुजविले पाहिजेत. मार्टिन ल्युथर किंग हयांनी असे म्हंटले आहे की, ''आपलयाकडे नियंत्रित क्षेपणास्त्रे आणि अनियंत्रित माणसे आहेत. आपल्या भल्यासाठी खाजगी व सार्वजनिक जीवनात नीतीमत्ता बिंबवून हे बदलले पाहिजे.

**शिक्षण आणि शिक्षकाची भूमिका :**

शिक्षण म्हणजे, ढोबळमानाने कोणतीही कृती किंवा अनुभव की ज्यामुळे व्यक्तीच्या मानसिक नैतिक किंवा शारिरीक जडणघडणीवर परिणाम होतो. तांत्रिक भाषते सांगायचे तर, समाज ज्या प्रक्रियेतून संग्रहित ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणून बुजून संक्रमित करतो, त्याला शिक्षण असे म्हणतात.

शैक्षणिक संस्थांमध्ये, शिक्षक शैक्षणिक प्रक्रियेला दिशा देतात आणि आपल्या देशातील लोकशाही पध्दती लक्षात ठेवून, वाङ्मय, गणित, शास्त्र, इतिहास, भूगोल, पर्यावरण शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, समाजोपयोगी उत्पादन कार्य (SUPW) इ. विषयांवर भर देतात. विविध क्षेत्रातील व्यावसायिक शिक्षणही आहे. उदा. वैमानिक या खेरीज, अनौपचारिक पातळीवर विविध प्रकारची शिक्षण क्षेत्रे आहेत उदा. वस्तुसंग्रहालये, वाचनालये, आंतरजाल आणि जीवनातील अनुभवातून शिक्षण. आता शिक्षणासाठी विविध अपारंपारिक पर्याय उपलब्ध आहेत.

## १.५ सारांश :-

शिक्षण आयोगानुसार आपण विज्ञान व मूल्ये एकत्र आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरुन, असा समाज निर्माण होईल की ज्यात व्यक्तीच्या एखाद्या अंगाचाच विकास न होता, व्यक्तीचा सर्वांगीण विकास होईल. जागतिक नागरिक तयार करण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोन हा जीवनाचा व संस्कृतीचा एक भाग बनला पाहिजे शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमुळे, आंतरराष्ट्रीय जाण निर्माण होऊन, वैश्विक नागरिकत्वासाठी आपल्या समाजाची खऱ्या अर्थाने तयारी व्हायला पाहिजे.

## १.६ स्वाध्याय :-

१. विकासात्मक गरजांची संकल्पना विषद करा .

२. विकासात्मक गरजा शिक्षण समर्थपणे कसे पेलते ?

३. जागतिक नागरिकत्वासाठी अध्यापन पध्दती व अभ्यासक्रम रचना कशी असावी ?

❖❖❖❖

# अभ्यासक्रम

## एम. ए. भाग -१, शिक्षणशास्त्र अभ्यासपत्रिका क्र.१

## शिक्षणातील प्रगत तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र

## (शिक्षणातील प्रगत समाजशास्त्र)

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :**

विद्यार्थ्यांस खालील गोष्टी करण्यास मदत करणे :

- शिक्षणातील समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचे आकलन करणे.
- शिक्षकांच्या व्यावसायिक, आंतरजाल (सामीजीकरणाच्या) प्रक्रियेचे आकलन करणे.
- शिक्षणाचा सामाजिक स्तरीकरण व राष्ट्रीय विकास ह्यातील संबंध जाणणे.
- सामाजिक दृष्टिकोनातून, शाळा व शिक्षकांकडून अपेक्षा ह्यातील संबंध जाणणे.

**भाग १ : शिक्षणाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन :**

**१. शिक्षणाचे समाजशास्त्र :**

शिक्षणाच्या समाजशास्त्राचा अर्थ व व्याप्ती. शिक्षणाचे समाजशास्त्र व शैक्षणिक समाजशास्त्र ह्यातील फरक. शिक्षणाचे समाजशास्त्र शिकण्याची आवश्यक समाजात शिक्षणाची कार्ये, शिक्षणाच्या समाजशास्त्राची तात्त्विक बैठक :

अ) व्यावहारिकतावाद (Functionalism)

ब) संघर्ष सिद्धांत (Conflict Theory)

क) अन्योन्य क्रियात्मकता (Interactionism)

ड) खुली प्रणाली दृष्टिकोन (Open System Approach)

**२. शिक्षकांचे व्यावसायिक आंतरजाल (सामाजीकरण) :**

अर्थ, शिक्षकांच्या व्यावसायिक आंतरजालाचे टप्पे व अवस्था, व्यावसायिक – एक हितसंबंधी गट, व्यावसायिक व संस्थानिहाय प्रश्न, प्रशासक, सहकारी, विद्यार्थी आणि पालकांशी संबंध, विद्यार्थी नियंत्रणासंबंधीचे विचार.

**भाग २: शिक्षण, सामाजिक स्तरीकरण आणि विकास :**

**३. शिक्षण आणि सामाजिक स्तरीकरण :**

अर्थ, सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार व कारणे. स्तरीकरणाची प्रक्रिया. स्तरीकरणाची प्रमुख स्पष्टीकरणे : अ) व्यावहारिकतावाद, संघर्ष, नवमार्क्सवादी आणि पुननिर्माण सिद्धांत. ब) सामाजिक वर्गाचे निर्णायक घटक. क) समतेची उद्दिष्टे : संधी,

सहभाग आणि फलित समतेचे प्रकार : मूलभूत, उदारमतवादी आणि पुरोगामी. सामाजिक न्यायाचा उदारमतवादी आणि विभाजन नमुना. ड) स्तरीकरण आणि शिक्षणाच्या समान संधी. भारतीय संदर्भात, विधायक भेदाभेद. हानीपूरक (Compensatory) शैक्षणिक कार्यक्रम.

**४. शाळेत जाणे आणि शिक्षकांच्या अपेक्षा, ह्यांचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम :**

शाळेत जाण्यामुळे व्यक्तीवर होणारा परिणाम पडताळ्याच्या पद्धती अ) ज्ञान आणि बौद्धिक विकास, ब) सामाजिक व आर्थिक फलिते, क) कामाच्या जागेची परिस्थिती, ड) सामाजिक सहभाग, इ) मानसिक स्वास्थ, फ) कुटुंबाचे परिणाम, ग) मूल्ये, ह) फुरसतीचा वेळ आणि य) राजकीय सहभाग. स्व-पूर्ततेचे भाकित. शिक्षकांच्या अपेक्षेचे स्त्रोत आणि त्याचा विद्यार्थी संपादन, प्रेरणा आणि 'स्व' संकल्पना.

**५. शिक्षण आणि विकास :**

शिक्षणाचे आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासावर परिणाम विकासाचे शैक्षणिक फलितांवर, (मुख्यत्वेकरुन सर्वसामान्यांसाठीचे शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण) विकासाचे चल म्हणून परिणाम. विकासात्मक गरजा भागविण्यासाठी शिक्षण. वैश्विक नागरिकत्वासाठी शिक्षण. नागरिकत्व शिक्षणासाठी अभ्यासक्रम.

**अंतर्गत मूल्यमापनासाठी स्वाध्याय :**

१. सद्य भारतीय परिस्थितीच्या संदर्भात, शिक्षण आणि सांस्कृतिक विकास ह्यांच्या परस्पर संबंधावर चिकित्सक निबंध लिहा.

२. सद्य भारतीय परिस्थितीत, शाळेचे व्यक्तीवर होणाऱ्या परिणामांवर चिकित्सक निबंध लिहा.

❖❖❖❖